सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०१६-१७



अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०१६-१७

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# प्रस्तावना

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग ‘महाराष्ट्राची आर्थिक पाहणी’ हे प्रकाशन राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०१६-१७ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ५६ वा अंक आहे.

२. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी शक्य त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत. हे प्रकाशन भारतातील सर्व राज्यांच्या महत्वाच्या सांख्यिकीची समयमालिकानिहाय अद्ययावत माहिती आणि निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक उपलब्ध करून देते. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरुपातील आहेत.

३. केंद्र व राज्य शासनाचे संबंधित विभाग व उपक्रम यांनी उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

प्र. दि. सोहळे
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : १७ मार्च, २०१७

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६-१७

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | **१** |
| **अ.** | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | **३** |
| **ब.** | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | **६** |
| **१.** | **राज्य अर्थव्यवस्था** | **९** |
| **२.** | **लोकसंख्या** | **१३** |
| **३.** | **राज्य उत्पन्न** | **२१** |
| **४.** | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | **३९** |
| **५.** | **लोकवित्त** | **६५** |
| **६.** | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | **७७** |
| **७.** | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>दुग्ध विकास<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | **८७** |
| **८.** | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | **१२३** |
| **९.** | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | **१४९** |
| **१०.** | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल कल्याण<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय<br>मानव विकास | **१७७** |
| **११.** | **विशेष अभ्यास** | **२४५** |
| | **व्याख्या सूची** | **२५१** |
| **क.** | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | **२५८** |

# परिशिष्टे



| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारित लोकसंख्या | १९ |
| **परि. २.२** | महाराष्ट्राची जनगणनांवर आधारित राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या | १९ |
| **परि. २.३** | जिल्हानिहाय लोकसंख्याविषयक निर्देशक - जनगणना २०११ | २० |
| **परि. ३.१** | मूळ किंमतींनुसार स्थूल राज्य मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्न - चालू किंमतींनुसार | २७ |
| **परि. ३.२** | मूळ किंमतीनुसार स्थूल राज्य मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | २८ |
| **परि. ३.३** | मूळ किंमतींनुसार निव्वळ राज्य मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - चालू किंमतींनुसार | २९ |
| **परि. ३.४** | मूळ किंमतींनुसार निव्वळ राज्य मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार निव्वळ राज्य उत्पन्न -स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | ३० |
| **परि. ३.५** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न - चालू किंमतींनुसार | ३१ |
| **परि. ३.६** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | ३२ |
| **परि. ३.७** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ उत्पन्न - चालू किंमतींनुसार | ३३ |
| **परि. ३.८** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | ३४ |
| **परि. ३.९** | स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - चालू किंमतींनुसार | ३५ |
| **परि. ३.१०** | स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - स्थिर किंमतींनुसार | ३६ |
| **परि. ३.११** | दरडोई स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - चालू किंमतींनुसार | ३७ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ४९ |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ५० |
| **परि. ४.३** | निवडक राज्यांसाठी केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेला ग्राहक किंमती निर्देशांक | ५१ |
| **परि. ४.४** | महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५२ |
| **परि. ४.५** | औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ५३ |
| **परि. ४.६** | महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ५४ |
| **परि. ४.७** | महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ५५ |
| **परि. ४.८** | अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक | ५६ |
| **परि. ४.९** | महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर | ५७ |
| **परि. ४.१०** | जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर २०१६ रोजी) | ५८ |
| **परि. ४.११** | अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना वाटप केलेला तांदूळ व गहू | ५९ |
| **परि. ४.१२** | भारत सरकारकडून राज्याला मिळालेले नियतन | ५९ |
| **परि. ४.१३** | जिल्हावार उपलब्ध गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या | ६० |
| **परि. ४.१४** | अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वाटप | ६१ |
| **परि. ४.१५** | अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१६-१७ करीता अन्नधान्याचे डिसेंबर पर्यंत नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वाटप | ६३ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ५.१** | दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प | ७२ |
| **परि. ५.२** | अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल | ७३ |
| **परि. ५.३** | अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चाचे कल | ७४ |
| **परि. ५.४** | वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे | ७५ |
| **परि. ५.५** | शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च | ७६ |
| **परि. ६.१** | सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज | ८४ |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०१६-१७) | ८५ |
| **परि. ७.१** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता | ११३ |
| **परि. ७.२** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | ११६ |
| **परि. ७.३** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र | ११७ |
| **परि. ७.४** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | ११८ |
| **परि. ७.५** | राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र | ११९ |
| **परि. ७.६** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी | १२० |
| **परि. ७.७** | महाराष्ट्रातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी | १२१ |
| **परि. ८.१** | महाराष्ट्रातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत) | १४१ |
| **परि. ८.२** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | १४३ |
| **परि. ८.३** | महाराष्ट्रातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य | १४४ |
| **परि. ८.४** | महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन | १४५ |
| **परि. ८.५** | महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा तपशील | १४६ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेचा पुरवठा व वापर | १७२ |
| **परि. ९.२** | महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील) | १७३ |
| **परि. ९.३** | जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) | १७४ |
| **परि. ९.४** | महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने | १७५ |
| **परि. १०.१** | विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या | २२९ |
| **परि. १०.२** | सन २०१६-१७ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २३० |
| **परि. १०.३** | सन २०१६-१७ मधील तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २३१ |
| **परि. १०.४** | सन २०१६-१७ मधील कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २३२ |
| **परि. १०.५** | सन २०१६-१७ मध्ये कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २३३ |
| **परि. १०.६** | राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्वस्थ संस्था रुग्णालये) | २३४ |
| **परि. १०.७** | राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर | २३५ |
| **परि. १०.८** | काम करणाऱ्या लोकांची जनगणना २०११ नुसार आर्थिक वर्गवारी | २३६ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. १०.९** | महाराष्ट्रातील विविध उद्योगांतील सरासरी दैनिक रोजगार | २३७ |
| **परि. १०.१०** | महाराष्ट्रातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार | २३८ |
| **परि. १०.११** | राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | २३९ |
| **परि. १०.१२** | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर २०१६ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या | २४० |
| **परि. १०.१३** | महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या विविध कामांच्या प्रकारानुसार संख्या व त्यावरील खर्च | २४१ |
| **परि. १०.१४** | महाराष्ट्रातील औद्योगिक विवाद ** | २४२ |
| **परि. १०.१५** | जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११ | २४३ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा नैसर्गिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड - चिरोली - गायखुरी या डोंगररांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत. राज्याला वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, पूर्वेस छत्तीसगढ, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा यांनी वेढले आहे.

राज्याचे हवामान उष्ण कटिबंधीय मोसमी आहे. मार्चपासून सुरु होणारा व अंगाची काहिली करणाऱ्या उन्हाळ्या पाठोपाठ जूनच्या सुरुवातीला पाऊस येतो. पावसाळ्यातील हिरवळीने लपेटलेले आल्हाददायी वातावरण, ऑक्टोबरच्या त्रासदायक वातावरणानंतर येणाऱ्या हिवाळ्यात टिकून राहते.

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून त्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३.०८ लक्ष चौ. किमी आहे. जनगणना २०११ नुसार राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून ४५.२ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून बहुतांशी प्रमुख खाजगी कंपन्या व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख शेअर बाजार व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू विनिमय केंद्रे मुंबईत आहेत. राज्यात ३६ जिल्हे असून ते कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या सहा महसुली विभागात विभागले आहेत.

चांगल्या प्रकारे विकसित पायाभूत सुविधा, मुबलक नैर्सगिक साधनसंपत्ती, सर्व प्रमुख भागांशी दळणवळण, कुशल मनुष्य बळ आणि दर्जेदार शिक्षण यामुळे महाराष्ट्र हे नविन उद्योगधंदे उभारणीसाठी आदर्श स्थान बनले आहे. राज्याने पायाभूत सुविधा आणि स्मार्ट शहरे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

शेती हा महाराष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. राज्यात अन्नधान्याची व नगदी अशी दोन्ही पिके घेतली जातात.

महाराष्ट्र हे केवळ भौगोलिक सीमांनी रेखाटन केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. नैर्सगिक तसेच सांस्कृतिक वैविध्य या बाबी राज्याची अद्वितीय मराठी संस्कृती विकसित होण्यास सहाय्यभूत झाल्या आहेत. स्वत:ची अध्यात्मिक बैठक असलेले हे राज्य 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते.

महाराष्ट्रात विविध चालीरिती व परंपरा एकत्रितपणे शांततेत नांदत आहेत. हे राज्य संगीत व नृत्य कलेत पारंगत असल्याने देशात सुप्रसिध्द आहे. लावणी, भारूड, पोवाडा, गोंधळ या राज्याच्या प्रमुख लोककला आहेत व त्या महाराष्ट्राच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम योगदानाचे प्रतिनिधीत्व करतात. तसेच महाराष्ट्राला उत्कृष्ट नाट्य परंपरा लाभली आहे. जगातील सर्व मुख्य धार्मिक सण शांततेत व एकोप्याने महाराष्ट्र राज्यात साजरे केले जातात. देशाच्या सामाजिक व राजकीय वर्तुळात राज्याने लक्षणीय भूमिका बजावली आहे.

अजंठा, वेरूळ व घारापुरीची लेणी, गेट वे ऑफ इंडिया आणि विहार व चैत्य अशा वास्तूशास्त्राच्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तू यामुळे जगभरातील पर्यटक राज्याकडे आकर्षित होतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य हे पारंपारिक धार्मिक पर्यटन व पर्यावरणीय पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. मानव विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्तिमत्वे राज्यात उदयास आली आहेत. क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यामध्ये राज्याचे भरीव योगदान आहे. राज्यात 'बॉलीवूड' नावाने जगप्रसिध्द असलेला चित्रपट उद्योग स्थित आहे.

वरील सर्व बाबींमुळे महाराष्ट्रातील जीवनमान प्रगतीशील व गतीमान बनले आहे.

* * * * *

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०१५-१६ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. **भौगोलिक क्षेत्र** - (हजार चौ.कि.मी.) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| २. **प्रशासकीय रचना -** | | | | | | | |
| महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३६ |
| तालुके | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५[@@] | ३५५[@@] |
| वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४०,९५९ | ४०,९५९ |
| वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | २,७०६ | २,७०६ |
| शहरे [#] | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ |
| ३. **जनगणनेनुसार लोकसंख्या -** (हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०११) |
| एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| अनुसूचित जाती | २,२२७ | ३,१७७ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| अनुसूचित जमाती | २,३९७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| लोकसंख्येची घनता (प्रती चौ.कि.मी.) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५७.१ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२२ | ३१.१७ | ३५.०३ | ३८.६९ | ४२.४३ | ४५.२ | ४५.२ |
| ४. **राज्य उत्पन्न** - (चालू किंमतीनुसार) | | | | | | | |
| राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | १७,४८,७७१[+†] |
| कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | १,७१,८९८[+††] |
| उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ४,९०,०९६[+††] |
| सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | ८,३९,६५१[+††] |
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | १,४७,३९९[+] |
| ५. **पर्जन्य** — सरासरीशी तुलना (%) | | | | | | १०२.३ | ९४.९ |
| ६. **कृषि** - (क्षेत्र हजार हेक्टरमध्ये) | | | | | | | |
| निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०६ | उ. ना. |
| पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २३,१७५ | उ. ना. |
| स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | @ | @ |
| *त्यापैकी* लाभ क्षेत्र ^ | २२६[$] | ४२२ | ७१८ | १,०७६[$$] | १,७६४[##] | २,९५५[##] | २,४४७[##] |
| स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | उ. ना. | उ. ना. |
| ७. **प्रमुख पिकांखालील क्षेत्र -** (हजार हेक्टरमध्ये) | | | | | | | |
| तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१६ | १,५०३ |
| गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ | ९११ |
| ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० | ३,२१७ |
| बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ | ८०१ |
| सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १०,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९८५ | ७,६६७ |
| सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ | ३,५४४ |
| सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२३ | ११,२१० |

उ. ना. - उपलब्ध नाही @@ मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील ३ तालुके वगळून # गणना शहरांसह + पहिले सुधारित अंदाज (पायाभूत वर्ष २०११-१२)
† बाजार किंमतींनुसार अंदाज †† मूळ किंमतींनुसार अंदाज टीप:राज्य उत्पन्नाचे १९६०-६१ ते २०१०-११ चे अंदाज घटक खर्चावर आधारित आहेत.
@ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. २६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये माहिती संकलनाच्या पद्धतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
$ १९६१-६२ $$ १९९१-९२ ## प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कालव्यावरील, उपसा व धरणातून नदी नाल्यामध्ये सोडलेल्या तसेच लाभक्षेत्रातील विहिरीव्दारे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र.
^ जलसंपदा विभागाकडून निर्मित लाभक्षेत्र

## अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| | बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०१५-१६<br>(८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | १,०४१ | उ. ना. |
| | ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ | ९८७ |
| | कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ | ४,२०७ |
| | भूईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३९५ | ३०९ |
| **८.** | **प्रमुख पिकांचे उत्पादन -** | | | | | | | |
| | (हजार टनात) | | | | | | | |
| | तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९१ | २,५९३ |
| | गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ | ९८१ |
| | ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ | १,२०५ |
| | बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ | ३३३ |
| | सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३१७ | ६,८९६ |
| | सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ | १,४३२ |
| | सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३४ | १५,४१३ | ८,३२८ |
| | ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ | ६९,२३५ |
| | कापूस (रुई)# | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ | ३,९१४ |
| | भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४७० | ३३४ |
| **९.** | **कृषि उत्पादनाचा निर्देशांक**@ - | -- | -- | -- | १३६.५ | १२७.४ | २२३.८ | १४१.२ |
| **१०.** | **कृषि गणना -** | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२००५-०६) | (२०१०-११) |
| | वहिती खातेदारांची संख्या (हजारात) | -- | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,७१६ | १३,६९९ |
| | वहिती क्षेत्र (हजार हेक्टर्समध्ये) | -- | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | २०,००५ | १९,७६७ |
| | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | -- | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४६ | १.४४ |
| **११.** | **पशुधन गणना -** | (१९६१) | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) | (२०१२) |
| | एकूण पशुधन (हजारात) | २६,०४८ | २५,४४९ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५५ | ३२,४८९ |
| | एकूण कोंबड्या-बदके (हजारात) | १०,५७८ | ९,९०२ | १८,७५१ | २४,८३० | ३५,३९२ | ६४,७५६ | ७७,७९५ |
| | | | | | | | (२००३) | (२००३) |
| | ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ |
| **१२.** | **वन क्षेत्र** (चौ.कि.मी.) | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,६२२* |
| **१३.** | **औद्योगिक गुंतवणूक**$ - | | | | | | (२०१५-१६) | (२०१६-१७) |
| | मंजूर प्रकल्प (संख्या) | -- | -- | -- | -- | -- | १९,१७५ | १९,४३७ |
| | प्रस्तावित गुंतवणूक (₹ कोटी) | -- | -- | -- | -- | -- | ११,०९,१५८ | ११,३७,७८३ |
| **१४.** | **वीज** - (दशलक्ष कि.वॅ.तास) | | | | | | | |
| | एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ | १,१३,७८७ |
| | एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९६ | १,१६,७४३ |
| | औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४०,२३१ |
| | कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २८,२३६ |
| | घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २७,००१ |

* अस्थायी # कापसाचे उत्पादन १७० किलोची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये

@ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १०० $ ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०१५-१६ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१५. बँका - (अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून १९७१) | (जून १९८१) | (जून १९९१) | (जून २००१) | (जून २०१०) | (जून २०१५) |
| बँक कार्यालये | उ.ना. | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,०३७ | ११,४०४ |
| | | | | (मार्च १९९१) | (मार्च २००१) | | |
| ग्रामीण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ.ना. | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,१७० | ३,१३१ |
| **१६. शिक्षण+ -** | | | | | | | |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | ९८,२१९ |
| विद्यार्थी (हजारात) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १६,०४४ |
| माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | २५,०२९ |
| विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | ६,४२४ |
| **१७. आरोग्य -** | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | ( २०१५) |
| रुग्णालये | उ.ना. | २९९ | ५३० | ७६८ | १,१०२ | १,३६८ | १,४०२ |
| दवाखाने | उ.ना. | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,५४४ | ३,०१२ | ३,०८७ |
| दर लाख लोकसंख्येमागे खाटा | उ.ना. | ८८ | ११४ | १४४ | १०६ | १०३ | १०८ |
| | | | | | | | (२०१५) |
| जन्मदर@ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १६.७ | १६.३ |
| मृत्युदर@ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.३ | ५.८ |
| अर्भक मृत्युदर@ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २५ | २१ |
| **१८. वाहतूक -** | | | | | | | |
| रेल्वे मार्गाची लांबी (किलोमीटर) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,१२७ |
| एकूण रस्त्यांची लांबी (किलोमीटर)† | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | ३,००,७८९ |
| *त्यापैकी* पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | २,४५,२१४ |
| मोटार वाहने (हजारात) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | २९,३९४ |
| **१९. सहकार -** | | | | | | | |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,१०२* |
| सभासद (लाखात) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० | १५१* |
| सहकारी संस्थांची एकूण संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,३०६ | १,९६,९०७* |
| एकूण सभासद (लाखात) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५३० | ४९९* |
| सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४८९ | ५,२१० | २४,२८४ | १,३४,४४० | २,४८,४३४ | ३,६०,५४५* |
| **२०. स्थानिक स्वराज्य संस्था -** | | | | | | | (२०१६-१७)$ |
| जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३४ |
| ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९१३ | २८,३३२ |
| पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ |
| नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २३४ |
| महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २७ |
| नगर पंचायत | -- | -- | -- | -- | ३ | ४ | १२४ |
| कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी    @ नमुना नोंदणी पाहणी    उ. ना. उपलब्ध नाही

† सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते    $ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार (दि. ३१.१२.२०१६ रोजीची)

\+ वर्ष २०११-१२ पासून सदर माहितीचा आधार बदलला असल्यामुळे सदर माहिती प्राथमिक शाळा (१ ते ८) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (९ ते १२) या स्वरुपात प्राप्त झाली असून पूर्वीची माहिती प्राथमिक शाळा (१ ते ७) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (८ ते १२) या स्वरुपात आहे. तसेच सदर माहितीचा आधार (२०१५-१६) यु-डीआयएसई आहे.

## ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब | परिमाण | महाराष्ट्र | भारत | भारताशी तुलना (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजारात | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| (अ) पुरुष | -"- | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| (ब) स्त्रिया | -"- | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजारात | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ५४.८ | ६८.९ | -- |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजारात | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ४५.२ | ३१.१ | -- |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | -- |
| १.५ लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर (२००१-२०११) | टक्के | १६.० | १७.७ | -- |
| १.६ साक्षरतेचे प्रमाण | -"- | ८२.३ | ७३.० | -- |
| १.७ अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लोकसंख्या | हजारात | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| १.८ एकूण काम करणारे | -"- | ४९,४२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र | लाख चौ.कि.मी. | ३.०८ | ३२.९ | ९.४ |
| **२. कृषि (२०१३-१४)** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १७,३६८ | १,४१,४२८ | १२.३ |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -"- | २३,३८० | २,००,८५९ | ११.६ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -"- | उ.ना. | ९५,७७२ | -- |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | उ.ना. | ४७.७ | -- |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२०११-१२ ते २०१३-१४ या वर्षांची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,५६९ | ४३,६३२ | ३.६ |
| (२) गहू | -"- | ८९७ | ३०,१११ | ३.० |
| (३) ज्वारी | -"- | ३,३६८ | ६,०८४ | ५५.४ |
| (४) बाजरी | -"- | ७९६ | ७,९६२ | १०.० |
| (५) एकूण तृणधान्ये | -"- | ७,७०५ | ९९,३५९ | ७.८ |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -"- | ११,१२९ | १,२३,५२४ | ९.० |
| (७) ऊस क्षेत्र | -"- | १,०९६ | ५,०१० | २१.९ |
| तोडणी क्षेत्र | -"- | ९६६ | उ.ना. | -- |
| (८) कापूस | -"- | ४,१७१ | १२,०३८ | ३४.६ |
| (९) भूईमूग | -"- | ३१९ | ५,१६३ | ६.२ |

उ.ना. उपलब्ध नाही

# महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन (२०१२) | हजारात | ३२,४८९ | ५,१२,०५७ | ६.३ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -"- | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व इलेक्ट्रीक पंप (२००३) | -"- | १,१७४ | १५,६८४ | ७.५ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२०१५) | चौ.कि.मी. | ६१,६२२ | ७,६४,५६६ | ८.१ |
| **५. उद्योग** | | | | |
| ५.१ औद्योगिक गुंतवणूक $ | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | १९,४३७ | १,०८,३१० | १७.९ |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | ११,३७,७८३ | १,१४,१०,४२६ | १०.० |
| **६. वीज (२०१४-१५)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | १,०३,७७९ | ११,१६,८५० | ९.३ |
| ६.२ एकूण वापर# | -"- | १,१२,८५५ | ८,१४,२५० | १३.९ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर | -"- | ४१,५२२ | २,८४,०७४ | १४.६ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३६.८ | ३४.९ | -- |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (मार्च २०१६) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | ११,७८९ | १,३२,५८७ | ९.० |
| ७.२ बँक कार्यालये असलेली शहरे व गावे (मार्च २०१५) | -"- | ३,०७६ | ४४,७५५ | ६.९ |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०१५-१६)** | | | | |
| ८.१ नॉमिनल उत्पन्न | ₹ कोटी | १७,४८,७७१+ | १,२०,८३,०९३+ | १४.५ |
| ८.२ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | १,४७,३९९+ | ९४,१७८+ | -- |
| ८.३ बाजार किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्न / बाजार किंमतींनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ कोटी | २०,०१,२२३+ | १,३६,७५,३३१+ | १४.६ |

$ ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर २०१६ + पहिले सुधारित अंदाज # वितरण परवानाधारकांमार्फत ग्राहकांना केलेली वीज विक्री

# १
# राज्य अर्थव्यवस्था

# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ वास्तविक ('रिअल') (सन २०११-१२ च्या स्थिर किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्नाच्या सन २०१६-१७ च्या पूर्वानुमानानुसार राज्य अर्थव्यवस्था मागील वर्षाच्या तुलनेत ९.४ टक्के वृद्धिदराने वाढेल असे अपेक्षित आहे. 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत १२.५ टक्के वाढ अपेक्षित असून 'उद्योग' व 'सेवा' क्षेत्रात अनुक्रमे ६.७ टक्के व १०.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. पूर्वानुमानानुसार सन २०१६-१७ साठी वास्तविक ('रिअल') स्थूल राज्य उत्पन्न ₹ १८,१५,४९८ कोटी अपेक्षित आहे. देशाची अर्थव्यवस्था सन २०१६-१७ मध्ये ७.१ टक्क्यांनी वाढणे अपेक्षित आहे.

१.२ पहिल्या सुधारित अंदाजानुसार सन २०१५-१६ चे वास्तविक ('रिअल') स्थूल राज्य उत्पन्न ₹ १६,५९,७७६ कोटी होते व ते मागील वर्षीच्या ₹ १५,३०,२११ कोटी स्थूल राज्य उत्पन्नापेक्षा ८.५ टक्क्यांनी अधिक आहे. चालू किंमतींनुसार २०१५-१६ चे सांकेतिक ('नॉमिनल') स्थूल राज्य उत्पन्न ₹ २०,०१,२२३ कोटी होते तर ते मागील वर्षी ₹ १७,७३,७४४ कोटी होते. सन २०१५-१६ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न ₹ १,४७,३९९ होते तर ते मागील वर्षी ₹ १,३२,३४१ होते.

## किंमती

१.३ राज्याच्या ग्रामीण व नागरी भागांचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष : २००३) एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीत अनुक्रमे २६६.५ व २५५.५ होता. सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीत ग्रामीण भागात वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ३.६ टक्के तर नागरी भागात ३.५ टक्के होता.

## लोकवित्त

१.४ राज्याची सन २०१६-१७ अर्थसंकल्पीय अंदाज (अअं) नुसार अपेक्षित महसुली जमा ₹ २,२०,८१० कोटी आहे तर सन २०१५-१६ सुधारित अंदाज (सुअं) नुसार ती ₹ १,९८,३२१ कोटी होती. सन २०१६-१७ (अअं) नुसार कर महसूल आणि करेतर महसूल अनुक्रमे ₹ १,७५,८४९ कोटी आणि ₹ ४४,९६१ कोटी अपेक्षित आहे. एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ १,४०,८६४ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६३.८ टक्के) असून ती गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत ११.४ टक्के वाढ दर्शविते.

१.५ राज्याचा सन २०१६-१७ (अअं) नुसार महसुली खर्च ₹ २,२४,४५५ कोटी अपेक्षित असून तो २०१५-१६ (सुअं) नुसार ₹ २,०७,६११ कोटी आहे.

१.६ अर्थसंकल्पीय अंदाज सन २०१६-१७ नुसार अपेक्षित महसुली तूट, वित्तीय तूट आणि ऋणभार अनुक्रमे ₹ ३,६४५ कोटी, ₹ ३५,०३१ कोटी व ₹ ३,५६,२१३ कोटी आहे. सन २०१६-१७ (अअं) नुसार वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १.५ टक्के तसेच ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १५.७ टक्के अपेक्षित असून ते १४ व्या वित्त आयोगाने 'एकत्रित वित्तीय सुधारणेचा मार्ग' या अंतर्गत दिलेल्या राजकोषीय मर्यादेत आहे.

१.७ सन २०१६-१७ (अअं) नुसार भांडवली जमेचा एकूण जमेतील आणि भांडवली खर्चाचा एकूण खर्चातील हिस्सा अनुक्रमे १४.१ टक्के व १२.७ टक्के अपेक्षित आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

१.८ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ३१ मार्च २०१६ रोजी एकूण ठेवी व एकूण कर्जे अनुक्रमे ₹ २१.७८ लाख कोटी व ₹ २२.३५ लाख कोटी होते, तर कर्ज-ठेवी प्रमाण १०२.७ टक्के होते. देशातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी व स्थूल कर्ज यामध्ये राज्यातील बँकांचा हिस्सा अनुक्रमे २४.० टक्के व २८.७ टक्के होता.

१.९ सन २०१६-१७ ची राज्यासाठी प्राधान्य क्षेत्राकरिता वार्षिक कर्ज योजना ₹ २.५५ लाख कोटींची असून ती मागील वर्षापेक्षा ३६.४ टक्क्यांनी जास्त आहे.

१.१० मार्च २०१६ अखेर ७.९ लाख स्व-सहाय्यता गटांची एकूण बचत ₹ ८५७ कोटी होती तर मार्च २०१५ अखेर ७.२ लाख स्व-सहाय्यता गटांची एकूण बचत ₹ ९०३.८ कोटी होती. मार्च २०१६ अखेर सुमारे २.०८ लाख स्व-सहाय्यता गटांकडे एकूण ₹ १,६९७ कोटी कर्ज थकीत होते तर मार्च २०१५ अखेर एकूण ₹ १,५३२.८ कोटी कर्ज थकीत होते .

१.११ प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत १० फेब्रुवारी २०१७ पर्यंत राज्यात सुमारे ₹ ३,९२५ कोटींच्या ठेवींसह सुमारे १.७६ कोटी बँक खाती उघडण्यात आली.

१.१२ सन २०१५-१६ मध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत राज्यात ३५.३ लाख ['शिशु' (₹ ५०,००० पर्यंत) अंतर्गत ३३.४ लाख, 'किशोर' (₹ ५०,००० - ₹ ५ लाख) अंतर्गत १.५ लाख व 'तरुण' (₹ ५ लाख - ₹ १० लाख) अंतर्गत ०.४ लाख] लाभार्थ्यांना एकूण ₹ १३,३७२ कोटी कर्ज वितरित करण्यात आले. सन २०१६-१७ मध्ये १० फेब्रुवारी २०१७ पर्यंत २३.७ लाख ('शिशु' अंतर्गत २१.७ लाख, 'किशोर' अंतर्गत १.६ लाख व 'तरुण' अंतर्गत ०.४ लाख) लाभार्थ्यांना एकूण ₹ ११,२०४ कोटी कर्ज वितरित करण्यात आले.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१३ दोन वर्षाच्या दुष्काळाच्या कालावधीनंतर सन २०१६-१७ मध्ये राज्यात चांगला (सरासरीच्या ९४.९ टक्के) पाऊस पडला. राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांतील तालुके वगळून) ५८ तालुक्यांत अपुरा, २१६ तालुक्यांत सरासरी एवढा तर ८१ तालुक्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला.

१.१४ सन २०१६ च्या खरीप हंगामामध्ये १५२.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ८० टक्के, १८७ टक्के, १४२ टक्के आणि ८३ टक्के वाढ अपेक्षित असून उसाच्या उत्पादनात २८ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१५ सन २०१६-१७ मध्ये रब्बी पिकांखालील क्षेत्र ५१.३१ लाख हेक्टर आहे. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये आणि तेलबिया यांच्या उत्पादनात अनुक्रमे ६२ टक्के, ९० टक्के आणि ३६ टक्के वाढ अपेक्षित आहे.

१.१६ मध्यम व लघु पाटबंधारे (राज्यक्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे १५ ऑक्टोबर २०१५ रोजीचा एकूण उपयुक्त जलसाठा १८,०७२ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार उपयुक्त जलसाठा क्षमतेच्या सुमारे ४४.४ टक्के होता.

१.१७ 'जलयुक्त शिवार अभियान' अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये निवडण्यात आलेल्या एकूण ६,२०२ गावांपैकी ४,३७४ गावे पाणी टंचाई मुक्त करण्यात आली आणि ११,८२,२३० हजार घन मीटर जलसाठ्याची निर्मिती करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये एकूण ५,२८१ गावे निवडण्यात आली.

१.१८ सन २०१५-१६ मध्ये ₹ ४०,५८१ कोटी पीक कर्ज वित्तीय संस्थांद्वारे वाटप करण्यात आले जे सन २०१४-१५ मध्ये ₹ ३४,१०० कोटी होते. सन २०१५-१६ मध्ये ₹ ३२,२८४ कोटी रकमेचे कृषी मुदत कर्ज वाटप करण्यात आले, तर ते सन २०१४-१५ मध्ये ₹ २१,८६१ कोटी होते. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांनी सन २०१५-१६ मध्ये शेतकऱ्यांना एकूण ₹ १३,२९३ कोटी कर्ज वितरित केले, त्यापैकी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ₹ ७,०८९ कोटी (५३.३ टक्के) कर्ज वितरित करण्यात आले.

१.१९ शासकीय व सहकारी दुग्धसंस्थांचे २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत दैनिक सरासरी दूध संकलन ४४.४३ लाख लिटर होते. सन २०१५-१६ मध्ये दुधाचे एकूण उत्पादन १०.१ दशलक्ष मे. टन होते तर ते सन २०१४-१५ मध्ये ९.५ दशलक्ष मे. टन होते.

१.२० सागरी व गोड्या पाण्यातील अंदाजित मत्स्य उत्पादन सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत अनुक्रमे ३.४९ लाख मे. टन व ०.८१ लाख मे. टन होते. सन २०१५-१६ मध्ये ते अनुक्रमे ४.३४ लाख मे. टन व १.४६ लाख मे. टन होते.

## उद्योग व सहकार

१.२१ ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत राज्यात ₹ ११,३७,७८३ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या एकूण १९,४३७ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी ₹ २,६९,८१४ कोटी (२३.७ टक्के) प्रस्तावित गुंतवणुकीचे ८,६६४ प्रकल्प (४४.६ टक्के) कार्यान्वित झाले.

१.२२ राज्यात सप्टेंबर २०१५ अखेर ₹ ५६,५५२ कोटी गुंतवणुकीचे व २९.२ लाख रोजगार असलेले सुमारे २.४४ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत होते.

१.२३ केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या वार्षिक उद्योग पाहणी २०१४-१५ च्या अस्थायी निष्कर्षाप्रमाणे स्थूल मूल्यवृद्धीत (₹ २,३९,०७६ कोटी) राज्य अग्रस्थानी आहे व देशाच्या स्थूल मूल्यवृद्धीत राज्याचा हिस्सा २०.५ टक्के आहे.

१.२४ प्रस्तावित दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर हा नवीन औद्योगिक शहरे 'स्मार्ट शहरे' म्हणून विकसित करणे आणि त्यांना पायाभूत सुविधा क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान पुरविणे यासाठीचा देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात राज्यातील शेंद्रा-बिडकीन आणि दिघी बंदर या दोन औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे. या कॉरिडॉरचा एक भाग म्हणून सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर अशा १०,००० एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे.

१.२५ सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यात ६१.४ लाख आस्थापना असून त्यामधील ९.२ लाख (१५.० टक्के) आस्थापना या वस्तुनिर्माण क्षेत्रात (संघटित तसेच असंघटित) कार्यरत होत्या व त्यातील रोजगार २९.१८ लाख होता.

१.२६ राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी सुमारे ४.९९ कोटी सभासद असलेल्या १.९७ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी, ११ टक्के कृषि पतपुरवठा, ११ टक्के बिगर-कृषि पतपुरवठा तर ७८ टक्के इतर संस्था होत्या. एकूण २०.३ टक्के सहकारी संस्था तोट्यात होत्या, त्यापैकी २९.२ टक्के कृषि पतपुरवठा संस्था होत्या.

## पायाभूत सुविधा

### ऊर्जा

१.२७ राज्यातील विजेची स्थापित क्षमता ३१ डिसेंबर २०१६ रोजी ३४,४१६ मेगावॅट होती. डिसेंबर २०१६ अखेर ८२,४४१ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत राज्यातील एकूण विजेचा वापर ८२,१४५ दशलक्ष युनिटस् असून त्यात मागील वर्षाच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत ४.८ टक्के वाढ दिसून येते.

१.२८ महावितरणची २०१५-१६ मध्ये १५,९४८ मेगावॅट सरासरी कमाल विजेची मागणी ९८ मेगावॅट तुटीचे भारनियमन करून भागविण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंतची १६,३०४ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी होती व शून्य भारनियमन होते.

१.२९ सन २०१५-१६ मध्ये महापारेषणची पारेषण हानी, महावितरणची वितरण हानी आणि 'एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक' हानी अनुक्रमे ३.९ टक्के, १४.५ टक्के व १९.७ टक्के होती.

### परिवहन

१.३० मार्च २०१६ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे ३.०१ लाख किमी होती. सुमारे ९९ टक्के गावे बारमाही वा हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती.

१.३१ मुंबई व नागपूर यांना जोडणारा 'मुंबई नागपूर समृद्धी कॉरिडॉर' हा आठ पदरी (७१० किमी लांब व १२० मीटर रुंद) द्रुतगती महामार्ग प्रस्तावित आहे. या महामार्गामुळे मुंबई-नागपूर अंतर सहा तासात गाठता येईल. या प्रकल्पावर ₹ ४०,००० कोटी खर्च अपेक्षित आहे.

१.३२ राज्यातील रस्त्यावरील वाहनांची १ जानेवारी २०१७ रोजी एकूण संख्या २९४ लाख (दर लाख लोकसंख्येमागे २४,४११ वाहने आणि प्रति किमी रस्त्यामागे ९८ वाहने) होती.

१.३३ नागपूर मेट्रो रेल प्रकल्प हा ३८.२१५ किमी लांबी आणि पुणे मेट्रो रेल प्रकल्प हा ३१.२५४ किमी लांबीचा असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

१.३४ सन २०१५-१६ मध्ये मोठी बंदरे व लहान बंदरे यांच्यामार्फत झालेली एकत्रित मालवाहतूक १,५३९.८६ लाख मे. टन होती तर ती मागील वर्षी १,५२८.१९ लाख मे. टन होती.

१.३५ सन २०१५-१६ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे २.४९ लाख मे. टन व ४.९७ लाख मे. टन होती तर सन २०१४-१५ साठी तत्सम आकडेवारी अनुक्रमे २.४२ लाख मे. टन व ४.८७ लाख मे. टन होती. सन २०१५-१६ मध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून झालेली प्रवासी वाहतूक अनुक्रमे ३७२.२ लाख व ११७.१ लाख होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे १९.२ टक्के व ३.० टक्के अधिक होती.

१.३६ स्मार्ट शहर अभियानांतर्गत राज्यातील बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, सोलापूर, नागपूर, पुणे आणि औरंगाबाद या दहा शहरांचा समावेश आहे.

## सामाजिक क्षेत्र

१.३७ जनगणना २०११ नुसार राज्याची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी असून त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण ४८.२ टक्के आहे. नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४५.२ टक्के आहे. राज्याचा दशवार्षिक लोकसंख्या वृद्धिदर १६.० टक्के असून तो मागील दशकाच्या तुलनेत ६.७ टक्के अंकांनी कमी आहे.

१.३८ राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ असून ०-६ वर्षे वयोगटातील बालकांमध्ये ते ८९४ आहे तर अखिल भारतीय स्तरावर ते अनुक्रमे ९४३ व ९१९ आहे. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३ टक्के आहे. साक्षरतेचे प्रमाण अनुसूचित जातींमध्ये ७९.७ टक्के आणि अनुसूचित जमातींमध्ये ते ६५.७ टक्के आहे.

१.३९ सन २०१५-१६ मध्ये घेण्यात आलेल्या पाचव्या 'रोजगार व बेरोजगार पाहणी' नुसार, राज्यातील नित्य मुख्य कार्यस्थितीनुसार १५ वर्षे व त्यावरील व्यक्तींसाठी श्रमशक्ति सहभाग दर ५२.७ टक्के, काम करणाऱ्यांचे लोकसंख्येशी प्रमाण ५१.६ टक्के व बेरोजगारीचा दर २.१ टक्के होता.

१.४०  सन २०१६-१७ मध्ये एकूण १,०४,९७० प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळा होत्या व त्यातील पटावरील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १५९.८६ लाख होती.  सन २०१६-१७ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) २५,७३७ शाळा होत्या व त्यातील पटावरील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ६६.१५ लाख होती.

१.४१  सन २०१५-१६ मध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असणाऱ्या शाळांची टक्केवारी ९९.७ टक्के आणि मुलींसाठी शौचालये (वापरायोग्य) उपलब्ध असलेल्या शाळांची टक्केवारी ९९.४ टक्के होती.

१.४२  अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालानुसार उच्च शिक्षणातील सन २०१५-१६ मधील पटसंख्या ३९.८७ लाख होती. सन २०१५-१६ करिता स्त्री-पुरुष असमानता निर्देशांक ०.८६ होता.

१.४३  सन २०१५ मधील जन्म दर, अर्भक मृत्यूदर व मृत्यूदर हे अनुक्रमे १६.३, २१ व ५.८ होते.  माता मृत्यू प्रमाण २०११ ते २०१३ या कालावधीकरिता ६८ होते.

१.४४  ‘महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२’ नुसार राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.७५२ आहे.  मुंबईचा (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांचा एकत्रित) मानव विकास निर्देशांक सर्वाधिक (०.८४१) आहे तर नंदूरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात कमी (०.६०४) आहे.  राज्यातील एकूण जिल्ह्यांपैकी २७ जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक राज्याच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा कमी आहेत.

* * * * *

# २
# लोकसंख्या



# २. लोकसंख्या

२.१ देशात जनगणना २०११ (मालिकेतील १५ वी जनगणना) भारताच्या महानिबंधक कार्यालयामार्फत घेण्यात आली. त्यापाठोपाठ सामाजिक, आर्थिक व जातनिहाय गणना २०११ (२९ जून २०११ रोजी प्रारंभ) घेण्यात आली. जनगणनेचे आणि सामाजिक, आर्थिक व जातनिहाय गणनेचे निष्कर्ष खाली दिले आहेत.

## जनगणना २०११

२.२ जनगणना २०११ नुसार राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी आहे. राज्याची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के असून लोकसंख्येनुसार देशामध्ये राज्य उत्तर प्रदेशानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्याचे व देशाचे महत्त्वाचे लोकसंख्या विषयक निर्देशक तक्ता २.१ मध्ये दिले आहेत.

**तक्ता २.१ महत्त्वाचे निर्देशक**

(लाख)

| बाब | | महाराष्ट्र | | भारत | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| **लोकसंख्या** | | | | | |
| ग्रामीण | पुरुष | २८५ | ३१५ | ३,८१६ | ४,२७८ |
| | स्त्रिया | २७३ | ३०० | ३,६०९ | ४,०६० |
| | व्यक्ती | ५५८ | ६१५ | ७,४२५ | ८,३३८ |
| नागरी | पुरुष | २१९ | २६७ | १,५०६ | १,९५५ |
| | स्त्रिया | १९२ | २४१ | १,३५६ | १,८१६ |
| | व्यक्ती | ४११ | ५०८ | २,८६२ | ३,७७१ |
| **एकूण** | **पुरुष** | **५०४** | **५८२** | **५,३२२** | **६,२३३** |
| | **स्त्रिया** | **४६५** | **५४१** | **४,९६५** | **५,८७६** |
| | **व्यक्ती** | **९६९** | **१,१२४** | **१०,२८७** | **१२,१०९** |
| अनुसूचित जाती | पुरुष | ५१ | ६८ | ८६१ | १,०३५ |
| | स्त्रिया | ४८ | ६५ | ८०५ | ९७९ |
| | व्यक्ती | ९९ | १३३ | १,६६६ | २,०१४ |
| अनुसूचित जमाती | पुरुष | ४४ | ५३ | ४२६ | ५२५ |
| | स्त्रिया | ४२ | ५२ | ४१७ | ५२० |
| | व्यक्ती | ८६ | १०५ | ८४३ | १,०४५ |
| वय ० ते ६ वर्षे | पुरुष | ७२ | ७० | ८५० | ८५७ |
| | स्त्रिया | ६५ | ६३ | ७८८ | ७८८ |
| | व्यक्ती | १३७ | १३३ | १,६३८ | १,६४५ |
| झोपडपट्ट्या | पुरुष | ६१ | ६३ | २२७ | ३४० |
| | स्त्रिया | ५१ | ५५ | १९९ | ३१५ |
| | व्यक्ती | ११२ | ११८ | ४२६ | ६५५ |
| स्त्री पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति '००० पुरुष ) | | ९२२ | ९२९ | ९३३ | ९४३ |
| बालकांमधील मुला मुलींचे प्रमाण (वय ० ते ६ वर्षे) | | ९१३ | ८९४ | ९२७ | ९१९ |
| लोकसंख्येची घनता (प्रति चौकिमी) | | ३१५ | ३६५ | ३२५ | ३८२ |
| साक्षरता दर (वय ७ वर्षे व त्यावरील) (टक्के) | | ७६.९ | ८२.३ | ६४.८ | ७३.० |
| नागरी लोकसंख्या (टक्के) | | ४२.४ | ४५.२ | २७.८ | ३१.१ |
| किशोरवयीन लोकसंख्या (वय १०-१९ वर्षे) (टक्के) | | २१.६ | १९.० | २१.९ | २०.९ |
| युवा लोकसंख्या (वय १५-२४ वर्षे) (टक्के) | | १९.० | १९.३ | १८.५ | १९.२ |
| कार्य सहभाग दर (टक्के) | पुरुष | ५३.३ | ५६.० | ५१.७ | ५३.३ |
| | स्त्रिया | ३०.८ | ३१.१ | २५.६ | २५.५ |
| | व्यक्ती | ४२.५ | ४४.० | ३९.१ | ३९.८ |
| दशवार्षिक वृध्दीदर (टक्के) | | २२.७ | १६.० | २१.५ | १७.७ |

आधार : भारताचे महानिबंधक कार्यालय

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

**आलेख २.१ : साक्षरता दर आणि दहावी/माध्यमिक व त्यावरील शैक्षणिक स्तर असलेल्यांची साक्षरांच्या संख्येशी टक्केवारी -२०११**




**आलेख २.२ : स्त्री पुरुष प्रमाण-२०११**




२.३ साक्षरता व शैक्षणिकस्तर हे समाजाने साध्य केलेल्या विकासाचे मूलभूत निर्देशक आहेत. जनगणना २०११ नुसार शैक्षणिक स्तराप्रमाणे लोकसंख्या तक्ता २.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता २.२ शैक्षणिक स्तराप्रमाणे लोकसंख्या**

(लाख)

| शैक्षणिक स्तर# | ग्रामीण | | | नागरी | | | राज्य | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
| **निरक्षर** | **२००.७३** | **८१.४८** | **११९.२६** | **१०७.४७** | **४८.३८** | **५९.०९** | **३०८.२०** | **१२९.८५** | **१७८.३५** |
| **साक्षर** | **४१४.८३** | **२३३.९१** | **१८०.९१** | **४००.७२** | **२१८.६६** | **१८२.०५** | **८१५.५४** | **४५२.५८** | **३६२.९७** |
| औपचारिक शिक्षणाशिवाय सुशिक्षित | २४.८६ | १२.३२ | १२.५४ | १६.४२ | ८.४७ | ७.९४ | ४१.२८ | २०.८० | २०.४८ |
| माध्यमिक खालील | २६१.७७ | १४०.०१ | १२१.७६ | १८३.८० | ९५.४७ | ८८.३२ | ४४५.५७ | २३५.४९ | २१०.०८ |
| दहावी / माध्यमिक | ६३.९३ | ३८.५३ | २५.४० | ७१.६७ | ४०.६१ | ३१.०६ | १३५.६० | ७९.१४ | ५६.४६ |
| उच्च माध्यमिक / तांत्रिक / बिगर तांत्रिक पदविका | ४१.३२ | २७.४१ | १३.९१ | ६०.९८ | ३६.०७ | २४.९१ | १०२.३१ | ६३.४८ | ३८.८३ |
| पदवीधर व त्यावरील | २०.०८ | १४.४० | ५.६७ | ६६.३१ | ३७.२७ | २९.०४ | ८६.३९ | ५१.६८ | ३४.७१ |

आधार : भारताचे महानिबंधक कार्यालय

# अवर्गीकृत वगळून

## स्थलांतर

२.४ जनगणनेमध्ये स्थलांतर दोन प्रकारच्या स्थितीनुसार मोजले जाते जसे की, जन्माच्या ठिकाणानुसार स्थलांतर व मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतर. एखाद्या व्यक्तीची गणना त्याच्या / तिच्या जन्म ठिकाणापेक्षा म्हणजेच जन्म गांव किंवा शहर यापेक्षा वेगळ्या जागी होते तेव्हा त्या व्यक्तीस जन्माच्या ठिकाणानुसार स्थलांतरित मानले जाते. एखाद्या व्यक्तीची गणना त्याच्या / तिच्या मागील वास्तव्याच्या ठिकाणापेक्षा वेगळ्या ठिकाणी होते तेव्हा त्या व्यक्तीस मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतरित मानले जाते. जनगणनेत स्थलांतराबाबतच्या कारणांची सुद्धा नोंद घेण्यात येते. कामकाज/रोजगार, व्यवसाय, शिक्षण, विवाह, जन्मानंतर स्थान बदल, कुटुंबासमवेत स्थान बदल आणि इतर याप्रमाणे मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतराबाबतच्या कारणांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

२.५ भारताच्या महानिबंधक कार्यालयामार्फत मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतराबाबतची आकडेवारी अलीकडेच प्रसिद्ध करण्यात आली आहे. मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार ५.७३ कोटी व्यक्ती स्थलांतरीत असल्याचे जनगणना २०११ च्या आकडेवारीनुसार निदर्शनास येते. एकूण स्थलांतरित व्यक्तींमध्ये पुरुषांचे प्रमाण ४१.५ टक्के, तर स्त्रियांचे प्रमाण ५८.५ टक्के होते. सामान्यत: जन्माचे ठिकाण व वास्तव्याच्या ठिकाणाच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या दर्जाशी संबंधित स्थलांतराचे वेगवेगळे प्रवाह असतात. राज्यात एकूण स्थलांतरीतांपैकी (वर्गीकरण करता न येणारे वगळून) ३८.२ टक्के व्यक्ती ग्रामीण भागातून ग्रामीण भागात, ६.७ टक्के व्यक्ती नागरी भागातून ग्रामीण भागात स्थलांतर केले तर २३.५ टक्के व्यक्ती ग्रामीण भागातून नागरी भागात व २२.९ टक्के व्यक्ती नागरी भागातून नागरी भागात स्थलांतर केले. मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार आणि वास्तव्याच्या कालावधीनुसार स्थलांतरीतांची आकडेवारी तक्ता २.३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता २.३ मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार आणि वास्तव्याच्या कालावधीनुसार स्थलांतरीत***

(लाख)

| सध्याचा वास्तव्याचा कालावधी | मागील वास्तव्याचे ठिकाण ग्रामीण/ नागरी | सध्याचे वास्तव्याचे ठिकाण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | | | नागरी | | |
| | | व्यक्ती | पुरुष | स्त्री | व्यक्ती | पुरुष | स्त्री |
| १ वर्षापेक्षा कमी | ग्रामीण | १२.३४ | ५.९२ | ६.४३ | ६.९३ | ३.८३ | ३.१० |
| | नागरी | ३.३४ | १.७१ | १.६४ | ८.०० | ४.०७ | ३.९४ |
| | एकूण | १७.६४ | ८.५४ | ९.१० | १६.९९ | ८.९४ | ८.०५ |
| १ ते ४ वर्षे | ग्रामीण | ३२.५१ | १०.६५ | २१.८६ | २४.९७ | १३.११ | ११.८६ |
| | नागरी | ८.७७ | ३.८९ | ४.८८ | २७.६३ | १३.२८ | १४.३५ |
| | एकूण | ४४.८३ | १५.८५ | २८.९८ | ५७.५६ | २८.८० | २८.७६ |
| ५ ते ९ वर्षे | ग्रामीण | ३१.१८ | ९.३७ | २१.८१ | २२.०५ | ११.३८ | १०.६६ |
| | नागरी | ७.३२ | ३.११ | ४.२१ | २३.७६ | ११.२८ | १२.४८ |
| | एकूण | ४१.७२ | १३.६३ | २८.०९ | ५०.२४ | २४.८२ | २५.४२ |
| १० वर्षे व त्यावरील | ग्रामीण | १४२.७० | ३९.३० | १०३.४० | ८०.५६ | ४१.८९ | ३८.६७ |
| | नागरी | १९.०१ | ८.०४ | १०.९७ | ७२.०५ | ३४.८३ | ३७.२२ |
| | एकूण | १७४.९५ | ५२.१९ | १२२.७५ | १६८.६३ | ८४.७१ | ८३.९२ |
| **सर्व** | **ग्रामीण** | **२१८.८८** | **६५.२९** | **१५३.५८** | **१३४.५९** | **७०.२६** | **६४.३३** |
| | **नागरी** | **३८.४७** | **१६.७६** | **२१.७१** | **१३१.५५** | **६३.५१** | **६८.०४** |
| | **एकूण** | **२७९.५२** | **९०.४२** | **१८९.१०** | **२९३.७९** | **१४७.४६** | **१४६.३३** |

आधार : भारताचे महानिबंधक कार्यालय टीप : १. वास्तव्याच्या सर्व कालावधीमध्ये 'निश्चित नसलेला कालावधी यांचा' समावेश आहे. *अस्थायी

२. मागील वास्तव्याचे ठिकाण ग्रामीण/ नागरी असे वर्गीकरण नसलेल्यांचा समावेश 'एकूण' मध्ये केला आहे.

२.६ स्थलांतरामध्ये विवाहपश्चात वास्तव्याच्या ठिकाणात बदलामुळे स्त्रियांच्या स्थलांतराचे प्रमाण लक्षणीय आहे. विवाह, जन्मानंतर स्थान बदल, कुटुंबासमवेत स्थान बदल ही स्थलांतरांची कारणे वगळून स्थलांतराच्या प्रमुख कारणांमध्ये कामकाज/रोजगार याकरिता स्थलांतराचे प्रमाण ५३.३ टक्के, शिक्षणाकरिता ७.६ टक्के, व्यवसायाकरिता ३.० टक्के, तर इतर कारणांकरिता स्थलांतराचे प्रमाण ३६.१ टक्के होते. मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार आणि कारणानुसार स्थलांतरीतांची आकडेवारी तक्ता २.४ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता २.४ मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार आणि स्थलांतराच्या कारणानुसार स्थलांतरीत***

(लाख)

| स्थलांतराचे कारण | मागील वास्तव्याचे ठिकाण ग्रामीण/ नागरी | सध्याचे वास्तव्याचे ठिकाण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | | | नागरी | | |
| | | व्यक्ती | पुरुष | स्त्री | व्यक्ती | पुरुष | स्त्री |
| कामकाज / रोजगार | ग्रामीण | १५.१० | ११.१५ | ३.९५ | ४२.५६ | ३८.६६ | ३.९० |
| | नागरी | ३.०१ | २.४० | ०.६१ | २३.४८ | २०.३६ | ३.१२ |
| | एकूण | १९.२० | १४.२८ | ४.९२ | ६९.१० | ६१.५५ | ७.५५ |
| व्यवसाय | ग्रामीण | ०.६७ | ०.२८ | ०.३९ | १.५२ | १.१२ | ०.४० |
| | नागरी | ०.२२ | ०.१२ | ०.१० | २.१२ | १.४१ | ०.७० |
| | एकूण | १.०० | ०.४५ | ०.५५ | ३.९८ | २.७३ | १.२४ |
| शिक्षण | ग्रामीण | ४.०४ | २.४९ | १.५४ | ३.८७ | २.६८ | १.१९ |
| | नागरी | ०.६१ | ०.३९ | ०.२२ | ३.११ | १.९४ | १.१७ |
| | एकूण | ५.०३ | ३.११ | १.९२ | ७.४७ | ४.९३ | २.५४ |
| विवाह | ग्रामीण | ११७.४४ | ३.१९ | ११४.२५ | ३२.३६ | १.१० | ३१.२६ |
| | नागरी | १०.३३ | ०.२९ | १०.०३ | २६.२६ | ०.९५ | २५.३० |
| | एकूण | १३५.१८ | ३.७५ | १३१.४३ | ६२.४४ | २.२२ | ६०.२२ |
| जन्मानंतर स्थान बदल | ग्रामीण | ४९.९८ | ३२.७९ | १७.१९ | १६.२४ | ९.७७ | ६.४७ |
| | नागरी | १५.५० | ९.३० | ६.२० | २१.१४ | १२.१९ | ८.९५ |
| | एकूण | ६९.८१ | ४४.८१ | २४.९९ | ४०.८४ | २३.९५ | १६.९० |
| कुटुंबासमवेत स्थान बदल | ग्रामीण | १९.२३ | ९.०९ | १०.१३ | २९.७० | १२.४० | १७.३० |
| | नागरी | ६.३८ | २.९१ | ३.४७ | ३७.३९ | १६.७३ | २०.६६ |
| | एकूण | २७.४९ | १२.९० | १४.५९ | ७१.९३ | ३१.३८ | ४०.५६ |
| इतर | ग्रामीण | १२.४२ | ६.२९ | ६.१३ | ८.३४ | ४.५४ | ३.८० |
| | नागरी | २.४२ | १.३५ | १.०७ | १८.०५ | ९.९२ | ८.१३ |
| | एकूण | २१.८२ | ११.१२ | १०.६९ | ३८.०३ | २०.७० | १७.३३ |
| **एकूण** | **ग्रामीण** | **२१८.८८** | **६५.२९** | **१५३.५८** | **१३४.५९** | **७०.२६** | **६४.३३** |
| | **नागरी** | **३८.४७** | **१६.७६** | **२१.७१** | **१३१.५५** | **६३.५१** | **६८.०४** |
| | **एकूण** | **२७९.५२** | **९०.४२** | **१८९.१०** | **२९३.७९** | **१४७.४६** | **१४६.३३** |

आधार : भारताचे महानिबंधक कार्यालय *अस्थायी

टीप : मागील वास्तव्याचे ठिकाण ग्रामीण/ नागरी' असे वर्गीकरण नसलेल्यांचा समावेश 'एकूण' मध्ये केला आहे.

## सामाजिक, आर्थिक व जातनिहाय गणना २०११

२.७ सामाजिक, आर्थिक व जातनिहाय गणना २०११ ही ग्रामीण व नागरी भागातील कुटुंबांचे सामाजिक व आर्थिक स्थितीबाबत अभ्यास होय. या गणनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती.

- कुटुंबांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीनुसार क्रम ठरवणे व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करणे.
- जातनिहाय लोकसंख्येची अधिकृत माहिती उपलब्ध करून देणे शक्य होईल.
- विविध जाती व घटकांची सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक स्थिती याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध करणे.

## ग्रामीण भागाचे महत्वाचे निष्कर्ष

२.८ सामाजिक, आर्थिक व जातनिहाय गणना २०११ नुसार ग्रामीण भागात १.३८ कोटी कुटुंबे असून कुटुंबाचा सरासरी आकार ४.६२ आहे. ग्रामीण भागातील एकूण कुटुंबांपैकी ०.१७ कोटी कुटुंबे अनुसूचित जाती तर ०.१९ कोटी कुटुंबे अनुसूचित जमातींची आहेत. भारतात एकूण १७.९७ कोटी कुटुंबे ग्रामीण भागात आहेत, त्यापैकी ३.३२ कोटी कुटुंबे अनुसूचित जाती तर १.९७ कोटी कुटुंबे अनुसूचित जमातींची आहेत. ग्रामीण भागातील कुटुंबांची महत्वाची वैशिष्ट्ये तक्ता २.५ मध्ये, तर कुटुंबाच्या उत्पन्न स्रोतानुसार ग्रामीण भागातील कुटुंबांचे प्रमाण तक्ता २.६ मध्ये देण्यात आले आहे.

## तक्ता २.५ ग्रामीण भागातील कुटुंबाची महत्वाची वैशिष्ट्ये

(टक्के)

| बाब | महाराष्ट्र | | | भारत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अजा | अज | एकूण | अजा | अज |
| **खालील बाबी असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण** | | | | | | |
| मोटार असलेले दोन / तीन / चार चाकी वाहने/ मासेमारी नौका | २१.७३ | १.४९ | ०.८४ | २०.७१ | २.३३ | १.०९ |
| शेतीची तीन / चार चाकी यांत्रिकी संयंत्रे | २.७० | ०.१० | ०.११ | ४.१० | ०.३६ | ०.१८ |
| ₹ ५०,००० व त्यावरील पत मर्यादा असलेले किसान क्रेडिट कार्ड | २.८० | ०.१२ | ०.११ | ३.६१ | ०.३२ | ०.१८ |
| सदस्यापैकी कोणीही शासकीय कर्मचारी असणारे | ५.४९ | ०.६९ | ०.४५ | ४.९८ | ०.७३ | ०.४८ |
| शासन नोंदणीकृत बिगर शेती उपक्रम असणारे | २.६२ | ०.२२ | ०.१४ | २.७३ | ०.३६ | ०.२३ |
| कोणत्याही सदस्याचे दरमहा ₹ १०,००० पेक्षा जास्त उत्पन्न असणारे | १०.८५ | ०.८८ | ०.५७ | ८.२५ | ०.८६ | ०.४९ |
| आयकर/व्यवसाय कर भरणारे कोणताही सदस्य असणारे | ५.५९ | ०.५९ | ०.३५ | ४.५७ | ०.६४ | ०.३७ |
| तीन/चार खोल्या असलेले व सर्व खोल्यांच्या भिंती व छत पक्के असलेले | १६.७७ | १.२७ | ०.६९ | १८.४५ | २.०८ | ०.७० |
| शीतकपाट (रेफ्रिजरेटर) मालकीचे असणारे | १०.७३ | ०.७४ | ०.३७ | ११.०१ | १.१९ | ०.३८ |
| दूरध्वनी (लँडलाईन) मालकीचे असणारे | ५.१६ | ०.३९ | ०.२७ | ३.७२ | ०.३१ | ०.१४ |
| सिंचनाखालील २.५ एकर किंवा अधिक मालकीची जमीन व कमीत कमी एक सिंचन उपकरण असणारे | ५.९९ | ०.१६ | ०.१८ | ४.२५ | ०.२४ | ०.१९ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **२०,०८,९३८** | **२०,७०,२१६** | **२१,५७,२००** | **२२,९६,२५०** | **२४,८७,४१८** |
| **१२** | **उद्योग** | **२२,३८,१२४** | **२२,९५,४७४** | **२३,८५,९४६** | **२५,६२,७८३** | **२७,९०,५१९** |
| | **(उप-बेरीज - ६+११)** | (१००.०) | (१०२.६) | (१०६.६) | (११४.५) | (१२४.७) |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | ८,३८,१०९ | ९,२६,४४४ | ९,७९,४१२ | १०,६१,७११ | ११,८५,११६ |
| १४ | रेल्वे | ४८,५३१ | ५४,७५१ | ५७,३११ | ६०,०७४ | ६०,४०५ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | २,८८,०६० | ३,०३,७८० | ३,२६,३६९ | ३,५०,५३९ | ३,७६,६५६ |
| १६ | साठवण | ४,३५१ | ४,९२७ | ४,३८१ | ४,६२२ | ५,०७७ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,०२,७७६ | १,०८,९७० | १,१२,८४७ | १,३४,१७६ | १,६२,५५२ |
| १८ | वित्तीय सेवा | ४,७३,३९९ | ५,२१,५७४ | ५,६९,११५ | ६,१९,३८२ | ६,५९,६१२ |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | ८,९७,७८५ | ९,७०,८९० | १०,८२,७०९ | ११,९७,३०३ | १३,३९,२७९ |
| २० | सार्वजनिक प्रशासन | ४,०५,५९२ | ४,१३,२३४ | ४,१८,३८२ | ४,४९,२७९ | ४,६९,८१३ |
| २१ | इतर सेवा | ४,८६,६७३ | ५,१७,५९८ | ५,४६,५८७ | ५,९९,३३१ | ६,५३,८०२ |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र** | **३५,४५,२७७** | **३८,२२,१६८** | **४०,९७,११३** | **४४,७६,४१७** | **४९,१२,३१२** |
| | **(उप-बेरीज -१३ ते २१)** | (१००.०) | (१०७.८) | (११५.६) | (१२६.३) | (१३८.६) |
| **२३** | **मूळ किंमतींनुसार एकूण निव्वळ मूल्यवृध्दी** | **७१,८९,५१५** | **७५,३९,०१२** | **७९,८०,२४८** | **८५,२३,७०६** | **९१,९३,०७४** |
| | **(५+१२+२२)** | (१००.०) | (१०४.९) | (१११.०) | (११८.६) | (१२७.९) |
| २४ | आयात शुल्कांसह उत्पादनावरील कर | ८,९०,०६० | ९,६०,९४९ | १०,१०,१४९ | १०,९०,३८८ | ११,६१,३८९ |
| २५ | वजा उत्पादनावरील अनुदान | २,६०,६७७ | २,९४,०५३ | २,७१,५७७ | २,७७,०४९ | २,७३,५८० |
| **२६** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एन.डी.पी) (२३+२४-२५)** | **७८,१८,८९८** | **८२,०५,९०८** | **८७,१८,८२०** | **९३,३७,०४५** | **१,००,८०,८८३** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | (-)७६,८२४ | (-)१,०८,२९२ | (-)१,२२,३१२ | (-)१,२४,४३४ | (-)१,३४,५९६ |
| **२८** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एन.एन.आय) (२६+२७)** | **७७,४२,०७४** | **८०,९७,६१६** | **८५,९६,५०८** | **९२,१२,६११** | **९९,४६,२८७** |
| **२९** | **दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **६३,४६०** | **६५,५६८** | **६८,७१७** | **७२,७१२** | **७७,५२४** |

*आधार* – केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार     +++ तिसरे सुधारित अंदाज     ++ दुसरे सुधारित अंदाज     + पहिले सुधारित अंदाज

टीप -   कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात.     आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.९
## स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - चालू किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | जिल्हा | २०११-१२@ | २०१२-१३@ | २०१३-१४@ | २०१४-१५++ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मुंबई# | २,२०,५५० | २,५१,०४१ | २,८२,९६४ | ३,१२,४३५ | ३,४९,५४० |
| २ | ठाणे$ | १,६३,३७० | १,८५,७९८ | २,०९,२०५ | २,३०,७६६ | २,५७,६६९ |
| ३ | रायगड | २९,५२३ | ३३,६२५ | ३७,९६७ | ४२,७६७ | ४७,९८२ |
| ४ | रत्नागिरी | १३,७८० | १५,६६२ | १८,१३१ | २२,१२५ | २२,०४० |
| ५ | सिंधुदुर्ग | ७,९८५ | ९,१०४ | १०,२८० | ११,१२१ | १२,१९५ |
| | **कोकण विभाग** | **४,३५,२०९** | **४,९५,२३०** | **५,५८,५४७** | **६,१९,२१५** | **६,८९,४२६** |
| ६ | नाशिक | ५५,०८५ | ६६,२४९ | ७७,०९७ | ७८,३२२ | ८५,१२६ |
| ७ | धुळे | १४,४६६ | १६,२८७ | १८,८२४ | २०,९५५ | २२,५१७ |
| ८ | नंदुरबार | ७,९५९ | ८,९३४ | १०,३६२ | १०,०११ | ११,३३५ |
| ९ | जळगाव | २९,४२४ | ३१,६५९ | ३७,२२३ | ४०,४५२ | ४३,२४५ |
| १० | अहमदनगर | ३६,८४३ | ३९,७९९ | ४६,७२३ | ५१,८५४ | ५७,२८३ |
| | **नाशिक विभाग** | **१,४३,७७८** | **१,६२,९२७** | **१,९०,२२९** | **२,०१,५९४** | **२,१९,५०५** |
| ११ | पुणे | १,३०,०४० | १,४७,५९४ | १,६६,४९३ | १,८३,७२२ | २,०४,८०७ |
| १२ | सातारा | २५,६२१ | २८,३६३ | ३२,४३१ | ३४,८५८ | ३९,३३३ |
| १३ | सांगली | २५,९०६ | २८,०५२ | ३२,३४६ | ३५,५३० | ३८,५८० |
| १४ | सोलापूर | ३९,७३७ | ४२,७४७ | ४७,८०६ | ५३,९५२ | ५७,९७७ |
| १५ | कोल्हापुर | ४०,६२१ | ४६,१७६ | ५१,२६८ | ५५,८८२ | ६३,११७ |
| | **पुणे विभाग** | **२,६१,९२५** | **२,९२,९३२** | **३,३०,३४३** | **३,६३,९४४** | **४,०३,८१४** |
| १६ | औरंगाबाद | ३१,३९६ | ३४,३५९ | ४०,३२८ | ४२,६७८ | ४८,२३८ |
| १७ | जालना | १३,१२० | १३,५७४ | १८,३११ | १५,८५७ | १६,९०५ |
| १८ | परभणी | १२,०६९ | १३,८७६ | १५,५२९ | १५,८८४ | १५,९११ |
| १९ | हिंगोली | ५,९४४ | ७,०३६ | ७,५२१ | ८,७०६ | ८,१९८ |
| २० | बीड | १५,५९१ | १६,५१५ | १९,५४५ | १९,४४८ | २१,१९३ |
| २१ | नांदेड | २०,९०४ | २३,९७३ | २७,०५० | २६,७६१ | ३०,१२९ |
| २२ | उस्मानाबाद | ११,६५० | ११,४६४ | १४,४०१ | १२,९१५ | १३,६३० |
| २३ | लातूर | १६,७९७ | १९,७५३ | २२,८१६ | २१,२९४ | २३,०२० |
| | **औरंगाबाद विभाग** | **१,२७,४७१** | **१,४०,५४९** | **१,६५,५०१** | **१,६३,५४३** | **१,७७,२२४** |
| २४ | बुलढाणा | १२,८२३ | १४,६१३ | १७,७३३ | १६,६२७ | १८,४१७ |
| २५ | अकोला | १२,९८६ | १५,११६ | १६,९३० | १७,३८८ | १९,५२५ |
| २६ | वाशिम | ६,२२० | ७,०२३ | ७,९४९ | ७,०५० | ८,२८१ |
| २७ | अमरावती | १८,७८३ | २२,२२३ | २५,००० | २६,९९२ | २९,९८८ |
| २८ | यवतमाळ | १५,६०२ | १८,६३७ | १९,३१२ | २०,१९३ | २३,७५९ |
| | **अमरावती विभाग** | **६६,४१३** | **७७,६१२** | **८६,९२४** | **८८,२५०** | **९९,९७०** |
| २९ | वर्धा | १०,०४० | ११,५८० | १२,४८० | १३,५२१ | १५,८९८ |
| ३० | नागपूर | ५५,९३४ | ६३,७२३ | ७१,६३० | ७८,८४२ | ८९,०४६ |
| ३१ | भंडारा | ८,०२२ | ९,१४८ | १०,३३८ | ११,२४४ | १२,१०७ |
| ३२ | गोंदिया | ८,५१३ | ९,९७७ | १०,९७३ | १२,०५८ | १२,९७२ |
| ३३ | चंद्रपुर | १६,८८९ | १९,७१२ | २१,४५० | २३,२११ | २६,२४४ |
| ३४ | गडचिरोली | ५,८०३ | ६,६३४ | ६,९४८ | ७,३४७ | ७,८९० |
| | **नागपूर विभाग** | **१,०५,२०१** | **१,२०,७७४** | **१,३३,८२०** | **१,४६,२२४** | **१,६४,१५८** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन  @ प्राथमिक  ++ दूसरे सुधारित अंदाज  + पहिले सुधारित अंदाज

# - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा  $ पालघर अंतर्भूत

टीप - सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा मूल्यवृद्धीचे अंदाज पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.१०
## स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - स्थिर किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | जिल्हा | २०११-१२@ | २०१२-१३@ | २०१३-१४@ | २०१४-१५++ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मुंबई# | २,२०,५५० | २,३३,८८८ | २,४९,९९२ | २,७१,०४६ | २,९६,२०८ |
| २ | ठाणे$ | १,६३,३७० | १,७३,१०३ | १,८४,७२२ | १,९९,८०६ | २,१७,९७८ |
| ३ | रायगड | २९,५२३ | ३१,२३७ | ३३,३०२ | ३६,७८९ | ४०,०७० |
| ४ | रत्नागिरी | १३,७८० | १४,५२८ | १५,६७४ | १८,२६० | १७,९३२ |
| ५ | सिंधुदुर्ग | ७,९८५ | ८,४०२ | ८,९०२ | ९,२१० | ९,७६७ |
| | **कोकण विभाग** | **४,३५,२०९** | **४,६१,१५९** | **४,९२,५९२** | **५,३५,११२** | **५,८१,९५६** |
| ६ | नाशिक | ५५,०८५ | ६०,५९१ | ६५,७८१ | ६७,९३१ | ७३,२६२ |
| ७ | धुळे | १४,४६६ | १५,१६० | १६,४८४ | १७,९७४ | १८,४९८ |
| ८ | नंदुरबार | ७,९५९ | ८,३९९ | ९,३४१ | ८,७६७ | ९,६०६ |
| ९ | जळगाव | २९,४२४ | २९,९१९ | ३३,५५६ | ३५,२३२ | ३५,९७६ |
| १० | अहमदनगर | ३६,८४३ | ३७,५२२ | ४१,६३४ | ४४,२४५ | ४६,०८१ |
| | **नाशिक विभाग** | **१,४३,७७८** | **१,५१,५९०** | **१,६६,७९६** | **१,७४,१५०** | **१,८३,४२२** |
| ११ | पुणे | १,३०,०४० | १,३७,०७२ | १,४६,८१९ | १,५८,७४३ | १,७२,२५१ |
| १२ | सातारा | २५,६२१ | २६,२५४ | २८,६७१ | २९,८२३ | ३२,७१३ |
| १३ | सांगली | २५,९०६ | २६,२४४ | २८,६७९ | ३०,१४८ | ३१,८२२ |
| १४ | सोलापूर | ३९,७३७ | ४०,०४६ | ४२,७९६ | ४७,६६६ | ४९,०५८ |
| १५ | कोल्हापुर | ४०,६२१ | ४२,७२८ | ४५,१२४ | ४७,९८१ | ५२,२९२ |
| | **पुणे विभाग** | **२,६१,९२५** | **२,७२,३४५** | **२,९२,०८८** | **३,१४,३६१** | **३,३८,१३५** |
| १६ | औरंगाबाद | ३१,३९६ | ३१,८७४ | ३५,६६२ | ३६,९४५ | ४०,५९८ |
| १७ | जालना | १३,१२० | १२,६२६ | १६,५७६ | १३,३५३ | १४,२९३ |
| १८ | परभणी | १२,०६९ | १२,९१२ | १३,६५६ | १३,७१९ | १३,३६९ |
| १९ | हिंगोली | ५,९४४ | ६,६८८ | ६,६८९ | ७,४०९ | ६,७४८ |
| २० | बीड | १५,५९१ | १५,५०९ | १७,२५६ | १६,८१० | १७,६७२ |
| २१ | नांदेड | २०,९०४ | २२,०८६ | २३,६३५ | २३,०६६ | २५,२२६ |
| २२ | उस्मानाबाद | ११,६५० | १०,७९७ | १२,७०९ | ११,१५४ | ११,४८० |
| २३ | लातूर | १६,७९७ | १८,०७७ | १९,९०२ | १८,३०८ | १९,२८२ |
| | **औरंगाबाद विभाग** | **१,२७,४७१** | **१,३०,५६९** | **१,४६,०८४** | **१,४०,७६३** | **१,४८,६६८** |
| २४ | बुलढाणा | १२,८२३ | १३,३२३ | १४,९७१ | १३,८२४ | १५,१०२ |
| २५ | अकोला | १२,९८६ | १४,०७९ | १४,९४३ | १५,०६१ | १६,३३१ |
| २६ | वाशिम | ६,२२० | ६,५५३ | ७,१३९ | ५,९८६ | ६,८२२ |
| २७ | अमरावती | १८,७८३ | २०,६८४ | २१,९४० | २३,५२६ | २५,५१५ |
| २८ | यवतमाळ | १५,६०२ | १७,१६६ | १६,८०९ | १७,४४७ | २०,१११ |
| | **अमरावती विभाग** | **६६,४१३** | **७१,८०५** | **७५,८०१** | **७५,८४३** | **८३,८८१** |
| २९ | वर्धा | १०,०४० | १०,७३७ | १०,९७७ | ११,७२९ | १३,११७ |
| ३० | नागपूर | ५५,९३४ | ५९,४२७ | ६३,१३० | ६८,१९४ | ७५,१३३ |
| ३१ | भंडारा | ८,०२२ | ८,४६८ | ८,९११ | ९,४०५ | ९,९६३ |
| ३२ | गोंदिया | ८,५१३ | ९,१८७ | ९,४७४ | १०,०९६ | १०,७८६ |
| ३३ | चंद्रपुर | १६,८८९ | १८,२६६ | १८,८७७ | २०,०४२ | २२,०४४ |
| ३४ | गडचिरोली | ५,८०३ | ६,१६० | ६,०४५ | ६,२६७ | ६,७१० |
| | **नागपूर विभाग** | **१,०५,२०१** | **१,१२,२४६** | **१,१७,४१४** | **१,२५,७३३** | **१,३७,७५३** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन      @ प्राथमिक      ++ दूसरे सुधारित अंदाज      + पहिले सुधारित अंदाज

# - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा      $ पालघर अंतर्भूत

टीप - सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा मूल्यवृद्धीचे अंदाज पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.११
## दरडोई स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - चालू किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | जिल्हा | २०११-१२@ | २०१२-१३@ | २०१३-१४@ | २०१४-१५++ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मुंबई# | १,७५,४०५ | १,९६,०९५ | २,१७,०९९ | २,३५,४५६ | २,५८,७४९ |
| २ | ठाणे$ | १,४६,३८८ | १,६३,९३८ | १,८१,७६९ | १,९७,४४१ | २,१७,०९४ |
| ३ | रायगड | १,११,३६७ | १,२५,४६५ | १,४०,१३३ | १,५६,१४० | १,७३,२७९ |
| ४ | रत्नागिरी | ८४,८९६ | ९५,६६६ | १,०९,८०३ | १,३२,८५५ | १,३१,२१७ |
| ५ | सिंधुदुर्ग | ९३,५३५ | १,०५,७७५ | १,१८,४७६ | १,२७,१३३ | १,३८,२७९ |
| | **कोकण विभाग** | **१,५०,७९१** | **१,६८,९४४** | **१,८७,६११** | **२,०४,७९१** | **२,२४,५०७** |
| ६ | नाशिक | ८९,५९३ | १,०६,५१४ | १,२२,५३२ | १,२३,०५२ | १,३२,२०७ |
| ७ | धुळे | ७०,१३१ | ७८,१८२ | ८९,४७६ | ९८,६२४ | १,०४,९३५ |
| ८ | नंदुरबार | ४८,०४६ | ५३,४६७ | ६१,४८३ | ५८,८९१ | ६६,११० |
| ९ | जळगाव | ६९,१४३ | ७३,६३२ | ८५,६८६ | ९२,१६२ | ९७,५१५ |
| १० | अहमदनगर | ८०,६७२ | ८६,३६२ | १,००,४८० | १,१०,५१९ | १,२१,००० |
| | **नाशिक विभाग** | **७६,९२७** | **८६,२८८** | **९९,७२६** | **१,०४,६१२** | **१,१२,७५२** |
| ११ | पुणे | १,३६,८१८ | १,५३,१८६ | १,७०,४६४ | १,८५,५६१ | २,०४,०६० |
| १२ | सातारा | ८४,८५७ | ९३,१०८ | १,०५,५२२ | १,१२,४१९ | १,२५,७३५ |
| १३ | सांगली | ९१,२८३ | ९७,८९८ | १,११,८०४ | १,२१,६३९ | १,३०,८१८ |
| १४ | सोलापूर | ९१,४७४ | ९७,३८७ | १,०७,७८७ | १,२०,३८८ | १,२८,०३३ |
| १५ | कोल्हापुर | १,०४,१७३ | १,१७,२०३ | १,२८,७९२ | १,३८,९४३ | १,५५,३२३ |
| | **पुणे विभाग** | **१,१०,९६०** | **१,२२,६९०** | **१,३६,७९२** | **१,४८,९९९** | **१,६३,४४९** |
| १६ | औरंगाबाद | ८४,२४८ | ९१,१२९ | १,०५,७१८ | १,१०,५८० | १,२३,५३४ |
| १७ | जालना | ६६,६२६ | ६८,३१८ | ९१,३४४ | ७८,४०४ | ८२,८४४ |
| १८ | परभणी | ६५,३३९ | ७४,३५७ | ८२,३७० | ८३,३९७ | ८२,६८४ |
| १९ | हिंगोली | ५०,२४१ | ५८,९६५ | ६२,५०० | ७१,७५० | ६६,९९८ |
| २० | बीड | ५९,९९५ | ६२,९८४ | ७३,८७७ | ७२,८५३ | ७८,६८५ |
| २१ | नांदेड | ६१,८३६ | ७०,२२२ | ७८,४६४ | ७६,८६८ | ८५,६९९ |
| २२ | उस्मानाबाद | ६९,९३२ | ६८,२२४ | ८४,९६२ | ७५,५४१ | ७९,०४१ |
| २३ | लातूर | ६८,०६१ | ७९,२७४ | ९०,६८९ | ८३,८३२ | ८९,७६२ |
| | **औरंगाबाद विभाग** | **६७,६६३** | **७३,८७७** | **८६,१४५** | **८४,२९८** | **९०,४६०** |
| २४ | बुलढाणा | ४९,३१७ | ५५,६९४ | ६६,९७० | ६२,२२२ | ६८,२९८ |
| २५ | अकोला | ७१,१२५ | ८१,८७० | ९०,६७० | ९२,०८१ | १,०२,२४८ |
| २६ | वाशिम | ५१,६९३ | ५७,८५७ | ६४,९१९ | ५७,०८२ | ६६,४६२ |
| २७ | अमरावती | ६४,६१९ | ७५,६३५ | ८४,१७२ | ८९,९०६ | ९८,८१३ |
| २८ | यवतमाळ | ५५,९७७ | ६६,२५५ | ६८,०३१ | ७०,४८६ | ८२,१८० |
| | **अमरावती विभाग** | **५८,६५३** | **६७,८७२** | **७५,२६९** | **७५,६६९** | **८४,८७८** |
| २९ | वर्धा | ७६,७१५ | ८७,५६६ | ९३,४०१ | १,००,१४१ | १,१६,५२९ |
| ३० | नागपूर | १,१९,१८९ | १,३३,८३९ | १,४८,२८९ | १,६०,८८२ | १,७९,१०२ |
| ३१ | भंडारा | ६६,४८१ | ७५,१४५ | ८४,१६० | ९०,७२८ | ९६,८२६ |
| ३२ | गोंदिया | ६४,०४५ | ७४,४१६ | ८१,१४१ | ८८,३९८ | ९४,२७६ |
| ३३ | चंद्रपुर | ७६,१४३ | ८७,९२१ | ९४,६५५ | १,०१,३३५ | १,१३,३६० |
| ३४ | गडचिरोली | ५३,८३५ | ६१,०५३ | ६३,४४३ | ६६,५५६ | ७०,९११ |
| | **नागपूर विभाग** | **८८,९०१** | **१,००,८९५** | **१,१०,५१५** | **१,१९,३७९** | **१,३२,४८९** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन @ प्राथमिक ++ दूसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

\# - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा $ पालघर अंतर्भूत

टीप - सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा मूल्यवृद्धीचे अंदाज पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही.

# ४

# किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था



# ४. किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था

## किंमती

४.१ स्थानिक पातळीवरील मागणी पुरवठ्यातील असंतुलन अत्यावश्यक वस्तूंच्या किंमतीवर परिणाम करते. भारतीय अर्थव्यवस्थेचे उर्वरित जागतिक अर्थव्यवस्थेशी संबंध वाढत असताना जागतिक बाजारपेठेतील वस्तुंच्या किंमतींचा स्थानिक किंमतींवर लक्षणीय प्रभाव होत असून स्थानिक बाजारपेठेतील वस्तूंच्या किंमतींमध्ये चढउतार दिसतो. किरकोळ व घाऊक व्यापारातील वस्तुंच्या किंमतीतील चढउतार मापनाकरिता अनुक्रमे ग्राहक किंमती निर्देशांक व घाऊक किंमती निर्देशांक वापरले जातात.

### राज्यातील किंमतीविषयक स्थिती

४.२ राज्यातील किंमतीविषयक स्थिती जाणून घेण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेतर्फे ग्रामीण भागातील ६८ केंद्रांमधून १०६ बाबी आणि नागरी भागातील ७४ केंद्रांमधून १२७ बाबींच्या किरकोळ किंमती नियमितपणे संकलित केल्या जातात. या किंमतींच्या आधारे राज्याच्या ग्रामीण व नागरी भागाकरिता स्वतंत्रपणे मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) परिगणित केले जातात.

४.३ एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीत ग्रामीण व नागरी भागांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे २६६.५ व २५५.५ होता. याच कालावधीत 'खाद्यपदार्थ' गटाचा ग्रामीण व नागरी भागांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे २७३.८ व २८०.८ होता, 'इंधन, वीज व दिवाबत्ती' गटाचा ग्रामीण व नागरी भागांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ४५५.६ व ४१८.५ होता. ग्रामीण व नागरी भागाकरिता गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे परिशिष्ट ४.१ व परिशिष्ट ४.२ मध्ये दिले आहेत.

४.३.१ एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भागासाठी ३.६ टक्के होता, तर नागरी भागासाठी तो ३.५ टक्के होता.

**आलेख ४.१ : राज्याकरिता प्रमुख गटांसाठी गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढ (ग्रामीण)**



**आलेख ४.२: राज्याकरिता प्रमुख गटांसाठी गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढ (नागरी)**




४.३.२ एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीत 'खाद्यपदार्थ' गटाचा वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण व नागरी या दोन्ही भागांसाठी ४.६ टक्के होता. जुलै २०१६ मध्ये तो अत्युच्च (ग्रामीण भागासाठी ९.७ टक्के तर नागरी भागासाठी १०.९ टक्के) होता. या कालावधीतील ग्राहक किंमती निर्देशांकातील वाढ ही मुख्यत: कडधान्ये व भाज्यांच्या भावातील वाढीमुळे झाली होती. ग्रामीण व नागरी भागांकरिता उपगट निहाय खाद्यपदार्थातील वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर तक्ता ४.१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ४.१ सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित खाद्यपदार्थातील उपगटनिहाय चलनवाढ (एप्रिल - डिसेंबर)**

(टक्के)

| गट | ग्रामीण | | नागरी | |
|---|---|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| **खाद्यपदार्थ गट** | **४.८** | **४.६** | **५.४** | **४.६** |
| तृणधान्ये व उत्पादने | (-)२.७ | ४.३ | (-)३.९ | ३.१ |
| कडधान्ये व उत्पादने | ४६.३ | १२.० | ४८.७ | १०.२ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | ५.१ | ३.८ | ४.२ | ३.८ |
| खाद्यतेल | २.४ | ४.७ | ५.३ | ६.२ |
| अंडी-मांस-मासे | ५.२ | २.५ | ६.७ | ४.४ |
| भाज्या व फळे | ३.७ | (-)६.१ | ३.७ | (-)२.१ |
| मसाले व मसाल्याचे पदार्थ | ८.९ | १३.३ | ६.२ | ११.७ |
| इतर खाद्यपदार्थ | (-)५.९ | १६.४ | २.७ | ९.३ |

आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

४.३.३ खाद्यपदार्थ गटाच्या ग्राहक किंमती निर्देशांकाच्या एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधातील वाढीसाठी प्रामुख्याने तूरडाळ, चणाडाळ, उडीदडाळ व काही भाज्यांच्या किंमतीतील वाढ कारणीभूत होती.

**आलेख ४.३ : तुरडाळीची राज्यातील प्रति किलो सरासरी किंमत**



**आलेख ४.४ : चणाडाळीची राज्यातील प्रति किलो सरासरी किंमत**




## इतर संस्थांद्वारे परिगणित ग्राहक किंमती निर्देशांक

४.४ अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत प्रकाशित केल्या जाणाऱ्या ग्राहक किंमती निर्देशांकाबरोबरच केंद्र शासनाकडून विविध उद्दिष्टांसाठी निरनिराळे मासिक ग्राहक किंमती निर्देशांक अखिल भारत आणि राज्य / केंद्रशासित प्रदेशांकरिता परिगणित व प्रकाशित केले जातात. उद्दिष्टांनुसार या ग्राहक किंमती निर्देशांकांची वस्तुसूची, भार व पद्धती वेगवेगळ्या असतात.

४.५ अखिल भारतीय व राज्य / केंद्रशासित प्रदेशातील ग्रामीण, नागरी भागासाठी स्वतंत्र आणि एकत्रित असे मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१२) केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार प्रकाशित करते. यासाठी १,१८१ ग्रामीण व १,११४ नागरी केंद्रांमधून किंमती संकलित केल्या जातात. राज्यातील ग्रामीण भागातील ६६ आणि नागरी भागातील ८६ केंद्रांचा यात समावेश आहे. एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेले महाराष्ट्रासाठीचे ग्रामीण, नागरी व एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३३.१, १२४.२ व १२७.२ होते. त्यांच्या चलनवाढीचा दर अनुक्रमे ६.१ टक्के, ३.७ टक्के व ४.५ टक्के होता. एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेले अखिल भारतासाठीचे ग्रामीण, नागरी व एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३२.४, १२७.८ व १३०.२ होते. त्यांच्या चलनवाढीचा दर अनुक्रमे ५.५ टक्के, ४.२ टक्के व ४.९ टक्के होता. निवडक राज्यांसाठी ग्रामीण, नागरी व एकत्रित ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.३ मध्ये दिले आहेत.

४.६ श्रम केंद्र, भारत सरकार शेतमजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (दोन्हींसाठी पायाभूत वर्ष १९८६-८७), दरमहा परिगणित व प्रकाशित करते. सदर निर्देशांक तयार करण्यासाठी भारतातील ६०० केंद्रांमधून किरकोळ किंमती गोळा केल्या जातात, त्यापैकी ५४ केंद्रे राज्यातील आहेत. एप्रिल ते डिसेंबर २०१६ करिता राज्यासाठी शेतमजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ९५१.३ आणि ९४४.३ होते, गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत चलनवाढीचा दर अनुक्रमे ६.५ टक्के व ६.४ टक्के होता. एप्रिल ते डिसेंबर २०१६ करिता अखिल भारतासाठी शेतमजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ८७०.३ आणि ८७५.३ होते व दोन्हींसाठी चलनवाढीचा दर ४.७ टक्के होता. राज्य व देशासाठी शेतमजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.४ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.५ : अखिल भारतीय स्तरावर वर्ष ते वर्ष चलनवाढ**




४.७ श्रम केंद्र, भारत सरकार औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००१) दरमहा परिगणित व प्रकाशित करते. हा निर्देशांक देशातील औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा निवडक ७८ केंद्रांमधील जीवनावश्यक वस्तू व सेवा यांच्या किरकोळ किंमतींवर आधारित असून त्यामध्ये राज्यातील पाच केंद्रांचा समावेश आहे. सदर पाच केंद्रांव्यतिरिक्त राज्यातील पाच अतिरिक्त केंद्रांसाठी कामगार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक स्वतंत्रपणे तयार करण्यात येतात. एप्रिल ते डिसेंबर २०१६ दरम्यानच्या कालावधीतील अखिल भारतासाठी औद्योगिक कामगारांकरिता

सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक २७६.४ होता व तो ४.७ टक्के चलनवाढ दर्शवितो. अखिल भारतासाठी औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक, केंद्रिय केंद्रांसाठीचा औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व राज्य केंद्रांसाठीचा औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे परिशिष्ट ४.५, परिशिष्ट ४.६ व परिशिष्ट ४.७ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.६ : अखिल भारतीय स्तरावर वर्ष ते वर्ष चलनवाढ**




## घाऊक किंमती निर्देशांक

४.८ घाऊक किंमती निर्देशांक हा व्यवसाय, उद्योग व शासन यांच्याकडून मोठ्या प्रमाणात वापरला जातो. चलनवाढीचा दर मोजण्यासाठी हे प्राथमिक साधन असल्याने घाऊक किंमती निर्देशांक हा महत्त्वाचा आर्थिक निर्देशक आहे. आर्थिक सल्लागार यांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, केंद्र शासन घाऊक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) दरमहा परिगणित करतात.

४.९ ‘सर्व वस्तुंसाठी’ घाऊक किंमती निर्देशांक एप्रिल २०१६ मधील १७७.८ वरुन डिसेंबर २०१६ मध्ये १८२.८ पर्यंत वाढला. याच कालावधीत ‘प्राथमिक वस्तु’ गटाच्या निर्देशांकात २५१.९ वरुन २५६.३ पर्यंत, 'निर्मित वस्तु' गटात १५५.५ वरुन १५८.० पर्यंत आणि ‘इंधन व वीज ’ या गटात १७५.४ वरुन १९२.१ पर्यंत वाढ झाली.

४.९.१ घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर नोव्हेंबर २०१४ ते मार्च २०१६ या कालावधीत ऋण होता. तो एप्रिल २०१६ मधील ०.८ टक्क्यांवरून डिसेंबर २०१६ मध्ये ३.४ टक्क्यांपर्यंत वाढला. ‘प्राथमिक वस्तु’ गटातील चलनवाढीचा दर एप्रिल २०१६ मधील ३.४ टक्क्यांवरून डिसेंबर २०१६ मध्ये ०.३ टक्क्यांपर्यंत घटला. एप्रिल ते डिसेंबर २०१६ या कालावधीत 'वस्तुनिर्माण' गटात तो १.० टक्क्यांवरून ३.७ टक्क्यांपर्यंत वाढला. 'इंधन व वीज' गटात तो (-)४.८ टक्क्यांवरून ८.७ टक्क्यांपर्यंत वाढला. 'प्राथमिक वस्तु' गटातील ‘खाद्यपदार्थ’ उपगटाचा चलनवाढीचा दर एप्रिल २०१६ मधील ४.७ टक्क्यांवरून बराच वाढून जुलै २०१६ मध्ये १२.६ टक्के झाला. त्यात घट होऊन तो डिसेंबर २०१६ मध्ये (-)०.७ टक्के झाला.

**आलेख ४.७ : अखिल भारतीय स्तरावर वर्ष ते वर्ष चलनवाढ**




४.१० गटनिहाय घाऊक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.८ मध्ये तर महत्त्वाच्या किंमतींच्या निर्देशांकांवर आधारित चलनवाढीचे दर परिशिष्ट ४.९ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.८ : अखिल भारतीय स्तरावर घाऊक किंमती निर्देशांकांवर आधारित चलनवाढ**



# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.११ पुरेसे व पोषक अन्न उपलब्ध होणे ही मानवाची मूलभूत गरज आहे आणि अन्न सुरक्षा वेळोवेळी निरोगी आणि क्रियाशील जीवनशैली राखण्याकरिता नागरिकांना त्याची हमी देते. सार्वजनिक वितरण व्यवस्था दारिद्र्य निर्मूलन आणि उपासमार निर्मूलन कार्यक्रमांपैकी एक असून यामध्ये जीवनावश्यक वस्तुंची खरेदी आणि निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना त्याचा अनुदानित दराने पुरवठा करणे याच्या व्यवस्थापनाचा समावेश होतो.

४.१२ सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केंद्र व राज्य शासनांची संयुक्त जबाबदारी आहे. वस्तु खरेदी, साठवणूक आणि ठोक नियतन ही केंद्र शासनाची जबाबदारी आहे, तर रास्त भाव दुकानांमार्फत त्यांचे लाभार्थी कुटुंबांना वितरण, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची निश्चिती करणे, शिधापत्रिकांचे वाटप आणि रास्त भाव दुकानांच्या कामाचे पर्यवेक्षण व संनियंत्रण या कामांची जबाबदारी राज्य शासनाची आहे. रास्त भाव दुकानांद्वारे प्रामुख्याने गहू, तांदूळ, साखर आणि घासलेट या वस्तू नियमित वितरित करण्यात येतात, तर २०१६-१७ या वर्षात तूरडाळ वितरित करण्यात येत आहे.

४.१३ शिधापत्रिकाधारकांची सोय आणि भौगोलिक संरचना विचारात घेऊन रास्त भाव दुकान सुरू व कार्यरत करण्यात येते जेणेकरुन अतिदुर्गम भागामध्येसुद्धा खात्रीशीररित्या अन्नधान्य उपलब्ध होते. राज्यात ३१ डिसेंबर २०१६ रोजी ५१,२०४ रास्त भाव दुकाने कार्यरत होती. त्यापैकी ५,४२७ आदिवासी भागात व २८ फिरती रास्त भाव दुकाने होती. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कार्य प्रभावीपणे होण्याकरिता रास्त भाव दुकानांना परवाने देताना सार्वजनिक संस्थांना प्राधान्य देण्यात आले आहे. मालकीच्या प्रकारानुसार रास्त भाव दुकाने तक्ता ४.२ मध्ये देण्यात आली आहेत.

**तक्ता ४.२ मालकीच्या प्रकारानुसार रास्त भाव दुकाने**

(३१ डिसेंबर २०१६ रोजी)

| मालकीचा प्रकार | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| वैयक्तिक (सर्वसाधारण) | २९,६२९ |
| अनुसूचित जाती | ३,६६० |
| अनुसूचित जमाती | ३,६२५ |
| माजी सैनिक | २५५ |
| महिला स्वसहाय्यता गट | ४,१४५ |
| पुरुष स्वसहाय्यता गट | ८९ |
| ग्रामपंचायती | १४६ |
| नागरी स्थानिक संस्था | १०१ |
| सहकारी | ८,१७६ |
| इतर | १,३७८ |
| **एकूण** | **५१,२०४** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

४.१३.१ पुरविण्यात आलेल्या अन्नधान्याच्या गुणवत्तेची खात्री राखण्यासाठी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी रास्त भाव दुकानांची नियमित निरिक्षणे घेतली जातात. जानेवारी ते डिसेंबर २०१६ या कालावधीत ९१,५४९ तपासणी लक्ष्याच्या तुलनेत १,०१,५८५ तपासण्या करण्यात आल्या. परवाने रद्द केलेली ३२७ व निलंबित करण्यात आलेली ४९२ रास्त भाव दुकाने होती आणि ₹ ६५.०७ लाख दंड वसूल करण्यात आला. याबरोबरच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जीवनावश्यक वस्तुंच्या वितरणावर आणि संनियंत्रणामध्ये जनतेचा खात्रीशीर सहभाग असण्यासाठी राज्यात निरनिराळ्या स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर अखेर गठीत करण्यात आलेल्या दक्षता समित्यांची संख्या महानगरपालिका स्तरावर २५, नगरपालिका स्तरावर १४४, जिल्हा स्तरावर ३१ आणि तालुका स्तरावर २८८ आहे.

**तक्ता ४.३ निवडक राज्यांमधील रास्त भाव दुकाने**

(१५ नोव्हेंबर २०१६ रोजी)

| राज्य | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| उत्तर प्रदेश | ७८,२८६ |
| महाराष्ट्र # | ५१,२०४ |
| बिहार | ४२,११७ |
| आंध्रप्रदेश | २९,०८२ |
| राजस्थान | २५,७२१ |
| मध्य प्रदेश | २२,४०९ |
| कर्नाटक | २०,४९७ |
| गुजरात | १७,२१२ |

*आधार* : अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, भारत सरकार # ३१ डिसेंबर रोजी

४.१४ डिसेंबर २०१६ अखेर एकूण २.४८ कोटी शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी सुमारे ०.४३ कोटी दारिद्र्य रेषेखालील आणि सुमारे ०.२५ कोटी 'अंत्योदय अन्न योजना' (अंअयो) शिधापत्रिकाधारक होते. शिधापत्रिकांची पडताळणी मोहीम घेण्यात आली आणि सन २०१५-१६ मध्ये १.०५ लाख शिधापत्रिका व सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर अखेर ०.९७ लाख शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या. निवडक राज्यांमधील रास्त भाव दुकाने तक्ता ४.३ मध्ये दिली आहेत. प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांची संख्या तक्ता ४.४ मध्ये आणि शिधापत्रिकांचा जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट ४.१० मध्ये देण्यात आला आहे.

**आलेख ४.९ : ३१ डिसेंबर २०१६ रोजी प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांचे प्रमाण**




**आलेख ४.१० : ३१ डिसेंबर २०१६ रोजी विभागनिहाय शिधापत्रिका**




**तक्ता ४.४ प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांची संख्या**

(लाख)

| वर्ष | शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर रोजी) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पिवळी | | केशरी दारिद्र्य रेषेवरील | अन्नपूर्णा | शुभ्र | एकूण |
| | दारिद्र्य रेषेखालील | अंत्योदय अन्न योजना | | | | |
| २०१४ | ४५.३५ | २४.७३ | १४६.४५ | ०.६५ | १९.९३ | २३७.११ |
| २०१५ | ४८.६६ | २५.०५ | १५१.७९ | ०.६२ | २०.९७ | २४७.०९ |
| २०१६ | ४२.९५ | २५.०२ | १५८.०९ | ०.५१ | २१.३६ | २४७.९३ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## तृणधान्याचे उत्पादन व गरज

४.१५ राष्ट्रीय नमुना पाहणी ६८ व्या फेरीमधील (जुलै २०११ ते जून २०१२) राज्य नमुन्यावर आधारित निष्कर्षांनुसार एकूण तृणधान्यांची वार्षिक अंदाजित घरगुती गरज १३२.६३ लाख मे.टन आहे तर सन २०१६-१७ मध्ये अंदाजित उत्पादन ११७.८७ लाख मे.टन आहे. राज्यातील तृणधान्याचे उत्पादन, गरज आणि केंद्र शासनाकडून नियतन तक्ता ४.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.५ राज्यातील तृणधान्याचे उत्पादन, गरज आणि केंद्र शासनाकडून नियतन**

(लाख मे. टन)

| तृणधान्ये | वार्षिक अंदाजित दरडोई घरगुती वापर (किलो) @ | सन २०१६-१७ करिता अंदाजित वार्षिक घरगुती गरज # | २०१६-१७ मध्ये अंदाजित उत्पादन $ | अंदाजित तूट / अधिक्य | केंद्र शासनाकडून नियतन | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २०१५-१६ | २०१६-१७ + |
| तांदूळ | ३६.०१ | ४३.२४ | ३६.५४ | (-)६.७० | २१.३० | १६.३१ |
| गहू | ५७.७९ | ६९.३८ | १४.०५ | (-)५५.३३ | २७.३७ | २१.१५ |

@ राष्ट्रीय नमुना पाहणी ६८ वी फेरी (जुलै २०११ ते जून २०१२ राज्य नमुना) # राज्याच्या १ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या प्रक्षेपित लोकसंख्येवर आधारित + डिसेंबरपर्यंत

$ कृषी आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत प्रसिद्ध (दुसरा अंदाज)

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम - २०१३

४.१६ भारत सरकारने नागरिकांच्या अन्नाची गरज भागविणेकरिता पुरेसे दर्जेदार अन्न रास्त दराने उपलब्ध होण्याच्या हमीने अन्न व पोषण सुरक्षा पुरविणेकरिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ लागू केला. राज्यात १ फेब्रुवारी २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अधिनियमानुसार राज्यातील सुमारे सात कोटी (६२.३ टक्के) लोकसंख्या अनुदानित दराने धान्य मिळण्यास पात्र आहे. यापैकी सुमारे ४.७० कोटी लोकसंख्या ग्रामीण भागातील व सुमारे २.३० कोटी लोकसंख्या नागरी भागातील आहे. अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांचे अंअयो लाभार्थी आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी असे गट करण्यात आले आहेत. दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंब आणि दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांपैकी (केशरी शिधापत्रिकाधारक) ग्रामीण भागातील २१६.८५ लाख कुटुंब (वार्षिक उत्पन्न ₹ ४४,००० पर्यंत असणारी) व नागरी भागातील १८३.२२ लाख कुटुंबांना (वार्षिक उत्पन्न ₹ ५९,००० पर्यंत असणारी) प्राधान्य गटातील कुटुंब असे संबोधण्यात येते.

४.१६.१ या अधिनियमानुसार अंअयोखालील लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणे प्रति माह प्रति कुटुंब ३५ किलो धान्य मिळते आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना (५.९२ कोटी लाभार्थी) प्रति व्यक्ति दरमहा पाच किलो प्रमाणे धान्य मिळते. सदर अधिनियमानुसार लाभार्थ्यांना ₹ तीन प्रति किलो दराने तांदूळ, ₹ दोन प्रति किलो दराने गहू व ₹ एक प्रति किलो दराने भरडधान्य देणे बंधनकारक आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी २५.०५ लाख इतक्या अंअयो कुटुंबांची संख्या निश्चित केली आहे. प्राधान्य कुटुंब व अंअयो लाभार्थ्यांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.६ मध्ये दिले आहे आणि सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत अंअयोअंतर्गत अन्नधान्याचे विभागनिहाय नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप परिशिष्ट ४.१४ व ४.१५ मध्ये दिले आहे. निवडक राज्यांमधील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट व्यक्ती आणि शिधापत्रिकांची संख्या तक्ता ४.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ४.६ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

(लाख मे.टन)

| लाभार्थी | वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
| प्राधान्य कुटुंब | २०१४-१५ | १४.७५ | १३.३२ | १३.७२ | १९.९९ | १८.१६ | १८.६९ |
| | २०१५-१६ | १५.१७ | १३.३१ | १५.७० | २०.६० | १८.०१ | १८.८६ |
| | २०१६-१७+ | ११.३० | १०.२६ | ९.५६ | १५.३४ | १३.९५ | १२.९९ |
| अंअयो | २०१४-१५ | ५.०३ | ४.६६ | ४.८९ | ५.२९ | ५.२२ | ५.१४ |
| | २०१५-१६ | ५.१३ | ४.९७ | ४.९२ | ५.२८ | ४.९८ | ४.९७ |
| | २०१६-१७+ | ३.८४ | ३.६३ | ३.३२ | ४.०३ | ३.७६ | ३.४५ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता ४.७ निवडक राज्यांमधील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत समाविष्ट व्यक्ती आणि शिधापत्रिकांची संख्या**

(लाख)

| राज्य | १ एप्रिल २०१६ रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत समाविष्ट व्यक्ती | | | शिधापत्रिका | | |
| | ग्रामीण | नागरी | एकूण | अंअयो | प्राधान्य कुटुंब | एकूण |
| उत्तर प्रदेश | १,२३४.०६ | २८६.५२ | १,५२०.५९ | ४०.९५ | २७८.९२ | ३१९.८६ |
| महाराष्ट्र | ४६९.७१ | २३०.४५ | ७००.१७ | २५.०५ | १२३.२३ | १४८.२८ |
| बिहार | ७८३.७४ | ८७.४२ | ८७१.१६ | २५.०१ | १२९.०० | १५४.०१ |
| आंध्र प्रदेश | ३४३.२८ | ११६.६५ | ४५९.९२ | ९.०८ | ८२.९५ | ९२.०३ |
| मध्य प्रदेश | ४२०.८३ | १२५.५९ | ५४६.४२ | १४.३२ | १०४.२५ | ११८.५७ |
| कर्नाटक | २८५.५५ | ११६.३८ | ४०१.९३ | ८.२६ | १००.९९ | १०९.२५ |
| गुजरात | २५८.७८ | १२४.०६ | ३८२.८५ | ७.९७ | ५५.३१ | ६३.२८ |

*आधार* : अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, भारत सरकार टिप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे एकूण बेरजा जुळणार नाहीत

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट नसलेले लाभार्थी

४.१७ राज्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट नसलेले औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा या जिल्ह्यांमधील दारिद्र्य रेषेवरील शेतकऱ्यांना (सुमारे ६८ लाख केशरी शिधापत्रिकाधारक) ऑगस्ट २०१५ पासून प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना लागू असलेल्या दराने व परिमाणानुसार अन्नधान्याचा पुरवठा शासनाच्या खर्चाने करण्यात येत आहे. दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.८ दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
| २०१५-१६ | १.०० | ०.८५ | ०.८१ | १.४९ | १.३२ | १.२६ |
| २०१६-१७+ | १.१७ | ०.९० | ०.९९ | १.७८ | १.४६ | १.४२ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

४.१७.१ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत समाविष्ट नसलेल्या राज्यातील १.७७ कोटी लाभार्थ्यांपैकी १.५० कोटी लाभार्थ्यांना शिधापत्रिकांची पडताळणी आणि आधार जोडणीचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत अन्नधान्य पुरविण्यात येईल.

४.१७.२ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांचा समावेश करणेकरिता सद्यस्थितीतील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत लाभार्थ्यांपैकी ज्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याची आवश्यकता नसेल अशा लाभार्थ्यांना अधिनियम अंतर्गत लाभ स्वेच्छेने सोडून देणेबाबत आवाहन करुन 'अनुदानातून बाहेर पडा' ही योजना १९ ऑक्टोबर २०१६ पासून सुरु करण्यात आली.

## अंअयो आणि दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तूर डाळीचे वितरण

४.१८ ऑगस्ट २०१६ मध्ये प्रति शिधापत्रिका प्रतिमाह एक किलो तूरडाळ ₹ १०३ प्रति किलो दराने अंअयो आणि दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना पुरविण्यात आली. त्याचे नियतन व उचल ७,००८ मे.टन आणि रास्त भाव दुकानांना वाटप ५,०८४ मे.टन होते.

## शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्य वितरण

४.१९ केंद्र शासन राज्यातील शिधापत्रिकाधारक आस्थापनांना (कल्याणकारी संस्था) अतिरिक्त अन्नधान्याचे नियतन मंजूर करते. अन्नधान्याचे (१५ किलो) दरमहा प्रति रहिवासी तांदूळ ₹ सहा प्रति किलो आणि गहू ₹ पाच प्रति किलो या दराने वाटप करण्यात येते. शिधापत्रिकाधारक आस्थापनांची संख्या ४,९१० असून त्यातील रहिवाशांची संख्या ५.१५ लाख आहे. शिधापत्रिकाधारक आस्थापनांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.९ शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

('००० मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
| २०१४-१५ | २२.८० | १९.४४ | १२.१९ | ५४.०० | ४२.८४ | २४.४० |
| २०१५-१६ | ११.४० | ७.५० | ७.०० | २७.०० | १६.०८ | १३.३१ |
| २०१६-१७+ | ३५.८३ | - | - | - | - | - |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + सप्टेंबरपर्यंत

## साखर

४.२० केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारक आणि त्यांची लोकसंख्या यानुसार राज्य शासनाला दरमहा सुमारे १३,९१८ मे. टन साखरेचे नियतन निश्चित केले आहे. राज्याला सणासुदीच्या दोन महिन्यांमध्ये (ऑगस्ट किंवा सप्टेंबर आणि ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर) १८,३७१ मे. टन साखरेचे नियतन मिळते. सद्यस्थितीत साखरेची विक्रीची किंमत ₹ १३.५० प्रति किलो आहे आणि नियमित पुरवठा करण्यात येणा-या साखरेचे परिमाण प्रति व्यक्ती प्रति माह ०.५ किलो आहे. केंद्र शासनाकडून राज्यास साखर खरेदीकरीता २०१५-१६ मध्ये ₹ २९०.१५ कोटी तर २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ २३६.८२ कोटी अर्थसहाय्य प्राप्त झाले. साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.१० साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

(लाख मे.टन)

| वर्ष | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | १.४८ | १.३४ | १.३४ |
| २०१५-१६ | १.७५ | १.७४ | १.७४ |
| २०१६-१७+ | १.३३ | १.३३ | १.३३ |

+ डिसेंबर पर्यंत

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## एलपीजी ग्राहकांसाठी सुधारित थेट लाभ हस्तांतर योजना

४.२१ राज्यात सुमारे २.३० कोटी घरगुती एलपीजी ग्राहक आहेत. त्यापैकी सुमारे १.१३ कोटी एक सिलेंडर जोडणीधारक आणि १.१७ कोटी दुहेरी सिलेंडर जोडणीधारक आहेत. केंद्र शासनाच्या धोरणानुसार अनुदानित एलपीजी सिलेंडरची संख्या वार्षिक १२ सिलेंडर प्रति एलपीजी जोडणी इतकी सिमीत आहे. राज्यात एलपीजी ग्राहकांसाठी सुधारित थेट लाभ हस्तांतर योजना १५ नोव्हेंबर २०१४ पासून अमरावती व वर्धा जिल्ह्यांत आणि उरलेल्या जिल्ह्यांत १ जानेवारी २०१५ पासून लागू करण्यात आली आहे. राज्यात ३१ डिसेंबर २०१६ रोजी सुमारे २.१६ कोटी सक्रिय एलपीजी ग्राहक, १.८२ कोटी एलपीजी आधार जोडणी केलेले ग्राहक आणि योजने अंतर्गत स्वेच्छेने अनुदानाचा लाभ सोडलेले १७.३७ लाख ग्राहक आहेत.

## घासलेट

४.२२ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गॅस जोडणी असलेले सर्व शिधापत्रिकाधारक वगळून उर्वरित शिधापत्रिकाधारकांना घासलेटचा पुरवठा केला जातो. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ अन्वये घासलेटचा साठा व व्यापार करण्याकरीता परवाना आवश्यक आहे. राज्यात ६१,७९९ घासलेट परवानाधारक आहेत. त्यापैकी ७२७ घाऊक, १,५३७ अर्धघाऊक आणि ५९,५३५ किरकोळ विक्रेते आहेत.

४.२२.१ एक, दोन आणि तीन व त्यापेक्षा जास्त सदस्य असलेल्या शिधापत्रिकाधारकांना पुरविण्यात येणा-या घासलेटचे परिमाण अनुक्रमे दोन, तीन व चार लिटर आहे. राज्यातील निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये घासलेटची किरकोळ किंमत ₹ १८.२८ ते ₹ १९.४० प्रति लिटर या दरम्यान आहे. घासलेटचे नियतन व उचल तक्ता ४.११ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.११ घासलेटचे नियतन व उचल**

(लाख किलो लिटर)

| वर्ष | नियतन | उचल |
|---|---|---|
| २०१४-१५ | ७.१३ | ७.१३ |
| २०१५-१६ | ६.२१ | ४.४२ |
| २०१६-१७+ | ४.०९ | ३.९२ |

+ डिसेंबरपर्यंत

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## गोदामे

४.२३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांमधुन करण्यात येते आणि राज्याच्या स्वत:च्या अथवा भाड्याने घेतलेल्या गोदामांमध्ये साठवणूक केली जाते. सन २०१६ मध्ये राज्य शासनाच्या मालकीची एकूण १,१०६ गोदामे असून त्यांची साठवणूक क्षमता ६.५६ लाख मे. टन आहे. यापैकी ०.७८ लाख मे. टन क्षमतेची १९९ गोदामे वापरासाठी अयोग्य असून ०.०७ लाख मे. टन क्षमतेची १६ गोदामे भाडे तत्वावर देण्यात आली होती. शासनाने ०.६५ लाख मे. टन क्षमतेची १०४ गोदामे अन्नधान्याच्या साठवणुकीसाठी भाड्याने घेतली आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोदामांच्या साठवणूक क्षमतेत वाढ करण्यासाठी व अन्नधान्याची नासाडी टाळण्याकरिता नाबार्डच्या अर्थ सहाय्याने राज्य शासनाने ५८४ नवीन गोदामे (५.९५ लाख मे.टन) बांधण्याच्या कामास सुरुवात केली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत डिसेंबर २०१६ पर्यंत २३३ गोदामे (३.२९ लाख मे.टन) बांधण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून २०० गोदामांच्या बांधकामाकरिता ₹ २१३.२६ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. जिल्हानिहाय उपलब्ध गोदामांची संख्या व त्यांची क्षमता परिशिष्ट ४.१३ मध्ये देण्यात आली आहे.

## अन्नधान्याकरीता अनुदान

४.२४ अन्नधान्याकरीता अनुदान हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याच्या वितरणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य, प्रतिकूल काळाशी सामना करण्याकरीता ठेवावयाच्या राखीव साठ्याच्या देखभालीचा खर्च आणि अन्नधान्य प्रापणासाठीची किंमत व विक्रीची किंमत यातील तफावतीमुळे राज्य शासनास सहन करावी लागणारी तूट आहे. सन २०१६-१७ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार अन्नधान्याकरीता ₹ १,५५१.९४ कोटी अनुदान आहे.

आलेख ४.११ : अन्नधान्याकरीता अनुदान




## जीवनावश्यक वस्तू कायद्याची अंमलबजावणी

४.२५ जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत जीवनावश्यक वस्तुंचे उत्पादन, वितरण, व्यापार व वाणिज्य नियंत्रित करण्याकरिता आदेश जारी करण्यास राज्य शासनास अधिकार आहेत. केंद्र सरकारने डाळी, खाद्यतेल आणि खाद्य तेलबिया यांच्या साठा निर्बंधास ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ अन्वये राज्याने डाळी, खाद्यतेल आणि खाद्य तेलबिया यावर साठा निर्बंध ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत लागू केले आहेत.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण

४.२६ केवळ योग्य आणि पात्र लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात पारदर्शकतेने वेळेवर अन्नधान्य वितरित करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत सुमारे २.४० कोटी शिधापत्रिकांचे संगणकीकरण करण्यात आले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माहितीकोषामध्ये १८ नोव्हेंबर २०१६ रोजी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत ६.१० कोटी लाभार्थ्यांचे आधार क्रमांक जोडणीचे काम पूर्ण झाले आहे. रास्त भाव दुकानांचे संगणकाद्वारे व्यवस्थापन म्हणजेच लाभार्थ्यांना आधार क्रमांकाद्वारे बायोमेट्रीक ओळख पटवून धान्य वितरित करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

## राज्य अन्न आयोग

४.२७ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम कलम १८ मधील तरतुदीनुसार, राज्याने अन्न आयोगाची स्थापना केली आहे आणि महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांना राज्य अन्न आयोगाच्या अधिकारांचा वापर व कार्ये करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे.

## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

४.२८ ग्राहकांच्या अधिकारांना संरक्षण व चालना देण्याकरिता राज्यात ग्राहक तक्रार निवारण आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असून औरंगाबाद आणि नागपूर या दोन ठिकाणी खंडपीठे आहेत. आयोगाच्या स्थापनेपासून ७४,८६० तक्रारी प्राप्त झाल्या व त्यापैकी ६०,५०५ तक्रारींचे निवारण करण्यात आले.

* * * * *

## परिशिष्ट ४.१

## महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वर्ष-ते-वर्ष चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | -- |
| २००४-०५ | १०४ | १०५ | १०३ | १०२ | १०२ | १०४ | -- |
| २००५-०६ | १०९ | १०९ | १०८ | १०३ | १०५ | १०७ | ३.८ |
| २००६-०७ | ११८ | ११७ | १३२ | १०५ | १०८ | ११६ | ७.८ |
| २००७-०८ | १२८ | १२६ | १७६ | १०७ | ११५ | १२८ | १०.३ |
| २००८-०९ | १४२ | १३९ | २३८ | ११० | १२५ | १४५ | १३.२ |
| २००९-१० | १६६ | १५६ | २६१ | १११ | १३६ | १६३ | १२.८ |
| २०१०-११ | १८४ | १७४ | २९७ | ११४ | १५० | १८१ | १०.९ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | ३२६ | ११९ | १६२ | १९८ | ९.१ |
| २०१२-१३ | २२२ | २४३ | ३८३ | १२५ | १७२ | २१८ | १०.५ |
| २०१३-१४ | २४२ | २६४ | ४३४ | १३१ | १९२ | २४१ | १०.२ |
| २०१४-१५ | २४९ | २९३ | ४६७ | १३३ | २०० | २५१ | ४.२ |
| २०१५-१६ | २६२ | ३२५ | ४४६ | १३५ | २०५ | २५८ | २.८ |
| २०१६-१७@ | २७४ | ३४९ | ४५६ | १३७ | २०९ | २६६ | ३.६ |
| एप्रिल २०१६ | २६८ | ३३६ | ४५३ | १३७ | २०९ | २६३ | ७.० |
| मे २०१६ | २७५ | ३३९ | ४५१ | १३७ | २०९ | २६६ | ७.० |
| जून २०१६ | २७८ | ३४९ | ४५२ | १३७ | २०८ | २६८ | ४.५ |
| जुलै २०१६ | २८३ | ३४७ | ४५१ | १३७ | २१० | २७१ | ५.७ |
| ऑगस्ट २०१६ | २७९ | ३५३ | ४५१ | १३७ | २०९ | २६९ | ३.३ |
| सप्टेंबर २०१६ | २७१ | ३५४ | ४५५ | १३६ | २१० | २६५ | १.८ |
| ऑक्टोबर २०१६ | २७५ | ३५२ | ४५४ | १३७ | २११ | २६७ | १.९ |
| नोव्हेंबर २०१६ | २७० | ३५५ | ४५३ | १३७ | २१० | २६५ | ०.७ |
| डिसेंबर २०१६ | २६४ | ३५६ | ४८० | १३६ | २०८ | २६४ | ०.९ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. @ ९ महिन्यांची सरासरी

टीप - चलनवाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

## परिशिष्ट ४.२

## महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वर्ष-ते-वर्ष चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४५.८०** | **१.५४** | **१०.२८** | **७.५१** | **३४.८७** | **१००.००** | -- |
| २००४-०५ | १०५ | १०३ | १०३ | १०२ | १०४ | १०४ | -- |
| २००५-०६ | १०९ | १०७ | १०७ | १०३ | १०७ | १०८ | ३.२ |
| २००६-०७ | १२० | ११२ | १२४ | १०५ | ११० | ११५ | ७.२ |
| २००७-०८ | १२८ | १२१ | १६२ | १०६ | ११५ | १२५ | ८.७ |
| २००८-०९ | १४२ | १३४ | २२४ | १०९ | १२३ | १४१ | १२.९ |
| २००९-१० | १६५ | १४७ | २४५ | ११३ | १३१ | १५७ | ११.४ |
| २०१०-११ | १८६ | १६९ | २७८ | ११८ | १४३ | १७५ | ११.४ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | २९७ | १२६ | १५४ | १८९ | ७.९ |
| २०१२-१३ | २२४ | २३३ | ३४९ | १३२ | १६० | २०८ | १०.१ |
| २०१३-१४ | २४८ | २६२ | ३९६ | १३७ | १७५ | २३० | १०.३ |
| २०१४-१५ | २५४ | २८८ | ४२९ | १३९ | १८५ | २४० | ४.५ |
| २०१५-१६ | २६८ | ३२२ | ४०८ | १४२ | १९१ | २४७ | ३.० |
| २०१६-१७@ | २८१ | ३४४ | ४१९ | १४५ | १९४ | २५५ | ३.५ |
| एप्रिल २०१६ | २७२ | ३३६ | ४१५ | १४५ | १९३ | २५१ | ६.७ |
| मे २०१६ | २८० | ३३९ | ४१५ | १४५ | १९३ | २५४ | ६.४ |
| जून २०१६ | २९१ | ३४३ | ४१५ | १४५ | १९४ | २६० | ५.६ |
| जुलै २०१६ | २९७ | ३४४ | ४१५ | १४५ | १९४ | २६२ | ६.१ |
| ऑगस्ट २०१६ | २८४ | ३४४ | ४१५ | १४४ | १९४ | २५७ | ३.० |
| सप्टेंबर २०१६ | २७६ | ३४५ | ४१५ | १४५ | १९५ | २५४ | १.५ |
| ऑक्टोबर २०१६ | २८० | ३४८ | ४१६ | १४४ | १९४ | २५५ | १.३ |
| नोव्हेंबर २०१६ | २७७ | ३४९ | ४१४ | १४४ | १९४ | २५३ | ०.३ |
| डिसेंबर २०१६ | २७१ | ३५० | ४४६ | १४५ | १९४ | २५४ | १.४ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. @ ९ महिन्यांची सरासरी

टीप - चलनवाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

# परिशिष्ट ४.३

## निवडक राज्यांसाठी केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेला ग्राहक किंमती निर्देशांक

(पायाभूत वर्ष २०१२) (एप्रिल -डिसेंबर)

| राज्य | ग्रामीण | | | नागरी | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७ | टक्के वाढ | २०१५-१६ | २०१६-१७ | टक्के वाढ | २०१५-१६ | २०१६-१७ | टक्के वाढ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| आंध्र प्रदेश | १२७.८१ | १३६.४२ | ६.७४ | १२५.१६ | १३१.४२ | ५.०१ | १२६.८३ | १३४.५८ | ६.११ |
| बिहार | १२८.१३ | १३३.९३ | ४.५३ | १२२.८० | १२६.५२ | ३.०३ | १२७.३६ | १३२.८४ | ४.३१ |
| गुजरात | १२५.२३ | १३४.७४ | ७.५९ | १२०.४९ | १२५.६२ | ४.२६ | १२२.५६ | १२९.५६ | ५.७१ |
| कर्नाटक | १२८.६९ | १३५.०६ | ४.९५ | १२८.२० | १३४.३७ | ४.८१ | १२८.४३ | १३४.६९ | ४.८७ |
| केरळ | १२५.१३ | १३०.२२ | ४.०७ | १२५.८० | १३१.०६ | ४.१८ | १२५.३८ | १३०.५२ | ४.१० |
| मध्य प्रदेश | १२४.१४ | १२९.३६ | ४.२० | १२३.०३ | १२७.५३ | ३.६६ | १२३.६८ | १२८.६१ | ३.९९ |
| **महाराष्ट्र** | **१२५.३७** | **१३३.०७** | **६.१४** | **११९.८१** | **१२४.२२** | **३.६८** | **१२१.६७** | **१२७.१९** | **४.५४** |
| पंजाब | १२१.६४ | १२७.७६ | ५.०२ | १२१.४७ | १२५.५६ | ३.३७ | १२१.५८ | १२६.७८ | ४.२८ |
| राजस्थान | १२६.६७ | १३४.१३ | ५.८९ | १२२.७३ | १२९.१७ | ५.२४ | १२५.२६ | १३२.३७ | ५.६८ |
| तामिळनाडू | १२४.९८ | १३०.६२ | ४.५२ | १२५.६७ | १३०.३९ | ३.७६ | १२५.३९ | १३०.४७ | ४.०५ |
| उत्तरप्रदेश | १२४.०८ | १३०.४३ | ५.१२ | १२२.९१ | १२८.२० | ४.३० | १२३.६४ | १२९.६३ | ४.८४ |
| पश्चिम बंगाल | १२३.६४ | १३१.६७ | ६.४९ | १२२.३० | १२७.९३ | ४.६१ | १२३.०१ | १२९.९१ | ५.६१ |
| **अखिल भारत** | **१२५.५२** | **१३२.३७** | **५.४५** | **१२२.६७** | **१२७.७९** | **४.१८** | **१२४.२१** | **१३०.२३** | **४.८५** |

*आधार :* केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

टीप : प्रत्येक राज्यासाठी वस्तुसूची वेगवेगळी आहे.

## परिशिष्ट ४.४

## महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक

(पायाभूत वर्ष १९८६-८७)

| वर्ष / महिना | शेतमजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | | | | ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | अखिल भारत | | महाराष्ट्र | | अखिल भारत | |
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २०००-०१ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०५ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०७ |
| २००१-०२ | ३०७ | ३०३ | ३०२ | ३०९ | ३०८ | ३०४ | ३०३ | ३११ |
| २००२-०३ | ३२२ | ३१७ | ३१२ | ३१९ | ३२२ | ३१७ | ३१३ | ३२१ |
| २००३-०४ | ३४२ | ३३२ | ३२५ | ३३१ | ३४१ | ३३२ | ३२६ | ३३३ |
| २००४-०५ | ३५७ | ३४६ | ३३३ | ३३९ | ३५६ | ३४६ | ३३४ | ३४१ |
| २००५-०६ | ३६५ | ३६२ | ३४४ | ३५३ | ३६४ | ३६२ | ३४५ | ३५५ |
| २००६-०७ | ४०२ | ३९४ | ३७६ | ३८० | ४०० | ३९२ | ३७६ | ३८२ |
| २००७-०८ | ४३७ | ४२३ | ४०६ | ४०९ | ४३४ | ४२० | ४०६ | ४०९ |
| २००८-०९ | ४८४ | ४६४ | ४५२ | ४५० | ४८० | ४६० | ४५२ | ४५१ |
| २००९-१० | ५७४ | ५४० | ५२२ | ५१३ | ५७१ | ५३५ | ५२३ | ५१३ |
| २०१०-११ | ६३३ | ६०० | ५७२ | ५६४ | ६२९ | ५९५ | ५७३ | ५६४ |
| २०११-१२ | ७०४ | ६७६ | ६०२ | ६११ | ६९७ | ६६८ | ६०३ | ६११ |
| २०१२-१३ | ७७० | ७४४ | ६५८ | ६७२ | ७६३ | ७३७ | ६६० | ६७३ |
| २०१३-१४ | ८१८ | ७९३ | ७३७ | ७५० | ७९३ | ७८६ | ७३९ | ७५१ |
| २०१४-१५ | ८७३ | ८४८ | ७७८ | ८०० | ८६१ | ८४१ | ७८२ | ८०१ |
| २०१५-१६ | ९३० | ८९७ | ८०७ | ८३५ | ९१५ | ८८७ | ८१० | ८३६ |
| २०१६-१७@ | ९९८ | ९५१ | ८४४ | ८७० | ९८७ | ९४४ | ८५० | ८७५ |
| एप्रिल २०१६ | ९५९ | ९२१ | ८१७ | ८४८ | ९५१ | ९१६ | ८२४ | ८५४ |
| मे २०१६ | ९७० | ९२८ | ८३३ | ८६० | ९६० | ९२२ | ८४० | ८६६ |
| जून २०१६ | १,००१ | ९४९ | ८४५ | ८६९ | ९८९ | ९४२ | ८५३ | ८७४ |
| जुलै २०१६ | १,०१९ | ९६३ | ८५५ | ८७७ | १,००७ | ९५५ | ८६१ | ८८१ |
| ऑगस्ट २०१६ | १,०२१ | ९६५ | ८५३ | ८७६ | १,००९ | ९५७ | ८५९ | ८८१ |
| सप्टेंबर २०१६ | १,००० | ९५५ | ८४६ | ८७३ | ९८८ | ९४७ | ८५२ | ८७७ |
| ऑक्टोबर २०१६ | १,०१५ | ९६६ | ८४९ | ८७६ | १,००२ | ९५८ | ८५४ | ८८१ |
| नोव्हेंबर २०१६ | १,००४ | ९५९ | ८५१ | ८७८ | ९९३ | ९५३ | ८५७ | ८८३ |
| डिसेंबर २०१६ | ९९६ | ९५६ | ८४६ | ८७६ | ९८३ | ९४९ | ८५१ | ८८१ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.५

## औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००१)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी, तंबाखू व मादक पदार्थ | इंधन व दिवाबत्ती | निवास | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्वसाधारण निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४६.१९** | **२.२७** | **६.४३** | **१५.२७** | **६.५८** | **२३.२६** | **१००.००** |
| २००५-०६ | ११५ | ११२ | १२३ | ११८ | ११० | १२० | ११७ |
| २००६-०७ | १२६ | ११६ | १३० | १२६ | ११४ | १२६ | १२५ |
| २००७-०८ | १३६ | १२८ | १३३ | १३१ | ११८ | १३१ | १३३ |
| २००८-०९ | १५३ | १३८ | १४४ | १३७ | १२२ | १४१ | १४५ |
| २००९-१० | १७६ | १५० | १४९ | १६६ | १२८ | १४९ | १६३ |
| २०१०-११ | १९४ | १६८ | १६३ | २०१ | १३६ | १५७ | १८० |
| २०११-१२ | २०६ | १९४ | १८८ | २२२ | १५५ | १६८ | १९५ |
| २०१२-१३ | २३० | २२३ | २१४ | २३८ | १७० | १८२ | २१५ |
| २०१३-१४ | २५९ | २४९ | २३० | २५४ | १८१ | १९५ | २३६ |
| २०१४-१५ | २८० | २८४ | २४३ | २७३ | १९२ | २१० | २५४ |
| २०१५-१६ | २९३ | ३०५ | २४९ | २८५ | १९८ | २१६ | २६५ |
| २०१६-१७@ | ३०८ | ३२४ | २४८ | २९६ | २०५ | २२४ | २७६ |
| एप्रिल २०१६ | २९९ | ३१६ | २५० | २९३ | २०३ | २२१ | २७१ |
| मे २०१६ | ३०७ | ३१९ | २४९ | २९३ | २०३ | २२१ | २७५ |
| जून २०१६ | ३१२ | ३१९ | २४६ | २९३ | २०४ | २२३ | २७७ |
| जुलै २०१६ | ३१६ | ३२१ | २४६ | २९८ | २०५ | २२४ | २८० |
| ऑगस्ट २०१६ | ३१० | ३२५ | २४८ | २९८ | २०५ | २२४ | २७८ |
| सप्टेंबर २०१६ | ३०८ | ३२७ | २४८ | २९८ | २०६ | २२५ | २७७ |
| ऑक्टोबर २०१६ | ३१० | ३२७ | २४७ | २९८ | २०५ | २२६ | २७८ |
| नोव्हेंबर २०१६ | ३०७ | ३२९ | २५० | २९८ | २०६ | २२६ | २७७ |
| डिसेंबर २०१६ | ३०१ | ३२९ | २५० | २९८ | २०६ | २२८ | २७५ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.६

## महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २००१) (केंद्रिय केंद्रे)

| वर्ष / महिना | मुंबई | | सोलापूर | | नागपूर | | पुणे | | नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **भारांक** | **४८.९** | **१००.००** | **५४.७** | **१००.००** | **४३.१** | **१००.००** | **३९.८** | **१००.००** | **४१.४** | **१००.००** |
| २००५-०६ | ११५ | ११८ | ११३ | ११५ | ११५ | ११९ | १२० | ११९ | ११९ | ११८ |
| २००६-०७ | १२६ | १२८ | १२६ | १२७ | १३३ | १३४ | १३४ | १३० | १३१ | १२६ |
| २००७-०८ | १३६ | १३६ | १४९ | १४२ | १४६ | १४२ | १४५ | १३८ | १४० | १३२ |
| २००८-०९ | १५१ | १४८ | १५९ | १५१ | १६६ | १५५ | १६० | १५० | १५५ | १४२ |
| २००९-१० | १७३ | १६३ | १७६ | १६६ | १९२ | १८३ | १८३ | १६७ | १८३ | १६५ |
| २०१०-११ | १९१ | १७८ | १८९ | १८२ | २०५ | २०७ | २०३ | १८५ | २०२ | १८६ |
| २०११-१२ | २०८ | १९६ | २१४ | २०४ | २१६ | २२४ | २२६ | २०४ | २१६ | २०८ |
| २०१२-१३ | २३२ | २१८ | २२८ | २२० | २४४ | २४६ | २४७ | २२१ | २३३ | २२८ |
| २०१३-१४ | २६० | २४२ | २६० | २४६ | २८० | २६८ | २८० | २४२ | २५८ | २४४ |
| २०१४-१५ | २८४ | २६२ | २८३ | २६५ | २९४ | २८१ | २९९ | २५७ | २८० | २६१ |
| २०१५-१६ | ३०६ | २८० | ३०६ | २८४ | ३१७ | २९८ | ३१६ | २६९ | २८९ | २७४ |
| २०१६-१७@ | ३१६ | २८८ | ३१९ | २९५ | ३३० | ३०९ | ३३५ | २७९ | ३०६ | २८८ |
| एप्रिल २०१६ | ३१० | २८४ | ३११ | २९० | ३१३ | ३०० | ३२७ | २७५ | २९७ | २८१ |
| मे २०१६ | ३२२ | २९० | ३२१ | २९५ | ३२६ | ३०५ | ३२७ | २७५ | २९८ | २८१ |
| जून २०१६ | ३२६ | २९२ | ३२५ | २९८ | ३४३ | ३१३ | ३४२ | २८१ | ३०८ | २८६ |
| जुलै २०१६ | ३३२ | २९५ | ३२५ | २९८ | ३४८ | ३१६ | ३५३ | २८६ | ३१२ | २९० |
**तक्ता ७.८ तृणधान्यांचा व कडधान्यांचा अंदाजित दरडोई घरगुती वापर**

| पीक | दरडोई घरगुती वापर | | वार्षिक गरज २०१६-१७# (लाख मे.टन) |
|---|---|---|---|
| | मासिक (किलो) | वार्षिक (किलो) | |
| तांदूळ | २.९६ | ३६.०१ | ४३.२४ |
| गहू | ४.७५ | ५७.७९ | ६९.३८ |
| ज्वारी | ०.९४ | ११.४४ | १३.७३ |
| बाजरी | ०.३८ | ४.६२ | ५.५५ |
| इतर तृणधान्ये | ०.०५ | ०.६१ | ०.७३ |
| **एकूण तृणधान्ये** | **९.०८** | **११०.४७** | **१३२.६३** |
| **एकूण कडधान्ये** | **०.९८** | **११.९२** | **१४.३१** |

# मध्यवार्षिक प्रक्षेपित लोकसंख्येकरीता (१ ऑक्टोबर, २०१६ रोजी)

टिप: रानपा ६८ वी फेरी (२०११-१२)

*आधार :* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## वहिती खातेदार

७.६ कृषि गणना २०१०-११ नुसार, राज्यात एकूण १.३७ कोटी वहिती खातेदार होते, त्यापैकी ७८.६ टक्के वहिती खातेदार दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीनधारणा असलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकरी होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचे प्रमाण अनुक्रमे ७.५ टक्के व ६.३ टक्के होते आणि त्यांनी धारण केलेले क्षेत्र अनुक्रमे ६.६ टक्के व ७.९ टक्के होते.

एकूण वहिती खातेदारांच्या जमीनधारणेचा सरासरी आकार १.४४ हेक्टर असून त्या तुलनेत अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचा जमीन धारणेचा सरासरी आकार १.२७ हेक्टर व १.८० हेक्टर होता. कृषि गणना २०१०-११ नुसार राज्यातील वहिती खातेदार व क्षेत्र तक्ता ७.९ मध्ये आणि समय मालिका परिशिष्ट ७.३ मध्ये दिली आहे. निवडक राज्यांतील वहिती खाती तक्ता ७.१० मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.९ कृषि गणना २०१०-११ नुसार वहिती खातेदार व क्षेत्र**

| आकार वर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('०००) | वहितीचे क्षेत्र ('००० हेक्टर) | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | |
|---|---|---|---|---|
| | | | २००५-०६ | २०१०-११ |
| १.० पर्यंत | ६,७०९ | ३,१८६ | ०.४६ | ०.४७ |
| १.० - २.० | ४,०५२ | ५,७३९ | १.२६ | १.४२ |
| २.० - ५.० | २,४७३ | ७,१५५ | २.७३ | २.८९ |
| ५.० - १०.० | ३९६ | २,६०३ | ६.१६ | ६.५७ |
| १०.० -२०.० | ५९ | ७५२ | १०.८९ | १२.७५ |
| २०.० व अधिक | ९ | ३३२ | ३२.५२ | ३६.८९ |
| **एकूण** | **१३,६९८** | **१९,७६७** | **१.४६** | **१.४४** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## जमिनीचा वापर

७.७ जमीन वापराच्या २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार राज्याच्या एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी, पिकांखालील स्थूल क्षेत्र २३२.७३ लाख हेक्टर तर निव्वळ पेरणी क्षेत्र १७३.४५ लाख हेक्टर (५६.४ टक्के) होते. वनांखालील क्षेत्र ५२.०१ लाख हेक्टर (१६.९ टक्के), मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र ३२.०९ लाख हेक्टर (१०.४ टक्के), मशागत न केलेले इतर क्षेत्र २४.१६ लाख हेक्टर (७.९ टक्के) आणि पडीत जमिनीखालील क्षेत्र २५.८७ लाख हेक्टर (८.४ टक्के) होते. जमीन वापराबाबतच्या आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.४ मध्ये दिली आहे. सन २०१३- १४ च्या आकडेवारीनुसार निवडक राज्यांतील जमीन वापराची आकडेवारी तक्ता ७.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.१० निवडक राज्यांतील वहिती खाती**

| राज्य | वहिती खाती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या ('०००) | | क्षेत्र ('००० हे) | | सरासरी क्षेत्र (हे) | |
| | २००५-०६ | २०१०-११ | २००५-०६ | २०१०-११ | २००५-०६ | २०१०-११ |
| **महाराष्ट्र** | **१३,७१६** | **१३,६९९** | **२०,००५** | **१९,७६७** | **१.४६** | **१.४४** |
| मध्यप्रदेश | ७,९०८ | ८,८७२ | १५,९९४ | १५,८३६ | २.०२ | १.७८ |
| उत्तर प्रदेश | २२,४५८ | २३,३२५ | १७,९०६ | १७,६२२ | ०.८० | ०.७६ |
| गुजरात | ४,६६१ | ४,८८६ | १०,२६९ | ९,८९८ | २.२० | २.०३ |
| कर्नाटक | ७,५८१ | ७,८३२ | १२,३८५ | १२,१६१ | १.६३ | १.५५ |
| तामिळनाडू | ८,१९३ | ८,११८ | ६,८२४ | ६,४८८ | ०.८३ | ०.८० |

*आधार* : कृषि गणना २००५-०६, २०१०-११

**तक्ता ७.११ सन २०१३-१४ च्या आकडेवारीनुसार निवडक राज्यांतील जमीन वापराची आकडेवारी**

| राज्य | भौगोलिक क्षेत्र (लाख हे) | पिकांखालील एकूण क्षेत्र (लाख हे) | टक्केवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निव्वळ पेरणी क्षेत्र | वने | मशागतीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | इतर मशागत न केलेली जमीन | पडीक जमीन | एकूण |
| **महाराष्ट्र@** | **३०७.५८** | **२३२.७३** | **५६.५** | **१६.९** | **१०.४** | **७.८** | **८.४** | **१००.०** |
| मध्यप्रदेश | ३०८.२५ | २४०.४७ | ५०.० | २८.२ | ११.४ | ७.५ | २.७ | १००.० |
| उत्तर प्रदेश | २४०.९३ | २५८.९६ | ६८.७ | ६.९ | १४.५ | ३.३ | ६.९ | १००.० |
| गुजरात | १९६.०२ | १२४.८७ | ५२.६ | ९.४ | १९.० | १४.४ | २.० | १००.० |
| कर्नाटक | १९१.७९ | १२२.६७ | ५१.७ | १६.० | ११.६ | ८.३ | ११.६ | १००.० |
| तामिळनाडू | १३०.०६ | ५८.९७ | ३६.२ | १६.३ | २०.६ | ५.३ | २१.८ | १००.० |

टिप: आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळणार नाहीत. @ २०१४-१५ ची आकडेवारी

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, कृषि विभाग, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार

## सिंचन प्रकल्प

७.८ महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील लाभक्षेत्रातील सिंचित क्षेत्र २०१५-१६ मध्ये २४.४७ लाख हेक्टर आहे. पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.१२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१२ पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| बाब | जलसंपदा विभागाचे प्रकल्प | | | लघु प्रकल्प (स्थानिक स्तर) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मोठे व मध्यम | लघु (राज्य स्तर) | एकूण | कोल्हापूर बंधारे | पाझर तलाव | उपसा जलसिंचन | लघु पाट बंधारे | इतर | एकुण लघु (स्थानिक) |
| **(अ) ३० जून २०१६ रोजी प्रकल्पांची संख्या** | | | | | | | | | |
| (i) पूर्ण | ४०३$ | ३,५०६$ | ३,९०९$ | ११,३३७ | २१,५४९ | २,६५९ | २,६१६ | ४३,४७० | ८१,६३१ |
| (ii) प्रगतीपथावरील | | | | ५,४०५ | १,०७१ | १२७ | १,१६४ | ४,१८८ | ११,९५५ |
| **(ब) सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | | | | | | | |
| (i) जून २०१५ पर्यंत निर्मित | ३४.६६* | १४.४४* | ४९.१०* | ३.३३ | ६.५३ | ०.३९ | २.३३ | ४.७२ | १७.३२ |
| (ii) २०१५-१६ मधील कालव्याद्वारे सिंचित क्षेत्र | १२.३८++ | ४.२४++ | १६.६२++ | १.१३ | - | ०.१३ | ०.८१ | - | २.०७ |
| (iii) लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे २०१५-१६ मधील सिंचित क्षेत्र | ६.७८ | १.०७ | ७.८५ | - | - | - | - | - | - |
| **(iv) एकूण वापरलेली सिंचन क्षमता** (ii)+(iii) | **१९.१६#** | **५.३१#** | **२४.४७#** | **१.१३** | - | **०.१३** | **०.८१** | - | **२.०७** |

$ पूर्ण व प्रगतीपथावरील घटकांची संख्या # सन २०१५-१६ मध्ये राज्यात अवर्षण स्थिती असल्याने गतवर्षीच्या तुलनेत वापरलेली सिंचन क्षमता कमी दिसते.

* अस्थायी ++ प्रकल्प कालव्यांवरील उपसा व धरणातून नदी नाल्यांमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र समाविष्ट

*आधार* : १) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन २) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक), महाराष्ट्र शासन

## पाटबंधारे क्षेत्रातील सुधारणा

७.९ सप्टेंबर २०१६ अखेर एकूण ५,१६५ पाणी वापर संस्था स्थापन झाल्या आहेत. पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी यांची समय मालिका परिशिष्ट ७.६ मध्ये दिली आहे.

## जलाशयांतील साठा

७.१० मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्यक्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे १५ ऑक्टोबर २०१५ रोजीचा एकूण उपयुक्त जलसाठा १८,०७२ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार उपयुक्त जलसाठा क्षमतेच्या सुमारे ४४.४ टक्के होता. जलाशयातील उपयुक्त साठा, सिंचन क्षमता व सिंचित क्षेत्र तक्ता ७.१३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१३ जलाशयातील उपयुक्त साठा, सिंचन क्षमता व सिंचित क्षेत्र**

| वर्ष | प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमता (दलघमी) | १५ ऑक्टोबर रोजीचा उपयुक्त जलसाठा (दलघमी) | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी | निर्मित सिंचन क्षमता (३० जून अखेर) (लाख हे) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र (१ जुलै ते ३० जून) (लाख हे) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राची निर्मित सिंचन क्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ३३,३८५ | २७,३०९ | ८१.८ | ४७.३७ | २९.५५ | ६२.४ |
| २०११-१२ | ३४,११९ | २६,९८९ | ७९.१ | ४५.३५# | ३२.४० | ७१.४ |
| २०१२-१३ | ३५,८३८ | २०,४०६ | ५६.९ | ४७.६२ | २४.९६ | ५२.४ |
| २०१३-१४ | ४०,३१३ | २९,२३२ | ७२.५ | ४८.०३ | ३२.४६ | ६७.६ |
| २०१४-१५ | ४०,७२९ | २५,००१ | ६१.४ | ४८.६६ | ३१.३७ | ६४.५ |
| २०१५-१६ | ४०,७२९ | १८,०७२ | ४४.४ | ४९.१० | २४.४७ | ४९.८ |

दलघमी : दशलक्ष घनमीटर

\# शासनाच्या आदेशानुसार मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद यांच्याकडून डॉ. चितळे समिती अहवालाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त माहितीच्या आधारे २०११ पासून निर्मित सिंचन क्षमता सुधारित

*आधार* : जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन

## जलयुक्त शिवार अभियान

७.११ 'सन २०१९ पर्यंत पाणी टंचाईमुक्त राज्य' या संकल्पनेनुसार राज्यात डिसेंबर २०१४ पासून पाण्याची टंचाई कायमची दूर करण्यासाठी 'जलयुक्त शिवार अभियान' राबविण्यात येत आहे. भू-जल पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी शाश्वत सिंचन सुविधेच्या निर्मितीद्वारे पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे असा या अभियानाचा मुख्य हेतू आहे. दरवर्षी ५,००० गावे व पाच वर्षात २५,००० गावे पाणी टंचाईमुक्त करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

७.११.१ आराखड्यानुसार २०१५-१६ मध्ये निवडण्यात आलेल्या एकूण ६,२०२ गावांपैकी ४,३७४ गावे पाणी टंचाई मुक्त करण्यात आली आहेत. जलयुक्त शिवार अभियानाची प्रगती तक्ता ७.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.१४ जलयुक्त शिवार अभियानाची प्रगती**

| तपशील | एकक | २०१५-१६ | २०१६-१७ + |
|---|---|---|---|
| निवडलेली गावे | संख्या | ६,२०२ | ५,२८१ |
| पूर्ण झालेली कामे | संख्या | २,२६,६५५ | ३५,९०६ |
| प्रगतीपथावर असलेली कामे | संख्या | १०,७४१ | १,७२,८८० |
| लोक सहभागाद्वारे पूर्ण केलेली कामे | संख्या | ६,१८८ | १,९१६ |
| लोक सहभागाद्वारे पूर्ण केलेल्या कामांचे मूल्य | ₹ कोटी | ४०१ | ११३ |
| पुरविण्यात आलेला एकूण विशेष निधी | ₹ कोटी | २,००० | १,४०० |
| विशेष निधीतील खर्च | ₹ कोटी | १,४५० | ८५ |
| निर्माण केलेला जलसाठा | ह घ मी | ११,८२,२३० | - |
| १०० टक्के कामे पूर्ण झालेली गावे | संख्या | ४,३७४ | - |
| विशेष निधी व समायोजित केलेल्या निधीद्वारे केलेला एकूण खर्च | ₹ कोटी | ३,३७१ | ३७५ |

+ २५ नोव्हेंबर २०१६ पर्यंत ह घ मी हजार घन मीटर

*आधार*:ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन

## मागेल त्याला शेततळे योजना

७.१२ राज्य शासनाने 'मागेल त्याला शेततळे' ही महत्त्वाकांक्षी योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत शेतामध्येच जल संधारणासाठी नवीन शेततळी निर्माण करण्याच्या हेतूने अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने अनुदान देण्यात येत आहे. शेतामध्ये कायमस्वरूपी पाणीसाठे निर्माण करण्यावर या योजनेचा भर आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्येच पाणी साठवून त्याचा शेतीसाठी वापर करण्यास मदत झाली आहे. या योजनेअंतर्गत अनुदान लाभास पात्र होण्यासाठी शेतकऱ्याकडे वैयक्तिक किंवा सामुहिक किमान ०.६० हेक्टर शेती क्षेत्र असणे आवश्यक आहे. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेअंतर्गत २०१६-१७ मध्ये १,११,१११ शेततळ्यांची निर्मिती करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

## मृद व जलसंधारण

७.१३ कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढविणे व जमिनीची धूप थांबविणे तसेच जलसंवर्धनासाठी विविध योजना राबविण्यात येत असून पूर्ण झालेली व प्रगतीपथावरील पाणलोटांची कामे तक्ता ७.१५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१५ पूर्ण झालेल्या व प्रगतीपथावरील पाणलोटांची कामे**

| योजना | पाणलोट कामांची संख्या | | | निवडलेल्या पाणलोट कामांवरील मार्च २०१६ पर्यंत खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| | निवडलेले | पूर्ण | प्रगतीपथावरील | |
| राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | ३२४ | २५५ | ० | १३७.८४ |
| नदी खोरे विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | २७१ | २२६ | ० | २९९.२६ |
| पश्चिम घाट विकास कार्यक्रम (मेगा पाणलोट) | १६ | ० | ० | १३६.५६ |
| एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | २५,२७४ | १३,२७६ | १२,१३० | ७,१९७.२८ |
| नाबार्ड सहाय्यित पाणलोट (मेगा पाणलोट) | ४३ | ० | ४३ | ७१.३९ |
| एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (आयडब्लूएमपी) | १,१७० | ० | १,१७० | २,३८३.०० |
| **एकूण** | **२७,०९८** | **१३,७५७** | **१३,३४३** | **१०,२२५.३३** |

*आधार:* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## तुषार व ठिबक सिंचन

७.१४ वर्षनिहाय तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च तक्ता ७.१६ मध्ये दिला आहे. शेतकऱ्यांना तुषार व ठिबक सिंचन संच खरेदी करण्यासाठी अनुदान देण्यात देते. शेतावरील पाणी व्यवस्थापन योजनेंतर्गत अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ६० टक्के व इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान देण्यात येते. तर अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेर अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ४५ टक्के व इतर शेतकऱ्यांना ३५ टक्के अनुदान देण्यात येते. विदर्भ सघन सिंचन विकास आराखड्यांतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संच उभारण्यासाठी एकूण किंमतीच्या ७५ टक्के किंवा कमाल ₹ ५७,००० प्रति हेक्टर अनुदान देण्यात येते. तसेच इतर शेतकऱ्यांना एकूण किंमतीच्या ५० टक्के किंवा कमाल ₹ ३८,००० प्रति हेक्टर अनुदान देण्यात येते. तुषार सिंचन संच उभारण्यासाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना एकूण किंमतीच्या ७५ टक्के किंवा कमाल ₹ २२,००० प्रति हेक्टर अनुदान देण्यात येते. तसेच इतर शेतकऱ्यांना एकूण किंमतीच्या ५० टक्के किंवा कमाल ₹ १५,००० प्रति हेक्टर अनुदान देण्यात येते.

**तक्ता ७.१६ वर्षनिहाय तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च**

| वर्ष | तुषार सिंचन संच | | ठिबक सिंचन संच | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | |
| २०१३-१४ | ३०,२९६ | ३०,२९६ | ८९,१०८ | ८१,८०० | ३०५.५७ |
| २०१४-१५ | ५२,१८० | ४३,०९८ | २,००,४९६ | १,७०,७१९ | ६८८.४१ |
| २०१५-१६ | ३३,८९८ | ३३,८९८ | १,१२,२४४ | १,०२,०४१ | ४४५.९८ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## कृषि पंपांचे विद्युतीकरण

७.१५ सन २०१५-१६ मध्ये महावितरण कंपनीने १.३० लाख कृषि पंपांना वीज जोडणी उपलब्ध करुन दिली. सन २०१६-१७ मध्ये कृषि पंपांच्या विद्युतीकरणाच्या १.३० लाख उद्दिष्टापैकी डिसेंबरपर्यंत ०.७८ लाख कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले. 'मागेल त्याला वीज जोडणी' देण्याच्या स्थितीपर्यंत पोहोचण्याकरिता प्रयत्न करण्यात येत असून अनुशेष-अधिसूचित जिल्ह्यांमधील कृषि पंपांच्या विद्युतीकरणाचा अनुशेष दूर करण्यासाठी २०१६-१७ करिता ₹ २५९ कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

७.१५.१ राज्यात सुमारे ३९.६७ लाख कृषि पंप आहेत. कृषि पंपांना पुरविण्यात येणाऱ्या विजेसाठी अनुदान देण्यात येते. वीज अनुदान देण्यासाठी २०१५-१६ च्या ₹ ४,५१९.१० कोटीच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये ₹ ४,७९०.८९ कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे.

## सुधारित बियाणांचा वापर

७.१६ महाबीज व राष्ट्रीय बीज निगम या दर्जेदार बियाणांचे उत्पादन व वितरण करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख संस्था आहेत. याशिवाय, विविध पिकांच्या बियाणांची किरकोळ विक्री खाजगी बियाणे उत्पादकांकडून केली जाते. केंद्र शासनाने स्वपरागसिंचित (तांदुळ, गहू, तूर, मूग, उडीद, इ.) पिकांच्या बाबतीत ३५ टक्के, परपरागसिंचित (मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, इ.) पिकांसाठी ५० टक्के व संकरित पिकांसाठी १०० टक्के याप्रमाणे बियाणे बदलाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सुधारित बियाणांचे खरिप व रबी हंगामासाठी केलेले वितरण तक्ता ७.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१७ सुधारित बियाणांचे खरिप व रबी हंगामासाठी केलेले वितरण**

| वितरक | हंगाम | बियाणांचे वितरण ('००० क्विंटल) | | | | | २०१५च्या तुलनेत २०१६ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | |
| सार्वजनिक | खरीप | ७४७ | ७७८ | २७१ | ५०० | ५५३ | १०.६ |
| | रबी | ३४१ | ३७० | २९१ | ३०२ | ३१५ | ४.३ |
| | **एकूण** | **१,०८८** | **१,१४८** | **५६२** | **८०२** | **८३८** | **८.२** |
| खाजगी | खरीप | १,१२८ | १,२८३ | ९४८ | ५७३ | ९८२ | ७१.४ |
| | रबी | २८९ | ४०१ | २३९ | ३१३ | ५७८ | ८४.७ |
| | **एकूण** | **१,४१७** | **१,६८४** | **१,१८७** | **८८६** | **१,५६०** | **७६.१** |
| **एकूण** | खरीप | १,८७५ | २,०६१ | १,२१९ | १,०७३ | १,५३५ | ४३.१ |
| | रबी | ६३० | ७७१ | ५३० | ६१५ | ८९३ | ४५.२ |
| | **एकूण** | **२,५०५** | **२,८३२** | **१,७४९** | **१,६८८** | **२,४२८** | **४३.८** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## खतांचा व किटकनाशकांचा वापर

७.१७ सन २०१६-१७ करिता राज्यातील रासायनिक खतांचा एकूण वापर ६४.६७ लाख मे.टन असून प्रति हेक्टर वापर १२२.३ किलो अपेक्षित आहे. सन २०१५-१६ मध्ये रासायनिक खतांचा एकूण वापर ५९.६३ लाख मे. टन व प्रति हेक्टर वापर १२२.५ किलो होता. सन २०१६-१७, मध्ये खत वितरणासाठी ०.४८ खत वितरण केंद्रे होती. त्यापैकी ०.१ टक्के सार्वजनिक क्षेत्रात, ७.२ टक्के सहकारी क्षेत्रात व ९२.७ टक्के केंद्रे खाजगी क्षेत्रात होती. रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर तक्ता ७.१८ मध्ये दिला आहे. रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर तक्ता ७.१९ मध्ये दिला आहे. सन २०१५-१६ मधील नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर तक्ता ७.२० मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१८ रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर**

| वर्ष | एकूण वापर (लाख मे. टन) | प्रति हेक्टर वापर (किलो) |
|---|---|---|
| २०१४-१५ | ६०.१३ | १२५.९ |
| २०१५-१६ | ५९.६३ | १२२.५ |
| २०१६-१७ $ | ६४.६७ | १२२.३ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $ अपेक्षित वापर

**तक्ता ७.१९ रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर**

(मे.टन)

| वर्ष | किटकनाशके | |
|---|---|---|
| | रासायनिक | जैविक |
| २०१४-१५ | ११,२३९ | १,१२४ |
| २०१५-१६ | ११,६६५ | १,१७३ |
| २०१६-१७ | १३,४९६ | १,४५४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.२० नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर**

('०० मे. टन)

| विभाग | रासायनिक खतांचा वापर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१५-१६ | | | | २०१६-१७ $ | | | |
| | नत्र (न) | स्फुरद (स्फु) | पालाश (पा) | एकूण (न+स्फु+पा) | नत्र (न) | स्फुरद (स्फु) | पालाश (पा) | एकूण (न+स्फु+पा) |
| कोकण | ४५० | ८८ | ६१ | ५९९ | ४०१ | ७० | ५८ | ५२९ |
| नाशिक | ३,२९३ | १,७६४ | १,३९४ | ६,४५१ | ४,३९७ | २,१४९ | १,५८८ | ८,१३४ |
| पुणे | ३,०६४ | १,५७९ | १,११२ | ५,७५५ | ४,०४३ | २,५९९ | १,७७६ | ८,४१८ |
| औरंगाबाद | ३,६७१ | २,५२२ | ९११ | ७,१०४ | ४,८७३ | ३,२९६ | १,७०१ | ९,८७० |
| अमरावती | २,०८० | १,४८६ | ७६२ | ४,३२८ | २,०३१ | १,५०२ | ६०२ | ४,१३५ |
| नागपूर | १,९४९ | १,०७८ | ३०७ | ३,३३४ | १,८०१ | १,०३९ | ३१५ | ३,१५५ |
| **महाराष्ट्र** | **१४,५०७** | **८,५१७** | **४,५४७** | **२७,५७१** | **१७,५४६** | **१०,६५५** | **६,०४०** | **३४,२४१** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $ अपेक्षित

## राष्ट्रीय कृषि विकास योजना

७.१८ राष्ट्रीय कृषि विकास योजना अतिरिक्त केंद्रीय अर्थसहाय्याद्वारे राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेची वित्तीय प्रगती तक्ता ७.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२१ राष्ट्रीय कृषि विकास योजनेची वित्तीय प्रगती**

(₹ कोटी)

| वर्ष | राज्यस्तरीय मंजूरी समितीने मंजूर केलेल्या प्रकल्पांची किंमत | केंद्र शासनाने दिलेल्या प्रशासकीय मान्यता | केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदान | खर्च |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | १,०१३.४९ | १,०२५.९९ | ९४२.०९ | ९४२.०९ |
| २०१५-१६ | ६२३.२४ | ७७३.२४ | ७३०.०० | ७३०.०० |
| २०१६-१७+ | ६६७.४८ | ७१२.१२ | ३३३.७३ | २०१.०० |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + फेब्रुवारीअखेर

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान

७.१९ 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान' अंतर्गत उत्पादकतेत सुधारणा व क्षेत्र विस्ताराकरिता सन २०१५-१६ मध्ये तांदळासाठी ₹ १८.२७ कोटी, गव्हासाठी ₹ २.२६ कोटी, कडधान्यांसाठी ₹ १३३.६१ कोटी व भरडधान्यांसाठी ₹ १८.७३ कोटी खर्च झाले. सन २०१६-१७ मध्ये जानेवारीपर्यंत तांदळासाठी ₹ ८.२९ कोटी, गव्हासाठी ₹ ०.८५ कोटी, कडधान्यांकरिता ₹ ९६.७४ कोटी आणि भरडधान्यांसाठी ₹ २१.९१ कोटी खर्च झाले.

## फलोत्पादन

७.२० राज्यात २०१५-१६ मध्ये अंतिम ९.०९ लाख हेक्टर क्षेत्र विविध फळपिकांखाली होते. त्यापैकी आंब्यासाठी १.६२ लाख हेक्टर, संत्र्यासाठी १.०७ लाख हेक्टर, मोसंबीसाठी ०.५४ लाख हेक्टर, डाळिंबासाठी १.२१ लाख हेक्टर, केळीसाठी ०.७० लाख हेक्टर, चिकूसाठी ०.१८ लाख हेक्टर आणि द्राक्षांसाठी ०.९० लाख हेक्टर क्षेत्र होते.

७.२०.१ केंद्र शासनामार्फत २००५-०६ मध्ये 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची' सुरुवात करण्यात आली. फलोत्पादनाखालील क्षेत्र व उत्पादकता वाढविण्याच्या व काढणीपश्चात व्यवस्थापन करण्याच्या मुख्य उद्देशाने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना राबविण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाची सन २००५ मध्ये स्थापना केली आहे. सन २०१५-१६ पासून 'एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान' ३४ जिल्ह्यांत राबविण्यात येत असून त्यामधील केंद्र व राज्याचा हिस्सा ६०:४० असा आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सुरुवातीपासून ऑक्टोबर २०१६ अखेर महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळास 'एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना अंतर्गत ₹ १,५९८ कोटी अनुदान प्राप्त झाले व त्यापैकी ₹ १,५३९ कोटी खर्च झाले. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सुरुवातीपासून ऑक्टोबर २०१६ पर्यंत विविध घटकांवर करण्यात आलेला खर्च पुढीलप्रमाणे आहे.

- गुणवत्तापूर्ण लागवड साहित्याच्या निर्मितीकरिता, उच्च तंत्रज्ञान आधारित रोपवाटिका व उतीसंवर्धन प्रयोगशाळा उभारणीकरिता ₹ २०.७७ कोटी,
- क्षेत्र विस्तार घटकांतर्गत आंबा, पेरू, संत्री इ. सघन लागवडीकरिता तसेच, केळी, द्राक्ष, डाळिंब, पपई, मसाला पिके, फुल पिके इ. फळबाग लागवडी करिता ₹ ४७३.१९ कोटी,
- आळंबी उत्पादनाच्या १४ प्रकल्पांकरिता ₹ १.८० कोटी,
- जुन्या फळबागांच्या पुनरुज्जीवनाकरिता ₹ ४६.०५ कोटी,
- १४,७७८ सामूहिक तळयांच्या बांधकामासाठी ₹ २८४.०२ कोटी,
- संरक्षित शेती घटकाअंतर्गत हरितगृह, शेडनेट हाऊस, प्लॅस्टिक मल्चिंग, पक्षी/किटक प्रतिरोधक जाळे इ. घटकांसाठी ₹ २४८.७२ कोटी,
- काढणीपश्चात व्यवस्थापन घटकाअंतर्गत पॅक हाऊस, पिकवणी कक्ष, कांदा साठवण चाळ, शीत साठवणूक गृहे, पूर्व शीतकरणगृह इ. घटकांसाठी ₹ १२७.३८ कोटी,
- एकात्मिक कीड/ अन्नद्रव्ये व्यवस्थापनास उत्तेजन देण्याकरिता ₹ १९.३१ कोटी,
- सेंद्रिय शेतीस उत्तेजन देण्याकरिता ₹ २१.०२ कोटी,
- मधुमक्षिका पालनास उत्तेजन देण्याकरिता ₹ १.०३ कोटी,
- फलोत्पादन यांत्रिकीकरणास उत्तेजन देण्याकरिता ₹ ४१.४८ कोटी,
- मनुष्यबळ विकासा अंतर्गत शेतकऱ्यांचे प्रशिक्षण/अभ्यास दौरे इ. करिता ₹ २२.२० कोटी.

७.२०.२ राज्य शासनाने फलोत्पादन विकासाला चालना देण्यासाठी फळरोपवाटिकांची स्थापना करणे आणि अल्प व अत्यल्प भूधारक तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे शेतकरी यांना निवडक प्रकारची फळझाडे वाढविण्यासाठी भांडवली सहाय्य देणे हा कार्यक्रम हाती घेतला आहे. सन १९९०-९१ पासून सदर कार्यक्रम रोजगार हमी योजनेशी निगडीत करण्यात आला आहे. परिणामी सन १९९०-९१ मधील फळांखालील २.४२ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते २०१६-१७ मध्ये डिसेंबर अखेर १८.५२ लाख हेक्टर झाले.

७.२०.३ द्राक्षे, आंबा, डाळिंब आणि केळी ही राज्यातून निर्यात केली जाणारी प्रमुख फळे आहेत. देशातील व राज्यातील फळा-फुलांची एकूण निर्यात आणि निर्यातीचे एकूण मूल्य तक्ता ७.२२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२२ फळा-फुलांची एकूण निर्यात आणि निर्यातीचे एकूण मूल्य**

| फळे / फुले | राज्य / देश | निर्यात | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१३-१४ | | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ + | |
| | | परिमाण (टन) | मूल्य (₹ कोटी) | परिमाण (टन) | मूल्य (₹ कोटी) | परिमाण (टन) | मूल्य (₹ कोटी) | परिमाण (टन) | मूल्य (₹ कोटी) |
| आंबा | महाराष्ट्र | ३३,१६९ | २४५ | ३२,९६२ | २५६ | २४,२४३ | २५९ | ३१,३५५ | ३०६ |
| | भारत | ४१,२८० | २८५ | ४२,९९८ | ३०३ | ३६,३२९ | ३१७ | ४५,५६२ | ३७० |
| द्राक्षे | महाराष्ट्र | १,२५,४२६ | १,३४८ | ८८,७६५ | ९५४ | १,४५,८३० | १,५१८ | ५०,०९३ | ४८४ |
| | भारत | १,९२,६१७ | १,६६६ | १,०७,२५८ | १,०८६ | १,५६,२०३ | १,५५१ | ६९,५९९ | ५३५ |
| केळी | महाराष्ट्र | ५,४१७ | १८ | १४,०८४ | ४३ | ३४,९१५ | ११५ | २८,५२८ | ९७ |
| | भारत | ३४,८३१ | १५४ | ६३,२७४ | २४२ | ९३,६६५ | ३५६ | ८२,१५३ | २७८ |
| संत्री | महाराष्ट्र | ५९ | ०.१७ | ८९ | ०.५९ | १४९ | ०.७७ | २७३ | १ |
| | भारत | २८,२३७ | ५६ | १७,२३१ | ३२ | ३४,५२२ | ७१ | १२,२९५ | ३२ |
| मनुके | महाराष्ट्र | ३०,९१५ | २१७ | १२,१४० | १०६ | २६,००९ | १९७ | २३,८०० | २०३ |
| | भारत | ३१,६०२ | २२३ | १२,३२६ | १०८ | २६,८२३ | २०४ | २४,४२६ | २०८ |
| गुलाबाची फुले | महाराष्ट्र | ९९४ | ३० | १,०१४ | २५ | ९३४ | २७ | ४३५ | १३ |
| | भारत | १,३८६ | ३८ | २,१६७ | ५५ | १,९७८ | ५६ | १,२९९ | ३३ |
| गुलाबाची रोपे | महाराष्ट्र | १२ | ०.४९ | १२ | ०.६६ | १४ | ०.७९ | १४ | १ |
| | भारत | २१२ | ७ | ३५ | १.७९ | २३ | १.१६ | १८ | १ |
| डाळिंब | महाराष्ट्र | २३,३९९ | २४३ | १७,०३९ | २७६ | २४,५३५ | ३५४ | १५,०२३ | १८९ |
| | भारत | ३१,३२८ | २९९ | २०,९९७ | ३२४ | ३१,०७० | ४१६ | २२,११४ | २३९ |
| इतर पालेभाज्या (कांदा वगळून) | महाराष्ट्र | २,१५,८२८ | ६४२ | १,५२,४३५ | ६१५ | १,६७,३७६ | ७२७ | १,२२,४२६ | ५२२ |
| | भारत | ९,५३,७३१ | २,२९३ | ८,३५,५०१ | २,४०२ | ६,९९,६०० | २,११९ | ६७,५६८ | १९२३ |
| इतर प्रक्रिया केलेली फळे व भाज्या (आंब्याचा गर वगळून) | महाराष्ट्र | १,१५,७९९ | ९२५ | १,१८,०८७ | ९४० | १,१६,९३१ | १,०४२ | ७६,११३ | ६७३ |
| | भारत | २,८७,३८५ | २,२६६ | ३,१६,०५९ | २,५७० | ३,२०,७३२ | २,९०० | २,१८,२६७ | १९५३ |
| हवाबंद वेष्टनातील सुकविलेला भाजीपाला | महाराष्ट्र | १७,००० | २१४ | १५,१७४ | २०८ | १४,११८ | २०६ | ८,९७० | १४५ |
| | भारत | ५६,१५८ | ७४३ | ६३,७०२ | ८४७ | ६६,१८० | ९१४ | ५२,९२६ | ६७५ |
| आंब्याचा गर | महाराष्ट्र | २५,३८० | १६१ | २०,८१५ | १७१ | १५,२८८ | १२३ | १४,९५४ | १२६ |
| | भारत | १,७४,८६० | ७७३ | १,५४,८२१ | ८४१ | १,२८,८६६ | ७९६ | ८८,४४० | ५७९ |
| कांदा | महाराष्ट्र | ७,९५,५२५ | १,५६७ | ६,०१,१४६ | १,११३ | ७,८१,३९३ | १,५९० | ७,५६,८४२ | १०२९ |
| | भारत | १४,८२,४९९ | ३,१७० | १२,३८,१०३ | २,३०१ | १२,०१,२४५ | २,७४७ | १४,६३,५५० | १९४२ |

*आधार* : कृषि व प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण, केंद्र शासन यांचे संकेतस्थळ + नोव्हेंबरपर्यंत

## सेंद्रिय शेती

७.२१ केंद्र शासनाने 'परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत' तीन वर्षांच्या (२०१५-१६ ते २०१७-१८) कालावधीकरिता सेंद्रिय शेतीसाठी ₹ १४०.७२ कोटी रक्कम मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत ९३२ (प्रत्येकी ५० एकर क्षेत्रफळ असलेल्या) समूह शेतांची स्थापना करण्याचे प्रस्तावित असून १८,६४० हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेती सहभाग हमी पद्धती प्रमाणपत्रांतर्गत (पीजीएस) आणण्याचे लक्ष्य आहे.

## कृषि वित्तपुरवठा

७.२२ शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्प मुदतीची कर्जे, पतपुरवठा, इत्यादींच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य केले जाते. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था कृषि व ग्रामीण विकासासाठी कार्य करणारी देशातील शिखर बँक आहे. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (मरासबँ), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (जिमसबँ) आणि भूविकास बँका यांच्यामार्फत कर्ज वितरित केले जाते. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/जिमसबँ/भूविकास बँकांनी दिलेले कर्ज तक्ता ७.२३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२३ वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/जिमसबँ/भूविकास बँकांनी दिलेली कर्जे**

(₹ कोटी)

| कर्जाचा प्रकार | वाणिज्यिक बँका$ | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | मरासबँ/ जिमसबँ/ भूविकास बँक | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६* | २०१४-१५ | २०१५-१६* | २०१४-१५ | २०१५-१६* | २०१४-१५ | २०१५-१६* |
| पीक कर्ज | १७,९८७ | २२,७५८ | १,६९० | २,०३२ | १४,४२३ | १५,७९१ | ३४,१०० | ४०,५८१ |
| कृषि मुदत कर्ज | २०,३५६ | २०,९१० | १११ | १०६ | १,३९४ | ११,२६८ | २१,८६१ | ३२,२८४ |
| **एकूण** | **३८,३४३** | **४३,६६८** | **१,८०१** | **२,१३८** | **१५,८१७** | **२७,०५९** | **५५,९६१** | **७२,८६५** |

*आधार* : राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य $ राष्ट्रीयीकृत बँकांसह * अस्थायी

७.२२.१ राज्यात सर्वात निम्न स्तरावर कृषि वित्तपुरवठा करण्याशी थेट संबंधित अशा वित्तीय संस्था म्हणजे शेतकरी सभासदांना अल्पमुदतीची पीक कर्जे देणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था आहेत. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून सन २०१५-१६ मध्ये एकूण ₹ १३,२९३ कोटी कर्जवाटप करण्यात आले त्यापैकी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ₹ ७,०८९ कोटी कर्जवाटप करण्यात आले. सन २०१४-१५ मध्ये ही आकडेवारी अनुक्रमे ₹ १३,७७७ कोटी व ₹ ५,९६१ कोटी होती.

## किसान क्रेडिट कार्ड योजना

७.२३ राज्यात सन २०१५-१६ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व प्रादेशिक ग्रामीण बँकांनी अनुक्रमे २.३७ लाख व ०.७५ लाख नवीन किसान क्रेडिट कार्ड वाटप केले आणि त्यांना अनुक्रमे ₹ ४४,९१९ लाख व ₹ १४,९२७ लाख रकमेचे कर्ज मंजूर केले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे तक्ता ७.२४ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.२४ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे**

(₹ कोटी)

| वर्ष | लघु मुदतीचे कर्ज | | दीर्घ मुदतीचे कर्ज | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम |
| २०१४-१५ | ३,४६८ | १३,१६६ | २८.३ | ३७५.१४ |
| २०१५-१६ | ३,४५५ | १४,५०४ | १६.६ | २६९.०८ |
| २०१६-१७+ | २,६७८ | ११,४७७ | १.८ | १८.५० |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित + नोव्हेंबर पर्यंत

## कृषि पणन

७.२४ महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्याकडे मुख्यत्वे राज्यातील बाजार समित्यांच्या कामांमध्ये आवश्यक समन्वय साधणे, कृषि उत्पन्न बाजार समितीचा विकास व प्रसार, कृषि निर्यात क्षेत्राची स्थापना, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र आणि प्रतवारी व संवेष्टन सुविधांची स्थापना करणे, इत्यादि कार्ये सोपविली आहेत. सर्व बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य तक्ता ७.२५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२५ सर्व बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य**

| वर्ष | आवक (लाख मे. टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०१३-१४ | २४२.६५ | ४४,९७७ |
| २०१४-१५ | २४७.२० | ७१,२८१ |
| २०१५-१६ | २२३.४० | ६१,६३१ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

७.२४.१ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियमाअंतर्गत १९ नोव्हेंबर २०१६ पर्यंत २३८ थेट पणन परवाने दिले आहेत. याव्यतिरिक्त, ३८ खाजगी बाजारांना परवाने देण्यात आले आहेत तर नॅशनल कमोडिटी अॅन्ड डेरिव्हेटिव्हज् एक्सचेन्ज यांचे कामकाज इंटरनेटच्या माध्यमातून सुरु आहे.

७.२४.२ राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या शेतमालाचे काढणी पश्चात होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी ते ग्राहक थेट शेतमालाच्या विक्रीसाठी १२ ऑगस्ट २०१६ पासून 'संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान' सुरु केले आहे. या अभियानाअंतर्गत राज्यात एकूण ४८ आठवडे बाजार सुरु करण्यात आले असून शेतकऱ्यांनी थेट ग्राहकांना विना मध्यस्थ फळे आणि पालेभाज्यांची विक्री करणे अपेक्षित आहे. शासनाचे विविध विभाग, नगर पालिका, महानगर पालिका यांनी शेतकरी आठवडे बाजारासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, ग्राहक सहकारी संस्था आणि उत्पादकांच्या सहकारी संस्था यांना या बाजारात शेतमाल विक्री करण्यासाठी मुभा असून ग्राहकांनाही ताजा, स्वच्छ, योग्य वजनाचा, स्वच्छ जागी भाजीपाला वाजवी दारात उपलब्ध होत आहे.

## किमान आधारभूत किंमत योजना

७.२५ नैसर्गिक आपत्ती व व्यापारी देऊ करत असलेल्या कमी किंमतींपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच कृषि कार्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र शासन काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. या योजनेअंतर्गत शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषि सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांच्यामार्फत केली जाते. प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती तक्ता ७.२६ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.२६ प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

| पीक | किमान आधारभूत किंमती (₹ / क्विंटल) | | |
|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| तांदुळ / धान (साधारण वाजवी प्रत) | १,३६० | १,४१० | १,४७० |
| तांदुळ / धान (प्रत-अ) | १,४०० | १,४५० | १,५१० |
| ज्वारी (संकरित) | १,५३० | १,५७० | १,६२५ |
| ज्वारी (मालदांडी) | १,५५० | १,५९० | १,६५० |
| गहू | १,४५० | १,५२५ | १,६२५ |
| मका | १,३१० | १,३२५ | १,३६५ |
| बाजरी | १,२५० | १,२७५ | १,३३० |
| हरभरा | ३,१७५ | ३,५०० | ४,००० |
| तूर | ४,३५० | ४,६२५ | ५,०५० |
| मूग | ४,६०० | ४,८५० | ५,२२५ |
| उडीद | ४,३५० | ४,६२५ | ५,००० |
| सूर्यफूल | ३,७५० | ३,८०० | ३,९५० |
| सोयाबीन (पिवळा) | २,५६० | २,६०० | २,७७५ |
| सोयाबीन (काळा) | २,५०० | २,६०० | २,७७५ |
| भूईमुगाच्या शेंगा | ४,००० | ४,०३० | ४,२२० |
| कापूस (मध्यम धागा) | ३,७५० | ३,८०० | ३,८६० |
| कापूस (लांब धागा) | ४,०५० | ४,१०० | ४,१६० |
| करडई | ३,०५० | ३,३०० | ३,७०० |
| मसूर | ३,०७५ | ३,४०० | ३,९५० |
| नाचणी | १,५५० | १,६५० | १,७२५ |
| तीळ | ४,६०० | ४,७०० | ५,००० |
| कारळे | ३,६०० | ३,६५० | ३,८२५ |
| मोहरी | ३,१०० | ३,३५० | ३,७०० |

*आधार* : दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड

## राष्ट्रीय कृषि विमा योजना

७.२६ राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये १६ खरीप आणि आठ रबी पिकांचा समावेश आहे. वर्षनिहाय राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांची आकडेवारी तक्ता ७.२७ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता ७.२७ वर्षनिहाय राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेले शेतकरी**

(₹ कोटी)

| वर्ष | समाविष्ट शेतकरी | | | नुकसान भरपाई | |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या (लाख) | विमा रक्कम | विमा हप्ता | शेतकरी संख्या (लाख) | रक्कम |
| २०१३-१४ | १७.४२ | २,२४७.५१ | ११७.०० | ३.५५ | १०३.२४ |
| २०१४-१५ | ५५.९५ | ५,४८४.०३ | १९८.०६ | ४१.७१ | १,८०६.५७ |
| २०१५-१६ | ११६.७६ | ११,४२४.५६ | ४६८.१२ | ९८.२८ | ५,०९८.८८ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

७.२७ अपघातग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या दु:खी कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी राज्य शासनाने २०१५-१६ मध्ये 'गोपीनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजना' सुरु केली. या विमा योजनेअंतर्गत सातबारा उतारा धारक १.३७ कोटी शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात आले असून १० ते ७५ वर्षे वयोगटातील शेतकऱ्यांना होणाऱ्या १३ प्रकारच्या धोक्यांसाठी (रस्ता अपघात, रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतुनाशके हाताळताना अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात, सर्पदंश अथवा विंचूदंश, नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या, जनावरांनी खाल्यामुळे/ चावण्यामुळे जखमी/ मृत्यू, दंगल व अन्य कोणतेही अपघात इ.) विमा संरक्षण पुरविण्यात आले आहे. विमा योजने अंतर्गत मिळणारे लाभ पुढील प्रमाणे (१) अपघातामुळे मृत्यू ₹ दोन लाख (२) अपघातामुळे अपंगत्व ₹ एक लाख किंवा ₹ दोन लाख यामध्ये अ) अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे ₹ एक लाख ब) अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे ₹ दोन लाख क) अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे ₹ दोन लाख. सन २०१६-१७ मध्ये शासनाने १ डिसेंबर २०१६ ते ३० नोव्हेंबर २०१७ या कालावधीच्या विमा हप्त्यापोटी ओरीयंटल इन्शुरन्स कंपनी मर्यादित यांना ₹ ३१.०४ कोटी रक्कम अदा केली आहे. या योजनेची प्रगती तक्ता ७.२८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२८ गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेची प्रगती**

| पॉलिसीचा कालावधी | शासनाने विम्याच्या हप्त्यापोटी अदा केलेली रक्कम ( ₹ कोटी) | एकूण प्राप्त दावे (संख्या) | निकाली काढलेले दावे (संख्या) | कार्यवाही चालू असलेले दावे (संख्या) | नाकारलेले दावे (संख्या) | शेतकऱ्यांना भरपाई पोटी अदा केलेली रक्कम (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ डिसेंबर २०१५ ते ३० नोव्हेंबर २०१६ | २७.२४ | २,५८५ | ९३७ | १,४३२ | २१६ | १८.१९ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## टंचाई व नैसर्गिक आपत्ती

७.२८ सन २०१५-१६ च्या खरीप व रबी हंगामातील टंचाई परिस्थितीमुळे अंदाजे ९९.९० लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून ₹ ६,९१४.९० कोटी रकमेचे अंदाजित नुकसान होते. त्यापैकी ५३.११ लाख हेक्टर क्षेत्राकरिता ₹ ३,६२३.०७ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली. अवकाळी पाऊस व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे फेब्रुवारी ते मार्च २०१६ या कालावधीत राज्यातील सुमारे ०.६७ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले व सुमारे ₹ ९६.०८ कोटी रकमेचे नुकसान झाले. त्याकरिता ₹ ८७.५९ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. जुलै ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत राज्यातील २९ जिल्ह्यातील सुमारे २१.३८ लाख हेक्टर क्षेत्र अवकाळी पाऊस, गारपीट, वादळीवारा, अतिवृष्टी व पूर परिस्थिती, इ. नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झाले आहे.

# पशुसंवर्धन

७.२९ ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये पशुधन महत्त्वाची भूमिका बजावते. पशुपालन करणाऱ्या कुटुंबांना उदरनिर्वाहाशिवाय पशुधनापासून दूध, अंडी आणि मांस या सारखा प्रथिनयुक्त आहार देखील उपलब्ध होतो. गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांकरिता स्वयंरोजगार निर्माण व्हावा या हेतूने राज्याने मिश्रजातीय दुधाळ जातीच्या गायी व म्हशींची पैदास तसेच भौगोलिक हवामानाशी अनुकूल देशी वंशावळीच्या गायी म्हशींची पैदास, शेळ्या व मेंढ्यांना सुदृढ करण्यासाठी पालन आणि सघन कुक्कुटपालन विकास यांना चालना देणे यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

## पशुधन गणना

७.३० पशुधन गणना दर पाच वर्षांनी घेतली जाते. १९ वी पशुधन गणना-२०१२ नुसार सुमारे ३२५ लाख पशुधन असून राज्य देशात सहाव्या क्रमांकावर आहे व १८ वी पशुधन गणना-२००७ च्या पशुधनाच्या तुलनेत ते ९.७ टक्क्यांनी कमी आहे. सन २०१२ मध्ये राज्यात दर लाख लोकसंख्येमागे अंदाजे २९ हजार पशुधन होते. राज्यात कुक्कुटपक्षांची संख्या सुमारे ७७८ लाख असून ती भारतातील एकूण कुक्कुटपक्षांच्या संख्येच्या १०.७ टक्के आहे व देशपातळीवर राज्याचा तिसरा क्रमांक आहे. कुक्कुट पक्षांच्या संख्येत १८ व्या पशुधन गणनेच्या तुलनेत १९ व्या पशुधन गणनेमध्ये २०.१ टक्के वाढ झाली आहे. पशुधन गणना १८ व १९ नुसार पशुधन तक्ता ७.२९ मध्ये व आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२९ पशुधन गणना १८ व १९ नुसार पशुधन**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | पशुगणना | गाई व बैल | म्हशी व रेडे | शेळ्या व मेंढ्या | इतर पशुधन | एकूण पशुधन | एकूण कुक्कुटादी पक्षी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २००७ | १,३३२ | ४२१ | ३७४ | ८ | २,१३५ | २०,२२२ |
| | २०१२ | १,१०६ | ३९७ | ३६५ | १६ | १,८८४ | १०,५१२ |
| नाशिक | २००७ | ३,६९५ | ९८३ | ३,६३२ | १०६ | ८,४१६ | २६,३५६ |
| | २०१२ | ३,६८८ | ८८९ | ३,२६८ | १२६ | ७,९७१ | २७,५७५ |
| पुणे | २००७ | २,३६१ | २,२१६ | ३,६१६ | ६० | ८,२५३ | १०,२८० |
| | २०१२ | २,४८८ | २,२०२ | २,९१३ | ५६ | ७,६५९ | ३०,९९७ |
| औरंगाबाद | २००७ | १,९९२ | ५८१ | १,४८४ | ३६ | ४,०९३ | २,२९७ |
| | २०१२ | १,९३६ | ५१० | १,१६३ | ५९ | ३,६६८ | २,२०७ |
| लातूर | २००७ | १,६८३ | ७५८ | १,०१६ | ४८ | ३,५०५ | १,६१२ |
| | २०१२ | १,६४३ | ६८३ | ७८१ | ३९ | ३,१४६ | १,५०७ |
| अमरावती | २००७ | २,३६१ | ५४९ | १,६१६ | ४२ | ४,५६८ | १,३७५ |
| | २०१२ | २,२४८ | ४५३ | १,३३८ | ४४ | ४,०८३ | १,७७३ |
| नागपूर | २००७ | २,७६० | ५६५ | १,५६३ | ९७ | ४,९८५ | २,६१३ |
| | २०१२ | २,३७५ | ४६१ | १,१८८ | ५४ | ४,०७८ | ३,२२४ |
| **राज्य** | **२००७** | **१६,१८४** | **६,०७३** | **१३,३०१** | **३९७** | **३५,९५५** | **६४,७५६** |
| | **२०१२** | **१५,४८४** | **५,५९५** | **११,०१६** | **३९४** | **३२,४८९** | **७७,७९५** |
| **भारत** | **२००७** | **१,९९,०७५** | **१,०५,३४३** | **२,१२,०९५** | **१२,८३६@** | **५,२९,३४९** | **६,४८,८२९** |
| | **२०१२** | **१,९०,९०४** | **१,०८,७०२** | **२,००,२४२** | **१२,२०९@** | **५,१२,०५७** | **७,२९,२०९** |

@ 'इतर पशुधन' यामध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट, गाढवे, कुत्रे, ससे व हत्ती यांचा समावेश आहे.

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.१: निवडक राज्यातील पशुधन (१९ व्या पशुधन गणनेनुसार)**




**आलेख ७.२: निवडक राज्यातील कुक्कुटपक्षी (१९ व्या पशुधन गणनेनुसार)**




## पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा

७.३१ पशुधनाच्या आरोग्याची निगा राखण्याकरिता राज्याने गावपातळीपर्यंत पशुवैद्यकीय संस्थांच्या जाळ्यांद्वारे पायाभूत सुविधा पुरविल्या आहेत. पशुवैद्यकीय विभागनिहाय पायाभूत सुविधा तक्ता ७.३० मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.३० पशुवैद्यकीय विभागनिहाय पायाभूत सुविधा**

(३१ मार्च २०१६ रोजी)

| पशुवैद्यकीय विभाग | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे | बहुचिकित्सालये$ | लघु बहुचिकित्सालये | पशुवैद्यकीय दवाखाने | | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | श्रेणी I | श्रेणी II | |
| मुंबई | ४ | ५ | २० | १३९ | ३५९ | १२ |
| नाशिक | ५ | ५ | २५ | ३६५ | ४९१ | ६ |
| पुणे | ५ | ५ | २६ | ४६० | ५५९ | ७ |
| औरंगाबाद | ४ | ३ | २० | १६१ | २८९ | २ |
| लातूर | ४ | ५ | २० | १६५ | २९१ | ३ |
| अमरावती | ५ | ५ | २७ | १९३ | ३९४ | १७ |
| नागपूर | ६ | ७ | ३० | २६३ | ४६३ | १८ |
| **राज्य** | **३३** | **३५** | **१६८** | **१,७४६** | **२,८४६** | **६५** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन $ मुंबई, परभणी आणि नागपूर येथील तीन बहुचिकित्सालये पशुवैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न.

७.३२ विविध आजारांकरिता पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यासोबत लसीकरण कार्यक्रमही राज्यात राबविले जातात. पशुवैद्यकीय केलेले उपचार व लसीकरणाबाबतची विभागनिहाय माहिती तक्ता ७.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३१ पशुवैद्यकीय केलेले उपचार व लसीकरणाबाबतची विभागनिहाय माहिती**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | वर्ष | केलेले उपचार | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सामान्य उपचार | खच्चीकरण | शस्त्रक्रिया | | लसीकरण (कुक्कुटांसह) |
| | | | | मोठी | किरकोळ | |
| मुंबई | २०१४-१५ | १,३७५ | ६० | १ | ५९ | ७,६२९ |
| | २०१५-१६ | १,३४७ | ६६ | २ | ५६ | ६,७२९ |
| | २०१६-१७⁺ | ९६५ | ६० | १ | २६ | ४,०११ |
| नाशिक | २०१४-१५ | ३,८९२ | २५६ | ७ | २६३ | १८,५५१ |
| | २०१५-१६ | ३,९७० | २५३ | ७ | २०८ | १३,९७० |
| | २०१६-१७⁺ | २,७४२ | १६६ | ११ | १०१ | ९,८२९ |
| पुणे | २०१४-१५ | ४,५२६ | १४४ | १४ | १८३ | १७,३५५ |
| | २०१५-१६ | ४,१८१ | १३१ | १४ | १०४ | १५,१३७ |
| | २०१६-१७⁺ | ३,२७९ | १०० | ९ | ६२ | ८,५३५ |
| औरंगाबाद | २०१४-१५ | १,५०४ | १०५ | ३ | ९३ | ७,६६१ |
| | २०१५-१६ | १,५६६ | ९७ | ३ | ५२ | ६,००७ |
| | २०१६-१७⁺ | १,१६४ | ६० | २ | २० | ४,११० |
| लातूर | २०१४-१५ | १,७१९ | १०८ | ५ | १२० | ७,५८४ |
| | २०१५-१६ | १,८७६ | १०७ | ६ | १०६ | ५,८८१ |
| | २०१६-१७⁺ | १,३८८ | ६० | ४ | ३७ | ३,९२७ |
| अमरावती | २०१४-१५ | २,०८८ | १२८ | ५ | १२४ | ७,८६६ |
| | २०१५-१६ | २,२४१ | १२९ | ५ | ११० | ६,५६१ |
| | २०१६-१७⁺ | १,५४९ | ८० | ५ | ५१ | ३,७१८ |
| नागपूर | २०१४-१५ | २,०९० | १३६ | ५ | १४० | ९,४१३ |
| | २०१५-१६ | २,०७० | १२६ | ५ | ९३ | ८,०३९ |
| | २०१६-१७⁺ | १,५३६ | ७९ | ४ | ३७ | ५,७३४ |
| **राज्य** | २०१४-१५ | **१७,१९४** | **९३७** | **४०** | **९८२** | **७६,०५९** |
| | २०१५-१६ | **१७,२५१** | **९०९** | **४२** | **७२९** | **६२,३२४** |
| | २०१६-१७⁺ | **१२,६२३** | **६०५** | **३६** | **३३४** | **३९,८६४** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## कृत्रिम रेतन

७.३३ कृत्रिम रेतनाची सुविधा ४,८५६ कृत्रिम रेतन केंद्रांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथील तीन गोठीत वीर्य प्रयोगशाळांमध्ये वीर्यनळ्यांची निर्मिती केली जाते आणि राज्यातील जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रांना व इतर सर्व कृत्रिम रेतन केंद्रांना त्याचा पुरवठा केला जातो. पशुवैद्यकीय विभागनिहाय करण्यात आलेले कृत्रिम रेतन तक्ता ७.३२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३२ पशुवैद्यकीय विभागनिहाय करण्यात आलेले कृत्रिम रेतन**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | वर्ष | केलेले कृत्रिम रेतन | | | | | जन्मलेली वासरे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गायी | | | म्हैस | एकूण | गायी | | म्हैस | एकूण |
| | | विदेशी | संकरीत | देशी | | | संकरीत | देशी | | |
| मुंबई | २०१४-१५ | २८ | २३ | १ | ३७ | ८९ | १९ | १ | १४ | ३४ |
| | २०१५-१६ | २३ | २५ | २ | ३८ | ८८ | १९ | १ | १५ | ३५ |
| | २०१६-१७+ | १९ | १६ | २ | २६ | ६३ | १५ | १ | ११ | २७ |
| नाशिक | २०१४-१५ | १३५ | २७६ | १३ | ८४ | ५०८ | १५० | ३ | २९ | १८२ |
| | २०१५-१६ | १२९ | २५८ | १६ | ७८ | ४८१ | १५५ | ५ | २९ | १८९ |
| | २०१६-१७+ | ६९ | १६९ | १४ | ५२ | ३०४ | १०३ | ४ | २२ | १२९ |
| पुणे | २०१४-१५ | ३४ | ५१८ | ७८ | ४२४ | १,०५४ | १७९ | ३७ | १४३ | ३५९ |
| | २०१५-१६ | ५८ | ३७४ | ७१ | ३६४ | ८६७ | १९० | ३० | १४७ | ३६७ |
| | २०१६-१७+ | ३२ | २९० | ५१ | २११ | ५८४ | १२५ | २३ | ९३ | २४१ |
| औरंगाबाद | २०१४-१५ | ४४ | १०० | २४ | ५४ | २२२ | ४१ | ७ | १८ | ६६ |
| | २०१५-१६ | ३९ | ९४ | २७ | ५१ | २११ | ४१ | ९ | १५ | ६५ |
| | २०१६-१७+ | २४ | ६२ | १७ | ३१ | १३४ | ३० | ५ | ११ | ४६ |
| लातूर | २०१४-१५ | २१ | ५६ | ७२ | ९६ | २४५ | २१ | २३ | २६ | ७० |
| | २०१५-१६ | १९ | ५७ | ७५ | ९० | २४१ | २२ | २४ | २७ | ७३ |
| | २०१६-१७+ | ९ | ४० | ४६ | ६६ | १६१ | १६ | १८ | २० | ५४ |
| अमरावती | २०१४-१५ | ५० | ३८ | १९ | ५५ | १६२ | २५ | ५ | १६ | ४६ |
| | २०१५-१६ | ४६ | ३९ | २६ | ५४ | १६५ | २६ | ६ | १७ | ४९ |
| | २०१६-१७+ | २५ | २४ | १६ | ३० | ९५ | १८ | ६ | ११ | ३५ |
| नागपूर | २०१४-१५ | ४८ | ८१ | ११ | २३ | १६३ | ४९ | ३ | ८ | ६० |
| | २०१५-१६ | ४७ | ८८ | १६ | २१ | १७२ | ५० | ५ | ७ | ६२ |
| | २०१६-१७+ | २८ | ६१ | १३ | १३ | ११४ | ३५ | ४ | ६ | ४५ |
| **राज्य** | **२०१४-१५** | **३६०** | **१,०९२** | **२१८** | **७७३** | **२,४४३** | **४८४** | **७९** | **२५४** | **८१७** |
| | **२०१५-१६** | **३६१** | **९३५** | **२३३** | **६९६** | **२,२२५** | **५०३** | **८०** | **२५७** | **८४०** |
| | **२०१६-१७+** | **२०६** | **६६२** | **१५९** | **४२९** | **१,४५६** | **३४२** | **६१** | **१७४** | **५७७** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## प्रमुख पशुधन उत्पादने

७.३४ दूध, अंडी व मांस या प्रमुख पशुधन उत्पादनाचा दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर वापर व मागील १५ वर्षातील सांख्यिकीय आकडेवारीवरुन निदर्शनास येते की, राज्यातील पशुधन उत्पादनात सातत्याने वाढ होत असून त्याचा वार्षिक चक्रवाढीचा दर अनुक्रमे ३.७ टक्के, ३.६ टक्के आणि ८.१ टक्के आहे. निवडक राज्यामधील दूध, अंडी व मांस या उत्पादनांची माहिती तक्ता ७.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३३ निवडक राज्यांमधील (सन २०१५-१६) मधील दूध, अंडी आणि मांस उत्पादने**

| राज्य | दूध ('००० मे.टन) | अंडी (लाख) | मांस ('००० मे.टन) |
|---|---|---|---|
| उत्तर प्रदेश | २६,३८७ | २१,९२९ | १,४१८ |
| राजस्थान | १८,५०० | १३,८५३ | १८० |
| गुजरात | १२,२६२ | १७,२१६ | ३४ |
| मध्य प्रदेश | १२,१४८ | १४,४१४ | ७० |
| **महाराष्ट्र** | **१०,१५३** | **५२,८५८** | **६७५** |
| बिहार | ८,२८८ | १०,०२१ | ३०२ |
| तामिळनाडू | ७,२४४ | १,६१,२५२ | ५४४ |
| कर्नाटक | ६,३४४ | ४७,६६० | ४६६ |
| **भारत** | **१,५५,४८८** | **८,२९,२९४** | **७,०१९** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.३ : राज्यातील दूध उत्पादन**




**आलेख ७.४ : राज्यातील अंडी आणि मांस उत्पादन**




## राष्ट्रीय गुरे पैदास व दुग्ध विकास कार्यक्रम

७.३५ राष्ट्रीय गुरे पैदास व दुग्ध विकास कार्यक्रम हा १०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून गुरे पैदास बळकटीकरण व विस्तारीकरण, देशी जातीच्या पैदाशीचे संवर्धन तसेच ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार निर्मितीकरिता महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामध्ये राबविण्यात येतो. या कार्यक्रमात दोन घटक आहेत. (i) राष्ट्रीय गुरे पैदास (ii) राष्ट्रीय दुग्ध विकास कार्यक्रम. राष्ट्रीय गुरे पैदास कार्यक्रमाची उद्दिष्टे :

- ➢ शेतकऱ्यांच्या दारी गायी- म्हैशींसाठी कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे.
- ➢ उच्च प्रतिच्या गोठीत रेतमात्रा व नैसर्गिक संयोगाकरिता उच्च प्रतिचे पैदासक्षम वळू तयार करणे.
- ➢ नामांकित देशी वंशावळीच्या गुरांच्या पैदाशीसाठी विकास व संवर्धन कार्यक्रम राबवणे.
- ➢ उच्च प्रतिच्या वंशांच्या पैदाशीसाठी देशी वंशावळीचा होणारा ऱ्हास व नाश थांबविणे.

## राष्ट्रीय गोकुळ मिशन

७.३५.१ राष्ट्रीय गुरे पैदास कार्यक्रमाच्या उद्दिष्टपुर्तीच्या दृष्टीने केंद्र शासनाने राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत गोकुळ ग्राम योजना राबविण्याचे निश्चित केले आहे.

७.३५.२ केंद्र शासनाने २०१४-१५ मध्ये ₹ एक कोटी निधी वितरीत केला असून त्यापैकी ₹ २० लाख राष्ट्रीय गुरे पैदास कार्यक्रमाकरिता आणि ₹ ८० लाख राष्ट्रीय गोकुळ मिशन करिता वितरीत करण्यात आले. सन २०१५-१६ मध्ये ₹ एक कोटी निधी प्राप्त झाला असून त्यापैकी ₹ ८० लाख निधी पोहरा येथील प्रक्षेत्राच्या बळकटीकरणाकरिता व उर्वरित ₹ २० लाख महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या व्यवस्थापनाकरिता खर्च झाला आहे.

७.३५.३ सन २०१६-१७ मध्ये ऑक्टोबरपर्यंत राष्ट्रीय गुरे पैदास कार्यक्रमाकरिता ₹ २.५ लाख आणि राष्ट्रीय गोकुळ मिशन करिता ₹ १२.५ लाख असा एकूण ₹ १५.० लाख निधी प्राप्त झाला.

७.३६ महाराष्ट्रात पशुधन उत्पादनाचे प्रयत्न प्राथम्याने अल्प भूधारक शेतकऱ्यांकडून होतात. पशुधन संगोपनाद्वारे ग्रामीण भागातील गरीब जनतेचे जीवनमान उंचावणे, उद्योजकता तयार करणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे याकरिता राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत. निवडक योजनांची प्रगती तक्ता ७.३४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३४ निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१३-१४ | | २०१४-१५ | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ लाख) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ लाख) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ लाख) |
| **अ - राज्य स्तर** | | | | | | |
| १. ६/४/२ दुधाळ जनावरांची गटवाटप योजना | १,०१८ | २,१०४ | ८२५ | १,८०६ | १,४८९ | १,८१९ |
| २. अंशत: ठाणबंद १० शेळी व एक बोकड गटवाटप | १,७४७ | ८७१ | १,९४२ | ९८१ | २,१०१ | १,०५० |
| ३. पशुसंवर्धनासाठी प्रसिध्दी व प्रचार | - | २४ | - | ६३ | - | ७० |
| ४. १,००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन जोडधंदा सुरु करणे | १,१७० | १,६१० | १,०२१ | १,४०५ | १,६९६ | २,२४४ |
| **ब - जिल्हा स्तर** | | | | | | |
| १. अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचे वाटप व अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना जनावरांसाठी खाद्य पुरवठा | २,४५८ | १,९०५ | १,३६६ | २,३२१ | २,९५५ | २,१९२ |
| २. अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना १०+१ शेळीगट पुरवठा | १,४३७ | ६२५ | १,९०५ | ८१५ | २,१९७ | ९५४ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय पशुधन अभियान

७.३७ सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता शेळी, मेंढी, कुक्कुट, डुक्कर, पशुधन विमा, खाद्य व चारा विकास आणि कौशल्य विकास, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि पशुसंवर्धन विस्तार कार्य या विविध योजना एकत्रित करुन राष्ट्रीय पशुधन अभियानाची सुरुवात केली. यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ७५ टक्के व राज्य शासनाचा हिस्सा २५ टक्के आहे. केंद्र शासनाने सन २०१४-१५ मध्ये ₹ ८२७.४२ लाख, सन २०१५-१६ मध्ये ₹ ५००.०० लाख व सन २०१६-१७ मध्ये ₹ १,३३८.२० लाख निधी मंजूर केला आहे.

## पशुधन विमा योजना

७.३८ पशुधन विमा ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत राज्यात २००६-०७ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा प्रमुख उद्देश पशुधारकांकडे असलेल्या जनावरांचा नैसर्गिक आपत्ती, अपघात अथवा रोगामुळे आकस्मिक मृत्यू झाल्यास होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण देणे हा आहे. सुरूवातीला ही योजना सहा जिल्हयांमध्ये राबविण्यात आली होती आणि सन २०१०-११ मध्ये १८ जिल्हयांमध्ये विस्तारित करण्यात आली. सन २०१४-१५ मध्ये विम्याच्या दाव्यापोटी ₹ १३.६३ लाख खर्च झाला. सन २०१५-१६ मध्ये या योजनेंतर्गत २०,७१२ पशुंच्या विम्याच्या दाव्यापोटी ₹ पाच कोटी खर्च झाला (केंद्र शासन हिस्सा ₹ २.७९ कोटी व राज्य शासन हिस्सा ₹ २.२१ कोटी).

## कुक्कुट विकास

७.३९ राष्ट्रीय पोषण संस्थेने दरडोई दरवर्षी १८० अंडी सेवनाची शिफारस केली आहे. यादृष्टीने राज्य शासनाने नाविन्यपूर्ण योजनेद्वारे कुक्कुट पालनास चालना देण्याचे ठरविले आहे. सन २०१५-१६ मध्ये या योजनेअंतर्गत १,६९६ लाभार्थ्यांवर ₹ २२.४५ कोटी खर्च झाला. राज्याच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा केलेले कुक्कुटवर्गीय पक्षी आणि अंड्यांची प्रति वर्ष दरडोई उपलब्धता तक्ता ७.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३५ मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा केलेले कुक्कुटवर्गीय पक्षी व अंड्यांची उपलब्धता**

| वर्ष | पुरवठा करण्यात आलेले कुक्कुटवर्गीय पक्षी (लाख) | अंड्यांची उपलब्धता (दरडोई दरवर्षी) | |
|---|---|---|---|
| | | राज्य | भारत |
| २०११-१२ | ८.८४ | ३९ | ५५ |
| २०१२-१३ | ८.६८ | ४० | ५७ |
| २०१३-१४ | ९.८७ | ४१ | ५८ |
| २०१४-१५ | १५.७९ | ४३ | ६१ |
| २०१५-१६ | १५.५१ | ४६ | ६६ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## दुग्ध विकास

७.४० दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण भागातील कुटुंबांसाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा दुय्यम स्त्रोत आहे आणि दुग्ध व्यवसाय रोजगार व उत्पन्नाच्या संधी निर्माण करण्यामध्ये प्रमुख भूमिका निभावत आहे. दूध उत्पादनामध्ये राज्याचा देशात सातवा क्रमांक आहे. दुधाचे उत्पादन व दरडोई उपलब्धता तक्ता ७.३६ मध्ये तर विभागनिहाय दूध उत्पादन तक्ता ७.३७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३६ दुधाचे उत्पादन व दरडोई उपलब्धता**

| वर्ष | दुधाचे उत्पादन (दशलक्ष मे टन) | | दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रति दिन) | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | भारत | राज्य | भारत |
| २०१२-१३ | ८.७ | १३२.० | २१३ | २९९ |
| २०१३-१४ | ९.१ | १३७.७ | २१९ | ३०७ |
| २०१४-१५ | ९.५ | १४६.३ | २२८ | ३२२ |
| २०१५-१६ | १०.१ | १५५.५ | २३९ | ३३७ |
| २०१६-१७# | १०.५ | उ ना | २३९ | उ ना |

उ ना उपलब्ध नाही # अपेक्षित

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.५ : सहकारी व शासकीय दुग्धशाळांकडून एकत्रित दैनिक सरासरी दूध संकलन**




७.४१ राज्यात सन २०१५-१६ मध्ये शासकीय व सहकारी क्षेत्रात एकत्रितपणे ९८ दूध प्रक्रिया प्रकल्प व १५६ दूध शीतकरण केंद्रे कार्यरत होती व त्यांची प्रतिदिन क्षमता अनुक्रमे ९०.१७ लाख लिटर व २६.५५ लाख लिटर होती. शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे एकत्रित दैनिक सरासरी दूध संकलन २०१५-१६ मध्ये ५१.१३ लाख लिटर आणि २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ४४.४३ लाख लिटर होते. राज्यात १९२ शीतगृहे असून त्यांची क्षमता ७,६१८.७७ मे.टन आहे, त्यापैकी १६७ शीतगृहे खाजगी क्षेत्रात असून त्यांची क्षमता ७,१७२.१२ मे. टन आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत राज्यातील १३ दूध प्रकल्पांना ₹ ६८.०८ कोटी अर्थसहाय्य देण्यात आले.

**तक्ता ७.३७ विभागनिहाय दूध उत्पादन**

('००० मे. टन)

| विभाग | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| कोकण | ३८२.९० | ५१४.४७ | ४९०.८७ |
| नाशिक | २,४०९.९४ | २,५२८.३२ | २,७१२.३० |
| पुणे | ३,४०२.०० | ३,८२४.७८ | ४,१८४.३२ |
| औरंगाबाद | १,७२४.१५ | १,६८०.५७ | १,४२९.९४ |
| अमरावती | ६०२.५३ | ४८२.०३ | ७०८.९५ |
| नागपूर | ५६७.५२ | ५१२.३१ | ६२६.१३ |
| **महाराष्ट्र** | **९,०८९.०४** | **९,५४२.४८** | **१०,१५२.५१** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.६ : निवडक राज्यांमधील दूध उत्पादन २०१५-१६**




**आलेख ७.७ : निवडक राज्यांची दुधाची दरडोई उपलब्धता २०१५-१६**



## मत्स्यव्यवसाय

७.४२ राज्यास ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून सागरी मासेमारीसाठी १.१२ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र योग्य आहे तसेच सागरी किना-यावर मासळी उतरविण्याची १७३ केंद्रे आहेत. सागरी मासेमारीसाठी १५,७१६ मच्छीमार नौका कार्यरत असून त्यापैकी १३,००२ यांत्रिक नौका आहेत. या व्यतिरिक्त, राज्यात ४.१९ लाख हेक्टर क्षेत्र गोड्या पाण्यातील व ०.१० लाख हेक्टर क्षेत्र निमखाऱ्या पाण्यातील मासेमारीयोग्य आहे. गोड्या पाण्यातील मासेमारीस सहाय्यभूत असणारी ३० मत्स्यबीज उत्पादन केंद्रे राज्यात असून त्यांची प्रतिवर्ष उत्पादन क्षमता २,४१४ लाख मत्स्यबीज आहे. मत्स्य उत्पादन व निर्यात तक्ता ७.३८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३८ मत्स्य उत्पादन व निर्यात**

| बाब | परिमाण | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७*+ |
|---|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** | लाख मे.टन | | | |
| सागरी | | ४.६४ | ४.३४ | ३.४९ |
| गोड्या पाण्यातील | | १.४४ | १.४६ | ०.८१ |
| **एकूण** | | **६.०८** | **५.८०** | **४.३०** |
| **स्थूल मूल्य** | ₹ कोटी | | | |
| सागरी | | ४,४८२ | ४,४७० | ३,८४२ |
| गोड्या पाण्यातील | | १,४१८ | १,४५५ | ८५२ |
| **एकूण** | | **५,९००** | **५,९२५** | **४,६९४** |
| **मत्स्य निर्यात** | | | | |
| उत्पादन | लाख मे.टन | १.५२ | १.२८ | उना |
| मूल्य | ₹ कोटी | ४,२७३ | ३,६७३ | उना |

उना उपलब्ध नाही * अस्थायी + डिसेंबरपर्यंत

*आधार* : मत्स्यव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.८: मत्स्य उत्पादन**




७.४३ राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०११-१२ पासून ₹ ७० कोटी खर्चाच्या १९ धक्क्यांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्यापैकी १० धक्क्यांचे काम पूर्ण झाले असून सात धक्क्यांचे काम प्रगतीपथावर तर दोन धक्क्यांचे काम रद्द करण्यात आले आहे आणि डिसेंबर २०१६ पर्यंत ₹ ६३.३९ कोटी निधी खर्च झाला आहे.

## रेशीम उत्पादन

७.४४ ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची क्षमता असलेला रेशीम उत्पादन हा कृषि आधारित उद्योग आहे. तुती रेशीम विकास कार्यक्रम राज्यातील २४ जिल्ह्यांत राबविला जातो. तुती लागवडी खालील क्षेत्र व रेशीम उत्पादनाची माहिती तक्ता ७.३९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३९ तुती लागवडी खालील क्षेत्र व रेशीम उत्पादन**

| बाब | परिमाण | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७*+ |
|---|---|---|---|---|
| लागवडीखालील क्षेत्र (नवीन) | हेक्टर | १,५८२ | १,५७७ | १,०८६ |
| लागवडीखालील क्षेत्र (जुने) | हेक्टर | १,२२६ | २,४१७ | २,४०२ |
| लागवडीखालील एकूण क्षेत्र | हेक्टर | २,८०७ | ३,९९४ | ३,४८८ |
| लाभार्थी (शेतकरी) | संख्या | ५,३९८ | ७,७६२ | ७,२६८ |
| रोग विरहीत अंडीपुंजांचा पुरवठा | लाख | २३.०५ | २७.५६ | १५.१८ |
| कोष उत्पादन | मे. टन | १,३१९ | १,६४३ | ९२४ |
| कच्चे रेशीम उत्पादन | मे. टन | २०३ | २५२ | १४२ |
| कोष खरेदी | मे. टन | १.१५ | ४.३७ | ०.२४ |
| निर्मित रोजगार (मनुष्य दिवस) | लाख | २२.२९ | २७.७२ | १५.६१ |

*आधार* : रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी + डिसेंबरपर्यंत

७.४४.१ टसर रेशीम विकास कार्यक्रम गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये राबविला जातो. टसर रेशीम किड्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक ऐन व अर्जुन वृक्षाचे या चार जिल्ह्यांतील लागवडीखालील क्षेत्र १८,८६६ हेक्टर आहे. सन २०१५-१६ मध्ये कच्च्या टसर रेशमाचे उत्पादन २१.५० मे.टन होते तर सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ते ९.०९ मे.टन होते.

## वने

७.४५ सन २०१५-१६ अखेर राज्याचे एकूण वनक्षेत्र ६१,६२२ चौ किमी (अस्थायी) असून राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार वनक्षेत्राचे प्रमाण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के असावे या उद्दीष्टाच्या तुलनेत राज्याचे वनक्षेत्र २०.०३ टक्के आहे. राज्यातील एकूण वनक्षेत्रापैकी वन विभाग (५५,२७९ चौ किमी), महाराष्ट्र वन विकास महामंडळ (मवविम) (३,७०६ चौ किमी), वन विभागाच्या अधिपत्त्याखाली आणण्यात आलेले खाजगी वनक्षेत्र (१,१८१ चौ किमी) व महसूल विभाग (१,४५६ चौ किमी) यांच्या अधिपत्याखाली आहे. 'भारताचा वनस्थिती अहवाल - २०१५' नुसार राज्याच्या एकूण वनाच्छादनात अति घनदाट वने १५.९ टक्के, मध्यम घनदाट वने ३७.९ टक्के, खुले वन ३८.६ टक्के तर खुरटे वन ७.६ टक्के होते. एकूण वनक्षेत्रापैकी ५१,१४५ चौ किमी राखीव, ६,५९७ चौ किमी संरक्षित आणि ३,८८० चौ किमी अवर्गीकृत वनक्षेत्र होते. परिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण तक्ता ७.४० मध्ये तर निवडक राज्यांचे वनाच्छादन तक्ता ७.४१ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४० परिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण ३१ मार्च २०१६ रोजी**

(चौ किमी)

| परिमंडळ | वनक्षेत्र | | | | एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण | |
| गडचिरोली | ११,३६४.९० | १,४०३.३८ | ७४.१७ | १२,८४२.४५ | २०.८ |
| नागपूर | ४,३०४.६४ | २,१५६.११ | १,२६४.९३ | ७,७२५.६८ | १२.५ |
| धुळे | ६,१७३.७६ | ५७.०६ | २३२.८३ | ६,४६३.६५ | १०.५ |
| ठाणे | ४,३३८.२१ | १,२००.५६ | २२०.१९ | ५,७५८.९६ | ९.३ |
| नाशिक | ५,०१५.०३ | २७२.९३ | ५०.९४ | ५,३३८.९० | ८.७ |
| चंद्रपूर | ३,८७४.९४ | ८७१.१४ | ५९.८४ | ४,८०५.९२ | ७.८ |
| अमरावती | ४,५८७.८९ | ५६.०६ | १४.७१ | ४,६५८.६६ | ७.६ |
| कोल्हापूर | २,७८०.१६ | ४१८.९२ | १,३१८.०४ | ४,५१७.१२ | ७.३ |
| यवतमाळ | ३,६८९.०६ | ३४.३७ | ११५.९२ | ३,८३९.३५ | ६.२ |
| औरंगाबाद | २,६५०.५६ | १२६.२८ | ३४४.४२ | ३,१२१.२६ | ५.१ |
| पुणे | २,३६५.५९ | ०.१३ | १८४.७६ | २,५५०.४८ | ४.१ |
| **महाराष्ट्र** | **५१,१४४.७४** | **६,५९६.९४** | **३,८८०.७५** | **६१,६२२.४३** | **१००.०** |

*आधार :* प्रधान मुख्य वन संरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.४१ निवडक राज्यांचे वनाच्छादन@**

(चौ किमी)

| राज्य | भौगालिक क्षेत्र | एकूण वनाच्छादन | भौगालिक क्षेत्राशी एकूण वनाच्छादनाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| मध्य प्रदेश | ३,०८,२४५ | ७७,४६२ | २५.१ |
| **महाराष्ट्र** | **३,०७,७१३** | **५०,६२८** | **१६.५** |
| कर्नाटक | १,९१,७९१ | ३६,४२१ | १९.० |
| तामिळनाडू | १,३०,०५८ | २६,३४५ | २०.३ |
| आंध्रप्रदेश | १,६०,२०४ | २४,४२४ | १५.२ |
| केरळ | ३८,८६३ | १९,२३९ | ४९.५ |
| **भारत** | **३२,८७,२६३** | **७,०१,६७३** | **२१.३** |

*आधार :* भारत वनस्थिती अहवाल - २०१५

@ उपग्रहाद्वारे प्राप्त माहितीवर आधारित (ऑक्टोबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४)

## वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये

७.४६ राज्यात सहा राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये आणि चार संवर्धित राखीव क्षेत्रे आहेत. 'भारतातील वाघांची स्थिती २०१४' अहवालानुसार राज्यातील वाघांची अंदाजित संख्या १९० होती, जी सन २०१० मध्ये १६९ होती. राज्यातील वाघांची संख्या मोजण्यासाठी फेज ४ (कॅमेरा ट्रॅप) अभ्यास पाहणी २०१४-१५ मध्ये घेण्यात आली असून सदर पाहणीत २०३ वाघ असल्याचे निदर्शनास आले. फेज ४ (कॅमेरा ट्रॅप) अभ्यास पाहणी २०१४-१५ चा गोषवारा तक्ता ७.४२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४२ फेज ४ (कॅमेरा ट्रॅप) अभ्यास पाहणी २०१४-१५ चा गोषवारा**

| भूभाग | क्षेत्र चौ किमी (अंदाजित) | वाघांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | वाघांसाठी राखीव क्षेत्र (गाभा + बफर) | वाघांसाठी राखीव नसलेले क्षेत्र (राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्ये) | असंरक्षित क्षेत्र | एकूण |
| ताडोबा अंधारी | १,७०० | ६१ | - | - | ६१ |
| उमरेड- करंडला | १४० | - | ४ | - | ४ |
| ब्रह्मपुरी विभाग | १,१०० | - | - | २३ | २३ |
| मध्य चांदा विभाग | ३२० | - | - | १० | १० |
| चंद्रपूर विभाग | ३९१ | - | - | १० | १० |
| **ताडोबा अंधारी** | **३,६५१** | **६१** | **४** | **४३** | **१०८** |
| पेंच | ३५२ | २३ | - | - | २३ |
| बावणथडी (नागपूर व भंडारा विभाग) | ४८० | - | - | ९ | ९ |
| **पेंच (महाराष्ट्र)** | **८३२** | **२३** | - | **९** | **३२** |
| बोर | १५८ | ३ | - | - | ३ |
| कळमेश्वर-कोंडाळी (नागपूर विभाग) | १२० | - | - | १ | १ |
| **बोर** | **२७८** | **३** | - | **१** | **४** |
| **नवेगांव-नागझिरा** | **६३५** | **७** | - | - | **७** |
| टिपेश्वर अभयारण्य | १४० | - | २ | - | २ |
| पांढरकवडा विभाग | २१० | - | - | ४ | ४ |
| **टिपेश्वर- पांढरकवडा** | **३५०** | - | **२** | **४** | **६** |
| **मेळघाट** | **२,०२९** | **४२** | - | - | **४२** |
| पोहरा | ३० | - | - | १ | १ |
| महेंद्री | ६६ | - | - | - | - |
| **पोहरा - महेंद्री** | **९६** | - | - | **१** | **१** |
| **सह्याद्री** | **६००** | **३** | - | - | **३** |
| **एकूण** | **८,४७१** | **१३९** | **६** | **५८** | **२०३** |

आधार : प्रधान मुख्य वन संरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन

## वन उत्पादने

७.४७ वनांद्वारे इमारती लाकूड, जळाऊ लाकूड ही प्रमुख व बांबू, तेंदू पत्ता, डिंक, गवत, इत्यादि गौण वन उत्पादने मिळतात. ही सर्व वन उत्पादने राज्याचा महसूल वाढविण्यासाठी व स्थानिकांना उपजीविका पुरविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. वन उत्पादने व त्यांचे मूल्य तक्ता ७.४३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४३ वन उत्पादने व त्यांचे मूल्य**

(₹ कोटी)

| वन उत्पादने | उत्पादनाचे परिमाण | २०१४-१५ | | २०१५-१६* | | २०१६-१७@ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य वन उत्पादने** | | | | | | | |
| इमारती लाकूड | लाख घन मीटर | १.११ | २१३.२५ | १.८२ | १२०.६७ | १.८१ | २३४.४२ |
| जळाऊ लाकूड | लाख घन मीटर | १.८९ | २०.५७ | २.२६ | १९.८७ | २.३६ | ३२.७८ |
| **एकूण (अ)** | **लाख घन मीटर** | **३.००** | **२३३.८२** | **४.०८** | **१४०.५४** | **४.१७** | **२६७.२०** |
| **(ब) गौण वन उत्पादने** | | | | | | | |
| बांबू | लाख मे. टन | ०.२३ | ३०.२६ | ०.३३ | १२.२० | ०.३८ | १४.७६ |
| तेंदू | लाख स्टँडर्ड बॅग्ज | ४.६२ | ५५.२१ | २.१३ | ३०.६८ | २.७६ | ५०.४७ |
| गवत | मे. टन | ४८३ | ०.१३ | ११६ | ०.०२ | उना | उना |
| डिंक | क्विंटल | ५,३९१ | ०.५६ | ४,५३० | ३.४१ | उना | उना |
| इतर (लाख, हिरडा, शिकेकाई, इ.) | | उना | ९.५६ | उना | १३.६३ | उना | उना |
| **एकूण (ब)** | | | **९५.७२** | | **५९.९४** | | **६५.२३** |
| **एकूण (अ+ब)** | | | **३२९.५४** | | **२००.४८** | | **३३२.४३** |

*आधार :* प्रधान मुख्य वन संरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन, उना उपलब्ध नाही * अस्थायी @अपेक्षित

## वृक्ष लागवड

७.४८ वृक्ष लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी मुख्यत: वन विभाग, मवविम व सामाजिक वनीकरण संचालनालय यांचेमार्फत करण्यात येते. राज्य शासनाने सन २०१२ पासून दरवर्षी १०० कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे. वृक्ष लागवडी अंतर्गत क्षेत्र व खर्च तक्ता ७.४४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४४ वृक्ष लागवडी अंतर्गत क्षेत्र व खर्च**

| वर्ष | वन विभाग | | मवविम | | सामाजिक वनीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | पुरविलेली रोपे (कोटी) |
| २०१२-१३ | ७०,१५७ | १३३.९७ | ४,८४७ | १०.३६ | २,१०६ | १४.२९ | ०.७७ |
| २०१३-१४ | ५८,६४६ | १०९.७६ | ३,९६९ | ८.५७ | २,५२८ | १६.०६ | २.१४ |
| २०१४-१५ | ८५,३५६ | १०२.९० | ३,३१४ | ८.८७ | १,४५३ | २१.३७ | ०.८९ |
| २०१५-१६ | ५१,८६६ | ११.४४ | २,८९८ | ११.०५ | १,०२९ | १७.४३ | ०.३८ |
| २०१६-१७*+ | ३६,४५७ | ६६.७६ | २,९०६ | ८.०२ | २,२०१ | ३०.९१ | १.१३ |

*आधार :* प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी +डिसेंबरपर्यंत

७.४९ जागतिक तापमान वाढ, हवामानातील बदल या समस्यांविरूद्ध लढा देण्याच्या आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात १ जुलै २०१६ या एकाच दिवशी दोन कोटी रोपांची लागवड करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम भव्य सार्वजनिक मोहिमेद्वारे राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत वन विभागासाठी १.५२ कोटी तर वनेतर विभागांसाठी ०.५० कोटी लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते त्या तुलनेत सुमारे २.८१ कोटी रोपांची लागवड यशस्वीपणे करण्यात आली. या मोहिमेची नोंद राष्ट्रीय विक्रम म्हणून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस मध्ये घेण्यात आली. राज्य शासनाने पुढील तीन वर्षांत ५० कोटी रोपांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दि.१ जुलै २०१६ रोजी करण्यात आलेली रोपांची विभागनिहाय लागवड तक्ता ७.४५ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ७.४५ दि.१ जुलै २०१६ रोजी करण्यात आलेली रोपांची विभागनिहाय लागवड**

(लाख)

| विभाग | लागवड | | |
|---|---|---|---|
| | वन विभाग | वनेतर विभाग | एकूण |
| कोकण | १५.३० | ८.९३ | २४.२३ |
| नाशिक | ६७.३५ | ८.३७ | ७५.७२ |
| पुणे | ३२.०३ | १६.३५ | ४८.३८ |
| औरंगाबाद | ३०.३७ | ६.९१ | ३७.२८ |
| अमरावती | १८.६० | ९.२४ | २७.८४ |
| नागपूर | ५६.६४ | ११.२९ | ६७.९३ |
| **महाराष्ट्र** | **२२०.२९** | **६१.०९** | **२८१.३८** |

*आधार* : प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन

## सामाजिक वनीकरण

७.५० सन २०१५-१६ मध्ये सुमारे ४३२ हेक्टर व १,११० किमी सामुहिक जमिनीवर १६.७८ लाख रोपांची लागवड करण्यात आली असून खाजगी जमिनीवरील वृक्ष लागवडीसाठी २२ लाख रोपे पुरविण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ६९ लाख रोपांची लागवड सुमारे ८३८ हेक्टर व २,५३४ किमी सामुहिक जमिनीवर करण्यात आली असून खाजगी जमिनीवरील लागवडीकरिता ४४ लाख रोपे पुरविण्यात आली. प्रमुख योजनांखालील वर्षनिहाय वृक्ष लागवडीची माहिती तक्ता ७.४६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.४६ प्रमुख योजनांखालील वृक्ष लागवड**

(क्षेत्र हेक्टर)

| योजना | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना-गट लागवड | २३४ | २११ | ११० |
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना- रस्त्यांच्या बाजूला वृक्ष लागवड (किमी) | १,६७२ | ९२८ | १,१३२ |
| राष्ट्रीय बांबू अभियान | ३९ | ३० | ६५ |
| निवडक पाणलोट क्षेत्रातील वनेतर सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रम | १२५ | १४७ | १०५ |

आधार: प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## संत तुकाराम वनग्राम योजना

७.५१ वने आणि वन्यजीव यांचे महत्व याविषयी जागरुकता निर्माण करणे या हेतूने तसेच बेकायदेशीर वृक्षतोड, अतिक्रमण इ. पासून वनांचे संरक्षण करण्याकरिता संत तुकाराम वनग्राम योजना सन २००६-०७ मध्ये सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत १५,५०० गावांमध्ये सुमारे २९.७० लाख सभासद असलेल्या एकूण १२,५१७ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांकडून २७.०४ लाख हेक्टर वनक्षेत्राचे व्यवस्थापन केले जाते.

* * * * *

# परिशिष्ट ७.१

## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २०१०-११ | १,५१६ | २,६९१ | १,७७५ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |
| ८ | २०१४-१५ | १,५५१ | २,९४६ | १,९०० | १,०६७ | १,३०८ | १,२२५ | ३,२८८ | २,१०९ | ६४१ |
| ९ | २०१५-१६ | १,५०३ | २,५९३ | १,७२५ | ९११ | ९८१ | १,०७७ | ३,२१७ | १,२०५ | ३७५ |

| अ. क्र. | वर्ष | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २०१०-११ | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०६८ | २,७४९ | २,५७५ | ८,९८५ | १२,३१७ | १,३७१ |
| ७ | २०१४-१५ | ८६५ | ५३८ | ६२२ | १,२८८ | २,३६६ | १,८३८ | ८,०५९ | ९,२६७ | १,१५० |
| ८ | २०१५-१६ | ८०१ | ३३३ | ४१६ | १,२३६ | १,७८३ | १,४४३ | ७,६६७ | ६,८९६ | ८९९ |

| अ. क्र. | वर्ष | तूर | | | हरभरा | | | मूग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २०१०-११ | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |
| ७ | २०१४-१५ | १,२१० | ३५३ | २९२ | १,४२७ | १,०८८ | ७६२ | ३१५ | ८४ | २६८ |
| ९ | २०१५-१६ | १,२३७ | ४४४ | ३५९ | १,४४२ | ७७७ | ५३९ | ३६६ | ६९ | १९० |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ७.१ (पुढे चालू)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | उडीद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २०१०-११ | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |
| ७ | २०१४-१५ | २७७ | ९२ | ३३३ | १८४ | ६४ | ३४६ | ३,४१३ | १,६८१ | ४९३ |
| ८ | २०१५-१६ | २८६ | ६१ | २१४ | २१३ | ८१ | ३७८ | ३,५४४ | १,४३२ | ४०४ |

| अ. क्र. | वर्ष | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबीन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २०१०-११ | १३,०२३ | १५,४१३ | १,१८३ | ३९५ | ४७० | १,१९० | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |
| ७ | २०१४-१५ | ११,४७२ | १०,९४८ | ९५४ | ३२७ | ३७९ | १,१६० | ३,६४० | १,८२१ | ५०० |
| ८ | २०१५-१६ | ११,२१० | ८,३२८ | ७४३ | ३०९ | ३३४ | १,०७८ | ३,७०२ | १,७९५ | ४८५ |

| अ. क्र. | वर्ष | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २०१०-११ | १७३ | ९४ | ५४४ | ३३१ | १७६ | ५३२ | ३,६२८ | ५,०५६ | १,३९४ |
| ७ | २०१४-१५ | ७४ | २६ | ३५३ | १६९ | ५१ | ३०२ | ४,२११ | २,२७८ | ५४१ |
| ८ | २०१५-१६ | ५७ | १३ | २२५ | १२७ | २६ | २०५ | ४,१९५ | २,१६६ | ५१६ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.१ (समाप्त)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**नगदी पिके**

| अ. क्र. | वर्ष | ऊस | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तोडणी क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (५७) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) | (६६) |
| १ | १९६०-६१ | १५५ | १०,४०४ | ६६.९२ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | १६७ | १४,४३३ | ८६.५३ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | २५८ | २३,७०६ | ९१.७४ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ४४२ | ३८,१५४ | ८६.४० | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ५९५ | ४९,५६९ | ८३.२७ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २०१०-११ | ९६५ | ८५,६९१ | ८८.८५ | ३,९४२ | ७,४७३ | ३२२ | १ | १ | ९९४ |
| ७ | २०१४-१५ | १,०३० | ९१,५३८ | ८९.०० | ४,१९० | ३,५७७ | १४५ | १ | २ | १,६०८ |
| ८ | २०१५-१६ | ९८७ | ६९,२३५ | ७०.१६ | ४,२०७ | ३,९१४ | १५८ | २ | ३ | १,७६० |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

उ.ना. - उपलब्ध नाही

टीप - (१) माहिती अंतिम अनुमानावर आधारित आहे.
(२) कापसाचे उत्पादन १७० किलो/गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

## परिशिष्ट ७.२

## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया: १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | | | |
| **(अ) तृणधान्ये** | | | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२२.१ | १३८.४ | १४१.३ | १३३.४ | ११७.४ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | २३७.७ | १२३.९ | १६५.५ | १३५.१ | १०१.४ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७०.५ | ४३.० | ५०.७ | ४३.१ | २४.६ |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १५५.५ | ६९.५ | १०९.१ | ७४.५ | ४६.१ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | १८८.७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | २,१८०.५ | १,५२८.५ | २,७१५.१ | १,८४४.६ | १,३९०.७ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ५५.५ | ६५.७ | ६७.१ | ५६.३ | ४३.९ |
| (८) कोद्रा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २३.६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | २६.१ | ४८.२ | ४६.६ | ७०.८ | ४७.३ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१३४.२** | **९४.३** | **१२०.६** | **९८.५** | **७३.१** |
| **(ब) कडधान्ये** | | | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ७९०.७ | ५२७.९ | ९८६.४ | ६६१.४ | ४७२.४ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | २४५.३ | २५२.९ | २५९.९ | ८८.८ | १११.७ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | १९६.५ | ११६.५ | १२३.२ | १५.१ | १९.३ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **३०५.६** | **२४५.६** | **३१६.१** | **१४४.६** | **१३१.३** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१६८.२** | **१२४.३** | **१५९.४** | **१०७.६** | **८४.७** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | | | |
| **(अ)** तेलबिया | | | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७४.३ | ३८.३ | १६३.८ | ६१.५ | ५४.२ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ५८.९ | ३२.४ | ३२.४ | १२.२ | १२.२ |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ५.१ | ३.४ | २०.३ | ९.० | ६.५ |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ३३३.३ | ४१६.७ | ४१६.७ | ५२५.६ | ३७५.५ |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | २६७.३ | ६८.३ | ८८.४ | ८८.४ | ८८.४ |
| **एकूण - तेलबिया** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **७९.८** | **३७.३** | **६०.१** | **५६.१** | **५०.०** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | ५१२.३ | ४६५.७ | ६०५.६ | २४५.२ | २४५.२ |
| (२) अंबाडी | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २६.४ | २९.२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **५१०.४** | **४६३.९** | **६०३.२** | **२४४.२** | **२४४.२** |
| **(क) संकीर्ण** | | | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | २९७.२ | २९२.५ | २८९.९ | ३४५.१ | २६१.० |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ३२.७ | ०.० | उ.ना. | ३०.९८ | ४१.४५ |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **२७३.४** | **२६८.९** | **२६६.५** | **३१७.४** | **२४०.१०** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **२८५.६** | **२६५.०** | **२९७.२** | **२५१.५** | **२०४.२०** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **२२३.८** | **१९०.९** | **२२४.६** | **१७५.७** | **१४१.२** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई    उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - २०१०-११ ते २०१५-१६ चे निर्देशांक अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.३

## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र

| अ. | आकारवर्ग | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | (हेक्टर) | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २२,४०९ | २७,४६२ | ३१,६५८ | ३६,४५७ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २०,२५२ | २५,५९५ | २९,५२५ | ३०,६३३ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३१,७५५ | ३६,०५६ | ४१,५०३ | ४०,५२३ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १४,७४५ | १५,७९१ | १७,०२० | १५,४६३ |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,७७४ | ६,९४९ | ७,४९६ | ६,१२८ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,८७४ | ३,७८० | ४,०३७ | ३,१४२ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ५,५५८ | ४,८७३ | ५,२१४ | ३,९६४ |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | १,०२९ | ७७३ | ६२२ | ५९० |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | १३२ | ९७ | ८१ | ८९ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,०६,५२८** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** | **१,३६,९८९** |

| अ. | आकारवर्ग | वहिती एकूण क्षेत्र ('०० हेक्टर) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | (हेक्टर) | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ५,७४६ | ७,३२८ | ७,७४० | ९,१८० |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १५,१२० | १९,१५९ | २०,२७४ | २२,६८० |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ४६,०५९ | ५१,२७१ | ५२,४७६ | ५७,३९० |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३५,४२० | ३७,४१४ | ३७,५४२ | ३६,६८१ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,३०३ | २३,६७६ | २३,७५६ | २०,९७४ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १७,२१० | १६,७१७ | १६,७१७ | १३,९०१ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३७,१५० | ३२,०८४ | ३२,१३५ | २६,०२७ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | १३,५१४ | ९,९६१ | ६,७७६ | ७,५२४ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ५,२७४ | ३,४१८ | २,६३४ | ३,३१४ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **१,९८,७९६** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** | **१,९७,६७१** |

| अ. | आकारवर्ग | वहिती सरासरी क्षेत्र (हेक्टर) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | (हेक्टर) | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२६ | ०.२७ | ०.२४ | ०.२५ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७४ |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४५ | १.४२ | १.२६ | १.४२ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.४० | २.३७ | २.२१ | २.३७ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ | ३.४२ |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ | ४.४२ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.६८ | ६.५८ | ६.१६ | ६.५७ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १३.१३ | १२.८९ | १०.८९ | १२.७५ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३९.९५ | ३५.२४ | ३२.५२ | ३७.२४ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.८७** | **१.६६** | **१.४६** | **१.४४** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ७.४

## राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '००० हेक्टर)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनां-खालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकां-खालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापिक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागती-योग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २०१०-११ | ३०,७५८ | ५,२१६ | १,७३१ | १,४४९ | ९१९ | १,२४२ | २५० | १,३६६ | १,१७९ | १७,४०६ | ५,७६९ | २३,१७५ |
| २०११-१२ | ३०,७५८ | ५,२११ | १,७२८ | १,४५१ | ९१९ | १,२४४ | २५० | १,३७८ | १,१९२ | १७,३८६ | ५,७२० | २३,१०६ |
| २०१२-१३ | ३०,७५८ | ५,२०७ | १,७२२ | १,४५६ | ९१६ | १,२४५ | २५१ | १,४१८ | १,२०० | १७,३४४ | ५,७७२ | २३,११६ |
| २०१३-१४ | ३०,७५८ | ५,२०५ | १,७२३ | १,४६० | ९१५ | १,२४२ | २४९ | १,४०१ | १,१९२ | १७,३६८ | ६,०१२ | २३,३८० |
| २०१४-१५ | ३०,७५८ | ५,२०१ | १,७२७ | १,४८२ | ९१९ | १,२४९ | २४९ | १,३९९ | १,१८८ | १७,३४४ | ५,९२९ | २३,२७३ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

टीप - २०१०-११ ते २०१४-१५ चे आकडे अस्थायी आहेत.

## परिशिष्ट ७.५

## राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र

('००० हेक्टर)

| अ. क्र. | वर्ष | सिंचित क्षेत्र | | | | ओलिताखालील पिकांची सघनता | सिंचन विहिरींची संख्या (हजारात) | दर विहिरीमागे सिंचित निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये) | पिकांखालील एकूण क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिरी | इतर साधने | निव्वळ क्षेत्र | एकूण क्षेत्र | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,०७२ | १,२२० | ११४ | ५४२ | १.१० | १८,८२३ | ६.५ |
| २ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,३४७ | १,५७० | ११७ | ६९४ | १.११ | १८,७३७ | ८.४ |
| ३ | १९८०-८१ | १,०५५ | ७८० | १,८३५ | २,४१५ | १३२ | ८२६ | १.२८ | १९,६४२ | १२.३ |
| ४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | २,६७१ | ३,३१९ | १२४ | १,०१७ | १.६४ | २१,८५९ | १५.२ |
| ५ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,२४९ | ३,८५२ | ११९ | १,३१८ | १.७२ | २१,६१९ | १७.८ |
| ६ | २००१-०२ | २,१४६ | ९९० | ३,१३६ | ३,७२७ | ११९ | १,३२२ | १.५२ | २०,९९१ | १७.८ |
| ७ | २००२-०३ | २,१४५ | १,०७१ | ३,२१६ | ३,८०६ | ११८ | १,३३१ | १.६१ | २०,९१५ | १८.२ |
| ८ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | २,९४४ | ३,६३६ | १२३ | उ.ना. | उ.ना. | २२,१९० | १६.४ |
| ९ | २००४-०५ | १,९९२ | १,००१ | २,९९३ | ३,६६५ | १२५ | उ.ना. | उ.ना. | २२,३७६ | १६.४ |
| १० | २००५-०६ | २,०७७ | १,०७० | ३,१४७ | ३,८१० | ११८ | उ.ना. | उ.ना. | २२,५५६ | १६.९ |
| ११ | २००६-०७ | २,१०९ | १,१३७ | ३,२४६ | ३,९५८ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,५५७ | १७.६ |
| १२ | २००७-०८ | २,१५१ | १,१६० | ३,३११ | ४,०३७ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६५५ | १७.८ |
| १३ | २००८-०९ | २,११५ | १,१४० | ३,२५५ | ३,९७० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,४५४ | १७.७ |
| १४ | २००९-१० | २,१५९ | १,१६२ | ३,३२१ | ४,०५० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६१२ | १७.९ |
| १५ | २०१०-११ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,१७५ | उ.ना. |
| १६ | २०११-१२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,१०६ | उ.ना. |
| १७ | २०१२-१३ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,११५ | उ.ना. |
| १८ | २०१३-१४ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,३८० | उ.ना. |
| १९ | २०१४-१५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,२७३ | उ.ना. |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

(२) स्तंभ क्र.७ मध्ये (स्तंभ क्र.६ ÷ स्तंभ क्र.५) x १०० हे सूत्र वापरून सघनता काढली आहे.

(३) २००३ -०४ ते २०१४-१५ चे आकडे अस्थायी आहेत.

(४) जलसंपदा विभागाच्या, महाराष्ट्र शासन, दि.२६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शा.नि. अन्वये माहिती संकलनाच्या पद्धती बाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## परिशिष्ट ७.६

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |
| २०११-१२ | १०९.७३ | ५४१.०६ | ६५०.७९ | ७९.१३ | ५४१.१३ | ६२०.२६ | ६०८.८७ | ४६१.७४ | १,०७०.६१ |
| २०१२-१३ | ८२.९८ | ६७०.१२ | ७५३.१० | ६३.१० | ४४३.०५ | ५०६.१५ | ६१८.७८ | ६५६.५२ | १,२७५.३० |
| २०१३-१४ | ७०.३७ | ५३६.६७ | ६०७.०४ | ५७.५७ | ४५७.२० | ५१४.७७ | ६३१.४९ | ७२८.२४ | १,३५९.७३ |
| २०१४-१५ | ७८.१५ | ५९३.५९ | ६७१.७४ | ६१.९७ | ५७४.५३ | ६३६.५० | ६४८.२९ | ६९५.८० | १,३४४.०९ |
| २०१५-१६ | ८०.०४ | ६६०.१३ | ७४०.१६ | ४९.१६ | ५२३.४२ | ५७२.५९ | ६७९.०२ | ८३५.१३ | १,५१४.१५ |

*आधार* - जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# परिशिष्ट ७.७

## महाराष्ट्रातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी

('०००)

| अनु. क्रमांक | पशुधन गणना वर्ष | गाई-बैल | म्हशी - रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर पशुधन + | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई व कुरण क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | पिकांखालील दर शंभर हेक्टर निव्वळ क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्ये-मागे पशुधन | एकूण कुक्कुटादी पक्षी $ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६१ | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| २ | १९६६ | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| ३ | १९७२ | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| ४ | १९७८ | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७५१ |
| ५ | १९८२ | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| ६ | १९८७ | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३० |
| ७ | १९९२ | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४६ | ३२,१८७ |
| ८ | १९९७ | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| ९ | २००३ | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३६ | ३४,५९६ |
| १० | २००७ | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५५ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,७५६@ |
| ११ | २०१२ | १५,४८४ | ५,५९५ | ११,०१६ | ३९४ | ३२,४८९ | ८८५ | १८७ | २९ | ७७,७९५@ |

*आधार* - पशुधन गणना

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

+ इतर पशुधन यामध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट, गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.

$ एकूण कुक्कुटादी पक्षीमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटपक्षी यांचाही समावेश करण्यात आला आहे.

@ एकूण कुक्कुटादी पक्षीमध्ये पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट आहे.

# ८

# उद्योग आणि सहकार



# ८. उद्योग आणि सहकार

## उद्योग

८.१ औद्योगिक विकासाच्या परिणामी उत्पादन क्षमतेत वाढ होऊन आर्थिक वाढीस चालना मिळते आणि अधिक व विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. तसेच ते इतर क्षेत्रांच्या विकासासही सहाय्यभूत होते. महाराष्ट्र हे मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण झालेले राज्य आहे. औद्योगिक वाढीस गती देण्याच्या दृष्टीने राज्याकडून नियमितपणे धोरणे आखली जातात व वेळोवेळी सुधारित केली जातात. राज्याने नुकतेच किरकोळ व्यापार धोरण-२०१६ व महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१६ जाहीर केले आहे.

### किरकोळ व्यापार धोरण-२०१६

८.२ किरकोळ व्यापार धोरण-२०१६ ची उद्दिष्टे :

- किरकोळ व्यापार क्षेत्रात महाराष्ट्रास देशामध्ये अग्रस्थानी ठेवणे
- राज्यातील कमी विकसित भागात गुंतवणुकीचा ओघ आणखी वाढविण्यासाठी चालना देणे
- राज्याच्या सर्व विभागातील, समाजातील सर्व स्तरातील, विशेषत: ग्रामीण भागातील तरुणांना किरकोळ व्यापार क्षेत्रात सहभागी करण्यासाठी प्रशिक्षित करून रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे
- राज्याच्या सामाजिक- आर्थिक विकासाकरिता किरकोळ व्यापार क्षेत्राचा एक साधन म्हणून वापर करणे
- जागतिकीकरणाला सामोरे जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या असंघटीत लहान किरकोळ विक्रेत्यांचे बळकटीकरण करणे

### महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१६

८.३ महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१६ ची उद्दिष्टे :

- राज्यात गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करून, इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या उत्पादनास चालना देणे
- राज्यातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राची रचना व अभियांत्रिकी यामध्ये विविध बदल करून राज्यात संशोधन व विकास प्रणाली निर्माण करून इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यास सक्रीयपणे सहाय्य करणे
- इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योग या क्षेत्राशी संबंधित विशिष्ट कौशल्यवृद्धी व प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे
- राज्यात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक उद्योग घटक स्थापन करण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करणे व संदर्भात संभाव्यधिष्ठित गुंतवणूकदारांच्या समस्यांचे योग्य प्रकारे निराकरण करुन त्यांना जमीन, ऊर्जा, पाणी इत्यादींसारख्या आवश्यक पायाभूत सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे
- केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निदेशानुसार शास्त्रोक्त पद्धतीचा वापर करुन ई-कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यासाठी अत्युत्तम पद्धती अंगीकृत करण्यास चालना देणे

### महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सहाय्य केंद्र

८.४ गुंतवणूकदारांना उद्योगासंबंधी सर्व परवाने एकाच ठिकाणी मिळण्यासाठी, ऑनलाईन व कालबद्ध मान्यता देण्यासाठी आणि उद्योगांच्या अडचणी तसेच तक्रारींचे निवारण करण्यासाठी शासनाने 'महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सहाय्य केंद्र' (मैत्री) स्थापन केले आहे. फेब्रुवारी २०१७ अखेर मैत्री केंद्राने ३९३ प्रकल्प हाताळले. मैत्री केंद्राकडे प्राप्त झालेल्या ७४० तक्रारींपैकी ६३७ निकाली काढण्यात आल्या व उर्वरित १०३ तक्रारींवर कार्यवाही सुरु आहे.

### औद्योगिक गुंतवणूक

८.५ ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी ४७६ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यामधील गुंतवणूक सर्वात जास्त ₹ ३,८७,४३३ कोटी (एकूण गुंतवणुकीच्या ३४.१ टक्के) आहे, त्या पाठोपाठ इंधन आणि धातू उद्योगामध्ये अनुक्रमे ₹ १,४२,७६० कोटी (१२.५ टक्के) व ₹ १,०१,३५४ कोटी (८.९ टक्के) गुंतवणूक आहे. एकूण मंजूर गुंतवणुकीपैकी सुमारे ५५.५ टक्के गुंतवणूक या तीन उद्योग गटांमध्ये आहे. उद्योग गटनिहाय राज्यातील मंजूर व कार्यान्वित प्रकल्पांची माहिती तक्ता ८.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१ उद्योग गटनिहाय मंजूर प्रस्ताव व कार्यान्वित प्रकल्प**

(ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर २०१६)

| उद्योग गट | मंजूर प्रस्ताव | | कार्यान्वित प्रकल्प | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | गुंतवणूक (₹ कोटी) | संख्या | गुंतवणूक (₹ कोटी) |
| माहिती व तंत्रज्ञान | ४७६ | ३,८७,४३३ | २८९ | ५८,३२२ |
| इंधन | ८२६ | १,४२,७६० | २०२ | २८,१४७ |
| धातू | १,९१९ | १,०१,३५४ | ९४८ | ३७,०५५ |
| रसायने व खते | २,८५९ | ६१,२२७ | १,३९७ | २२,७०९ |
| वस्त्रोद्योग | २,०१२ | ५०,५९० | ९५८ | १७,१६९ |
| साखर | १,५५१ | ३९,०१३ | २४७ | ८,६०२ |
| परिवहन | ४२१ | ३२,१४९ | २८५ | २४,५५४ |
| फोटोग्राफीक फिल्म्स् व कागद | ९८१ | २८,४१९ | ५७० | १३,९८८ |
| सिमेंट जिप्सम | ३७३ | २५,४५६ | १५० | ५,७२६ |
| औद्योगिक यंत्रसामग्री | ८५१ | २४,२०४ | ५०९ | ८,८०२ |
| विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स | १,१८१ | २२,६३३ | ६८७ | ७,९७८ |
| प्रक्रिया केलेले अन्न | १,०५७ | २०,५१५ | ४४७ | ५,८६८ |
| वनस्पती तेल आणि वनस्पती | ३७४ | १६,१०८ | २०४ | २,३५० |
| औषधी | ८५९ | १६,०८० | ४९९ | ४,३८६ |
| कागद व कागद उत्पादने | ५५६ | १७,११२ | २८१ | ७,९७० |
| अभियांत्रिकी | ३६३ | १३,६८१ | २०६ | ४,६२२ |
| यंत्रसामग्री/सिरॅमिक/संकीर्ण उद्योग | ४६६ | ८,२२१ | २९१ | ४,४२२ |
| इतर | २,३१२ | १,३०,८२८ | ४९४ | ७,१४४ |
| **एकूण** | **१९,४३७** | **११,३७,७८३** | **८,६६४** | **२,६९,८१४** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

८.५.१ सन २०१५-१६ मध्ये ₹ ३०,५८० कोटी गुंतवणुकीच्या व ०.३ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या ३४० प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ २८,६२५ कोटी गुंतवणुकीच्या व अंदाजे ०.२ लाख रोजगार निर्मितीच्या २६२ प्रकल्पांची नोंदणी झाली आणि ₹ २,३६१ कोटी गुंतवणुकीचे २२ प्रकल्प कार्यान्वित झाले.

८.५.२ राज्याने रोजगार निर्मितीची सर्वाधिक क्षमता असलेले सर्वात जास्त औद्योगिक प्रस्ताव प्राप्त केले आहेत. ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत एकूण ₹ ११,३७,७८३ कोटी गुंतवणुकीच्या १९,४३७ औद्योगिक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यापैकी ₹ २,६९,८१४ कोटी गुंतवणुकीचे (२३.७ टक्के) व सुमारे ११.४५ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीचे ८,६६४ प्रकल्प (४४.६ टक्के) कार्यान्वित झाले आहेत, तर ₹ ८७,७०१ कोटी गुंतवणुकीच्या २,१०७ प्रकल्पांचे काम सुरु असून त्यामधून २.९८ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. देशामध्ये प्राप्त झालेल्या एकूण औद्योगिक प्रस्ताव आणि गुंतवणुकीमध्ये राज्याचा अनुक्रमे १७.९ टक्के आणि १० टक्के वाटा आहे. मंजूर औद्योगिक प्रस्तावांची राज्यनिहाय माहिती तक्ता ८.२ मध्ये देण्यात आलेली आहे.

**तक्ता ८.२ निवडक राज्यांसाठी मंजूर औद्योगिक प्रस्ताव@**

(ऑगस्ट १९९१ ते नोव्हेंबर २०१६)

| तपशिल | महाराष्ट्र | गुजरात | तामिळनाडू | आंध्र प्रदेश | उत्तर प्रदेश | अखिल भारत |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रस्ताव (संख्या) | १९,४३७<br>(१७.९) | १३,३०८<br>(१२.३) | ९,५२०<br>(८.८) | ८,८१४<br>(८.१) | ८,२६७<br>(७.६) | १,०८,३१०<br>(१००.०) |
| गुंतवणूक (₹ कोटी) | ११,३७,७८३<br>(१०.०) | १४,३६,९६२<br>(१२.६) | ५,३८,६२२<br>(४.७) | ९,९६,८३४<br>(८.७) | ३,४१,८२६<br>(३.०) | १,१४,१०,४२६<br>(१००.०) |

@ आवेदन पत्र/इरादा पत्र/१०० टक्के निर्यातभिमुख प्रस्तावांसह

कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात.

*आधार* : डी.आय.पी.पी., भारत सरकार

## मोठ्या प्रकल्पांमधील गुंतवणूक

८.५.३ राज्यात २००५ पासून मोठ्या प्रकल्पांबाबतचे धोरण राबविण्यात येत आहे. राज्यामध्ये सुरुवातीपासून डिसेंबर २०१६ पर्यंत ₹ ३,७९,५६१ कोटी गुंतवणुकीच्या ४.२ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या ४८८ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. यापैकी ₹ ६५,८१७ कोटी प्रत्यक्ष गुंतवणूक व सुमारे एक लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या १५७ प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक

८.५.४ वस्तुनिर्माण आणि सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांपैकी वस्तुनिर्माण उपक्रमांचे त्यांच्या यंत्रसामग्रीतील गुंतवणुकीच्या आधारे व सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांचे साधनसामग्रीच्या मूल्याच्या आधारे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम चौथी गणना २००६-०७ अनुसार राज्यात ३१ मार्च २००७ रोजी एकूण गुंतवणूक ₹ १४,८५९ कोटी व १०.९५ लाख रोजगार असलेले ८६,६३५ उद्योग कार्यरत होते. सप्टेंबर २०१५ पर्यंत एकूण ₹ ५६,५५२ कोटी गुंतवणुकीचे २,४३,७२१ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत असून त्यामधून २९.१९ लाख रोजगार निर्माण झाला आहे. वर्षनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक व रोजगार आणि विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती अनुक्रमे तक्ता ८.३ व तक्ता ८.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३ वर्षनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक व रोजगार**

| वर्ष | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १०,२४४ | २,२८१ | १.४० |
| २००८-०९ | ११,६८२ | ३,२९५ | १.७१ |
| २००९-१० | ११,८९६ | ३,०२८ | १.५० |
| २०१०-११ | १४,४९६ | ५,५६३ | १.८७ |
| २०११-१२ | १५,६०६ | ४,४४३ | २.०७ |
| २०१२-१३ | १६,१३६ | ५,४५५ | २.०६ |
| २०१३-१४ | १९,८१४ | ६,३५८ | २.४८ |
| २०१४-१५ | ३६,९९२ | ७,१८० | ३.५० |
| २०१५-१६+ | २०,२२० | ४,०९० | १.६६ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + सप्टेंबरपर्यंत

**तक्ता ८.४ विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती**

(सप्टेंबर २०१५ पर्यंत)

| विभाग | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | टक्केवारी | रोजगार (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | २४,७८६ | १०.२ | ४.०५ | १३.९ |
| कोकण (मुंबई वगळून) | ३९,२६९ | १६.१ | ६.३२ | २१.७ |
| नाशिक | २७,४५८ | ११.३ | ३.१५ | १०.८ |
| पुणे | ९२,२३३ | ३७.८ | १०.०५ | ३४.४ |
| औरंगाबाद | १८,७५१ | ७.७ | १.९३ | ६.६ |
| अमरावती | १४,५१० | ५.९ | १.१४ | ३.९ |
| नागपूर | २६,७१४ | ११.० | २.५५ | ८.७ |
| **एकूण** | **२,४३,७२१** | **१००.०** | **२९.१९** | **१००.०** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

८.५.५ मुंबईत १३ ते १८ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत 'मेक इन इंडिया' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याअंतर्गत 'मेक इन महाराष्ट्र' कार्यक्रमादरम्यान राज्याने ₹ ८,०४,८९७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या, ३०.५ लाख अपेक्षित रोजगाराच्या ३,०१८ प्रकल्पांच्या प्रस्तावांचे सामंजस्य करार केले.

## महाराष्ट्रातून निर्यात

८.६ राज्यातून मुख्यत्वे रत्ने व आभूषणे, पेट्रोकेमिकल्स, तयार कपडे, सुती धागे, धातू व धातू उत्पादने, शेतमालावर आधारित उत्पादने, अभियांत्रिकी उपकरणे, औषधे व औषधी द्रव्ये आणि प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू यांची निर्यात होते. महाराष्ट्र आणि भारतातून झालेली निर्यात तक्ता ८.५ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ८.५ महाराष्ट्र आणि भारतातून निर्यात**

(₹ कोटी)

| वर्ष | महाराष्ट्र | भारत |
|---|---|---|
| २०१२-१३ | ३,६१,४६० | १५,४६,७६६ |
| २०१३-१४ | ४,३४,५९१ | १८,३१,००९ |
| २०१४-१५ | ४,४५,३४९ | १८,६५,५८९ |
| २०१५-१६ | ४,३६,४३५ | १७,१४,६१७ |
| २०१६-१७+ | २,९५,९७६ | ११,७१,१५१ |

*आधार* : डी.जी.सी.आय.एस., भारत सरकार + नोव्हेंबरपर्यंत

## उद्योगांना वित्तीय सहाय्य

८.७ सिकॉम लि., महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यासारख्या राज्यस्तरीय वित्तीय संस्था आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय साधारण विमा महामंडळ, आयएफसीआय लि., भारतीय लघु उद्योग विकास बँक यासारख्या केंद्रस्तरीय वित्तीय संस्थांद्वारे राज्यातील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविले जाते. याबाबतची माहिती परिशिष्ट ८.३ मध्ये दिली आहे.

## विशेष आर्थिक क्षेत्रे

८.८ राज्याने फेब्रुवारी २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्विकारले असून ऑक्टोबर २०१६ पर्यंत राज्यात २४३ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. राज्यामध्ये ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत ७२ विशेष आर्थिक क्षेत्रांची अधिसूचना रद्द झाली किंवा मागे घेण्यात आली आणि ३,०५९ हेक्टर क्षेत्रावर ₹ ३२,२५५ कोटी गुंतवणुकीची २५ विशेष आर्थिक क्षेत्रे कार्यान्वित झाली व त्यामधून सुमारे ३.६० लाख रोजगार निर्मिती झाली आहे. मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे याबाबतची माहिती तक्ता ८.६ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.६ मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे**

(ऑक्टोबर २०१६ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र (हेक्टर) | | | रोजगार (लाख) | | | गुंतवणूक (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोकण | ३२ | २३ | ६ | ८,९८४ | २,५२४ | २६१ | १४.९६ | ८.३३ | १.६५ | ५०,२५७ | ३४,५६८ | ७,३६६ |
| पुणे | २१ | १८ | १४ | ७७७ | ७४६ | ७२४ | ७.४४ | ६.९१ | १.७८ | ३४,७२४ | ३४,०१९ | १२,७०२ |
| नाशिक | २ | १ | ० | १,१०७ | १,००७ | ० | १.७५ | १.२५ | ० | १,८४३ | १,३८० | ० |
| औरंगाबाद | ७ | ५ | ३ | ७०५ | ५५३ | ३७५ | १.०८ | ०.२८ | ०.१६ | २,५३८ | १,५३८ | ४,४८७ |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| नागपूर | ६ | ४ | २ | २,८५० | १,७४० | १,६९९ | ५.४० | ३.८७ | ०.०१ | ८,५१९ | ३,८७२ | ७,७०० |
| **एकूण** | **६८** | **५१** | **२५** | **१४,४२३** | **६,५७०** | **३,०५९** | **३०.६३** | **२०.६४** | **३.६०** | **९७,८८१** | **७५,३७७** | **३२,२५५** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## माहिती तंत्रज्ञान संकुले

८.९ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मऔविम), सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी डिसेंबर २०१६ अखेर ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली. त्यामध्ये सुमारे ₹ १८,००० कोटींची गुंतवणूक असून सुमारे २.६८ लाख रोजगाराची निर्मिती झाली आहे.

८.९.१ खाजगी क्षेत्राला सहभागी करुन माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता ४८७ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली. त्यापैकी १७० संकुले कार्यरत असून त्यामधील गुंतवणूक ₹ ३,७७८ कोटी असून त्यामधून ५.०४ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. उर्वरित ३१७ माहिती तंत्रज्ञान संकुलामधून ₹ १०,२४३ कोटी गुंतवणूक प्रस्तावित असून १३.६६ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे (१७२), मुंबई शहर व मुंबई उपनगर (१६२), ठाणे (१४०), नागपूर (५), नाशिक (५), औरंगाबाद (३) आणि वर्धा (१) या जिल्ह्यांमध्ये आहेत.

## जैव-तंत्रज्ञान संकुले

८.१० राज्याने २००१ मध्ये जैव-तंत्रज्ञान धोरण जाहीर केले. राज्यात मऔविम परिसरात जालना आणि हिंजवडी (पुणे) येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैव-तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहेत. राज्यात सहा खाजगी तत्वावरील जैव-तंत्रज्ञान संकुले प्रस्तावित असून त्यातील गुंतवणूक सुमारे ₹ ३०५ कोटी आहे. राज्यात सुमारे ₹ ४,३४९ कोटी गुंतवणूक प्रस्तावित असून १.६४ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असलेली दहा जैव-तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत. नोंदणीकृत जैव-तंत्रज्ञान संकुलांची माहिती तक्ता ८.७ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.७ नोंदणीकृत जैव-तंत्रज्ञान संकुले**

(ऑक्टोबर २०१६ पर्यंत)

| जैव-तंत्रज्ञान संकुले | एकूण संकुले | | गुंतवणूक (₹ कोटी) | | रोजगार ('००) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | इरादा पत्र | नोंदणीकृत | इरादा पत्र | नोंदणीकृत | इरादा पत्र | नोंदणीकृत |
| सूक्ष्म, लघु व मध्यम | १५ | ५० | १८० | २६१ | ३३८ | ८७२ |
| मोठे | ७ | १६ | ५३१ | १,१२० | ९३१ | ७१२ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर

८.११ दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर हा नवीन औद्योगिक शहरे 'स्मार्ट शहर' म्हणून विकसित करणे आणि त्यांना पायाभूत सुविधा क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान पुरविणे यासाठीचा देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात राज्यातील शेंद्रा-बिडकीन आणि दिघी बंदर या दोन औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे. याचा एक भाग म्हणून सुनियोजित, हरित आणि स्मार्ट शहर अशा १०,००० एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचे (ऑरिक) विकास केला जात आहे.

## सहकारी औद्योगिक वसाहती

८.१२ मऔविम क्षेत्राव्यतिरिक्त सहकारी तत्वावर औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा कार्यक्रम राज्याने हाती घेतला आहे. उद्योग स्थापित करण्यासाठी भाग भांडवलातील हिस्सा व तांत्रिक सल्ला राज्य शासनाकडून देण्यात येतो. सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी राज्य शासनाकडून एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के भांडवल, बँक/वित्तीय संस्थांकडून ६० टक्के कर्ज उभारणी आणि उर्वरित २० टक्के रक्कम उद्योग स्थापन करणाऱ्या सभासदांचे भाग भांडवल असे आहे. सप्टेंबर २०१६ अखेर एकूण १४२ सहकारी औद्योगिक वसाहती नोंदणीकृत असून त्यापैकी १०७ वसाहती कार्यरत आहेत तर २९ वसाहती अद्याप कार्यान्वित होणे बाकी आहे आणि उर्वरीत सहा अवसायनात गेल्या आहेत. एकूण १०७ सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये ८,०३७ घटक कार्यरत असून त्यामधील रोजगार सुमारे १.७९ लाख आहे. शासनाने ९३ सहकारी वसाहतींना अर्थसहाय्य पुरविले आहे. सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती तक्ता ८.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.८ सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती**

( सप्टेंबर २०१६ पर्यंत)

| विभाग | सहकारी | | कार्यरत उद्योग घटक | भाग भांडवल (₹ कोटी) | रोजगार |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणीकृत | कार्यरत | | | |
| बृहन्मुंबई | ४ | ३ | ४७५ | - | १९,४०० |
| कोकण (बृहन्मुंबई वगळून) | १४ | ९ | ६०२ | १.०१ | ९,८८८ |
| नाशिक | ३३ | ३३ | २,१०९ | ४.९२ | ५०,१०९ |
| पुणे | ४५ | ३८ | ३,६६७ | ७.८७ | ८७,३२८ |
| औरंगाबाद | १८ | ६ | ३१७ | १.०३ | ८२८ |
| नांदेड | ८ | ८ | ३१४ | | ७,२१८ |
| अमरावती | १० | ४ | ११२ | ०.०३ | ७०२ |
| नागपूर | १० | ६ | ४४१ | ०.९७ | ४,००१ |
| **महाराष्ट्र** | **१४२** | **१०७** | **८,०३७** | **१५.८३** | **१,७९,४७४** |

*आधार* :उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सामुहिक प्रोत्साहन योजना

८.१३ औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात उद्योगांच्या प्रसारास उत्तेजन देऊन या भागात नवीन / विस्तारीत उद्योग घटक स्थापन करण्यासाठी राज्य शासन सामुहिक प्रोत्साहन योजना राबवित आहे. सदर योजनेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली असून राज्याने 'सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३' जाहीर केली आहे व ती एप्रिल २०१३ ते मार्च २०१८ पर्यंत अंमलात राहील. राज्यातील पात्र असलेले खाजगी, सार्वजनिक / संयुक्त, सहकारी क्षेत्रातील आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील फक्त विशाल उद्योग घटक 'सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३' अंतर्गत विचारात घेतले जातात. या योजनेअंतर्गत २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १,९३३ कोटी प्रोत्साहन रक्कम पात्र असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, मोठे उद्योग आणि विशाल प्रकल्पांना वितरीत करण्यात आली.

८.१३.१ सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत विशाल, मोठ्या आणि सूक्ष्म, लघु व मध्यम प्रकल्पांना वितरीत केलेले औद्योगिक प्रोत्साहन अनुदान व इतर प्रोत्साहने तक्ता ८.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.९ सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान व इतर प्रोत्साहने**

(₹ कोटी)

| बाब | वितरण | | |
|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
| **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान** | | | |
| विशाल प्रकल्प | २,१५९ | २,४५७ | १,५८० |
| मोठे उद्योग | ११३ | ९८ | ५७ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ९९ | १४८ | १४८ |
| **इतर प्रोत्साहने** | | | |
| मोठे उद्योग | ६३ | ५१ | ४७ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ६५ | ८१ | १०१ |
| **एकूण** | **२,५००** | **२,८३५** | **१,९३३** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## औद्योगिक समूह विकास कार्यक्रम

८.१४ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांची उत्पादकता व स्पर्धा क्षमता उंचावण्यासाठी सक्षम समूहांच्या विकासासाठी केंद्र शासनाने योजना जाहीर केली असून त्यामध्ये उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करुन मध्यम ते दीर्घ कालावधीत प्रभावी अंमलबजावणी व शाश्वत परिणाम साधण्यावर भर दिला आहे.

८.१४.१ **सूक्ष्म, लघु उपक्रम - औद्योगिक समूह विकास कार्यक्रम :** या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने १६ समूह प्रकल्पांना मंजुरी दिली असून पाच प्रकल्पांना तत्वत: मंजुरी दिली आहे. आतापर्यंत केंद्र शासनाने एकूण ₹ ९५ कोटी निधी वितरीत केला आहे.

८.१४.२ **सुधारित औद्योगिक पायाभूत सुविधा श्रेणीवाढ योजना :** दर्जेदार पायाभूत सुविधा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वाद्वारे पुरवून निवडलेल्या कार्यरत उद्योग समुहांची स्पर्धात्मक क्षमता वृद्धिंगत करण्याचे योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक मंजूर प्रकल्पासाठी प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के प्रमाणे जास्तीत जास्त ₹ ५० कोटी पर्यंत केंद्रीय सहाय्य देण्यात येते. केंद्र शासनाने पाच समूह प्रकल्प मंजूर केले असून त्यापैकी तीन प्रकल्प पूर्ण तर दोन अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर आहेत. केंद्र शासनाने या योजनेखाली डिसेंबर २०१६ पर्यंत ₹ १९७ कोटी निधी वितरीत केला आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

८.१५ ३१ मार्च २०१६ रोजी विकसित भूखंडांच्या ९४ टक्के भूखंड उद्योजकांना वितरीत करण्यात आले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती तक्ता ८.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१० महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक**

(३१ मार्च २०१६ रोजी)

| विभाग | घटक (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) | भूखंडांची संख्या | | वितरीत भूखंडांची विकसित भूखंडांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विकसित | वितरीत | |
| मुंबई | १,०१२ | १०,१३५ | १.३२ | ७,५३५ | ७,४४२ | ९८.८ |
| कोकण (मुंबई वगळून) | १२,३०६ | ४०.८४२ | ४.०१ | ५,४१३ | ५,२७९ | ९७.५ |
| नाशिक | ७,६८६ | ६,०६५ | ०.८० | ९,४९३ | ८,७५६ | ९२.२ |
| पुणे | ११,७८० | ६१,५२१ | ४.६० | ११,६०७ | १०,९६५ | ९४.५ |
| औरंगाबाद | ७,४९९ | ८,१२६ | ०.७१ | ८,०२९ | ७,३९९ | ९२.२ |
| अमरावती | २,०६७ | ७,१८२ | ०.२७ | ४,२३४ | ३,४७२ | ८२.० |
| नागपूर | ३,७०१ | १५,६३१ | ०.८२ | ५,४५५ | ५,१०० | ९३.५ |
| **एकूण** | **४६,०५१** | **१,४९,५०३** | **१२.५३** | **५१,७६६** | **४८,४१३** | **९३.५** |

आधार : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

८.१६ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगांचा विकास करण्यासाठी उद्योजकांना मदत करते. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल तक्ता ८.११ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.११ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|
| पणन सहाय्य | ७२.८४ | ५८.८० | १०.५१ |
| इतर | ३.१० | २.७० | ४.६६ |
| **एकूण** | **७५.९४** | **६१.५०** | **१५.१७** |

*आधार* : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ + नोव्हेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

८.१७ राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तार करणे हे महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना २०१४-१५ मध्ये ₹ २८.४३ कोटी वित्तीय सहाय्य अनुदानाच्या स्वरुपात देण्यात आले आणि २०१५-१६ मध्ये ₹ २९.०२ कोटी वितरित करणे प्रस्तावित आहे. खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती तक्ता ८.१२ मध्ये दिली आहे.

८.१७.१ कारागीर रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१४-१५ मध्ये २.३२ लाख कारागीरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. सन २०१५-१६ मध्ये २.४५ लाख कारागीरांना रोजगाराच्या संधी अपेक्षित होत्या.

**तक्ता ८.१२ खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती**

| वर्ष | सहाय्यित घटक (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २०११-१२ | २.१५ | १,५०६ | ४.३ |
| २०१२-१३ | १.९१ | १,३७६ | ३.७ |
| २०१३-१४ | १.९३ | १,४९५ | ३.४ |
| २०१४-१५ | १.६० | ३,१६१ | १.३ |
| २०१५-१६ | १.६३ | ३,२२४ | १.३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

## खनिजे

८.१८ राज्यातील खनिज साठा क्षेत्र विदर्भातील अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर व यवतमाळ, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्ह्यांमध्ये विखुरलेले असून तेथे कोळसा, चुनखडी, कच्चे मँगनिज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, डोलोमाईट, लॅटराईट, कायनाईट, फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट, सिलीका वाळू, क्वार्टझ्, इत्यादी खनिजांचे साठे आढळून येतात. राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे सुमारे ५८ हजार चौ. किमी क्षेत्र असून ते राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १९ टक्के आहे. मार्च २०१६ अखेर राज्यात ५१,७९३ रोजगार असलेल्या प्रमुख खनिजांच्या २८९ खाणी कार्यरत आहेत. राज्यातील २०१५-१६ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ ७,७१२ कोटी होते, यापैकी उत्खनन केलेल्या कोळशाचे मूल्य ₹ ६,८६० कोटी (८९.० टक्के) होते. सन २०१६-१७ मध्ये (सप्टेंबर २०१६ पर्यंत) उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ २,२२९ कोटी होते. राज्यातील महत्वाच्या खनिजांचे उत्पादन व मूल्य परिशिष्ट ८.४ मध्ये दिले आहे.

## वस्त्रोद्योग

८.१९ वस्त्रोद्योगामध्ये रोजगारनिर्मितीची मोठी क्षमता आहे. राज्यातील वस्त्रोद्योगाचा विस्तार करणे, रोजगारामध्ये वाढ करणे आणि कापूस उत्पादक क्षेत्रात प्राथम्याने दिर्घकालीन खात्रीशीर विकासासाठी कापूस उत्पादन ते तयार वस्त्र निर्मिती या विविध स्तरावरील प्रक्रिया घटकांची उभारणी यासाठी महाराष्ट्र शासनाने वस्त्रोद्योग धोरण-२०१२ तयार केले आहे. या धोरणाचे उद्दिष्ट ₹ ४०,००० कोटी गुंतवणूक आकर्षित करणे आणि ११.० लाख रोजगार निर्मिती करणे हे आहे. या धोरणांतर्गत अद्यापपर्यंत बँकांनी ₹ १६,३७१.३० कोटी प्रस्तावित गुंतवणूक व २.४६ लाख अपेक्षित रोजगार असलेल्या २,४९७ वस्त्रोद्योग प्रकल्पांना मंजूरी दिली आहे. सद्यस्थितीत राज्यात १०.०१ लाख यंत्रमाग कार्यरत असून त्यामधील अंदाजित रोजगार १९.० लाख आहे. राज्यात सुमारे ०.२३ लाख रोजगार निर्मितीसह १६ वस्त्रोद्योग संकुले कार्यरत आहेत.

## सहावी आर्थिक गणना

८.२० आर्थिक गणना ही देशाच्या भौगोलिक सीमांतर्गत असलेल्या आर्थिक कार्यात गुंतलेल्या सर्व आस्थापनांची (फक्त स्वत:च्या उपभोगासाठी केलेले उत्पादन आणि/किंवा वितरण व सेवा वगळून) संपूर्ण मोजणी होय. राज्यात ऑक्टोबर २०१३ ते एप्रिल २०१४ या कालावधीत सहावी आर्थिक गणना घेण्यात आली. त्यातील काही महत्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

- सुमारे ११८.७३ लाख रोजगारासहित एकूण ४५.४६ लाख आस्थापना या बिगर-कृषि क्षेत्रात (लोक प्रशासन, संरक्षण, अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा वगळता) कार्यरत होत्या,
- यापैकी ९.२० लाख आस्थापना या उत्पादन क्षेत्रात (संघटित तसेच असंघटित) कार्यरत होत्या व त्यामध्ये सुमारे २९.१८ लाख व्यक्ती कार्यरत होत्या.

## वार्षिक उद्योग पाहणी

८.२१ वार्षिक उद्योग पाहणी (वाउपा) ही औद्येगिक सांख्यिकीचा प्रमुख स्त्रोत असून सदर पाहणीवरुन संघटित वस्तूनिर्माण क्षेत्रातील स्थिर व खेळते भांडवल, निविष्टी, उत्पादन, मूल्यवृद्धी, रोजगार इत्यादी बाबतचे अंदाज उपलब्ध होतात. वार्षिक उद्योग पाहणीत कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग-२ एम् (एक) आणि २ एम् (दोन) खाली नोंद झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ खाली नोंद झालेल्या विडी व सिगारेट आस्थापनांचा समावेश आहे.

८.२१.१ वार्षिक उद्योग पाहणी २०१४-१५ च्या अस्थायी निष्कर्षावरुन निदर्शनास येते की देशाच्या स्थूल मूल्यवृद्धी व कामगार वेतन यामध्ये राज्य अग्रस्थानी असून राज्याचा वाटा २०.५ टक्के व १५.७ टक्के आहे. एकूण उद्योग, एकूण कामगार व स्थिर भांडवल या बाबतीत राज्य दुसऱ्या क्रमांकावर असून या बाबतीत राज्याचा वाटा अनुक्रमे १२.४ टक्के, १२.१ टक्के व १३.६ टक्के आहे.

८.२१.२ देशातील एकूण उत्पादन मूल्य, खेळते भांडवल व निव्वळ मूल्यवृद्धी मध्ये राज्याचा वाटा अनुक्रमे १६.३ टक्के, १७.२ टक्के व २१.४ टक्के होता. उद्योगांचे निवडक निर्देशक तक्ता ८.१३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.१३ उद्योगांचे निवडक निर्देशक**

(₹ कोटी)

| तपशील | २०१२-१३ | | २०१३-१४ | | २०१४-१५* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| उद्योग (संख्या) | २८,९४९<br>(१३.०) | २,२२,१२० | २९,१२३<br>(१३.०) | २,२४,५७६ | २८,६०१<br>(१२.४) | २,३०,४३५ |
| स्थिर भांडवल | ३,४४,९३०<br>(१५.८) | २१,८०,२६० | ३,२६,३६२<br>(१३.७) | २३,७३,७१९ | ३,३७,१४४<br>(१३.६) | २४,७४,४५५ |
| खेळते भांडवल | १,०१,६९२<br>(१६.९) | ६,०३,४११ | १,२०,४१८<br>(१८.२) | ६,६२,६८६ | १,०९,९७१<br>(१७.२) | ६,४०,८४० |
| एकूण उत्पादन | १०,२२,०३२<br>(१७.०) | ६०,२५,९४५ | १०,६५,९७१<br>(१६.३) | ६५,५५,२५१ | ११,१९,६१८<br>(१६.३) | ६८,८६,३३५ |
| एकूण निविष्टी | ८,१९,४५४<br>(१६.३) | ५०,१८,६६६ | ८,३७,३९६<br>(१५.३) | ५४,९०,१४० | ८,८०,५४२<br>(१५.४) | ५७,२२,२५५ |
| स्थूल मूल्यवृद्धी | २,०२,५७८<br>(२०.१) | १०,०७,२७९ | २,२८,५७५<br>(२१.५) | १०,६५,११२ | २,३९,०७६<br>(२०.५) | ११,६४,०७९ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १,७८,७२९<br>(२१.०) | ८,५१,९४९ | २,००,५१६<br>(२२.४) | ८,९५,३४२ | २,०८,८३१<br>(२१.४) | ९,७४,५३९ |
| रोजगार (लाख) | १२.३३<br>(१२.३) | १००.५२ | १८.८६<br>(१३.९) | १३५.३८ | १८.८४<br>(१३.६) | १३८.८१ |
| नफा | १,०१,६४०<br>(२२.९) | ४,४४,२६२ | १,१९,६१३<br>(२७.२) | ४,३९,५६६ | १,१७,३५७<br>(२५.५) | ४,५९,६६० |

*आधार :* केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार    कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात    * अस्थायी

**आलेख ८.१ : निवडक राज्यांचा देशाच्या स्थूल मूल्यवृद्धीतील हिस्सा (२०१४-१५*)**




**आलेख ८.२ : महाराष्ट्रामधील स्थिर व खेळते भांडवल, स्थूल मूल्यवृद्धी**



८.२१.३ एकूण उत्पादन मूल्याच्या बाबतीत २०१४-१५ मध्ये खाद्य उत्पादने व पेये (१४.० टक्के),कोळसा, शुद्ध पेट्रोलियम यांची उत्पादने (१३.० टक्के), रसायने आणि रासायनिक उत्पादने (१२.६ टक्के), मूलभूत धातू (१०.२ टक्के) आणि मोटार वाहने, ट्रेलर्स (८.९ टक्के) हे प्रमुख उद्योग होते. या उद्योग गटांचे २०१४-१५ मध्ये एकूण उत्पादन मूल्यामधील प्रमाण ५८.७ टक्के होते, तर स्थिर भांडवलातील प्रमाण ५०.३ टक्के होते. वार्षिक उद्योग पाहणीनुसार राज्यातील उद्योगांबाबतची महत्वाची वैशिष्ट्ये परिशिष्ट ८.१ मध्ये दिली आहेत.

८.२१.४ राज्यातील २०१४-१५ मधील प्रति कारखाना 'उत्पादित वस्तू व सेवा' यांचे मूल्य आणि 'निव्वळ मूल्यवृद्धी' यांचे मूल्य मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ७.० व ६.१ टक्क्यांनी जास्त आहे. वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित महत्वाचे निर्देशक तक्ता ८.१४ मध्ये दिले आहेत.

**आलेख ८.३ : स्थूल मूल्यवृद्धी (२०१४-१५*)**




**तक्ता ८.१४ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित महत्त्वाचे निर्देशक**

(₹ लाख)

| निर्देशक | २०१२-१३ | | २०१३-१४ | | २०१४-१५* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| **अ) प्रति कारखाना** | | | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | १,१९२ | ९८२ | १,१२१ | १,०५७ | १,१७९ | १,०७४ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | ३,५३० | २,७१३ | ३,६६० | २,९१९ | ३,९१५ | २,९८८ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | ६१७ | ३८४ | ६८९ | ३९९ | ७३० | ४२३ |
| रोजगार (संख्या) | ४३ | ४५ | ४६ | ४७ | ४६ | ४७ |
| **ब) प्रति कामगार** | | | | | | |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १४.५ | ८.५ | १५.१ | ८.६ | १६.० | ९.१ |
| वार्षिक वेतन | १.४ | १.१ | १.५ | १.२ | १.७ | १.३ |

*आधार*: केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी

## अखिल भारताचे औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.२२ अखिल भारताचे औद्योगिक उत्पादन निर्देशांक उत्पादन स्तरातील बदलांचे मोजमाप करतो आणि त्यामुळे किंमतीत होणाऱ्या प्रभावापासून मुक्त आहे. हा कमी कालावधीचा निर्देशक शासनाला धोरण निश्चितीसाठी तसेच विविध संघटनांना देखील उपयुक्त आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) परिगणित करुन जाहीर करते. अखिल भारतीय स्तरावरील औद्योगिक उत्पादन निर्देशांक एप्रिल-डिसेंबर २०१५ मधील १७८.२ वरुन एप्रिल-डिसेंबर २०१६ मध्ये १७८.७ पर्यंत वाढला. अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांकांची मालिका परिशिष्ट ८.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ८.४ : अखिल भारताचे क्षेत्रनिहाय मासिक औद्योगिक उत्पादनाचे निर्देशांक**



## पर्यटन

८.२३ राज्याला अव्वल दर्जाचे पर्यटन स्थळ बनविणे, राज्यात पर्यटन पायाभूत सुविधांची उभारणी करणे आणि पर्यटन क्षेत्रातील गुंतवणुकीचे सुलभीकरण करणे यासाठी महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र पर्यटन धोरण- २०१६' तयार केले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ पर्यटन धोरण राबविणारी राज्यातील नोडल संस्था आहे.

८.२३.१ धोरणाची उद्दिष्टे :

- खाजगी गुंतवणुकीच्या/सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या सहाय्याने पर्यटन क्षेत्रातील प्रकल्पांना चालना देणे
- पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक करण्याकरिता जागतिक गुंतवणुकदारांना आकर्षित करणे
- राज्यात पर्यटनविषयक पायाभूत सुविधा विकसित करणे
- विपणन व जाहिरातीसाठी नावीन्यपूर्ण पद्धती अवलंबिणे
- पर्यटन स्थळे व संधींचा विकास करणे
- शाश्वत पर्यटन विकासासाठी दृष्टिकोन निश्चित करणे

८.२३.२ धोरणाची लक्ष्ये :

- सन २०२५ पर्यंत राज्याला जागतिक स्तरावर अग्रगण्य पर्यटन स्थळ बनविणे
- ₹ ३०,००० कोटी गुंतवणूक आकर्षित करणे
- पर्यटन क्षेत्रात दहा लाख अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे
- पर्यटन प्रकल्पांची संख्या पाच वर्षात दुप्पट व १० वर्षात तिप्पट करणे
- पर्यटकांची संख्या पाच वर्षात दुप्पट व १० वर्षात तिप्पट करणे
- पर्यटन क्षेत्रात दहा लाख कुशल व अकुशल मनुष्यबळ उपलब्ध करणे

८.२४ पर्यटकांना स्वच्छ व स्वस्त निवासव्यवस्था आणि भोजनव्यवस्था पुरविण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने 'निवास व न्याहरी' योजना सुरू केली आहे. सद्यस्थितीत राज्यात या योजनेखाली १,३२८ सेवापुरवठाधारक नोंदणीकृत आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत २१ पर्यटक निवास चालविण्यात येत आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ पुणे महोत्सव, वेरुळ महोत्सव, एलिफंटा महोत्सव, इत्यादि महोत्सवांचे आयोजन करते. सन २०१५-१६ मध्ये राज्याला भेट देणाऱ्या एकूण पर्यटकांची संख्या १७ कोटी होती त्यापैकी देशी पर्यटकांची संख्या १६.६ कोटी व विदेशी पर्यटकांची संख्या ०.४ कोटी होती.

८.२४.१ पर्यटन क्षेत्रातील बदल लक्षात घेता विविध प्रायोगिक उपक्रम उदा. कृषी पर्यटन, गाव पर्यटन, अन्न पर्यटन, सफारी, आदिवासी जीवनशैली इत्यादी एका छत्राखाली आणण्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने 'महाभ्रमण' ही योजना राबविली आहे. या योजनेअंतर्गत सध्या ६५ प्रकल्प कार्यरत आहेत.

८.२४.२ सन २०१५-१६ मध्ये 'स्वदेश दर्शन' योजनेअंतर्गत केंद्र शासनाने एका प्रकल्पासाठी ₹ ८२.१७ कोटी निधी मंजूर केला असून ₹ २८.८७ कोटी खर्च झाला आहे.

## सहकार

८.२५ महाराष्ट्र राज्य हे सहकारी चळवळीला चालना देणारे देशातील अग्रेसर राज्य आहे. राज्यामध्ये विशेषतः ग्रामीण भागात, सहकारी चळवळीने सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी एक महत्वाची आणि ठोस भूमिका बजावली आहे. सुरुवातीला कृषि पतपुरवठा क्षेत्रात सुरु झालेली ही चळवळ पाठोपाठ कृषि प्रक्रिया, पणन, पतपुरवठा संस्था, गृहनिर्माण, दुग्ध व वस्त्रोद्योग इ. अशा इतर क्षेत्रांमध्ये पसरली.

८.२६ राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी सुमारे १.९७ लाख सहकारी संस्था कार्यरत होत्या व त्यामध्ये सुमारे ४९९ लाख सभासद होते. कोकण विभागात सर्वात जास्त (४३ टक्के) सहकारी संस्था असून त्याखालोखाल पुणे विभागात २८ टक्के सहकारी संस्था आहेत, तर अमरावती विभागात सर्वात कमी (चार टक्के) सहकारी संस्था आहेत. दृष्टीक्षेपात सहकारी संस्था तक्ता ८.१५ मध्ये दिल्या आहेत व महाराष्ट्रातील सहकारी संस्थाची माहिती परिशिष्ट ८.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१५ दृष्टीक्षेपात सहकारी संस्था**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१५ च्या तुलनेत २०१६ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१६* | |
| संस्था (संख्या) | २,३०,२९५ | २,२५,७२१ | १,९६,९०७ | (-)१२.८ |
| सभासद (लाख) | ५२३.९९ | ५३५ | ४९९ | (-)६.७ |
| भरणा भाग भांडवल | १८,८९२ | २०,७२१ | १९,५५५ | (-)५.६ |
| *यापैकी,* राज्य शासनाचे | ५,८०८ | ३,६३५ | ३,५३० | (-)२.९ |
| खेळते भांडवल | ३,१४,९२२ | ३,४३,६९१ | ३,६०,५४५ | ४.९ |
| ठेवी | १,५९,३२२ | १,६७,११४ | १,७५,६१४ | ५.१ |
| स्थूल कर्ज | १,३१,२४२ | १,३९,३६० | १,३९,५८० | ०.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५९,३५५ | ५३,९८२ | ३९,९९२ | (-)२५.९ |
| तोट्याची रक्कम | ५,६७७ | ९,२९४ | ८,४९८ | (-) ८.६ |
| येणे कर्ज | १,३३,०६४ | १,४४,७४८ | १,५१,५३३ | ४.७ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**आलेख ८.५ : सहकारी संस्थांतील खेळते भांडवल व येणे कर्ज**




**आलेख ८.६ : विभागनिहाय सहकारी संस्था**




**३१ मार्च २०१६ रोजी**

**आलेख ८.७ : गटनिहाय सहकारी संस्थांची रचना व त्यांचे खेळते भांडवल**




## सहकारी संस्थांद्वारे कृषि पतपुरवठा

८.२७ राज्यातील कृषि पतपुरवठा सहकारी बँकांची संरचना त्रिस्तरीय असून, कृषि व संलग्न कार्यांना पतपुरवठा व चालना देण्यात त्या प्रमुख भूमिका बजावतात. कृषि सहकारी बँकांची माहिती तक्ता ८.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१६ कृषि सहकारी बँकांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१५ च्या तुलनेत २०१६ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१६* | |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित** | | | | |
| सभासद ( संख्या) | २,१२२ | २,११५ | २,००० | (-)५.४ |
| खेळते भांडवल | २३,६५७ | २०,९४७ | २३,३०० | ११.२ |
| ठेवी | १३,४७५ | ९,९९३ | १२,२६८ | २२.८ |
| स्थूल कर्ज | १६,०६० | ११,७४३ | १५,०८६ | २८.५ |
| येणे कर्ज | १०,७३१ | १२,००७ | १४,४२४ | २०.१ |
| थकीत कर्ज | १,४३६ | १,२५९ | १,२३५ | (-)१.९ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | | |
| सभासद (लाखात) | १.७३ | १.८२ | १.९६ | ७.७ |
| खेळते भांडवल | ७७,७८२ | ८४,५२८ | ९१,४१५ | ८.१ |
| ठेवी | ५७,३७८ | ६१,५२९ | ६६,३८२ | ७.९ |
| स्थूल कर्ज | ४०,४६३ | ४४,२३१ | ४३,२६६ | (-)२.२ |
| येणे कर्ज | ४०,३५७ | ४८,१४७ | ४७,४५४ | (-)१.४ |
| थकीत कर्ज | ९,९०७ | १०,६७४ | ११,९९९ | १२.४ |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या.@#** | | | | |
| सभासद (संख्या) | ८२७ | ८२७ | ८२७ | ० |
| खेळते भांडवल | २,०९९ | २,११० | २,११० | ० |
| ठेवी | - | - | - | - |
| स्थूल कर्ज | - | - | - | - |
| येणे कर्ज | १,०४३ | १,०६५ | १,०७९ | १.३ |
| थकीत कर्ज | १,०४२ | १,०६५ | ९८४ | (-)७.६ |
| **जिल्हास्तरीय सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका (२९)@#** | | | | |
| सभासद (लाखात) | ११.२३ | ६.८१ | ६.८१ | ० |
| खेळते भांडवल | १,०२३ | १,५१२ | १,०२३ | (-)३२.३ |
| ठेवी | ०.३ | ०.३ | ०.३ | ० |
| स्थूल कर्ज | - | - | - | - |
| येणे कर्ज | २९० | २८६ | २९०.४ | १.५ |
| थकीत कर्ज | २८५ | २८४ | २८५.२ | ०.४ |

# अवसायनाची प्रक्रिया सुरु असल्याने माहिती उपलब्ध नाही. @ अवसायनात गेल्याने कर्ज देणे बंद केले आहे. * अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

८.२८ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था (प्राकृपसं) मुख्यत: शेतीच्या हंगामी कामांकरिता अल्प मुदतीसाठी कृषि पतपुरवठा करतात. यांमध्ये कृषि सेवा संस्था व आदिवासी सहकारी संस्थांचाही समावेश आहे. ३१ मार्च २०१६ रोजी सुमारे ५५.३६ टक्के प्राकृपसं तोट्यात होत्या. गतवर्षीच्या तुलनेत तोट्यातील प्राकृपसंच्या संख्येत ०.७७ टक्क्यांनी घट झाली असून कर्ज घेणाऱ्यांच्या संख्येत एक टक्क्याने वाढ झाली आहे. प्राकृपसंची माहिती तक्ता ८.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१५ च्या तुलनेत २०१६ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१६* | |
| संस्था (संख्या) | २१,१८५ | २१,०६४ | २१,१०२ | ०.२ |
| सभासद (लाख) | १५१ | १५१ | १५१ | ० |
| खेळते भांडवल | २०,३०९ | १९,१४५ | १७,२४९ | (-)९.९ |
| स्वनिधी | ३,४८८ | ३,०५२ | ३,१३४ | २.७ |
| भाग भांडवल | २,४०७ | २,१६४ | २,१७६ | ०.६ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ७ | ६ | ६ | ० |
| कर्जदार सभासद (लाख) | ३७.९५ | ३६.८९ | ३७.२६ | १.० |
| *त्यापैकी,* १) अत्यल्प भूधारक (१ हेक्टर पर्यंत) @ | २८.८ | २६.९ | २८.१ | लागू नाही |
| २) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टर पर्यंत) @ | २३.९ | २३.७ | २३.९ | लागू नाही |
| स्थूल कर्ज | १२,८२६ | १३,७७७ | १३,२९३ | (-)३.५ |
| *त्यापैकी,* अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलेले | ४,८२९ | ५,९६१ | ७,०८९ | १८.९ |
| येणे कर्ज | १३,६०४ | १२,२०९ | १२,७८३ | ४.७ |
| कर्ज वसुली | ९,९३१ | १०,९६१ | १०,४३७ | (-)४.८ |
| थकीत कर्ज | ४,८९३ | ५,१८२ | ५,४३९ | ५.० |
| तोट्यातील संस्था | १२,०३७ | ११,७७३ | ११,६८२ | (-)०.८ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन @ एकूण कर्जदार सभासदांशी टक्केवारी * अस्थायी

**आलेख ८.८ : विभागनिहाय प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था**




**आलेख ८.९ : विभागनिहाय प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचे सभासद व कर्जदार सभासद**




## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

८.२९ अल्प मुदतीच्या पीक कर्जाचा परतावा वेळेवर व्हावा याकरिता शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी व्याजात सवलत दिली जाते. या योजनेअंतर्गत ₹ एक लाखापर्यंतच्या कर्जावर तीन टक्के तसेच ₹ एक लाखापेक्षा अधिक व ₹ तीन लाखांपर्यंतच्या कर्जावर एक टक्का व्याज सवलत दिली जाते. शेतकऱ्यांनी दरवर्षी ३० जून पर्यंत कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत २०१५-१६ मध्ये

३९ लाख लाभार्थ्यांना ₹ ३९६.९० कोटी अनुदान देण्यात आले, तर २०१६-१७ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ४.८५ लाख लाभार्थ्यांना ₹ १७७.८६ कोटी अनुदान देण्यात आले.

## कृषि प्रक्रिया सहकारी संस्था

८.३० कृषि प्रक्रिया सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडतात. राज्य शासन सहकारी संस्थांना कृषि प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य पुरविते. सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था व दुग्ध संघ आणि मत्स्य व्यवसाय संस्था हे कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे प्रमुख घटक आहेत.

**आलेख ८.१० : कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांतील सभासद**




**३१ मार्च २०१६ रोजी**

## सहकारी साखर कारखाने

८.३०.१ देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३४ टक्के कारखाने राज्यात असून त्या खालोखाल २२ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. सन २०१५-१६ मध्ये देशातील एकूण साखरेच्या उत्पादनात राज्याचा हिस्सा ३३.५ टक्के होता, त्या खालोखाल उत्तर प्रदेशाचा हिस्सा २७ टक्के होता. सहकारी साखर कारखान्यांची माहिती तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१८ सहकारी साखर कारखान्यांची माहिती**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१५ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१६* | |
| नोंदणीकृत सहकारी कारखाने (संख्या) | २०२ | २०२ | २०२ | ० |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | ९६ | ९९ | ९९ | ० |
| सभासद ('००) | २६,३४० | २५,१६० | २५,५५० | १.६ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (₹ कोटी) | १,२४४.३० | १,२५३.८३ | १,२८४.०७ | २.४ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (# लाख मे. टन) | ३.२२ | ३.४ | ३.५२ | ३.५ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) @ | ४८६.७२ | ५८९.४७ | ४८३.४९ | (-)१८.० |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) @ | ५६.५२ | ६७.७९ | ५५.८१ | (-)१७.७ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.६१ | ११.५ | ११.५५ | ०.४ |
| ऊसाची सरासरी किंमत (₹ प्रति मे. टन ) | | | | |
| अ) खरेदी (रास्त दराने मोबदला) | २,१०० | २,२०० | २,३०० | ४.५ |
| ब) कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेली | २,४६७ | २,५४० | २,६३७ | ३.८ |
| मळी (लाख मे. टन) | २७.०४ | ३७.२ | २९.७३ | (-)२०.१ |
| कारखान्यांची संख्या | | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ६९ | ६९ | ६९ | ० |
| ब) सह-वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ४६ | ४७ | ५१ | ८.५ |
| सह वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट) | ८२७ | ८४३ | ९९७ | १८.३ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | २९ | ६० | ४७ | (-)२१.७ |

# प्रतिदिन गाळप क्षमता @ ऑक्टोबर ते सप्टेंबरकरिता * अस्थायी

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ

८.३०.२ राज्यात मार्च २०१६ अखेर १४,९२१ सहकारी दुग्ध संस्था व ८५ सहकारी दुग्ध संघ होते. सुमारे ३७.६ टक्के सहकारी दुग्ध संस्था व २९.४ टक्के दुग्ध संघ तोट्यात होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१९ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी दुग्ध संस्था | | | सहकारी दुग्ध संघ | | |
| | २०१५ | २०१६* | शेकडा बदल | २०१५ | २०१६* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | १९,९०१ | १४,९२१ | (-)२५.० | ८८ | ८५ | (-)३.४ |
| सभासद (लाख) | १३.६ | ११.६ | (-)१४.७ | १.१० | १.४३ | ३०.० |
| भाग भांडवल | १६.८१ | १२.८९ | (-)२३.३ | ९४.१० | ८५.९७ | (-)८.६ |
| खेळते भांडवल | ३४.६७ | २८.५५ | (-)१७.७ | ९७.१० | ९२.४० | (-)४.८ |
| दूध खरेदी (किंमत) | ४१५.०९ | २७८.५६ | (-)३२.९ | ७६५.३० | ७०२.३५ | (-)८.२ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (किंमत) | ५५८.०२ | ३७०.५ | (-)३३.६ | १,०१०.२० | ९०६.३३ | (-)१०.३ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ९,३०३ | ५,६१२ | (-)३९.७ | ४५ | २५ | (-)४४.४ |
| तोटा | ४२.८८ | ६८.४ | ५९.५ | ११६.२२ | ५६.८३ | (-)५१.१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.३०.३ राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी ८३ कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्था होत्या. उत्पादन चालू असलेल्या संस्थांपैकी सुमारे ७८.५ टक्के संस्था तोट्यात होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

८.३०.४ राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी २७८ सहकारी सूत गिरण्या होत्या. उत्पादन चालू असलेल्या सूत गिरण्यांपैकी सुमारे ८८.२ टक्के सूत गिरण्या तोट्यात होत्या. सहकारी सूत गिरण्यांची माहिती तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२० कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | |
| संस्था (संख्या) | ११९ | ८३ | (-)३०.३ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | १०२ | ६५ | (-)३६.३ |
| सभासद ('००) | १,३४४ | १,०४८ | (-)२२.० |
| भाग भांडवल | ७ | ५ | (-)२८.६ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १ | १ | ० |
| खेळते भांडवल | ६३ | ४४ | (-)३०.२ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | ९२ | ७५ | (-)१८.५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६८ | ५१ | (-)२५.० |
| तोटा | २ | १ | (-)५०.० |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ८.२१ सहकारी सूत गिरण्यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | |
| गिरण्यांची संख्या | २७५ | २७८ | १.१ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ६६ | ६८ | ३.० |
| सभासद ('००) | ४,३४० | ५,२०० | १९.८ |
| भाग भांडवल | १,८५४ | १,९७० | ६.२ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १,६८३ | १,७२७ | २.६ |
| चात्यांची संख्या (लाख) | १४.६३ | १४.८४ | १.४ |
| उत्पादित सूताचे मूल्य | ३,००४ | २,८५७ | (-)४.९ |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ५५ | ६० | ३.४ |
| तोटा | १,३९८.८१ | १,५९४.५० | १४.० |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

८.३०.५ राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी ६०४ सहकारी हातमाग व १,५७२ यंत्रमाग संस्था होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे आठ व ९०.२ टक्के होता. सुमारे ४५.२ टक्के सहकारी हातमाग व ७४.४ टक्के यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची माहिती तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२२ सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हातमाग | | | यंत्रमाग | | |
| | २०१५ | २०१६* | शेकडा बदल | २०१५ | २०१६* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | ६६५ | ६०४ | (-)९.२ | १,५७२ | १,५७२ | ० |
| सभासद ('००) | ३३९ | ३०८ | (-)९.१ | ८०२ | ८०२ | ० |
| भाग भांडवल | ८० | ८० | ० | ११२.१४ | ११२.१४ | ० |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६.४२ | ६.४२ | ० | १०१.१४ | १०१.१४ | ० |
| मागांची संख्या ('०००) | २४२ | २१९ | (-)९.५ | १८०.१२ | १८०.०३ | नगण्य |
| उत्पादनाचे मूल्य | ७२ | ६५ | (-)९.७ | १७६.५६ | १९२.३४ | ८.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३०१ | २७३ | (-)९.३ | १,१७० | १,१७० | ० |
| तोटा | १२.०९ | १०.९८ | (-)९.२ | ४२.३० | ४१.२३ | (-)२.५ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## मत्स्यव्यवसाय

८.३१ राज्यात मार्च २०१६ अखेर ३,४६३ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत होत्या. त्याव्यतिरिक्त ३७ मत्स्यव्यवसाय सहकारी संघ आणि दोन महासंघ या क्षेत्रात कार्यरत होते. गतवर्षीच्या तुलनेत मासे व मत्स्योत्पादनाच्या विक्रीत ३९.५ टक्के वाढ झाली असून तोटा ७.१ टक्क्यांनी कमी झाला आहे. मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | |
| संस्था (संख्या) | ३,४८४ | ३,४६३ | (-)०.६ |
| सभासद (लाख) | ३.४५ | ३.४५ | (-)०.१ |
| भाग भांडवल | ८८.६८ | ८०.६५ | (-)९.१ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६७.७ | ६८.९३ | १.८ |
| खेळते भांडवल | २६८.१५ | २६९.११ | ०.४ |
| मासे व मत्स्य उत्पादन विक्री | ४५३.५६ | ६३२.७५ | ३९.५ |
| तोट्यातील संस्था(संख्या) | १,४२० | १,१७९ | (-)१७.० |
| तोटा | ५२.०३ | ४८.३२ | (-)७.१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी

## सहकारी पणन संस्था

८.३२ सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. मार्च २०१६ अखेर सुमारे ४९.५ टक्के सहकारी पणन संस्था तोट्यात होत्या तर मार्च २०१५ अखेर सुमारे ४७.२ टक्के संस्था तोट्यात होत्या. सहकारी पणन संस्थांची माहिती तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२४ सहकारी पणन संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | |
| संस्था (संख्या) | १,५१८ | १,१८३ | (-)२२.१ |
| सभासद (लाख) | १३.७२ | १३.०५ | (-)४.९ |
| भाग भांडवल | ८६ | ७१ | (-)१७.४ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २५ | २३ | (-)८.० |
| खेळते भांडवल | १,१२६ | १,००१ | (-)११.१ |
| विक्री | | | |
| (अ) शेतमाल | ८४१ | ८९३ | ६.२ |
| (ब) खते | ६६९ | ६८६ | २.५ |
| (क) बियाणे | ७४ | ५५ | (-)२५.७ |
| (ड) ग्राहकोपयोगी वस्तू | २२१ | ३४० | ५३.८ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ७१६ | ५८५ | (-)१८.३ |
| तोटा | २३ | २० | (-)१३.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी

## बिगर कृषि पतसंस्था

८.३३ राज्यात मार्च २०१६ अखेर २०,८०५ बिगर कृषि पतसंस्थांपैकी १३,५८६ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, ६,७११ वेतनधारकांच्या सहकारी संस्था व ५०८ नागरी सहकारी बँका होत्या. सुमारे २१.४ टक्के बिगर कृषि पतपुरवठा संस्था तोट्यात होत्या. एकूण ५०८ नागरी सहकारी बँकांपैकी ११० बँका अवसायनात आहेत. बिगर कृषि पतपुरवठा संस्थांची माहिती तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ बिगर कृषि पतपुरवठा संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | बदल |
| संस्था (संख्या) | २२,३२६ | २०,८०५ | (-)६.८ |
| सभासद (लाख) | २३९.८८ | २२२.०७ | (-)७.४ |
| ठेवी | ९२,८८० | ९५,१११ | २.४ |
| स्वनिधी | २०,९८५ | २१,९२३ | ४.५ |
| भाग भांडवल | ८,११७ | ८,०३६ | (-)१.० |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ०.८ | ०.९ | १२.५ |
| खेळते भांडवल | १,६१,५८० | १,७०,९१७ | ५.८ |
| कर्ज वाटप | ६७,००६ | ६५,३९० | (-)२.४ |
| येणे कर्ज | ६७,०२७ | ७१,२७७ | ६.३ |
| थकित कर्ज | ८,१७७ | ८,३२८ | १.८ |
| कर्ज वसुली | ६२,१४३ | ६०,७५२ | (-)२.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४,६५९ | ४,४४२ | (-)४.७ |
| तोटा | १,३८७ | १,४७१ | ६.१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## इतर सहकारी संस्था

८.३४ राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी ९८,५४१ सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या, त्यातील सभासद संख्या २४.९२ लाख होती. तसेच ११,००६ कंत्राटी मजूर संस्था होत्या त्यातील सभासद संख्या ७.२० लाख होती. एकूण ६३,४५२ सदस्य संख्या असलेल्या २६१ श्रमिक वन संस्था होत्या, त्यापैकी १२६ संस्था (४८.३ टक्के) नफ्यात होत्या.

## महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

८.३५ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित संस्थेची माहिती तक्ता ८.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२६ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित संस्थेची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | बदल |
| सभासद (संख्या) | १०,५१८ | १०,४४१ | (-)०.७ |
| खेळते भांडवल | ९२.७३ | ९०.१७ | (-)२.८ |
| स्थूल कर्ज | ६४४ | ६४४ | ० |
| येणे कर्ज | ५९.४९ | ५५.८४ | (-)६.१ |
| थकीत कर्ज | २१.९ | २४.८९ | १३.७ |
| कर्ज वसुली | ५.५७ | ३.६५ | (-)३४.५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळ मर्यादित * अस्थायी

## सहकारी ग्राहक महासंघ

८.३६ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरीत करतात. राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १२८ घाऊक ग्राहक भांडारे व १,७०२ प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती तक्ता ८.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२७ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्राहक महासंघ | | घाऊक ग्राहक भांडार | | प्राथमिक ग्राहक भांडार | |
| | २०१५ | २०१६* | २०१५ | २०१६* | २०१५ | २०१६* |
| संख्या | १ | १ | १५३ | १२८ | २,३८६ | १,७०२ |
| सभासद ('००) | ६ | ६ | ३,२२६ | २,६९९ | १४,९५५ | १०,९०६ |
| भाग भांडवल | १.६५ | ०.५८ | १३.९ | ९.८९ | ४९.३४ | २४.३ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १.१४ | - | २.८५ | १.८३ | २.१३ | १.२७ |
| तोटा | ०.०९ | ०.२ | ३.१७ | ३.४६ | ७.६ | ४.३३ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | - | - | ११२ | ७१ | १,०४३ | ६९० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## खाजगी सावकार

८.३७ कृषि व बिगर कृषि पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त खाजगी सावकारांना, वैयक्तिक कर्जाचे वाटप करण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. यासाठी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत परवाने दिले जातात. खाजगी सावकारांची माहिती तक्ता ८.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२८ खाजगी सावकारांची माहिती**

(संख्या)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | |
| परवाना धारक | १२,०२२ | १२,२०८ | १.५ |
| नवीन परवाने | १,५८९ | १,९४७ | २२.५ |
| नुतनीकरण केलेले परवाने | ७,८५२ | ७,७२५ | (-)१.६ |
| रद्द केलेले परवाने | ४७७ | ७१९ | ५०.७ |
| कर्जदार सभासद (व्यापारी / बिगर व्यापारी / शेतकरी) | ७,०४,४५२ | १०,५६,२७३ | ४९.९ |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | ८९६.३४ | १,२५४.९७ | ४०.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

* * * * *

## परिशिष्ट ८.१

## महाराष्ट्रातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी
## (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत)

(₹ कोटी)

| कार्य (दोन अंकी) राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) कापूस पिंजणी, सफाई | २०१३-१४ | ५९४ | ८८२ | १,८०५ | ७५ | १५,०७९ | ११,६७६ | १३,९२३ | १,०५९ |
| इत्यादि. (०१) | २०१४-१५* | ६६४ | ८७८ | १,३५८ | ६१ | १६,३०१ | ८,३५८ | ९,८८३ | ६,२९५ |
| (२) मीठ उत्पादन (०८) | २०१३-१४ | ४३ | २ | ७ | ६ | १४ | २ | ५ | ९ |
| | २०१४-१५* | ४४ | १ | ४ | २ | ५ | १ | २ | ३ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०१३-१४ | ३,०३८ | ३२,४४५ | ११,२३५ | २,०४६ | १,३०,५५६ | ८२,१९७ | १,१६,२३७ | ११,९४१ |
| | २०१४-१५* | ३,०१३ | ३५,११६ | ९,५१८ | २,१९८ | १,५६,८९३ | ९७,४२५ | १,३७,२९३ | १६,८५२ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २०१३-१४ | ११० | १,३०१ | १,८४२ | १५६ | ५,०३२ | १,४०८ | २,३४४ | २,५४५ |
| | २०१४-१५* | १०९ | १,३१६ | १,०५१ | २४१ | ६,१९७ | १,८५१ | ३,६७३ | २,३८५ |
| (५) वस्त्रे (१३) | २०१३-१४ | २,०६८ | १२,२१३ | ४,०१७ | १,३३४ | ३७,५०३ | २१,४९५ | ३१,७०७ | ४,५१२ |
| | २०१४-१५* | १,९१३ | १४,५४० | ३,१७८ | १,६५७ | ४१,२२६ | २४,९११ | ३४,१४६ | ५,५९८ |
| (६) वस्त्र प्रावरणे (१४) | २०१३-१४ | १,०४५ | १,७०५ | १,९९६ | ४८० | ११,१७६ | ६,१६६ | ८,८९० | २,१३३ |
| | २०१४-१५* | १,०४१ | २,२७६ | २,०५३ | ३६२ | ९,८७५ | ४,५२७ | ८,१०३ | १,६२५ |
| (७) चामडे व त्यासंबंधित | २०१३-१४ | ११६ | १८२ | ४९० | ३६ | १,७४७ | ७२१ | १,१३८ | ५८५ |
| उत्पादने (१५) | २०१४-१५* | ११९ | १३५ | १६९ | ४९ | ७५९ | ४२३ | ५८२ | १६६ |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने | २०१३-१४ | २५९ | २५३ | २१८ | २९ | ९२७ | ४४५ | ६५८ | २४५ |
| आणि बूच (फर्निचर वगळून) (१६) | २०१४-१५* | २३९ | २८८ | १६७ | ४० | १,५१० | ७९४ | १,२४१ | २२६ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०१३-१४ | १,००० | ८,५२८ | ६९३ | ३३१ | १४,०८१ | ८,५४३ | ११,४६५ | २,१०४ |
| | २०१४-१५* | ८९२ | ८,६६६ | १,७६६ | ३१८ | १४,४१५ | ८,६६३ | ११,१३८ | २,६५० |
| (१०) छपाई व मुद्रित माध्यमांचे | २०१३-१४ | ९८८ | ३,४६५ | (-)११,७७८ | ३६६ | ६,४६७ | ३,६९७ | ५,४९० | ६२४ |
| पुनरुत्पादन (१८) | २०१४-१५* | ९८० | ३,५४६ | ८८३ | ४३३ | १०,७९६ | ४,९२४ | ७,५३५ | २,७५२ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियम | २०१३-१४ | १९७ | २१,३७५ | ४,५४९ | ४५७ | १,६२,३१६ | १,०२,४५६ | १,०७,५५५ | ५३,८४२ |
| यांची उत्पादने (१९) | २०१४-१५* | १८४ | १३,८४२ | (-)२,१२१ | ८९६ | १,४५,८६६ | ९६,१६६ | १,०३,४०१ | ४१,३५४ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने, | २०१३-१४ | २,७५२ | ४५,६८२ | ४३,६१९ | २,४८० | १,४६,०७५ | ७३,८७० | १,०४,७४० | ३६,५९८ |
| औषध, वैद्यकीय रसायने व | २०१४-१५* | २,७०२ | ४२,२५८ | २४,११६ | २,५६४ | १,४०,८५१ | ७३,०५९ | १,०५,१२० | ३१,३७८ |
| जैविक उत्पादने (२०,२१) | | | | | | | | | |
| (१३) रबर आणि प्लास्टिक उत्पादने (२२) | २०१३-१४ | १,९१२ | २१,९२४ | ९,४८८ | १,०६४ | ४८,०९७ | २९,५१७ | ३६,२०० | १०,४९२ |
| | २०१४-१५* | १,७९२ | १५,७४६ | १६,२८७ | १,०५७ | ४७,०३७ | २८,९५३ | ३५,८६३ | ९,५१५ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०१३-१४ | ९९२ | ७,८९६ | १,९८७ | ३६६ | १२,८०१ | ६,०४० | ९,६९३ | २,४६४ |
| | २०१४-१५* | १,०३२ | १७,२६४ | १७,८१५ | ४५४ | २३,६७८ | ८,३२३ | १६,०३२ | ६,४४३ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २०१३-१४ | १,५१७ | ५०,२७० | १३,५३२ | १,४७२ | १,१६,३५६ | ७८,०४७ | १,००,९१५ | १२,२७६ |
| | २०१४-१५* | १,५१४ | ४६,९८६ | ११,८६६ | १,५२५ | १,१३,६६९ | ७६,०९१ | १,०१,५८४ | ९,०९० |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.१ (समाप्त)

| | कार्य (दोन अंकी) राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१६) | धातूच्या वस्तूंची उत्पादने | २०१३-१४ | ३,५८० | ११,४८६ | (-)१,०४१ | १,३९४ | ३८,९६२ | २२,१८८ | २९,४२१ | ८,४१२ |
| | यंत्रे व यंत्रसामग्री वगळून (२५) | २०१४-१५* | ३,४८६ | ११,८७१ | (-)४,३५४ | १,४४० | ४२,९६५ | २४,१७९ | ३२,३४१ | ९,३२७ |
| (१७) | संगणक. विद्युत आणि | २०१३-१४ | ५७० | ५,३११ | १०,२८२ | ५२६ | २०,७९६ | ११,००४ | १६,७०७ | ३,७३३ |
| | ऑप्टीकल उत्पादने (२६) | २०१४-१५* | ४८० | ७,२३३ | १०,७६२ | ४२६ | १७,७६९ | ८,२९९ | १३,८६७ | ३,५४४ |
| (१८) | विद्युत सामग्री (२७) | २०१३-१४ | १,३३४ | ८,९९८ | ६,०३१ | ९४५ | ४१,७८१ | २६,३११ | ३२,७०९ | ८,०१८ |
| | | २०१४-१५* | १,३७४ | ८,५०९ | ५,१२१ | ९०९ | ४०,००४ | २४,८५१ | ३०,८१० | ८,०३३ |
| (१९) | यंत्रे व यंत्रसामग्री (इतरत्र | २०१३-१४ | २,३६० | १९,१५४ | ७,०९४ | २,०२० | ५९,८१५ | ३२,१२० | ४४,९४७ | १३,०२३ |
| | वर्गीकृत नसलेले), दुरुस्ती | २०१४-१५* | २,४१४ | २७,८७२ | १३,०७० | २,४०६ | ७७,०८२ | ३७,८८९ | ५४,५५१ | १९,५१९ |
| | आणि यंत्र व यंत्रसामग्री | | | | | | | | | |
| | उभारणी (२८,३३) | | | | | | | | | |
| (२०) | मोटार वाहने, ट्रेलर्स व | २०१३-१४ | १,४१४ | ३०,१३१ | (-)९,००२ | २,५०३ | ८०,१२८ | ४८,४०६ | ६४,९१० | ९,८९४ |
| | निम ट्रेलर्स (२९) | २०१४-१५* | १,४११ | ३१,५२३ | (-)१६,५५४ | ३,०७६ | १,००,०९० | ५८,९५५ | ८२,१०५ | १३,९८७ |
| (२१) | इतर परिवहन सामग्री (३०) | २०१३-१४ | ३६९ | ७,३४८ | ८०९ | ५३१ | २८,४९७ | १९,६११ | २२,१३३ | ५,८९७ |
| | | २०१४-१५* | ३३९ | ९,३०६ | १४० | ६३४ | ३६,४८७ | २३,१५७ | २७,०९५ | ८,५४४ |
| (२२) | फर्निचर उत्पादने व इतर | २०१३-१४ | १,३२३ | ४,६०८ | २०,०४९ | ८११ | ५०,२४५ | ३८,४७४ | ४५,००८ | ४,८४४ |
| | वस्तुनिर्माण (३१,३२) | २०१४-१५* | १,३५८ | ६,१३६ | १२,८५७ | ७७३ | ३६,११७ | २४,८२८ | ३१,०६० | ४,४७६ |
| (२३) | इतर (टाकाऊ वस्तुंचे संचयन, | २०१३-१४ | १,५४२ | ३१,२०३ | २,४९३ | ८९३ | ३७,५२२ | ६,०९२ | ३०,६०२ | ५,२६७ |
| | प्रक्रिया व विल्हेवाट संबंधी | २०१४-१५* | १,५०१ | ३१,८३६ | ८१८ | ५३४ | ४०,०२८ | ६,९५६ | ३३,११९ | ५,०६८ |
| | कार्य, वस्तुंचा पुनर्वापर, प्रकाशन | | | | | | | | | |
| | कार्य, इतर उद्योग) (३८,५८, इतर) | | | | | | | | | |
| | **एकूण** | **२०१३-१४** | **२९,१२३** | **३,२६,३६२** | **१,२०,४१८** | **२०,३२१** | **१०,६५,९७१** | **६,३०,४८७** | **८,३७,३९६** | **२,००,५१६** |
| | | **२०१४-१५*** | **२८,६०१** | **३,३७,१४४** | **१,०९,९७१** | **२२,०५२** | **११,१९,६१८** | **६,४३,५८९** | **८,८०,५४२** | **२,०८,८३१** |

*आधार* - वार्षिक उद्योग पाहणी, केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार    * अस्थायी

# परिशिष्ट ८.२
## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २००४-०५ = १००)

| अ.क्र. | बाब | भार | २००५-०६ | २०१०-११ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७++* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१०८.६** | **१६५.५** | **१७२.२** | **१७२.०** | **१७६.९** | **१८१.१** | **१७८.७** |
| **II** | **खाणकाम व दगड खाणकाम** | **१४.१६** | **१०२.३** | **१३१.०** | **१२५.५** | **१२४.७** | **१२६.५** | **१२९.३** | **१२६.४** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७५.५३** | **११०.३** | **१७५.७** | **१८३.३** | **१८१.९** | **१८६.१** | **१८९.८** | **१८५.९** |
| | **उद्योग गट** | | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने व पेय | ७.२८ | ११३.२ | १४२.९ | १६९.५ | १६७.७ | १७५.७ | १६४.९ | १४३.९ |
| २ | तंबाखू उत्पादने | १.५७ | १०१.० | १०४.१ | १०९.२ | ११०.२ | १११.२ | १११.० | १०४.९ |
| ३ | कापड उत्पादने | ६.१६ | १०८.३ | १३५.९ | १४२.० | १४८.३ | १५२.४ | १५६.४ | १५७.१ |
| ४ | परिधान करावयाची वस्त्रे व रंगाई करणे | २.७८ | ११४.१ | १४२.२ | १४३.६ | १७१.६ | १८०.४ | १९२.३ | १७७.५ |
| ५ | प्रवास सामान, पिशव्या, पादत्राणे, चामडे कमावणे, साफ करणे आणि चामड्याचे उत्पादन | ०.५८ | ९०.९ | ११४.३ | १२७.१ | १३३.७ | १४७.५ | १४५.५ | १३४.९ |
| ६ | लाकुड व लाकडाची उत्पादने आणि बूच (फर्निचर वळून), काड्यापासून बनविलेल्या व मुलामा दिलेल्या वस्तु | १.०५ | १०६.८ | १५६.५ | १४७.९ | १४४.६ | १५०.९ | १५५.७ | १४९.५ |
| ७ | कागद आणि कागदाची उत्पादने | १.०० | १०६.३ | १३१.४ | १३८.७ | १३८.६ | १४३.१ | १४७.१ | १४७.३ |
| ८ | प्रकाशने, छपाई आणि प्रसार माध्यमे यांची प्रतिलिपी नोंद ठेवणे | १.०८ | ११३.७ | १४८.८ | १८३.० | १८३.४ | १७५.९ | १६०.१ | १५८.३ |
| ९ | कोक, रिफाईन्ड पेट्रोलियम उत्पादने आणि आण्विक इंधन | ६.७२ | १००.६ | १२१.५ | १३६.४ | १४३.५ | १४४.७ | १५३.४ | १६१.२ |
| १० | रसायने व रासायनिक उत्पादने | १०.०६ | १०१.० | १२३.१ | १२७.३ | १३८.६ | १३८.२ | १४३.५ | १४६.४ |
| ११ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.०३ | ११२.३ | १८५.२ | १८५.० | १८१.१ | १८९.३ | १९०.४ | १९१.६ |
| १२ | अधातू खनिज उत्पादने | ४.३१ | १०७.८ | १५१.४ | १६१.६ | १६३.३ | १६७.४ | १७०.१ | १६६.९ |
| १३ | मूलभूत धातू | ११.३४ | ११५.५ | १७६.७ | १९५.८ | १९६.४ | २२१.४ | २२३.६ | २३७.५ |
| १४ | फेब्रीकेटेड धातू उत्पादने (यंत्र व सामग्री सोडून) | ३.०९ | १११.१ | १८२.८ | १९३.८ | १८०.२ | १७९.१ | १८१.९ | १७७.६ |
| १५ | यंत्रे व यंत्रसामग्री इतरत्र वर्गीकृत नसलेले | ३.७६ | १२६.१ | २५६.३ | २३०.० | २१९.२ | २२७.९ | २३३.८ | २३२.९ |
| १६ | कार्यालयीन लेखा आणि संगणक सामग्री | ०.३१ | १४५.३ | १४६.३ | १२८.१ | १०८.० | ६७.० | ६७.६ | ५९.६ |
| १७ | विद्युत सामग्री आणि उपकरणे | १.९८ | ११६.८ | ४७२.१ | ३६९.२ | ४२२.६ | ५११.६ | ४५३.२ | २८१.० |
| १८ | रेडीओ, टि.व्ही. आणि दळण- वळणाची साधने आणि उपकरणे | ०.९९ | १२२.७ | ९११.५ | १,००३.७ | ७३०.१ | ३३२.७ | ३४४.९ | ३९३.१ |
| १९ | औषधे, चष्म्याची उपकरणे, भितींवरील घडयाळे व मनगटी घडयाळे | ०.५७ | ९५.४ | १०७.८ | ११७.१ | १११.१ | १०८.६ | १०६.२ | ९७.३ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स, सेमी ट्रेलर्स | ४.०६ | ११०.१ | २३३.३ | २४४.८ | २२१.३ | २२६.८ | २४३.८ | २५०.२ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.८३ | ११५.३ | २१०.७ | २३५.७ | २४९.५ | २६५.५ | २६९.० | २७६.७ |
| २२ | फर्निचर, इतरत्र वर्गीकृत नसलेले वस्तुनिर्माण | ३.०० | ११६.२ | १४१.२ | १३१.५ | ११३.३ | १२१.७ | १७५.७ | १६३.८ |
| **IV** | **विद्युत** | **१०.३१** | **१०५.२** | **१३८.०** | **१५५.२** | **१६४.७** | **१७८.६** | **१८८.७** | **१९८.२** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी ++ डिसेंबर पर्यंत

## परिशिष्ट ८.३

## महाराष्ट्रातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य

(₹ कोटी)

| अ. क्र. | वित्तीय संस्था | १९९०-९१ | | २०००-०१ | | २०१०-११ | | २०१५-१६* | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ मर्यादित | ४०७.७७ | २५१.९३ | २७५.६० | २८८.४९ | ३,६१०.०० | २,९३७.०१ | उ.ना. | उ.ना. |
| २ | भारतीय लघु उद्योग विकास बँक | ३०६.७३ | २२७.२४ | २,०८१.८७ | १,३२०.७९ | ४४,२१४ | ३८,७९६ | ६१,४८३ | ५९,४६७ |
| ३ | भारतीय उद्योग गुंतवणूक बँक मर्या. | ३३.५४ | २५.५४ | ५७६.५९ | ५६०.२७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ४ | भारतीय आयात - निर्यात बँक | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ८,३६२.०० | ७,२३५.०० | २,०१२.२४ | २,५१५.५५ |
| ५ | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २५४.५५ | ११०.५८ | ५,१५०.६५ | ३,९१९.१२ | २०,७४६.९४ | १९,३४५.२७ | उ.ना. | उ.ना. |
| ६ | भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ $ | १०८.३४ | ५२.२५ | ६१.४१ | ८८.६० | ६२७.४० | ६२७.४० | उ.ना. | उ.ना. |
| ७ | महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ | १५७.९७ | ९४.६१ | ६८.६३ | ४७.१२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ८ | सिकॉम मर्यादित | ८५.४० | ६८.८७ | ५९३.०० | ४६३.०० | ४,९४७.०० | ५,३४०.०० | २,७२३.०० | १,७७१.०० |
| ९ | इतर # | ३,३९१.३८ | १,९६१.०३ | ६१,२२०.०९ | ३५,८८६.७५ | -- | -- | -- | -- |

*आधार* - ह्या तक्त्यात उल्लेखिलेल्या वित्तीय संस्था    * अस्थायी    उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) # आयसीआयसीआय, भारतीय औद्योगिक विकास बँक व युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या वित्तीय संस्थांनी केलेल्या अर्थसहाय्याचा यात समावेश आहे. या संस्थांनी उद्योगांना अर्थसहाय्य देणे बंद केले आहे.

(२) $ यामध्ये वित्तीय संस्थांची रोखे हमी व शासकीय रोखे हमीचा अंतर्भाव आहे.

# परिशिष्ट ८.४

## महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन: '००० टनात)
(मूल्य: ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन/ मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१५-१६* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | १५५ |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ३८,१८६ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | ६,८६,०७५ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | -- | ०.६ | -- | ०.०९ |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | -- | ८ | -- | २.४७ |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | १,५१६ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | २०,७३० |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | १३,२४० |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | २४,३५३ |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | ६५६ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | ३१,३३३ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२ | -- | -- |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | -- | -- |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | २,२४९ |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | ५,८१५ |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | २१२ |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | ६४३ |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | ३७६ |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | १,०६४ |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | -- | -- | -- | ३ | ३ | २८४ | -- |
| | | मूल्य | -- | -- | -- | -- | २४ | १२,४५७ | -- |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | -- | -- | -- | ८५ | ८३ | ४९ | २७८ |
| | | मूल्य | -- | -- | -- | ७६ | १०७ | ५८ | ४८७ |
| १३ | कायनाईट | उत्पादन | -- | ५ | २२ | १५ | ०.२ | ३ | ३ |
| | | मूल्य | -- | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | १३० |
| १४ | इतर $$ | उत्पादन | -- | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | ३०९ |
| | | मूल्य | -- | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | ६११ |

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर     * अस्थायी

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ कोरंडम, क्ले, पायरोफायलाईट, स्फटिक, वाळू (इतर), सिलीमानाईट, फायर क्ले आणि शेल हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

## परिशिष्ट ८.५

## महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा तपशील

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१४-१५ | २०१५-१६* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३५ | ३४ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २०,४२०$ | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,०६४ | २१,१०२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,४३४ | २२,३२६ | २०,८०५ |
| (४) पणन संस्था | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१९ | १,५१८ | १,१८३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,८४८ | ३९,७८१ | २७,४१२ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२८,७६० | १,४०,९९७ | १,२६,३७१ |
| **एकूण** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२४,३०६** | **२,२५,७२१** | **१,९६,९०७** |
| **२. सभासदांची संख्या ('०००)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था $$ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४७ | १९५ | २०९ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १५,००१ | १५,१०१ | १५,०६५ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २१,६१८ | २३,९८८ | २२,२०७ |
| (४) पणन संस्था | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३३७ | १,३७२ | १,३०६ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ८,०१० | ५,६९२ | ५,६४९ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,८०९ | ७,१२० | ५,४१८ |
| **एकूण** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,०२२** | **५३,४६८** | **४९,८५४** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ८९,७१९ | १,०७,६७८ | १,१६,९१६ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १८,९८७ | १९,१४५ | १७,२४९ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,०४,८१४ | १,६१,५८० | १,७०,९१७ |
| (४) पणन संस्था | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,३०० | १,१२६ | १,००१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २८,७१७ | ४७,६३३ | ४८,३४८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,८९७ | ६,५२९ | ६,११४ |
| **एकूण** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,४८,४३४** | **३,४३,६९१** | **३,६०,५४५** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४०,४३६ | ५६,६१८ | ५८,९९६ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,०६० | १३,७७७ | १३,२९३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ४९,९०७ | ६७,००६ | ६५,३९० |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ८ | १८ | ११ | ७ | ६ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३ | १२ | १७ | १०३ | २,०५२ | १,६९५ | १,६४८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ४ | १२ | ६० | २३५ | २१५ | २५७ | २४७ |
| **एकूण** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,००,६८१** | **१,३९,३६०** | **१,३९,५८०** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.५ (समाप्त)

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१४-१५ | २०१५-१६* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४२,३८५ | ६१,२७९ | ६३,०१३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १२,०२४ | १२,२०९ | १२,७८३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४७,८६३ | ६७,०२७ | ७१,२७७ |
| (४) पणन संस्था | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | २५ | २३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ६ | ३० | ६९ | २३६ | ३,७२४ | ३,५३१ | ३,८४९ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८३४ | ६७७ | ५८८ |
| **एकूण** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,११,८६२** | **१,४४,७४८** | **१,५१,५३३** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ५९३ | ७७५ | ७४४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३ | १० | -- | ३८ | ७६ | -- | -- |
| (४) पणन संस्था | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३६८ | १,८०५ | २,०३३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ४६,११२ | २३,०११ | २३,७५८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ४,०७६ | ४,३९० | ३,४७१ |
| **एकूण** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **५२,२२५** | **२९,९८१** | **३०,००६** |

*आधार* - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी ला.ना. - लागू नाही

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

# ९

# पायाभूत सुविधा



# ९. पायाभूत सुविधा

९.१ सामाजिक व आर्थिक व्यवस्था कार्यरत राहण्यासाठी आवश्यक मूलभूत सुविधा व सेवा म्हणजे पायाभूत सुविधा. यात प्रामुख्याने विद्युत पुरवठा, वाहतुक व दळणवळण यंत्रणांचा समावेश होतो. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे गुंतवणूक आकर्षित होते, रोजगार निर्मिती होते, शासकीय महसुलात भर पडते आणि आर्थिक वाढीस चालना मिळते. सर्वंकष विकासासाठी पर्यावरण संरक्षणाच्या हमीसह दर्जेदार पायाभूत सुविधा निर्मिती हा पाया ठरतो.

## ऊर्जा

९.२ दर्जेदार जीवनासाठी ऊर्जा अत्यावश्यक असून ती उद्योग, वाहतुक व इतर सुविधांना गतिमान करते. दैनंदिन आयुष्य व कामकाज हे अखंडीत ऊर्जेच्या पुरवठ्यावर संपूर्णतः अवलंबून असल्याने अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात ऊर्जा हा महत्वाचा घटक झाला आहे.

## वीज

९.३ सर्वसाधारणपणे ऊर्जेचा वापर हा वीज स्वरुपात केला जातो. सामाजिक उत्तरदायित्व उद्देशाने अपारंपरिक ऊर्जा स्रोतांवर भर देत स्पर्धात्मक दरांत सर्वांसाठी वीज निर्मिती व पुरवठा शाश्वतरित्या करण्याचा राज्याचा दृष्टीकोन आहे.

### स्थापित क्षमता

९.४ राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता ३१ मार्च २०१५ रोजी देशात सर्वाधिक असून त्याखालोखाल गुजरात, तामिळनाडू, मध्यप्रदेश व राजस्थान यांचा क्रमांक आहे. तथापि, प्रति लाख लोकसंख्येमागे विजेच्या स्थापित क्षमतेसंदर्भात राज्याचा क्रमांक छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश व पंजाब यांच्यानंतर पाचवा आहे.

९.५ राज्यातील एकूण स्थापित क्षमता ३१ मार्च २०१६ रोजी ३२,३३२ मेगावॅट असून त्यात सार्वजनिक क्षेत्राचा ३६.१ टक्के, खाजगी क्षेत्राचा ५७.१ टक्के (पारंपरिक ३६.१ टक्के व नवीकरणीय ऊर्जा २१.० टक्के) आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून साकारलेल्या प्रकल्पाचा (रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट मर्या.) ६.९ टक्के वाटा होता. मागील वर्षाच्या तुलनेत राज्यातील स्थापित क्षमतेत २०१५-१६ मध्ये ३.३ टक्के वाढ झाली, तर केंद्रिय क्षेत्राकडून राज्यासाठीच्या वाटपात सहा टक्के वाढ झाली. खाजगी क्षेत्राचा वाटा मागील पाच वर्षात जवळपास दुप्पट झाला आहे. स्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील क्षेत्रनिहाय स्थापित क्षमता**




**तक्ता ९.१ स्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | ३१ मार्च रोजी | | | ३१ डिसेंबर २०१६ रोजी | २०१५-१६ मध्ये २०१४-१५ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१६ | | |
| **राज्यामधील** | **२९,५५६** | **३१,२९१** | **३२,३३२** | **३४,४१६** | **३.३** |
| औष्णिक | १७,२०६ | १८,४३६ | १९,२१६ | २०,९१६ | ४.२ |
| नवीकरणीय | ६,१७२ | ६,७१७ | ६,९७८ | ७,३६२# | ३.९ |
| जलजन्य | ३,०६६ | ३,०६६ | ३,०६६ | ३,०६६ | ०.० |
| नैसर्गिक वायुजन्य | ३,११२ | ३,०७२ | ३,०७२ | ३,०७२ | ०.० |
| **केंद्रिय क्षेत्राकडून वाटप** | **६,६२७** | **६,६२७** | **७,०२६** | **७,०२६** | **६.०** |

*आधार :* महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, महाऊर्जा, जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, केंद्रिय विद्युत प्राधिकरण # ऑक्टोबर २०१६ पर्यंत

## वीज निर्मिती

९.६ राज्यात २०१४-१५ मध्ये झालेली एकूण वीज निर्मिती देशात सर्वाधिक होती. तथापि, दरडोई वीज निर्मितीच्या संदर्भात राज्याचा क्रमांक हिमाचल प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, पंजाब व हरियाणा नंतर सहावा होता.

९.७ राज्यात २०१५-१६ मध्ये एकूण वीज निर्मिती (नवीकरणीय ऊर्जेसह) मागील वर्षापेक्षा ९.६ टक्के वाढून १,१३,७८७ दशलक्ष युनिटस् झाली. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत राज्यात एकूण ८२,४४१ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली.

९.८ एकूण वीज निर्मितीमध्ये महानिर्मितीचा वाटा ४१.९ टक्के, त्याखालोखाल अदानी पॉवर मर्यादित १७.६ टक्के, नवीकरणीय ऊर्जा ७.६ टक्के, जेएसडब्ल्यू एनर्जी ७.४ टक्के, टाटा पॉवर ७.१ टक्के, रत्तन इंडिया पॉवर ५.४ टक्के, व्हीआयपी बुटीबोरी व एम्को पॉवर प्रत्येकी ३.५ टक्के, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ३.१ टक्के आणि इतर २.९ टक्के असा होता.

**आलेख ९.२ : राज्यातील क्षेत्रनिहाय वीज निर्मिती**




९.९ केंद्रिय क्षेत्राकडून राज्याला २०१५-१६ मध्ये २९,१७९ दशलक्ष युनिटस् आणि २०१६-१७ मध्ये डिसेंबर २०१६ पर्यंत २२,४३६ दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध झाली. स्रोतनिहाय वीज निर्मिती तक्ता ९.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२ स्रोतनिहाय वीज निर्मिती**

(दशलक्ष युनिटस्)

| स्रोत | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+* | २०१५-१६ मध्ये २०१४-१५च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| **राज्यामधील** | **९१,९८७** | **१,०३,७७९** | **१,१३,७८७** | **८२,४४१** | **९.६** |
| औष्णिक | ७१,६८६ | ८४,८८२ | ९४,४८२ | ६३,९७२ | ११.३ |
| नैसर्गिक वायुजन्य | ६,०५५ | ४,६२६ | ५,३०२ | ७,१२२ | १४.६ |
| जलजन्य | ६,७६३ | ५,८५६ | ५,०४५ | ४,१९६ | (-) १३.९ |
| नवीकरणीय $ | ७,४८३ | ८,४१५ | ८,९५८ | ७,१५१ | ६.५ |
| **केंद्रिय क्षेत्रातून उपलब्ध** | **३१,५२५** | **३०,४०१** | **२९,१७९** | **२२,४३६** | **(-) ४.०** |

टीप : १ युनिट = १ किलो वॅट तास $ बंदिस्त विजेसह + डिसेंबरपर्यंत * अस्थायी

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, महावितरण, केंद्रिय विद्युत प्राधिकरण

## वीज खरेदी

९.१० महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेल्या विजेचा तपशील तक्ता ९.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३ यंत्रणानिहाय खरेदी केलेली वीज**

| वर्ष | महावितरण | | | बेस्ट | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिट) | एकूण किंमत (₹ कोटी) | प्रति युनिट दर (सरासरी) (₹) | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिट) | एकूण किंमत (₹ कोटी) | प्रति युनिट दर (सरासरी) (₹) |
| २०१४-१५ | १,१२,५७७ | ४९,०८९ | ४.३६ | ४,७२८ | २,७१८ | ५.७५ |
| २०१५-१६ | १,१६,३२५ | ४७,६९६ | ४.१० | ४,८६० | २,७०० | ५.५६ |
| २०१६-१७+ | ८२,६५६ | ३४,०४९ | ४.१२ | ३,६२२ | १,६९५ | ४.६८ |

*आधार* : महावितरण, बेस्ट + डिसेंबरपर्यंत

## विजेचा वापर

९.११ राज्यातील २०१५-१६ मधील महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर व बेस्ट यांच्यामार्फत होणारा विजेचा एकूण वापर १,१६,७४३ दशलक्ष युनिटस् इतका असून तो मागील वर्षापेक्षा ३.४ टक्के अधिक होता, तर २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ८२,१४५ दशलक्ष युनिटस् वापर झाला. हा २०१५-१६ मधील तत्सम कालावधीतील वापरापेक्षा ४.८ टक्के अधिक होता. राज्यातील विजेचा सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३४.५ टक्के), तर त्या खालोखाल कृषि क्षेत्रात (२४.२ टक्के) आणि घरगुती क्षेत्रात (२३.१ टक्के) होता. या तीन क्षेत्रांचा एकत्रित वापर एकूण वीज वापराच्या ८१.८ टक्के होता. क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.४ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिटस्)

| क्षेत्र | एप्रिल-मार्च | | | एप्रिल-डिसेंबर* | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१६-१७ मध्ये २०१५-१६ च्या तुलनेत शेकडा बदल |
| औद्योगिक | ३८,९४९ | ४१,५२२ | ४०,२३१ | २५,५२६ | ३१,०४६ | २१.६ |
| कृषि | २१,७२५ | २६,४०७ | २८,२३६ | १४,९५१ | १४,९२१ | (-)०.२ |
| घरगुती | २३,६७९ | २५,४२८ | २७,००१ | २१,३७४ | २१,२३५ | (-)०.७ |
| वाणिज्यिक | १२,४६९ | १२,५०४ | १३,१८२ | ९,९५६ | ९,९८४ | ०.३ |
| सार्वजनिक सेवा@ | ३,६३४ | ४,१८३ | ४,२८७ | ३,३५१ | ३,२३२ | (-)३.६ |
| रेल्वे | २,३८९ | २,४४३ | १,७९५ | १,६८० | ७७ | (-)९५.४ |
| संकीर्ण | १४४ | ३६८ | २,०११ | १,५४५ | १,६५० | ६.८ |
| **एकूण** | **१,०२,९८९** | **१,१२,८५५** | **१,१६,७४३** | **७८,३८३** | **८२,१४५** | **४.८** |

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा * अस्थायी

*आधार :* महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट

९.१२ प्रमुख क्षेत्र निहाय भारतातील (२०१४-१५) आणि महाराष्ट्रातील (२०१४-१५ व २०१५-१६) दरडोई विजेचा अंतिम वापर तक्ता ९.५ मध्ये दिला आहे. राज्यातील २०१४-१५ मधील एकूण वीज विक्री व विजेचा सर्व क्षेत्रांतील एकत्रित अंतिम वापर संदर्भात राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे.

**तक्ता ९.५ दरडोई विजेचा अंतिम वापर**

(युनिटस्)

| प्रमुख क्षेत्र | भारत | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| **सर्व क्षेत्र** | **६५२.५** | **९६२.६** | **९८४.०** |
| औद्योगिक | २२७.६ | ३५४.१ | ३३९.१ |
| कृषि | १३५.४ | २२५.२ | २३८.० |
| घरगुती | १७४.२ | २१६.९ | २२७.६ |
| वाणिज्यिक | ६२.८ | १०६.६ | १११.१ |

*आधार :* केंद्रिय विद्युत प्राधिकरण, महावितरण, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, टाटा पॉवर, बेस्ट

**आलेख ९.३ : क्षेत्रनिहाय वीज वापर**



९.१३ कोकण विभागातील एकूण वीज वापर सर्वाधिक (३६.२ टक्के) असून त्याखालोखाल पुणे (२५.६ टक्के), औरंगाबाद (१६.३ टक्के), नाशिक (८.९ टक्के), नागपूर (७.७ टक्के) व अमरावती (५.३ टक्के) असा आहे. विभागनिहाय विजेचा वापर तक्ता ९.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.६ विभागनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिटस्)

| विभाग | वर्ष | क्षेत्र | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घरगुती | वाणिज्यिक | औद्योगिक | कृषि | इतर@ | |
| कोकण | २०१४-१५ | १३,१८९ | ८,५४८ | १७,५१६ | १२९ | २,८८१ | ४२,२६३ |
| | २०१५-१६ | १३,९७५ | ८,८९४ | १६,३८९ | १४० | २,८६९ | ४२,२६७ |
| नाशिक | २०१४-१५ | १,१४७ | ३९३ | ३,२०० | ४,८३९ | ४८० | १०,०५९ |
| | २०१५-१६ | १,२०० | ४०७ | ३,०८८ | ५,०७९ | ६३४ | १०,४०८ |
| पुणे | २०१४-१५ | ४,६७० | २,१८५ | ११,८११ | ७,८७७ | १,००२ | २७,५४५ |
| | २०१५-१६ | ५,०६६ | २,४८६ | ११,८६१ | ८,८२६ | १,६९० | २९,९२९ |
| औरंगाबाद | २०१४-१५ | २,५०१ | ५४० | ४,७१० | ९,७४९ | १,१३७ | १८,६३७ |
| | २०१५-१६ | २,६३७ | ५५६ | ४,७३१ | ९,७४७ | १,३३९ | १९,०१० |
| अमरावती | २०१४-१५ | १,४३४ | २२२ | ७२३ | २,७७१ | ५९० | ५,७४० |
| | २०१५-१६ | १,४८२ | २३० | ६८७ | ३,२०० | ५९० | ६,१८९ |
| नागपूर | २०१४-१५ | २,४८७ | ६१६ | ३,५६२ | १,०४२ | ९०४ | ८,६११ |
| | २०१५-१६ | २,६४१ | ६०९ | ३,४७५ | १,२४४ | ९७१ | ८,९४० |
| **एकूण** | **२०१४-१५** | **२५,४२८** | **१२,५०४** | **४१,५२२** | **२६,४०७** | **६,९९४** | **१,१२,८५५** |
| | **२०१५-१६** | **२७,००१** | **१३,१८२** | **४०,२३१** | **२८,२३६** | **८,०९३** | **१,१६,७४३** |

*आधार :* महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट @ सार्वजनिक पाणीपुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती, रेल्वे आणि इतर बाबी समाविष्ट

९.१४ स्थापित क्षमता, विद्युत निर्मिती, क्षेत्रनिहाय विजेचा वापर आणि दरडोई विजेचा अंतिम वापर यासंबंधीची मालिका परिशिष्ट ९.१ मध्ये दिली आहे.

## विजेची मागणी व पुरवठा

९.१५ विविध स्रोताद्वारे झालेली क्षमता वाढ, पायाभूत जाळ्यातील सुधारणा, पारेषण व वितरण हानीत झालेली घट आणि ऊर्जा अक्षय्यतेच्या उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. महावितरणची २०१५-१६ मध्ये १५,९४८ मेगावॅट विजेची सरासरी कमाल मागणी ९८ मेगावॅट इतक्या तुटीचे भारनियमन करुन भागविण्यात आली. तसेच २०१६-१७ मध्ये डिसेंबर २०१६ पर्यंतची १६,३०४ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी शून्य मेगावॅट भारनियमन करुन भागविण्यात आली. सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट तक्ता ९.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.७ सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**

(मेगावॅट)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | १४,०३२ | १३,३०९ | ७२३ |
| २०१३-१४ | १४,४०६ | १३,८३० | ५७६ |
| २०१४-१५ | १५,८१२ | १५,३९२ | ४२० |
| २०१५-१६ | १५,९४८ | १५,८५० | ९८ |
| २०१६-१७+ | १६,३०४ | १६,३०४ | ० |

*आधार :* महावितरण + डिसेंबरपर्यंत

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.१६ पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा आणि पारेषण व वितरण हानी (तांत्रिक व अतांत्रिक दोन्ही) कमी करणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात अति उच्च दाब (इएचव्ही) उपकेंद्रांचे आधुनिकीकरण, सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्रे पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे, तारा टाकणे यांसह वीजचोरी विरुद्ध मोहीम अशा महापारेषण व महावितरण यांच्याद्वारे हाती घेतलेल्या उपाययोजनांचा समावेश आहे.

९.१७ महापारेषण कंपनीची ४३,७०० सर्किट किमीचे जाळे व ६३३ उपकेंद्रे यांसह २०१५-१६ पर्यंतची पारेषण क्षमता १,१०,८६४.५ मेगा व्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) होती. सन २०१५-१६ मध्ये पारेषण क्षमतेत २,१०८.९ सर्किट किमी जाळे व २४ उपकेंद्रांसह ५,७५२.५ एमव्हीए वाढ झाली तर २०१६-१७ मध्ये जानेवारीपर्यंत पारेषण क्षमतेत ३५६.६ सर्किट किमी जाळे व १० उपकेंद्रांसह ६,१०५.५ एमव्हीए वाढ झाली. महापारेषण कंपनीची २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ ची पारेषण हानी अनुक्रमे ४.०८ टक्के, ३.८९ टक्के, ३.९२ टक्के आणि २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ३.५८ टक्के होती.

९.१८ महावितरण कंपनीच्या वितरण जाळ्यात २०१५-१६ मध्ये १२७ उपकेंद्रे, ३०,४३० सर्किट किमी वाहिन्या व २५,४०५ वितरण ट्रान्सफॉर्मर्सची वाढ होऊन २०१५-१६ अखेर त्यात ३,०५२ उपकेंद्रे, ९,८०,२१९ सर्किट किमी वाहिन्या व ५,४८,९८८ वितरण ट्रान्सफॉर्मर्स होते. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरअखेर १०४ उपकेंद्रे, १३,४३४ सर्किट किमी वाहिन्या व ९,१४६ वितरण ट्रान्सफॉर्मर्सचा समावेश करण्यात आला. सन २०१५-१६ अखेर १७,२३३ फिडर्स व २,४०,३२९ वितरण रोहित्र केंद्रांवर मीटर्स बसविण्यात आले आणि २०१५-१६ मध्ये १०,१७,२९० जुने मीटर्स बदलून नवीन बसविण्यात आले. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत १,५९६ फिडर्स व १,४५० वितरण रोहित्र केंद्रांवर मीटर्स बसविण्यात आले तर ११,६३,८४२ मीटर्स बदलण्यात आले. वीजचोरी विरुद्ध चालविण्यात येत असलेल्या मोहिमेत २०१५-१६ मध्ये ३६,३७२ वीजचोरीची प्रकरणे आढळली व ₹ ८.७३ कोटी रक्कम वसूल करण्यात आली तर २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत आढळलेल्या ३९,२९० वीजचोरीच्या प्रकरणांतून ₹ ९.८७ कोटी रक्कम वसूल करण्यात आली. महावितरण कंपनीची सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंतची एकूण तांत्रिक व वाणिज्यिक (एटी ॲन्ड सी) हानी २०.२४ टक्के होती.

**आलेख ९.४ : एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी आणि वितरण हानी**




९.१९ राज्यातील वीज वितरण यंत्रणांमध्ये २०१५-१६ करिता महावितरणचा वाटा ८४.३ टक्के असून त्या पाठोपाठ रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ६.९ टक्के, टाटा पॉवर ४.९ टक्के आणि 'बेस्ट'चा ३.९ टक्के होता. वितरण हानी तक्ता ९.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.८ वितरण हानी**

(टक्के)

| परवानाधारक | वितरण हानी | | | |
|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+* |
| महावितरण | १४.०० | १४.१७ | १४.५१ | १३.४३# |
| टाटा पॉवर | १.१० | ०.५८ | ०.६३ | १.२१ |
| रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | ९.५० | ९.४७ | ९.२४ | ९.११ |
| बेस्ट | ५.९० | ६.५३ | ५.८३ | ५.२४# |

*आधार* : महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट + सप्टेंबरपर्यंत # डिसेंबरपर्यंत * अस्थायी

९.२० उज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजना (उदय) : राज्य शासनाच्या मालकीच्या वीज वितरण कंपन्यांच्या आर्थिक परिवर्तनासाठी केंद्र शासनाने २०१५ मध्ये राज्य वितरण यंत्रणांच्या कार्यकारी व वित्तीय कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने ही योजना मंजूर केली. राज्य सदर योजनेत सहभागी झाले असून ₹ ४,९५९.७५ कोटी राज्य शासनाकडून २०१६-१७ मध्ये महावितरणला वर्ग करण्यात आले आहेत. फिडर मीटरिंग राज्यात पूर्ण झाले आहे तर वितरण ट्रान्सफॉर्मर्स मीटरिंगचे काम प्रगतीपथावर आहे.

९.२१ एकात्मिक वीज विकास योजना (आयपीडीएस) : केंद्र शासनाने २०१५ मध्ये नागरी क्षेत्रासाठी (वैधानिक नगरे) योजना घोषित केली. जनगणना २०११ नुसार १५,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या एकूण २५४ शहरांचा या योजनेत विचार करण्यात आला आहे. उप-पारेषण, वितरण जाळ्यांचे बळकटीकरण, वितरण ट्रान्सफॉर्मर्स/ फिडर्स/ ग्राहक यांचे मीटरिंग आणि वितरण क्षेत्राचे माहिती तंत्रज्ञान वापरासाठी सक्षमीकरण हा योजनेचा उद्देश आहे. केंद्र शासनाने ₹ २,३००.४३ कोटी रकमेच्या प्रकल्पांना मान्यता दिली असून डिसेंबर २०१६ पर्यंत ₹ १३९.१८ कोटी राज्यास वितरीत केले आहेत व त्यापैकी ₹ ३.३४ कोटी जानेवारी २०१७ पर्यंत खर्च झाले आहेत.

९.२२ पुनर्रचित गतिमान ऊर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम : या योजनेत ३०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली नगरे व शहरे यांचा समावेश आहे. पायाभूत माहिती यंत्रणा प्रस्थापित करणे, जबाबदारी निश्चिती, एकूण तांत्रिक व व्यावसायिक हानी मध्ये कपात, पर्यवेक्षी नियंत्रण व माहिती प्राप्ती /माहिती व्यवस्थापन प्रणाली नियंत्रण केंद्र यांचा या कार्यक्रमात समावेश आहे. ऊर्जा वित्त महामंडळाकडून २०१०-११ पासून **₹** १,९४३.४९ कोटी राज्यास वितरीत केले असून जानेवारी २०१७ अखेरपर्यंत **₹** १,९००.०५ कोटी खर्च झाला. ही योजना आयपीडीएस या नवीन योजनेत समाविष्ट करण्यात आली आहे.

## क्षमता वाढ

९.२३ **औष्णिक ऊर्जा** : महानिर्मितीद्वारे कार्यान्वित व आस्थापित करण्यात येत असलेल्या सुमारे २,५७० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांपैकी १,९१० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प २०१५-१६ मध्ये कार्यान्वित करण्यात आले व कोराडी संच १० (६६० मेगावॅट) जानेवारी २०१७ मध्ये कार्यान्वित झाला आहे. पारस, भुसावळ व नाशिक केंद्रांमधील १,५७० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांचे प्रस्ताव प्रत्यक्ष विजेची मागणी लक्षात घेऊन सुधारित करण्यात येत आहेत आणि २,५४० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प विचाराधीन आहेत.

९.२४ **नवीकरणीय ऊर्जा** : पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक, इ. स्वच्छ आणि पर्यावरण पूरक नवीकरणीय ऊर्जेचे स्रोत आहेत. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ मधील तरतुदींचे समन्वयन, विनियमन व अंमलबजावणी करण्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केले आहे. नवीकरणीय ऊर्जेचा प्रसार व विकास आणि ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा सक्रीय आहे.

९.२५ केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून १० टक्के वीज खरेदीचे उद्दिष्ट गाठण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारले आहे. त्यास अनुसरुन नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे ग्रीड संलग्न वीज निर्मितीसाठी धोरण जाहीर करण्यात आले आहे. नवीकरणीय ऊर्जेच्या संभाव्य क्षमतेसंदर्भात राज्य राजस्थान व जम्मू-काश्मीर नंतर देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे तर नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे वीज निर्मिती प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेनुसार राज्याचा देशात तामिळनाडू नंतर दुसरा क्रमांक आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता सुधारित करण्यात आली आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमता तक्ता ९.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.९ नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च रोजी | | | ३१ ऑक्टोबर २०१६ रोजी |
| | | २०१४ | २०१५ | २०१६ | |
| पवन | ९,४०० | ४,०८० | ४,४४४ | ४,६६२ | ४,६६२ |
| चिपाडांपासून वीज सहनिर्मिती | २,५०० | १,३५५ | १,४१५ | १,४१५ | १,७७६ |
| लघु जल विद्युत प्रकल्प# | ८२४ | २८८ | २९४ | ३०२ | ३०५@ |
| कृषि अवशेष | १,८८७ | १९० | २०० | २०० | २१५ |
| शहरी घनकचरा | २८७ | ३ | ३ | ३ | ३ |
| औद्योगिक कचरा | ३५० | २६ | ३२ | ३४ | ३५ |
| सौर | ६४,३२० | २३० | ३२९ | ३६२ | ३६६ |
| **एकूण** | **७९,५६८** | **६,१७२** | **६,७१७** | **६,९७८** | **७,३६२** |

# जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प @ ३१ डिसेंबर २०१६ रोजी

*आधार* : महाऊर्जा, 'ऊर्जा सांख्यिकी २०१६' अहवाल, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन

९.२५.१ सौर ऊर्जा : राज्यात ऑक्टोबर २०१६ अखेर ३६५.७५ मेगावॅट क्षमतेचे ग्रीड संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. तर १,७०४ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प शासनाच्या मालकीच्या नापीक जमिनी, महाऊर्जेच्या ताब्यातील जमिनी, धरणे, कालवे व जलसंपदा विभागाच्या जमिनी यावर प्रस्तावित केले आहेत.

९.२५.२ पवन ऊर्जा : महाऊर्जाद्वारे ११.०९ मेगावॅट क्षमतेचे प्रदर्शक प्रकल्प राज्यात उभारण्यात आले आहेत. शासनाने जाहीर केलेले धोरण व प्रोत्साहन यामुळे पवन ऊर्जा क्षेत्रात राज्यात ₹ २३,२०० कोटीपेक्षा अधिक खाजगी गुंतवणूक झाली आहे.

**आलेख ९.५ : पवन ऊर्जेची स्थापित क्षमता**




९.२५.३ चिपाडांपासून वीज सह-निर्मिती : राज्यात ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत चिपाडांपासून वीज सह-निर्मितीचे १,७७६ मेगावॅट क्षमतेचे एकूण १०२ प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. या क्षेत्रात गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाकडून बॉयलर संरचनेवर व वापरकर्त्याच्या श्रेणीवर आधारित वीज सह-निर्मिती प्रकल्पांना भांडवली अर्थसहाय्य देण्यात येते.

९.२५.४ कृषिजन्य अवशेषांवर आधारित ऊर्जा निर्मिती : महाऊर्जाने केंद्र शासनाच्या वित्तीय सहाय्याने राज्यातील ३९ तालुक्यांमध्ये कृषि अवशेषांच्या उपलब्धतेबाबत अभ्यास घेण्यात आले. खाजगी सहभागाबाबत धोरणामुळे ऑक्टोबर २०१६ अखेर कृषिजन्य अवशेषांवर आधारित १९ ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत व १७ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.

९.२५.५ लघु जलविद्युत प्रकल्प : राज्यातील एकूण ८२४.४४ मेगावॅट संभाव्य क्षमतेपैकी जलसंपदा विभागाकडून ३०५.४३ मेगावॅट क्षमतेचे लघु जलविद्युत प्रकल्प डिसेंबर २०१६ अखेरपर्यंत स्थापित करण्यात आले आहेत. लघु जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून विकसित करण्यास चालना देण्यासाठीच्या राज्य शासनाच्या धोरणांतर्गत डिसेंबर २०१६ अखेरपर्यंत ११३.१० मेगावॅट क्षमतेचे २७ प्रकल्प कार्यान्वित झाले असून एकूण ५१.१५ मेगावॅट क्षमतेच्या १७ प्रकल्पांचे बांधकाम सुरु आहे.

९.२६ भू-औष्णिक ऊर्जा, समुद्राच्या भरती-ओहोटी पासून तसेच सागरी लाटांपासून ऊर्जा हे संशोधित करण्यास वाव असलेले नवीकरणीय ऊर्जेचे स्रोत आहेत. महाऊर्जाने मे. थरमॅक्स लि. यांच्याशी राज्याच्या पश्चिम किनाऱ्यावर भू-औष्णिक ऊर्जेपासून वीज निर्मिती साठी विकास व अंमलबजावणी करण्याचा सामंजस्य करार केला आहे. समुद्राच्या भरती-ओहोटी पासून ऊर्जा निर्मितीसाठी रत्नागिरी मधील जयगड खोरे व सिंधुदुर्ग मधील वेंगुर्ला रॉक्स या काही संभाव्य जागा आहेत. सागरी लाटांपासून ऊर्जा निर्मितीच्या संदर्भात राज्याच्या किनारपट्टीच्या अभ्यासानुसार वेंगुर्ला रॉक्स, मालवण रॉक्स, रेडी, पावस, रत्नागिरी व गिर्ये या काही संभाव्य जागा आढळून आल्या आहेत. राज्याच्या किनारपट्टीवरील एकूण संभाव्य क्षमता सुमारे ५०० मेगावॅट आहे.

## नियामक उपाययोजना व वीज दर

९.२७ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना वीज दर निश्चिती, वीज खरेदी आणि पारेषण व वितरण यंत्रणांच्या प्रापण प्रक्रियांचे नियमन, स्पर्धात्मकता, कार्यक्षमता व काटकसरीस उत्तेजन यासाठी करण्यात आली आहे. विद्युत अधिनियम, २००३ अन्वये आयोगाकडे आंतर-राज्य पारेषण आणि वीज वहन सुलभीकरण, वीज पारेषण, वितरण आणि खरेदी-विक्रीकरिता परवाने वितरण, सहवीजनिर्मिती व नवीकरणीय ऊर्जा निर्मितीस प्रोत्साहन ही अतिरिक्त कामे सोपविण्यात आली.

९.२८ महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडून एकापेक्षा अधिक वर्षांसाठी वीज दर निर्धारण, नवीकरणीय ऊर्जेस चालना, समांतर परवाना पध्दती, ग्राहक सहभाग व समर्थन, मागणीच्या अनुषंगाने व्यवस्थापन, इ. उपाययोजना करण्यात येत आहेत. मुंबईतील समांतर परवाना पध्दती ही देशात एकमेव आहे. समांतर परवाना पध्दती अंतर्गत मुंबई हे एकाच भौगोलिक क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी दोन अधिकृत समांतर परवाना धारक (मुंबई शहरात बेस्ट व टाटा पॉवर आणि मुंबई उपनगरात रिलायन्स इन्फ्रा व टाटा पॉवर) असलेले महानगर बनले असून आयोगाने विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार ग्राहकांना एका परवाना धारकाऐवजी दुसऱ्याची निवड करणे शक्य होत आहे. ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आयोगाकडून ग्राहक तक्रार निवारण मंच आणि मुंबई व नागपूर येथे वीज लोकायुक्त नियमांद्वारे घोषित करण्यात आले आहेत. सन २०१६-१७ मधील सरासरी वीज दर तक्ता ९.१० मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.१० सन २०१६-१७ मधील सरासरी वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहकाचा प्रकार | महावितरण | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | टाटा पॉवर | बेस्ट |
|---|---|---|---|---|
| **लघु दाब - घरगुती/निवासी** | | | | |
| दारिद्र्यरेषेखालील | १.४८ | @ | @ | २.५० |
| ० ते १०० युनिट्स | ४.७८ | ३.८८ | १.२३ | ३.६७ |
| १०१ ते ३०० युनिट्स | ८.४५ | ८.३८ | ३.३७ | ६.३८ |
| ३०१ ते ५०० युनिट्स | ११.४३ | ९.६१ | ६.८५ | ८.९५ |
| ५०० ते १,००० युनिट्स | १२.९९ | ११.३८ | ९.१५ | १०.८२ |
| १,००० युनिट्स पेक्षा अधिक | १४.२४ | ११.३८ | ९.१५ | १०.८२ |
| **लघु दाब - व्यावसायिक/अनिवासी** | | | | |
| (अ) ०- २० केडब्ल्यु | १०.२५ | १०.२८ | ७.५९ | १०.५८ |
| (ब) > २० केडब्ल्यु आणि < = ५० केडब्ल्यु | १३.१८ | १०.९१ | ८.३० | १०.६० |
| (क) ५० केडब्ल्यु पेक्षा अधिक | १६.१२ | ११.४७ | ९.३१ | ११.१५ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| (अ) २० केडब्ल्यु पेक्षा कमी भार | ६.३३ | ९.२५ | ७.११ | ९.६६ |
| (ब) २० केडब्ल्यु पेक्षा अधिक भार | ९.१७ | ९.६९ | ८.४९ | ९.३५ |
| **लघु दाब - कृषि** | | | | |
| (अ) कृषि पंप (मीटर शिवाय) | ३.७७ | -- | -- | -- |
| (ब) कृषि पंप (मीटर सह) | ३.१७ | ४.७१ | @ | @ |
| (क) इतर (मीटर सह) | ४.७९ | @ | @ | @ |
| **लघु दाब - पथदिवे (सार्वजनिक दिवाबत्ती)** | | | | |
| (अ) ग्रामपंचायत आणि अ, ब व क वर्ग नगरपालिका | ५.४३ | -- | -- | -- |
| (ब) महानगरपालिका क्षेत्रे | ६.७० | ८.८६ | ७.८१ | ९.०६ |
| **लघु दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| (अ) शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ८.६२ | ८.३४ | ७.८६ | ९.०१ |
| (ब) इतर | ८.९५ | ९.०७ | ९.२७ | ९.७० |
| **उच्च दाब - उद्योग** | ८.५७ | १०.०५ | ७.०४ | ९.६४ |
| **उच्च दाब — रेल्वे/मेट्रो/मोनोरेल** | ९.१८ | ७.९५ | ७.९६ | @ |
| **उच्च दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| (अ) शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ८.४५ | ९.३१ | ७.६९ | ८.९७ |
| (ब) इतर | १०.४२ | १०.४१ | ९.०३ | १०.०४ |
| **उच्च दाब - कृषि पंप** | ३.९९ | -- | -- | -- |

*आधार*: महाराष्ट्र वीज नियामक आयोग @ ग्राहकांची संख्या निरंक वा अत्यंत कमी असल्याने सरासरी दर दर्शविले नाहीत -- लागू नाही

९.२९ छतावरील सौर पीव्ही नेट मीटरिंग नियमन २०१५ अधिसूचीत केल्यानंतर डिसेंबर २०१६ पर्यंत ४७१ ग्राहकांना एकूण ११.५० मेगावॅट क्षमतेची वीज उपलब्ध झाली आहे.

९.३० **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व नवीकरणीय ऊर्जेसंबंधीच्या इतर उपाययोजना** : नवीकरणीय ऊर्जेची स्वतंत्रपणे कार्यरत असलेली उपकरणे मोठ्या प्रमाणात अनुदानित तत्वावर वितरीत करण्यात आली आहेत. राज्यात खुल्या बाजाराद्वारे १२.२४ लाख चौ.मी. सौर ऊर्जा एकत्रिकरण क्षेत्र (सौर उष्मीकरण पध्दती), १.६२ लाख सौर कंदील, ०.४५ लाख सौर घरगुती दिवे, १.१६ लाख सौर पथदिवे आणि १३ सौर पंप स्थापित करण्यात आले आहेत. 'ऊर्जा बचत योजना' अंतर्गत ऊर्जा लेखापरिक्षण कार्यक्रम ७९८ उद्योगांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात आला आहे. राज्यातील प्रमुख उपलब्धी तक्ता ९.११ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ९.११ ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम आणि इतर उपाययोजनांतर्गत उपलब्धी**

(संख्या)

| विवरण | साध्य | | |
|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | मार्च २०१६ अखेर पर्यंत संचयी |
| **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम** | | | |
| अ) ऊर्जा लेखा परिक्षण | ८० | ७२ | ८७० |
| ब) संक्षिप्त ऊर्जा लेखा परिक्षण | ४३२ | ० | २,२४७ |
| क) अपव्ययित उष्म्याचा पुनर्वापर | ० | ० | ११ |
| ड) ग्रामपंचायत क्षेत्रात सीएफएल दिवे बदलणे | १९,८५५ | १०,२२४ | १,३८,४५६ |
| इ) शासकीय/निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प | १३ | ६ | ४६ |
| ई) नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्रे बसविणे | १३ | ० | ३४ |
| वारा मापन केंद्रे | ७ | ३ | ४०९ |
| सौर किरण निर्धारण केंद्रे | २ | १ | ७ |
| सामायिक अभ्यासिकेत सौर दिवे | ५०० | ० | १८,६०३ |
| ग्रामीण विद्युतीकरण अ) गावे | १४ | ० | ५४३ |
| ब) पाडे-वस्त्या | ५९ | ० | ६९४ |
| शासकीय इमारतीतील सौर ऊर्जा प्रकल्प | ५ | ११ | २४ |
| जैविक कांडी कोळसा (ब्रिक्वेटींग) प्रकल्प | १४ | १७ | १२० |
| पवन-सौर संकरित संयंत्रे अ) संख्या | १२ | ० | २७६ |
| ब) क्षमता (किलोवॅट) | १२६ | ० | २,०७४ |
| आश्रमशाळा व वसतीगृहातील पवन-सौर संकरित यंत्रणा | ५ | ० | २० |
| प्रदर्शने | ११ | २० | २६१ |
| आश्रमशाळांतील सौर ऊर्जा संयंत्रे (सौर घरगुती दिवे, पथदिवे, जल उष्मीकरण यंत्रणा आणि ऊर्जा संच) | ० | ० | १० |

*आधार* : महाऊर्जा

९.३१ **ग्रामीण विद्युतीकरण, जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा अक्षय्यता** : राज्यातील वस्ती असलेल्या एकूण ४०,९५९ गावांपैकी (जनगणना २०११ नुसार), ४०,९१३ गावांचे डिसेंबर २०१६ पर्यंत पारंपरिक ऊर्जेद्वारे विद्युतीकरण झाले आहे. ग्रामीण विद्युतीकरण, जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा अक्षय्यतेसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना खालीलप्रमाणे आहेत.

९.३१.१ दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना : केंद्र शासनाने २०१५ पासून ग्रामीण भागासाठी योजना (१०० टक्के केंद्रपुरस्कृत) सुरु केली असून राज्यासाठी ₹ २,१६४.१५ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. १२.४८ लाख ग्रामीण कुटुंबांना (त्यापैकी ३.९६ लाख दारिद्र्य रेषेखालील) वीज जोडणी देण्याचे प्रस्तावित आहे.

९.३१.२ कृषि पंपांचे विद्युतीकरण : सन २०१५-१६ मध्ये १.३० लाख कृषि पंपांचे व २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत ०.७८ लाख कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले. डिसेंबर २०१६ अखेरपर्यंत विद्युतीकरण झालेल्या पंपांची एकूण संख्या (कायमस्वरुपी जोडणी काढून टाकलेले कृषि पंप वगळून) ४०.५४ लाख होती. 'मागेल त्याला वीज जोडणी' ही स्थिती गाठण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून अनुशेष घोषित जिल्ह्यांमधील कृषि पंपांच्या विद्युतीकरणाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी २०१६-१७ मध्ये ₹ २५९ कोटी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

९.३१.३ अटल सौर कृषि पंप योजना : सदर योजना राज्यात २०१५ पासून सुरु करण्यात आली. राज्यात ७,५४० सौर कृषि पंप स्थापित करण्याच्या उद्दिष्टाच्या तुलनेत सुमारे १,६७४ सौर कृषि पंप योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर २०१६ पर्यंत कार्यान्वित करण्यात आले.

९.३१.४ घरगुती कार्यक्षम दिव्यांसाठी कार्यक्रम (डीईएलपी) : जून २०१५ मध्ये घोषित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांतर्गत घरगुती ग्राहकांकडील सद्यस्थितीतील सीएफएल व इनकॅन्डेसन्ट दिव्यांच्या ऐवजी एलईडी दिवे बदलून देण्यात येत आहेत. हा कार्यक्रम एनर्जी एफिशियन्ट सर्व्हिसेस लि. या केंद्रिय वीज मंत्रालयाच्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे राबविण्यात येत असून राज्यात त्यासाठी महावितरण सहाय्य करीत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजुरी दिलेल्या आराखड्यानुसार महावितरणला ३.८६ कोटी एलईडी दिवे वितरणासाठी अंदाजित खर्च ₹ ५५३.९३ कोटी आहे. याद्वारे अंदाजित ७५० दशलक्ष युनिट्सची वार्षिक बचत व मागणीत सुमारे २९३ मेगावॅट घट अपेक्षित आहे. पुढील दोन आर्थिक वर्षात तीन कोटी एलईडी दिवे वितरित करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यात ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत सुमारे २.०७ कोटी एलईडी दिव्यांचे वितरण करण्यात आले आहे.

९.३२ **नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन ('आरपीओ') व नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्रे ('आरईसी') पध्दती** : नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कायद्याद्वारे बंधनकारक केले असून बांधील यंत्रणेद्वारे (वितरण परवानाधारक, ग्रीडला जोडलेले कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प व वितरण मुक्त प्रवेश असलेले ग्राहक) वापर केलेल्या एकूण विजेपैकी किमान मर्यादेपर्यंत नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे असे बंधन आहे.

९.३३ नवीकरणीय ऊर्जेस चालना देण्यासाठी आणि उपलब्ध असलेले नवीकरणीय ऊर्जा स्रोत व बांधील यंत्रणांना साध्य करावयाचे नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन यांच्यात असलेली तफावत दूर करण्याकरिताचे 'आरईसी' हे बाजाराधारीत साधन आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महाऊर्जा या यंत्रणेस 'आरपीओ', त्याचे पालन व 'आरईसी' पध्दतीची अंमलबजावणी यासाठी राज्य यंत्रणा म्हणून घोषित केले आहे. बांधील यंत्रणांना त्यांच्या एकूण वीज वापराच्या किमान पातळीपर्यंत नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या 'आरपीओ-आरईसी नियमन २०१०' (२०१५-१६ पर्यंत) अनुसार नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून किमान खरेदी करावयाची ऊर्जा (१ युनिट विजेच्या समतुल्य) सौर ऊर्जेसाठी ०.५ टक्के व इतर नवीकरणीय ऊर्जेसाठी ८.५ टक्के असा एकूण ९.० टक्के इतके उद्दिष्ट आहे. नवीकरणीय ऊर्जा बंधन (आरपीओ) चे साध्य तक्ता ९.१२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.१२ नवीकरणीय ऊर्जा बंधन (आरपीओ) चे साध्य**

(टक्के)

| वितरण परवानाधारक | प्रत्यक्ष साध्य | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सौर | | इतर नवीकरणीय ऊर्जा | | एकूण | |
| | २०१४-१५ | २०१५-१६* | २०१४-१५ | २०१५-१६* | २०१४-१५ | २०१५-१६* |
| महावितरण | ०.२५ | ०.३२ | ७.९२ | ७.३६ | ८.१७ | ७.६८ |
| टाटा पॉवर | ०.८२ | १.२४ | ८.५२ | ९.४४ | ९.३४ | १०.६८ |
| रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | ०.७७ | ०.७४ | ८.४८ | ९.३४ | ९.२५ | १०.०८ |
| बेस्ट | १.०८ | ०.६२ | १०.२६ | ८.६७ | ११.३४ | ९.२९ |

*आधार* : महाऊर्जा * अस्थायी

# ऊर्जेचे इतर प्रकार

## पेट्रोलियम व नैसर्गिक वायू

९.३४ पेट्रोलियम उत्पादनांच्या एकूण वापराची आकडेवारी वाढीचा कल दर्शविते. मागील वर्षीच्या तुलनेत २०१५-१६ मध्ये देशात व राज्यात अनुक्रमे ११.९ टक्के व ७.७ टक्के वाढ झाली. प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांचा देशात व राज्यात झालेल्या वापराचा तपशील तक्ता ९.१३ मध्ये दिला आहे.

९.३५ द्रवरुप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) घरगुती ग्राहक, वितरक, केरोसिन (एसकेओ)/डीझेल (एलडीओ) वितरक आणि किरकोळ विक्री केंद्रे तक्ता ९.१४ मध्ये दिली आहेत.

**आलेख ९.६ : पेट्रोलियम उत्पादनांची दरडोई विक्री**




* अस्थायी

**तक्ता ९.१३ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांचा वापर**

('००० टन)

| पेट्रोलियम उत्पादने | २०१३-१४* | | २०१४-१५* | | २०१५-१६* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| नॅप्था | १०,५९१ | २७० | १०,९३९ | २९६ | १३,२७१ | २९७ |
| द्रवरुप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) | १५,९२५ | २,१६४ | १८,०१९ | २,२८५ | १९,६२३ | २,४२५ |
| मोटर स्पिरीट/गॅसोलिन (एमएस) | १७,१२८ | २,२७२ | १९,०७५ | २,४८३ | २१,८४७ | २,८३७ |
| सुपिरीयर केरोसिन ऑईल (एसकेओ) | ७,१६५ | ५७६ | ७,०८७ | ५५१ | ६,८२६ | ४८६ |
| एव्हीएशन टर्बाईन इंधन (एटीएफ) | ५,५०२ | १,२९९ | ५,५७८ | १,३२६ | ६,२६२ | १,३७४ |
| हाय स्पीड डिझेल (एचएसडी) | ६८,२८७ | ७,३४७ | ६९,४०४ | ७,३०१ | ७४,६४७ | ७,८१४ |
| लाईट डिझेल ऑईल (एलडीओ) | ३८६ | ९२ | ३६५ | ८८ | ४०७ | ८८ |
| फर्नेस ऑईल (एफओ) | ५,०९१ | ९६४ | ५,६४० | ८११ | ६,४८२ | ८२३ |
| हॉट हेवी स्टॉक (एचएचएस)/ लो सल्फर हेवी स्टॉक (एलएसएचएस) | ४४९ | २० | ३७७ | १७ | १५० | १८ |
| लॅब्रीकन्ट /ग्रीस | १,२१८ | २८३ | २,९६४ | २५१ | ३,५७१ | ३१७ |
| बिटुमेन | ४,७६१ | ३८४ | ४,९८३ | ३८८ | ५,९३८ | ४६८ |
| इतर | १२,२५८ | १,०९७ | २०,५५८ | १,१२० | २५,६५० | १,२८२ |
| **एकूण** | **१,४८,७६१** | **१६,७६८** | **१,६४,९८७** | **१६,९१७** | **१,८४,६७४** | **१८,२२७** |

*आधार* : 'भारतीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू सांख्यिकी २०१४-१५ व २०१५-१६' अहवाल * अस्थायी

**तक्ता ९.१४ एलपीजी घरगुती ग्राहक, वितरक, केरोसिन/एलडीओ वितरक आणि किरकोळ विक्री केंद्रे**

| तपशील | २०१३-१४* | | २०१४-१५* | | २०१५-१६* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| एलपीजी घरगुती ग्राहक (संख्या लाखात) | १,६६२.६ | २०३.१ | १,८१९.० | २१७.९ | २,०१७.९ | २३४.६ |
| एलपीजी वितरक (संख्या) | १३,८९६ | १,३७५ | १५,९३० | १,५४९ | १७,९१६ | १,६९७ |
| केरोसीन/एलडीओ वितरक (संख्या) | ६,५८२ | ७७४ | ६,५५९ | ७६९ | ६,५४८ | ७६७ |
| किरकोळ विक्री केंद्रे (संख्या) | ५२,४३९ | ५,०२५ | ५३,४१८ | ५,२०७ | ५६,१९० | ५,४१९ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी केरोसीनचे वाटप (००० मे.टन) | ७,०६६.१ | ५६८.५ | ६,९८४.९ | ५४१.५ | ६,७५९.१ | ४८७.४ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी केरोसीनची उचल (००० मे.टन) | ६,९९६.५ | ५६८.२ | ६,९०९.२ | ५४१.३ | ६,६४३.४ | ४७७.८ |

*आधार* : 'भारतीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू सांख्यिकी २०१४-१५ व २०१५-१६' अहवाल * अस्थायी

९.३६ महानगर गॅस लि., महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. आणि गेल गॅस लि. या पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) जोडणी, कॉम्प्रेस्ड नैसर्गिक वायू (सीएनजी) केंद्रे व सीएनजी वरील वाहने यासंदर्भात राज्यात कार्यरत यंत्रणा आहेत. देशात ऑक्टोबर २०१६ अखेर १,१६७ सीएनजी केंद्रे व सुमारे २८.४७ लाख सीएनजी वाहने असून त्यापैकी २३० सीएनजी केंद्रे व ६.१९ लाख सीएनजी वाहने राज्यात आहेत. त्याचप्रमाणे देशात ३३.८० लाख पीएनजी जोडण्या असून त्यापैकी ९.४६ लाख जोडण्या राज्यात आहेत.

# वाहतूक व दळणवळण

९.३७ देशाचा सामाजिक व आर्थिक विकास हा बहुतांशी परिवहन व दळणवळण अशा महत्वाच्या घटकांच्या कार्यक्षम आणि पर्याप्त व्यवस्थेवर निर्भर आहे. भूपृष्ठ, जल व वायू हे परिवहन तर पोस्ट, दुरध्वनी-भ्रमणध्वनी आणि इंटरनेट सेवा हे दळणवळण व्यवस्थेतील मुख्य व आवश्यक घटक आहेत. परिवहन व दळणवळण या क्षेत्रातील नाविन्यपूर्णता व तांत्रिक प्रगती समाजास प्रचंड उपयोगी ठरलेली आहे.

## भूपृष्ठ वाहतूक

### रस्त्यांचे जाळे

९.३८ रस्त्यांच्या जाळ्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, वन विभाग, नागरी स्थानिक संस्था, कटक मंडळे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या राज्यातील रस्त्यांचा विकास करणाऱ्या यंत्रणा आहेत.

९.३९ राज्यात ३.३७ लाख किमी लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवून रस्ते विकास आराखडा २००१-२१ ची अंमलबजावणी सुरु आहे. मार्च २०१६ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळून) ३.०१ लाख किमी होती. सन २०१५-१६ मध्ये ₹ ४,७७० कोटी नियतव्यय मंजूर होता व ₹ ४,०३० कोटी खर्च झाला. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी तक्ता ९.१५ मध्ये दिली आहे. वर्षनिहाय व रस्त्यांच्या प्रकारानुसार रस्त्यांच्या लांबीची माहिती परिशिष्ट ९.२ आणि सन २०१५ व २०१६ मधील जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण परिशिष्ट ९.३ मध्ये दिले आहे.

**आलेख ९.७ : रस्ते विकास आराखड्यानुसार (२००१-२१) साध्य**




**तक्ता ९.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी**

(किमी)

| विकास मंडळ | ३१ मार्च रोजी | रस्त्यांचे प्रकार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| विदर्भ | २०१५ | १,५९९ | १,६३९ | ९,६०४ | ११,८९९ | १४,६४२ | २६,२८१ | ६५,६६४ |
| | २०१६ | २,१३४ | १,२३२ | ९,५२६ | १२,३९१ | १४,६४२ | २६,२८२ | ६६,२०७ |
| मराठवाडा | २०१५ | ८१६ | १,७५७ | ७,७७८ | ११,५२७ | १२,२५१ | ३१,३६८ | ६५,४९७ |
| | २०१६ | १,४०७ | १,४७९ | ७,६५६ | ११,५२५ | १२,२५१ | ३१,३६८ | ६५,६८६ |
| उर्वरित महाराष्ट्र | २०१५ | २,३५१ | २,७६७ | १६,४७८ | २७,१५९ | ३१,२२२ | ८८,२३० | १,६८,२०७ |
| | २०१६ | ३,८९७ | २,४६९ | १६,१४८ | २६,९२८ | ३१,२२३ | ८८,२३१ | १,६८,८९६ |
| **एकूण** | **२०१५** | **४,७६६** | **६,१६३** | **३३,८६०** | **५०,५८५** | **५८,११५** | **१,४५,८७९** | **२,९९,३६८** |
| | **२०१६** | **७,४३८** | **५,१८०** | **३३,३३०** | **५०,८४४** | **५८,११६** | **१,४५,८८१** | **३,००,७८९** |

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

## केंद्रीय रस्ते निधी

९.४० राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते, राज्य रस्ते (आर्थिक दृष्ट्या महत्वपूर्ण ठरणारे - आंतरराज्य जोडणीसाठी चालना देणारे) आणि जिल्हा रस्ते यांचा विकास करणे, देखभाल दुरुस्ती करणे तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी उड्डाण पूल व भूयारी मार्ग बांधणे आणि निर्मनुष्य रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती कामे करणे यासाठी केंद्र शासनाने २००१-०२ पासून केंद्रीय रस्ते निधी ही योजना कार्यान्वीत केली असून त्याद्वारे निधीचे वाटप व वितरण करण्यात येते. केंद्रीय रस्ते निधी योजनेची प्रगती तक्ता ९.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१६ राज्यातील केंद्रीय रस्ते निधी योजनेची प्रगती**

| वर्ष | मंजूर कामे (संख्या) | मंजूर लांबी (किमी) | मंजूर रक्कम (₹ कोटी) | कामे (संख्या) | | पूर्ण झालेल्या रस्त्यांची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रगतिपथावर | पूर्ण | | |
| २०१२-१३ पर्यंत$ | ७०७ | ७,०४४.६८ | २,४६९.६६ | १० | ६९५ | ७,०४४.६८ | २,५७२.८५ |
| २०१३-१४ | ६ | ४८.३५ | ८४.०० | २ | ४ | ४८.३५ | ७९.११ |
| २०१४-१५ | ३३ | २५७.२९ | ३९०.८९ | २१ | १२ | २४३.६२ | २८०.०३ |
| २०१५-१६ | ८६ | ९७७.८७ | १,७९६.६८ | ८५ | ० | ३१६.३० | ३५२.४० |
| २०१६-१७+ | १७० | १,२३३.६३ | ३,१०६.३९ | १५८ | ० | ६.५० | २३७.०६ |
| **एकूण** | **१,००२** | **९,५६१.८२** | **७,८४७.६२** | **२७६** | **७११** | **७,६५९.४५** | **३,५२१.४५** |

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन $ २००१-०२ पासून + जानेवारी पर्यंत

## प्रधान मंत्री ग्राम सडक योजना

९.४१ ग्रामीण भागामध्ये ५०० व अधिक (आदिवासी भागातील २५० व अधिक) लोकसंख्या असलेल्या तसेच रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेचा मूळ उद्देश आहे. या योजनेंतर्गत २४,४३९ किमी लांबीच्या रस्त्यांनी ८,३१५ लोकवस्त्यांना जोडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टापैकी नोव्हेंबर २०१६ पर्यंत ८,२१८ वस्त्यांना २३,१९८ किमी लांबीच्या रस्त्यांनी जोडण्यात आले आहे. प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरुवातीपासून बांधलेल्या रस्त्यांची लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या तक्ता ९.१७ मध्ये आणि योजनेची प्रगती तक्ता ९.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१७ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरुवातीपासून बांधलेल्या रस्त्यांची लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या**

| विकास मंडळ | भौतिक लक्ष्य | | संचयी भौतिक साध्य+ | |
|---|---|---|---|---|
| | रस्त्याची लांबी (किमी) | लोकवस्त्या (संख्या) | रस्त्याची लांबी (किमी) | जोडलेल्या लोकवस्त्या (संख्या) |
| विदर्भ | ७,७८२ | २,९२१ | ७,३५१ (९४) | २,८५८ (९८) |
| मराठवाडा | ५,०२६ | १,८६३ | ४,९१९ (९८) | १,८४८ (९९) |
| उर्वरित महाराष्ट्र | ११,६३१ | ३,५३१ | १०,९२८ (९४) | ३,५१२ (९९) |
| **एकूण** | **२४,४३९** | **८,३१५** | **२३,१९८ (९५)** | **८,२१८ (९९)** |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन कंसातील आकडेवारी भौतिक लक्ष्याशी टक्केवारी दर्शवते. + नोव्हेंबर २०१६ पर्यंत

९.४२ ज्या राज्यांनी लक्ष्याच्या तुलनेत लोकवस्त्या जोडणीची १०० टक्के व रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची ७५ टक्के कामे पूर्ण केली त्या राज्यांसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग-II (केंद्र शासन ६० टक्के व राज्य शासन ४० टक्के हिस्सा) मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत केवळ रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची कामे घेता येतात. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने राज्यासाठी २,६२० किमी रस्ते लांबीचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे.

**तक्ता ९.१८ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेची प्रगती**

| वर्ष | जोडलेल्या लोकवस्त्या (संख्या) | निर्मित रस्त्याची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | १५५ | ३६७ | ४१०.०० |
| २०१५-१६ | २२० | ३१८ | २५८.०० |
| २०१६-१७+ | १९ | ६७ | ६३.२९ |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर पर्यंत

### मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

९.४३ राज्यातील न जोडलेल्या वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी २८ ऑक्टोबर २०१५ पासून राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना कार्यान्वीत झाली. सन २०१५-१६ व २०१६-१७ करीता या योजनेंतर्गत ७,२०० किमी ग्रामीण रस्त्यांच्या लांबीचे भौतिक उद्दीष्ट ठेवण्यात आले असून आतापर्यंत एकूण ₹ २२१.१० कोटी खर्च झाला आहे.

## मुंबई - नागपूर समृध्दी कॉरिडॉर

९.४४ प्रस्तावित मुंबई - नागपूर समृध्दी कॉरिडॉर हा ७१० किमी लांब व १२० मी रुंद असा २४ जिल्ह्यांना जोडणारा आठ पदरी द्रुतगती महामार्ग १० जिल्हे, ३० तालुके व ३५४ गावांमधून जाणारा असून या महामार्गामुळे मुंबई - नागपूर अंतर सहा तासांत गाठता येईल. हा महामार्ग ज्या ठिकाणी राज्य मार्ग/ राष्ट्रीय महामार्गास छेदेल तेथे नाविन्यपूर्ण व सुनियोजीत 'कृषी समृध्दी केंद्राची' उभारणी करण्याची कल्पना असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचे ध्येय आहे. हा महामार्ग बुटीबोरी, वर्धा, अमरावती, जालना, चिकलठाणा, शेंद्रा, वाळूज व सिन्नर या औद्योगिक स्थळांना तर सेवाग्राम, कारंजा(लाड), लोणार, सिंदखेडराजा, वेरुळ व शिर्डी या पर्यटन स्थळ व तीर्थक्षेत्रांना जोडेल. या प्रकल्पावर एकूण ₹ ४०,००० कोटी खर्च अपेक्षित आहे.

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

९.४५ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने १९ प्रकल्प पूर्ण केले असून त्यावर ऑक्टोबर २०१६ अखेर ₹ ७,७६५ कोटी खर्च झाला. ऑक्टोबर २०१६ अखेर पूर्ण झालेल्या व अंशत: पूर्ण झालेल्या प्रकल्पांवरील ₹ ८,७०० कोटी खर्चाच्या तुलनेत टोल वसूलीची एकूण रक्कम सुमारे ₹ ७,०४९ कोटी होती. महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१९ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती**

(ऑक्टोबर २०१६ पर्यंत)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची अंदाजे किंमत (₹ कोटी) | प्रकल्पांवर झालेला खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| पश्चिम मुक्तमार्ग सागरी सेतू | १९९८-९९ | ४,१४३ | १८.५८ | उना |
| रस्त्यांची कामे - | | | | |
| नागपूर | २००१-०२ | ४२२ | ४९४.३३ | २०१६-१७ |
| औरंगाबाद | २००१-०२ | १४२ | ३२६.६० | २०१६-१७ |
| मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी) | २००३-०४ | ४७२ | ३२१.०६ | २०१६-१७ |
| मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) | २००५-०६ | ३९३ | १६८.०१ | २०१६-१७ |
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | २००७-०८ | ४,४१९ | १६.५७ | उना |
| नागपूर-काटोल-जलालखेडा रस्त्याचे रुंदीकरण | २००८-०९ | ३१ | ४.०८ | २०१६-१७ |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | २००८-०९ | १,००० | ५०.१३ | उना |
| विस्तारीत - एमयुआयपी | २००८-०९ | २,०६५ | ४३३.६० | २०१६-१७ |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाची क्षमता वाढ | २००९-१० | ५,००० | १४.९८ | २०१९-२० |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गास संलग्न सोई-सुविधा | २०१४-१५ | २०० | २.३० | २०१६-१७ |
| पेडर रोड उड्डाणपूल | २०१२-१३ | ३८० | उना | उना |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उना - उपलब्ध नाही

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

९.४६ मुंबई महानगर प्रदेशात आठ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा आणि ठाणे व रायगड जिल्ह्यातील सुमारे एक हजार गावांचा समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) विविध पायाभूत प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई मेट्रो रेल प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येणारा सामुहिक शीघ्र वाहतूक व्यवस्था प्रकल्प आहे. एमएमआरडीए मार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची माहिती तक्ता ९.२० मध्ये दिली आहे.

## तक्ता ९.२० मुंबई महानगर क्षेत्रात सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्यस्थिती

(₹ कोटी)

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | ऑक्टोबर २०१६ पर्यंत खर्च | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| **मुंबई मेट्रो रेल प्रकल्प $ :** | | | | | |
| **टप्पा - II अ** : दहिसर - डी. एन. नगर (१८.६ किमी) | २०१६ | ६,४१० | १.०० | २०२०-२१ | काम प्रगतिपथावर |
| **टप्पा - III** : कुलाबा - वांद्रे - सीप्झ (३३.५ किमी) | २०१५ | २३,१३६ | १४०.०० | २०२०-२१ | स्थापत्य कामे प्रगतिपथावर |
| **टप्पा - IV** : वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | २०१६ | १४,५४९ | -- | २०२१-२२ | स्थापत्य कामांसाठी कंत्राटदाराच्या नेमणूकीची निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर |
| **टप्पा - VII** : अंधेरी (पू.) - दहिसर (पू.) (१६.५ किमी) | २०१६ | ६,२०८ | ६२.१३ | मार्च २०१९ | स्थापत्य कामे प्रगतिपथावर |
| **मुंबई मोनो रेल प्रकल्प :** | २००८ | २,४६० | २,३३७.०० | मार्च २०१७ | |
| पहिला टप्पा - वडाळा ते चेंबूर (८.९३ किमी) आणि | | | | | (i) पहिला टप्पा पूर्ण |
| दुसरा टप्पा - संत गाडगेमहाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा (११.२० किमी) | | | | | (ii) दुस-या टप्प्यातील ९८ टक्के काम पूर्ण |
| **एमयूआयपी** : रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, इ. (१८ रस्ते) | २००३ | ३,२०७ | ४,७५७.४१ | एप्रिल २०१८ | (i) सर्व रस्ते पूर्ण<br>(ii) उर्वरित कामे प्रगतीपथावर |
| वांद्रे-कुर्ला संकुल (जी-ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नत मार्ग बांधणे. | | | | डिसेंबर २०१७ | वांद्रे-कुर्ला संकुलाजवळ, मिठी नदी, कॉलनी मार्ग व सोमय्या मैदान येथे काम प्रगतीपथावर |
| **विस्तारित एमयुआयपी :** | | | | | |
| **टप्पा - I व II** :३५ उप प्रकल्प (२७६ किमी रस्ते, १८ उड्डाणपूल, ३ खाडीपूल व २ रेल्वे मार्गावरील पूल) | २००७ | २,६०७ | २,१९३.५७† | मे २०१८ | (i) २१४ किमी रस्ते पूर्ण<br>(ii) सात उड्डाणपूल पूर्ण,<br>(iii) उर्वरित कामे प्रगतीपथावर |
| **टप्पा - ३** : १७ उप प्रकल्प (३२ पूल, ३ भुयारी मार्ग व १३३ किमी रस्ते) | | ३,६२९ | | मे २०१८ | (i) १० कामे प्रगतीपथावर<br>(ii) उर्वरीत कामांची निविदा पूर्व प्रक्रिया सुरु |
| **मल्टी मोडल कॉरिडोर विरार ते अलिबाग** : वाहनांसाठी ८ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला खुला मार्ग बांधणे (१२६ किमी) | २०१० | ९,५००@ | ९.३२ | डिसेंबर २०२३ | भुसंपादन व अन्य कामे प्रगतीपथावर |
| **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक** : शिवडी ते न्हावा सागरी सेतू (२२ किमी) | २०११ | १७,८४३ | ३६.९९ | डिसेंबर २०२१ | सल्लागाराची व कंत्राटदाराची नेमणूक करणेकरीता स्वतंत्र निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहेत. |

एमयुआयपी : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, $ टप्पा-१: वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (१४ किमी) चे काम पूर्ण

@ भूसंपादनावरील खर्च वगळून † टप्पा-३ सह

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## मोटार वाहने

९.४७ राज्यात १ जानेवारी २०१७ रोजी एकूण २.९ कोटी मोटार वाहने (दर लाख लोकसंख्येमागे २४,४११ वाहने) वापरात होती, जी मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे आठ टक्क्यांनी जास्त होती. राज्यातील एकूण वाहनांपैकी २९.७ लाख (१०.१ टक्के) वाहने बृहन्मुंबईत होती. राज्यात प्रति किमी रस्त्यावरील वाहनांची सरासरी संख्या ९८ आहे. वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या तक्ता ९.२१ मध्ये आणि वापरात असलेल्या मोटार वाहनांची वर्षनिहाय मालिका परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२१ वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या**

('०००)

| प्रकार | १ जानेवारी रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | | बृहन्मुंबई | | |
| | २०१६ | २०१७* | शेकडा बदल | २०१६ | २०१७* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | १९,८८१.५ | २१,४७६.७ | ८.० | १,५९१.८ | १,७२५.१ | ८.४ |
| ऑटो रिक्षा | ७२६.१ | ७४४.२ | २.५ | ११९.५ | १२१.२ | १.४ |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ४,०७४.८ | ४,४३३.४ | ८.८ | ९३९.८ | १,०२७.१ | ९.३ |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, स्कुल बसेस आणि पीएसव्ही) | ११५.५ | १२७.७ | १०.६ | १३.५ | १४.४ | ६.७ |
| माल मोटारी {आर्टीक्युलेटेड/मल्टी ऍक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलेव्हरी व्हॅन्स (३ व ४ चाकी), इ.} | १,४२२.८ | १,५०५.२ | ५.८ | ७०.९ | ७५.७ | ६.८ |
| ट्रॅक्टर्स | ६०३.६ | ६३९.२ | ५.९ | ०.२ | ०.२ | ०.० |
| ट्रेलर्स | ३८४.५ | ३९६.२ | ३.० | ०.१ | ०.१ | ०.० |
| रूग्णवाहिका | १४.३ | १५.० | ४.९ | १.६ | १.७ | ६.२ |
| इतर वाहने | ४७.० | ५६.८ | २०.९ | १.२ | १.३ | ८.३ |
| **एकूण** | **२७,२७०.१** | **२९,३९४.४** | **७.८** | **२,७३८.६** | **२,९६६.८** | **८.३** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन    पीएसव्ही - सार्वजनिक सेवा वाहने    * अस्थायी

९.४८ मार्च २०१६ अखेर मोटार वाहने चालविण्याच्या वैध परवान्यांची संख्या तीन कोटी होती जी मागील वर्षाच्या तुलनेत ३.३ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात मार्च २०१६ अखेर २५ लाख शिकाऊ परवाने देण्यात आले.

९.४९ राज्यामध्ये दरवर्षी ब्रीद वाक्यावर आधारित रस्ता सुरक्षाविषयक विविध पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात येतात. राज्यात प्रति दहा हजार वाहनांमागे २०१६ मध्ये झालेल्या अपघातांची संख्या १४ होती. राज्य व बृहन्मुंबईतील अपघात, मृत व जखमी व्यक्तींविषयक आकडेवारी तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.८ : राज्यातील रस्ते अपघातातील मृत आणि जखमी व्यक्तींची संख्या**




**तक्ता ९.२२ राज्य व बृहन्मुंबईतील अपघात, मृत व जखमी व्यक्तींविषयक आकडेवारी**

| वर्ष | अपघातांची संख्या | | मृत व्यक्तींची संख्या | | | जखमी व्यक्तींची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | बृहन्मुंबई | राज्य | बृहन्मुंबई | टक्केवारी@ | राज्य | बृहन्मुंबई | टक्केवारी@ |
| २०१४ | ६१,६२७$ | २२,५५७$ | १२,८०३ | ५२९ | ४.१ | ४०,४५५ | ३,९३६ | ९.७ |
| २०१५ | ६३,८०५$ | २३,३४७$ | १३,२१२ | ५२० | ३.९ | ३९,६०६ | ४,०३७ | १०.२ |
| २०१६ | ३९,८४८# | ३,३४९# | १२,८८३ | ५१० | ४.० | ३५,८९४ | ३,५३२ | ९.८ |

$ नोंदवलेले सर्व अपघात    # फक्त गुन्हा नोंदवलेले अपघात    @ बृहन्मुंबईची राज्याशी

*आधार :* अतिरिक्त पोलिस महासंचालक (वाहतूक) यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.५० महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (मरामाप) महामंडळाकडे ३१ मार्च २०१६ रोजी केंद्र व राज्य शासनाचे भागभांडवल अनुक्रमे ₹ ५६.७७ कोटी व ₹ १,३४१.२१ कोटी होते. मरामाप महामंडळाने २०१५-१६ या वर्षात प्रतिदिन सरासरी ६७.१० लाख प्रवासी वाहतूक केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सार्थ किमी वाहतूक सुमारे ०.५ टक्क्यांनी वाढली असून मार्गस्थ गाड्यांचे सरासरी भारमान (सवलतीच्या रकमेसह) १.३ टक्के बिंदूंनी कमी झाले आहे. ग्रामीण, वातानुकूलित व शहरी वाहतुकीच्या प्रवासी उत्पन्नावर ३१ मार्च २०१६ रोजी प्रवासी कराचा दर अनुक्रमे १७.५ टक्के, ५.५ टक्के व ३.५ टक्के होता. मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली गावे आणि लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.२३ आणि मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली गावे आणि लोकसंख्या**

(टक्के)

| विवरण | गावे | | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| थेट जोडलेली | ७३.८ | ७४.५ | ९०.४ | ९१.१ |
| ३ किमीपर्यंत | १६.४ | १५.७ | ६.३ | ५.९ |
| ३ ते ५ किमीपर्यंत | ५.६ | ५.६ | १.९ | १.७ |
| ५ किमीपेक्षा अधिक | ४.२ | ४.२ | १.४ | १.३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**तक्ता ९.२४ मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २०१४-१५ | २०१५-१६ | शेकडा बदल | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|
| एकूण ताब्यातील वाहने | १७,९५७ | १८,५१४ | ३.१ | १८,७२६ |
| मार्गस्थ बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | १६,७०२ | १६,९८१ | १.७ | १६,८२९ |
| एकूण कर्मचारी | १,०७,५०० | १,०५,६७९ | (-)१.७ | १,०३,४६७ |
| प्रतिदिन सरासरी सार्थ किमी (लाख) | ५७.१२ | ५७.३९ | ०.५ | ५६.७६ |
| प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या (लाख) | ६७.२८ | ६७.१० | (-)०.३ | ६५.३२ |
| वाहन उत्पादकता (किमी) | ३१८.०९ | ३१०.०१ | (-)२.५ | ३०३.११ |
| प्रति दहा लिटर डिझेल मागे किमीचे प्रमाण | ४७.६३ | ४७.६२ | (-)०.०२ | ४७.५५ |
| चालक-वाहक उत्पादकता (किमी) | २२७.६१ | २२९.४० | ०.८ | २१६.६ |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (मार्गस्थ वाहनांच्या आधारे)# | ६.४४ | ६.२२ | (-)३.४ | ६.१९ |
| सरासरी आसन क्षमता | ४३.९५ | ४३.७१ | (-)०.५ | ४३.०० |
| भारमान (लोड फॅक्टर) (सवलतीच्या रकमेशिवाय) टक्के | ५७.१६ | ५५.७१ | (-)१.५@ | ५५.३६ |
| भारमान (लोड फॅक्टर) (सवलतीच्या रकमेसह) टक्के | ७०.८६ | ६९.६० | (-)१.३@ | ६८.७२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ  # ३१ मार्च रोजी  @ बिंदू  + जानेवारी पर्यंत

९.५१ नियमित वाहतुकीशिवाय मरामाप महामंडळ यात्रा व नैमित्तिक करार तत्वावर विशेष वाहतूक सेवा पुरविते. यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२५ यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| विवरण | यात्रा | | नैमित्तिक करार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१४-१५ | | | २०१५-१६ | | |
| | २०१४-१५ | २०१५-१६ | सवलतीत | विना-सवलतीत | एकूण | सवलतीत | विना-सवलतीत | एकूण |
| सार्थ किमी (लाख) | १९९.४९ | १९६.३७ | १३६.८० | १०८.८५ | २४५.६५ | १२५.०९ | ६४.७३ | १८९.८२ |
| प्राप्त उत्पन्न (₹ लाख) | ६,१५०.१२ | ५,९२४.४५ | ३,४२९.७७ | ६,५५४.७३ | ९,९८४.५० | ३,११४.८० | ३,३३४.०० | ६,४४८.८० |
| प्रति किमी उत्पन्न (₹) | ३०.८३ | ३०.१७ | २५.०७ | ६०.२२ | ४०.६५ | २४.९० | ५१.५१ | ३३.९७ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.५२ मरामाप महामंडळ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले), कर्क रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इ. प्रवाशांना बस भाड्यात सवलत देते. सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. सन २०१५-१६ मध्ये मरामाप महामंडळाने दिलेल्या सवलतीची रक्कम ₹ १,३५४ कोटी होती. एप्रिल २००९ ते मार्च २०१६ पर्यंत महामंडळास व्याज देय भांडवली अंशदान म्हणून ₹ १,८०५.०१ कोटी प्राप्त झालेले आहेत. मरामाप महामंडळाची वित्तीय स्थिती तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.९ : मरामापम-प्रति किमी मिळकत आणि प्रति किमी खर्च**




**तक्ता ९.२६ मरामाप महामंडळाची वित्तीय स्थिती**

(₹ कोटी)

| विवरण | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| (अ) जमा (महसूल) | | | |
| (i) प्रवासी वाहतुकीपासून | ६,५१९.८४ | ७,०६१.६९ | ७,०६९.२८ |
| (ii) इतर | २१७.७० | १९६.९७ | २१५.२० |
| **एकूण** | **६,७३७.५४** | **७,२५८.६६** | **७,२८४.४८** |
| (ब) खर्च | | | |
| (i) प्रवासी, मोटार वाहने, महापालिका कर व जकात | ८६२.९८ | ९३२.८५ | ९१५.१५ |
| (ii) घसारा | ४०८.१७ | ३७३.०० | ३५४.६६ |
| (iii) इतर | ६,०६०.५९ | ६,५९४.४१ | ६,१९७.४३ |
| **एकूण** | **७,३३१.७४** | **७,९००.२६** | **७,४६७.२४** |
| नफा (अ - ब) | (-)५९४.२० | (-)६४१.६० | (-)१८२.७६ |
| मागील ताळमेळ | २१.५५ | २५०.६० | ६०.८७ |
| निव्वळ नफा | (-)५७२.६५ | (-)३९१.०० | (-)१२१.८९ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.५३ मरामाप महामंडळाने सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ करीता अनुक्रमे ₹ १३३ कोटी, ₹ १४६ कोटी व ₹ १२३ कोटी टोल रक्कम अदा केली. अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई**

| विवरण | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| अपघातांची संख्या | ३,१५४ | ३,१७२ | २,९२० |
| मृत व्यक्तींची संख्या | ५३३ | ४९४ | ४४५ |
| जखमी व्यक्तींची संख्या | ६,३६६ | ६,२७६ | ५,२१३ |
| दर लाख किमी मागे अपघात | ०.१५ | ०.१५ | ०.१४ |
| घटनास्थळी दिलेली रक्कम (₹ लाख) | ३७.२७ | ६२.५७ | ५०.५५ |
| अंतिम भरपाई (₹ लाख) | ३,७७८.२१ | ४,६०७.२४ | ७,०८३.५८ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## शहरी सार्वजनिक प्रवासी वाहतूक

९.५४ सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील प्रवासी वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. राज्यातील २३ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरात (औरंगाबाद, नांदेड, नाशिक, सांगली-मिरज, रत्नागिरी, चंद्रपूर आणि वसई-विरार-नालासोपारा) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (मरामापम) प्रवासी वाहतूक सेवा पुरविते. बृहन्मुंबईत बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट), पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) आणि उर्वरित १३ शहरात संबंधित नगरपरिषद/ महानगरपालिका प्रवासी वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक प्रवासी वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ शहरी सार्वजनिक प्रवासी वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी**

(३१ मार्च रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ वाहनांची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | | निव्वळ नफा /तोटा (₹ लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१५ | २०१६ | २०१५ | २०१६ | २०१५ | २०१६ |
| बेस्ट | ३,६३६ | ३,४६६ | ३३.४७ | २८.९९ | ६.६८ | ६.४० | (-)८५,८०२ | (-)१,०६,१९२ |
| पीएमपीएमएल | १,३६४ | १,४४७ | १२.१७ | ११.२४ | ३.१४ | ३.१३ | (-)१६,७६९ | (-)१५,१८१ |
| मरामापम (शहर वाहतूक) | ४८२ | ४८५ | २.४४ | २.४० | ०.९१ | ०.८९ | (-)२,६८८ | (-)२,२७१ |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २४० | २४० | १.३५ | १.२४ | ०.४२ | ०.४३ | (-)२,५३४ | (-)२,४४० |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | २४३ | २५७ | २.१९ | २.३१ | ०.६७ | ०.७२ | (-)३,२०९ | (-)४,१५९ |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | १७४ | १९२ | १.७१ | १.५७ | ०.३५ | ०.३६ | (-)३,७९६ | उना |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | ९२ | १०१ | ०.७१ | ०.६० | ०.२१ | ०.२४ | (-)८६ | (-)६९२ |
| वसई-विरार महानगरपालिका परिवहन | ११० | ११५ | ०.८५ | ०.८५ | ०.२२ | ०.२४ | (-)११८ | (-)१४० |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | ७५ | ८३ | ०.४० | ०.४६ | ०.१३ | ०.१६ | (-)१,७६४ | (-)१,२१६ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | ७० | ९६ | ०.४७ | ०.७२ | ०.१६ | ०.२३ | (-)८०१ | (-)५०२ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | ३९ | ३० | ०.२४ | ०.१९ | ०.०९ | ०.०५ | (-)२१६ | (-)३१० |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | ३३ | ३३ | ०.३५ | ०.२८ | ०.०८ | ०.०८ | ७ | ७ |
| अहमदनगर महानगरपालिका परिवहन | - | १८ | - | ०.११ | - | ०.०२ | - | (-)७२ |
| खोपोली नगरपालिका परिवहन | ११ | १३ | ०.३९ | ०.४३ | ०.२ | ०.२ | २ | १२ |

*आधार :* बेस्ट, संबंधित नगरपालिका / महानगरपालिका, पुणे महानगर परिवहन महामंडळ व मरामाप महामंडळ — उना उपलब्ध नाही

## एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरण

९.५५ मुंबई महानगरातील सार्वजनिक परिवहन कार्यप्रणाली उंचावणे व परिवहनाच्या विविध समस्यांचे निवारण करणे यासाठी एकीकृत मुंबई महानगर परिवहन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. याअंतर्गत मुंबई महानगरातील प्रवाशांना एकसंघ प्रवास करणे शक्य व्हावे यादृष्टीने एमएमआरडीएने एकात्मिक तिकीट यंत्रणा प्रकल्पाच्या माध्यमातून 'राष्ट्रीय सामायिक भ्रमण कार्ड (*नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड*)' ची अंमलबजावणी प्रस्तावित केली आहे.

## रेल्वे

९.५६ भारतात रेल्वे ही अतिशय परिणामकारक अशी मोठ्या प्रमाणावरील वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक हे रेल्वेचे दोन प्रमुख भाग आहेत. राज्यातील लोहमार्गाची ३१ मार्च २०१६ रोजी एकूण लांबी ६,१२७ किमी (कोकण रेल्वेच्या ३८१ किमी लांबी सह) भारतातील एकूण (६६,६८८ किमी) लांबीच्या ९.२ टक्के एवढी होती. राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्यस्थिती तक्ता ९.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२९ राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्यस्थिती**

(३१ ऑक्टोबर २०१६ रोजी)

| मार्गाचे नाव | मार्गाची लांबी (किमी) | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| अहमदनगर-नारायणडोह-बीड-परळी-वैजनाथ | २६१ | २,८२६.०० | एकूण कामाची भौतिक प्रगती १२ टक्के |
| बारामती - लोणंद (नवीन मार्ग) | ५४ | ७३६.४४ | एकूण कामाची भौतिक प्रगती ५० टक्के |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्ग) | २७ | १,७८१.९८ | एकूण कामाची भौतिक प्रगती ४५ टक्के |
| वर्धा - नांदेड (नवीन मार्ग) | २८४ | २,४९१.४३ | एकूण कामाची भौतिक प्रगती ६ टक्के |
| पनवेल - पेण (दुपदरीकरण) | ३५ | २६०.१६ | एकूण कामाची भौतिक प्रगती ९८ टक्के |
| पेण - रोहा (दुपदरीकरण) | ४० | ३७५.०० | एकूण कामाची भौतिक प्रगती ९५ टक्के |
| गोधानी-कलमुना (दुपदरीकरण) | १३ | ५९.१३ | काम पूर्ण |
| कल्याण-कसारा ३ रा मार्ग (दुपदरीकरण) | ६८ | ७९२.८९ | एकूण कामाची भौतिक प्रगती ८ टक्के |
| भुसावळ-जळगांव ३ रा मार्ग (दुपदरीकरण) | २४ | १९९.१२ | एकूण कामाची भौतिक प्रगती २५ टक्के |
| वर्धा-सेवाग्राम-नागपूर ३ रा मार्ग (दुपदरीकरण) | ७६ | ५४०.०२ | एकूण कामाची भौतिक प्रगती १० टक्के |

*आधार :* दक्षिण पूर्व, मध्य, दक्षिण मध्य व पश्चिम रेल्वे आणि कोकण रेल्वे महामंडळ

## मुंबई उपनगर रेल्वे

९.५७ उपनगरीय रेल्वे हे मुंबईमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा पश्चिम रेल्वे (३७ स्थानके) आणि मध्य रेल्वे (६२ स्थानके) यांद्वारे चालविली जाते. हार्बर मार्गावर ३८ स्थानके असून हा मध्य रेल्वेचा भाग आहे. दर दिवशी एकूण २०५ गाड्यांच्या ताफ्याने २,८५५ फेऱ्यांद्वारे सरासरी ७६.३ लाख प्रवाशांची वाहतूक केली जाते. मुंबई उपनगरीय रेल्वेतील अपघाती मृत्यु व जखमींची (कारणनिहाय) संख्या तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० मुंबई उपनगरीय रेल्वेतील अपघाती मृत्यु व जखमींची (कारणनिहाय) संख्या**

| अपघाताचे कारण | २०१४ | | २०१५ | | २०१६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मृत्यु | जखमी | मृत्यु | जखमी | मृत्यु | जखमी |
| रुळ ओलांडतांना | १,९१२ | ४८६ | १,८०१ | ४६८ | १,७९८ | ३७९ |
| रेल्वे व फलाट दरम्यान पडून | ३४ | ३९ | ४० | २६ | १३ | १९ |
| रेल्वेमधून पडून | ७९७ | १,७१४ | ८०६ | १,६९७ | ६५७ | १,४९८ |
| रेल्वेच्या खांबांना धक्का लागून | ११ | ७७ | १३ | ८९ | ८ | ८५ |
| अन्य $ | ६६९ | ९८३ | ६४४ | १,०६९ | ७२६ | १,३८२ |
| **एकूण** | **३,४२३** | **३,२९९** | **३,३०४** | **३,३४९** | **३,२०२** | **३,३६३** |

$ विजेचा धक्का लागून, आत्महत्या, नैसर्गिक मृत्यु, रासायनिक प्रयोगशाळेकडे संदर्भित केलेली प्रकरणे, इत्यादी.

*आधार* : मुंबई लोहमार्ग पोलिस आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

९.५८ मुंबई रेल्वे विकास महामंडळ, एमयुटीपी II मधील रेल्वे मार्गाची कामे करीत आहे. एमयुटीपी II अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३१ एमयुटीपी II अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती**

(३१ जानेवारी २०१७ रोजी)

| प्रकल्पाचे नाव | काम सुरु झाल्याचे वर्ष | मार्गिकेची लांबी (मार्ग किमी) | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | भौतिक प्रगती | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| सीएसटी-कुर्ला (अतिरिक्त ५वा व ६वा मार्ग) | २००८-०९ | १५.३९ | ८९१ | ३८.७६ | काम प्रगतीपथावर | मार्च २०२१ |
| ठाणे-दिवा (अतिरिक्त ५वा व ६वा मार्ग) | २००८-०९ | ९.४४ | ४४० | २४७.२४ | ६९ टक्के काम पूर्ण | मार्च २०१९ |
| मुंबई सेंट्रल-बोरीवली (अतिरिक्त ६वा मार्ग) | २००८-०९ | २९.५० | ९१९ | १९८.३१ | १७ टक्के काम पूर्ण | मार्च २०२१ |
| अंधेरी - गोरेगाव (हार्बर मार्गाचा विस्तार) | २००८-०९ | ५.०७ | २१४ | १८६.१४ | ७५ टक्के काम पूर्ण | मे २०१७ |
| हार्बर मार्गावर १२ डब्यांची उपनगरी रेल्वे चालविणे | २०१२-१३ | ६१.१३ | | | | |
| अ) १५३ रेल्वे डब्यांची खरेदी | | | ५१९ | -- | प्रक्रिया सुरु | २०१८ |
| ब) १२ डब्यांसाठी फलाटांची लांबी वाढविणे | | | १९५ | ११२.२८ | ७५ टक्के काम पूर्ण | मार्च २०१७ |

*आधार* : मुंबई रेल्वे विकास महामंडळ

## नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

९.५९ सिडकोने सहा मेट्रोरेल मार्गिकांचा टप्प्या-टप्प्याने विकास करण्याचे निश्चित केले आहे. पहिल्या टप्प्यातील सीबीडी बेलापूर-पेंधर-तळोजा एमआयडीसी-कळंबोली-खांदेश्वर-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गिकेचे काम तीन टप्प्यात अंमलात येईल. यापैकी, पहिल्या टप्प्याचे सीबीडी बेलापूर-पेंधर (११.१ किमी) चे काम प्रगतीपथावर आहे (अंदाजित खर्च ₹ ३,०४३ कोटी).

## नागपूर मेट्रो रेल प्रकल्प

९.६० नागपूर मेट्रो रेल प्रकल्पामध्ये ३८.२१५ किमी लांबी व ३६ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण विस्तार उत्तर-दक्षिण कॉरीडॉर (१९.६५८ किमी-१७ स्थानके) व पूर्व-पश्चिम कॉरीडॉर (१८.५५७ किमी-१९ स्थानके) या दोन कॉरीडॉर्स मध्ये विभागला आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹८,६८० कोटी आहे.

## पुणे मेट्रो रेल प्रकल्प

९.६१ पुणे मेट्रो रेल प्रकल्पामध्ये ३१.२५४ किमी लांबी व ३१ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ११,५२२ कोटी आहे. हा प्रकल्प सन २०२१ मध्ये पुर्णत्वास येणे अपेक्षित आहे.

# जलवाहतूक

## मोठी बंदरे

९.६२ राज्यास ७२० किमी लांबीची समुद्र किनारपट्टी लाभली असून, त्यावर मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट द्वारे परिचालित केली जाणारी दोन मोठी बंदरे आहेत. सन २०१५-१६ मध्ये, एमबीपीटी व जेएनपीटी यांनी अनुक्रमे ६११.१० लाख मे.टन व ६४०.२७ लाख मे.टन मालाची वाहतूक केली. एमबीपीटीचे सन २०१५-१६ चे परिचालन अधिक्य ₹ ४०२.४९ कोटी होते जे मागील वर्षापेक्षा २१.३ टक्क्यांनी अधिक होते. जेएनपीटीचे वर्ष २०१५-१६ साठी परिचालन अधिक्य ₹ ९७१.९८ कोटी होते जे मागील वर्षापेक्षा १६.२ टक्क्यांनी जास्त होते. मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३२ मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | मुंबई पोर्ट ट्रस्ट | | शेकडा बदल | जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | | २०१४-१५ | २०१५-१६ | |
| **एकूण माल वाहतूक क्षमता (लाख मे.टन)** | **५०२.५०** | **५०२.५०** | - | **६५८.८०** | **७९३.७** | **२०.५** |
| कर्मचारी (संख्या) | १०,८९७ | १०,१६६ | (-)६.७ | १,६६९ | १,६३८ | (-)१.९ |
| **माल वाहतूक (लाख मे.टन)** | **६१६.६०** | **६११.१०** | **(-)०.९** | **६३८.०१** | **६४०.२७** | **०.४** |
| पैकी अ) आयात | ४०६.१६ | ४१२.९४ | १.७ | ३४२.११ | ३५०.७५ | २.५ |
| ब) निर्यात | २१०.४४ | १९८.१६ | (-)५.८ | २९५.९० | २८९.५२ | (-)२.२ |
| प्रवासी वाहतूक (हजार) | ७.९२ | ३.१८ | (-)५९.८ | लाना | लाना | लाना |
| बंदरात आलेल्या बोटी (संख्या) | ४,५८४ | ५,१६९ | १२.८ | २,६४२ | २,७८० | ५.२ |
| परिचालन उत्पन्न (₹ कोटी) | १,३९९.७८ | १,४७८.१८ | ५.६ | १,५०८.०८ | १,६६५.१ | १०.४ |
| परिचालन खर्च (₹ कोटी) | १,०६८.१० | १,०७५.६९ | ०.७ | ६७१.५१ | ६९३.१२ | ३.२ |
| परिचालन अधिक्य (₹ कोटी) | ३३१.६८ | ४०२.४९ | २१.३ | ८३६.५७ | ९७१.९८ | १६.२ |

*आधार* : मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट                    लाना लागू नाही

## लहान बंदरे

९.६३ राज्याच्या सन २०१० च्या बंदर धोरणानुसार महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड (एमएमबी) सहा लहान बंदरे विकसित करीत आहे. या बंदरांपैकी धामणखोल-जयगड, दिघी आणि लवगण-जयगड (आंग्रे बंदर) ही बंदरे कार्यान्वित झाली आहेत. रेवस-आवरे, विजयदुर्ग आणि रेडी या बंदरांची बांधकाम-पूर्व कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय, लहान बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय थांबे असून तेथेदेखील मालाची वाहतूक केली जाते. सर्व लहान बंदरांनी मिळून सन २०१६-१७ मध्ये सप्टेंबर पर्यंत १५५.५३ लाख मे.टन माल वाहतूक आणि ८०.२० लाख प्रवासी वाहतूक केली. लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३३ लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | | | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख मे. टन)** | | | **२७३.५८** | **२८८.४९** | **१५५.५३** |
| पैकी | अ) | आयात | २३०.१३ | २४४.७४ | १३०.५३ |
| | ब) | निर्यात | ४३.४५ | ४३.७५ | २५.०० |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | | | **१७८.३५** | **१८०.७२** | **८०.२०** |
| पैकी | अ) | यांत्रिकी बोटीतून | १६७.०३ | १६९.८० | ७६.५४ |
| | ब) | बिगर - यांत्रिकी बोटीतून | ११.३२ | १०.९२ | ३.६६ |

*आधार :* महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड + सप्टेंबर पर्यंत

## विमान वाहतूक

९.६४ मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित यांच्यासह भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई (सीएसआयए) च्या आधुनिकीकरणांतर्गत एकात्मिक नवीन टी २ टर्मिनल बांधण्याचा महाप्रकल्प हाती घेतला. नवीन टी २ टर्मिनल हे जागतिक दर्जाचे सुसज्ज टर्मिनल असून, त्यांची प्रतिवर्ष ४० दशलक्ष प्रवासी वाहतूक हाताळण्याची क्षमता आहे. नवीन टी २ टर्मिनलचे काम पूर्ण झाले असून, वाहतूक सुरु झाली आहे. राज्यात तीन आंतरराष्ट्रीय व आठ देशांतर्गत विमानतळे आहेत. विमानतळनिहाय प्रवासी व मालवाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३४ विमानतळनिहाय प्रवासी व मालवाहतूक विषयक सांख्यिकी**

(३१ मार्च रोजी)

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | शेकडा बदल | माल वाहतूक (मे.टन) | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | | २०१५ | २०१६ | |
| **अ) देशांतर्गत** | **३१२.११** | **३७२.१६** | **१९.२** | **२,४२,३६२** | **२,४८,५१३** | **२.५** |
| मुंबई | २५२.०५ | ३००.४६ | १९.२ | २,०७,७२० | २,०९,००३ | ०.६ |
| पुणे | ४०.६८ | ५१.७६ | २७.२ | २७,३९० | ३१,७६५ | १६.० |
| नागपूर | १३.५६ | १५.२१ | १२.२ | ५,५९५ | ५,९५८ | ६.५ |
| औरंगाबाद | ४.२४ | २.९९ | (-)२९.५ | १,२५० | १,४०६ | १२.५ |
| कोल्हापूर | नगण्य | नगण्य | - | नगण्य | नगण्य | - |
| जुहू | १.५६ | १.७४ | ११.५ | ४०७ | ३८१ | (-)६.४ |
| नांदेड | नगण्य | नगण्य | - | नगण्य | नगण्य | - |
| सोलापूर | ०.०२ | नगण्य | - | नगण्य | नगण्य | - |
| **ब) आंतरराष्ट्रीय** | **११३.७३** | **११७.०९** | **३.०** | **४,८६,९७६** | **४,९६,६८०** | **२.०** |
| मुंबई | ११२.०३ | ११३.९२ | १.७ | ४,८६,५४० | ४,९६,२४६ | २.० |
| नागपूर | ०.४५ | ०.७४ | ६४.४ | ४३६ | ४३३ | (-)०.६९ |
| पुणे | १.२३ | २.४१ | ९५.९ | - | १ | - |
| औरंगाबाद@ | ०.०२ | ०.०२ | - | - | - | - |
| **एकूण (अ + ब)** | **४२५.८४** | **४८९.२५** | **१४.८९** | **७,२९,३३८** | **७,४५,१९३** | **२.१७** |

*आधार :* भारतीय विमानतळ प्राधिकरण @ चार्टर्ड विमानाने प्रवासी वाहतूक

९.६५ राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) रिलायन्स विमानतळ विकास प्रायव्हेट लिमिटेड (आरएडीपीएल) या कंपनीस ९५ वर्षाच्या भाडे कराराने विकास, सुधारणा, कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखरेख करण्यासाठी नोव्हेंबर २००९ पासून राज्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, यवतमाळ आणि बारामती ही पाच विमानतळे दिली आहेत. या विमानतळांवरून केवळ विमानांची अनियोजित उड्डाणे होतात, याद्वारे २०१५-१६ मध्ये १,०२६ प्रवासी वाहतूक झाली.

९.६६ मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर अतिरिक्त विमानतळ उभारण्याचे प्रस्तावित असून चार टप्प्यातील या प्रकल्पाचा अपेक्षित खर्च ₹ १६,७०४ कोटी आहे.

९.६७ ओझर विमानतळ, नाशिक येथून २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये (डिसेंबर पर्यंत) अनुक्रमे ९१,५९७ मे. टन आणि ९९,३९१ मे.टन मालाची वाहतूक केली आहे.

९.६८ नागपूर येथील बहुआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळ (मिहान) प्रकल्पामध्ये सध्याच्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळामध्ये विकसीत करण्याचा समावेश आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (एमएडीसी) व एएआय यांच्या मिहान इंडीया लि. (एमआयएल) या संयुक्त भांडवली कंपनीद्वारे सदर प्रकल्प राबविण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर चे उन्नयन व आधुनिकीकरण करण्याकामी मिहान इंडीया लि. या अधिकृत संस्थेला सहाय्य करण्याच्या उद्देशाने भागीदाराची निवड करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

## दळणवळण

९.६९ टपाल, दूरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार हे दळणवळण व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. डाक सेवेबाबतची सांख्यिकी तक्ता ९.३५ मध्ये दिली आहे.

९.७० सप्टेंबर २०१६ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ४८.९४ लाख होती. दर लाख लोकसंख्येमागे दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या अनुक्रमे ४,०७६ व ९७,३४९ होती. दूरध्वनी जोडण्या व भ्रमणध्वनींची आकडेवारी तक्ता ९.३६ मध्ये दिली आहे.

९.७१ राज्यात ३० सप्टेंबर २०१६ रोजी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ४.७२ कोटी होती, जी सर्व राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.

**तक्ता ९.३५ डाक सेवेबाबतची सांख्यिकी**

(संख्या)

| बाब | क्षेत्र | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| डाक कार्यालये | ग्रामीण | ११,३६२ | ११,३६८ |
| | नागरी | १,२३९ | १,२३३ |
| | **एकूण** | **१२,६०१** | **१२,६०१** |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ३५,५७० | ४०,७२० |
| | नागरी | ८,०८७ | ७,६१६ |
| | **एकूण** | **४३,६५७** | **४८,३३६** |
| डिलिव्हरी पोस्टमेन (डाक सेवकांसह) | ग्रामीण | २०,७०६ | २०,०३७ |
| | नागरी | १४,४९८ | १४,१८१ |
| | **एकूण** | **३५,२०४** | **३४,२१८** |

*आधार :* मुख्य डाक कार्यालय, मुंबई

**तक्ता ९.३६ दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्या**

(लाख)

| सेवापुरवठादार | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | १९.४२ | ११.७४ | १८.८९ | १२.४२ | १८.४८ | १२.८९ |
| बीएसएनएल | १६.८२ | ५१.०७ | १५.३५ | ५८.५० | १४.२९ | ६२.५९ |
| भारती | ४.०९ | १६७.४६ | ४.२४ | १९२.१९ | ४.२९ | १९७.०२ |
| आयडीया/स्पाईस | -- | २५७.९६ | -- | २७५.६५ | -- | २८२.७२ |
| रिलायंस | ३.१९ | १०९.०४ | ३.३३ | ११३.७१ | ३.३८ | १०८.४९ |
| टाटा | ८.०६ | १०३.१३ | ८.१८ | ९८.८४ | ८.१८ | ९२.१६ |
| वोडाफोन | ०.२२ | २५८.६८ | ०.२७ | २७१.३५ | ०.३२ | २७४.४९ |
| एअरसेल-डिशनेट | -- | ४३.२९ | -- | ५४.६८ | -- | ५६.७९ |
| टेलिनॉर | -- | ७३.५० | -- | ८१.६३ | -- | ८१.५९ |
| **एकूण** | **५१.८०** | **१,०७५.८७** | **५०.२६** | **१,१५८.९७** | **४८.९४** | **१,१६८.७४** |

*आधार :* टेलिफोन रेग्यूलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया + सप्टेंबर पर्यंत

* * * * *

# परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७$ | १,०६५$ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | १९,२१६ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा | -- | -- | -- | -- | -- | ३,४०८ | ६,९७८ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६६ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | ६७२ | १,८२० | २,७१४ | ३,०७२ |
| **एकूण (अ-१)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **३२,३३२** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | |
| (१) राष्ट्रीय औष्णि ऊर्जा महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २,०४८@ | ४,६८६ | ६,३३६ |
| (२) अणुशक्ती महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १३७ | ६९० | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **२,१८५** | **५,३७६** | **७,०२६** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **३९,३५८** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३$ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | ९४,४८२ |
| (२) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | ५,३०२ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ५,०४५ |
| (४) नवीकरणीय ऊर्जा # | -- | -- | -- | -- | -- | ५,११८ | ८,९५८ |
| **एकूण** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९#** | **८३,०१७** | **१,१३,७८७** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४०,२३१ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २७,००१ |
| (२) कृषि | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २८,२३६ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | १३,१८२ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | १,७९५ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ.ना. | १,१९९ | १,९८३ | २,५३० |
| (७) सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | १,७५७ |
| (८) संकीर्ण | -- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | २,०११ |
| **एकूण** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,१६,७४३** |
| **ड. दरडोई विजेचा अंतिम वापर (युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | ३३९.१ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | १११.१ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण
(२) महानिर्मिती
(३) महावितरण
(४) बेस्ट
(५) टाटा पॉवर
(६) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर

उ.ना. - उपलब्ध नाही

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.
(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.
(३) # यात बंदिस्त वीज व नवीकरणीय ऊर्जेची (महावितरणला विकलेली) आकडेवारी समाविष्ट आहे.
(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे.
(५) टाटा पॉवर व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे.
(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

## परिशिष्ट ९.२

## महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | रस्ते | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | -- | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | -- | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | -- | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | -- | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | -- | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००५-०६ | ४,३६७ | -- | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ७ | २००६-०७ | ४,३६७ | -- | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ८ | २००७-०८ | ४,३६७ | -- | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ९ | २००८-०९ | ४,३६७ | -- | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| १० | २००९-१० | ४,३७६ | -- | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| ११ | २०१०-११ | ४,३७६ | -- | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| १२ | २०११-१२ | ४,३७६ | -- | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १३ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| १४ | २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| १५ | २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| १६ | २०१५-१६ | ७,४३८ | ५,१८० | ३३,३३० | ५०,८४४ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,००,७८९ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे .

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.

(३) सन २०१२-१३ पासून रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे.

# परिशिष्ट ९.३

## जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ. क्र. | जिल्हा / रूंदी (मीटर) | साध्य लांबी २०१४-१५ | | | | | साध्य लांबी २०१५-१६ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ४९ | ० | ० | ० | ४९ | ६० | -- | -- | -- | ६० |
| २ | ठाणे | ५८३ | ७७४ | ४,१४० | ४,१६० | ९,६५६ | २५० | २१३ | ९०० | २,११४ | ३,४७७ |
| ३ | पालघर | -- | -- | -- | -- | -- | २५५ | ३९१ | ३,२५९ | २,०६५ | ५,९७० |
| ४ | रायगड | ७८२ | ४८१ | २,६१४ | २,३६० | ६,२३७ | १,२०० | २६६ | २,२३७ | २,४१८ | ६,१२१ |
| ५ | रत्नागिरी | ४४९ | ८७२ | ८,०५३ | ० | ९,३७४ | ४५७ | ९१४ | ८,०२१ | ० | ९,३९२ |
| ६ | सिंधुदुर्ग | १२० | ७१३ | ७,०७० | ० | ७,९०३ | १२४ | ७८८ | ६,८८९ | ० | ७,८०१ |
| | **कोकण** | **१,९८२** | **२,८४०** | **२१,८७७** | **६,५२०** | **३३,२१९** | **२,३४६** | **२,५७२** | **२१,३०६** | **६,५९७** | **३२,८२१** |
| ७ | पुणे | ७८५ | १,२२७ | १६,६१४ | ६१ | १८,६८८ | १,२७८ | १,२४६ | १६,४५४ | १२० | १९,०९८ |
| ८ | सातारा | ३७१ | ९६९ | ८,८३८ | २,१७० | १२,३४८ | ४५१ | ९६३ | ८,८८९ | २,१५८ | १२,४६१ |
| ९ | सांगली | ४०७ | १,०४५ | ६,४४९ | ४,२४७ | १२,१४७ | ५७३ | १,०५५ | ६,३५५ | ४,२४७ | १२,२३० |
| १० | कोल्हापुर | ४४८ | ८५९ | ३,७५९ | ३,५०१ | ८,५६६ | ५९० | ८६१ | ३,७४३ | ३,५०० | ८,६९४ |
| ११ | सोलापूर | १२१० | १,०७७ | ११,८५८ | २,९२८ | १७,०७३ | १,७१० | ९२७ | ११,८५१ | २,९०८ | १७,३९६ |
| | **पश्चिम महाराष्ट्र** | **३,२२१** | **५,१७७** | **४७,५१८** | **१२,९०६** | **६८,८२२** | **४,६०२** | **५,०५२** | **४७,२९२** | **१२,९३३** | **६९,८७९** |
| १२ | अहमदनगर | १,०५० | १,३०९ | १०,९८० | ७,३०४ | २०,६६२ | ७२३ | १,२३७ | ११,२४५ | ७,५८२ | २०,७८७ |
| १३ | नाशिक | १,००३ | १,४८८ | ११,७०७ | ४,८२५ | १९,०२४ | १,२२९ | १,५४३ | ११,६५४ | ४,७१० | १९,१३६ |
| १४ | धुळे | ३९० | ५३७ | ४,४८८ | १५६ | ६,६५८ | ५५० | ५३३ | ५,४३३ | ८५ | ६,६०१ |
| १५ | नंदुरबार | १२१ | ४०४ | ४,७५६ | १,८१५ | ७,०९६ | २४८ | ४९२ | ४,४७२ | १,७९३ | ७,००५ |
| १६ | जळगाव | ५८९ | १,२७४ | ४,३४२ | ६,५२३ | १२,७२७ | ५५६ | १,२५७ | ४,४३३ | ६,४२० | १२,६६६ |
| | **उत्तर महाराष्ट्र** | **३,१५४** | **५,०१२** | **३६,२७४** | **२०,६२४** | **६६,१६६** | **३,३०६** | **५,०६२** | **३७,२३७** | **२०,५९०** | **६६,१९५** |
| १७ | औरंगाबाद | ५४३ | ६३४ | ६,९२२ | २,०१५ | १०,११४ | ६७१ | ७८७ | ७,०६१ | २,००६ | १०,५२५ |
| १८ | जालना | २८६ | ४२४ | ४,९३७ | १,७५४ | ७,४०१ | २७७ | ४२४ | ४,९३७ | १,७५६ | ७,३९४ |
| १९ | परभणी | १८१ | ५१३ | ३,७८९ | ९२९ | ५,४१२ | १८० | ५१३ | ३,७८९ | ९२९ | ५,४११ |
| २० | हिंगोली | १३९ | १९१ | ३,५०५ | १७ | ३,८५२ | ७५ | १६९ | ३,५०५ | १७ | ३,७६६ |
| २१ | नांदेड | ४३९ | ७३३ | ८,३०६ | १,८४६ | ११,३२४ | ३८४ | ७३३ | ८,३०६ | १,८४६ | ११,२६९ |
| २२ | बीड | ७४८ | ५९८ | ७,५१९ | ३,४९७ | १२,३६२ | ७८९ | ५९८ | ७,५१९ | ३,४७३ | १२,३७९ |
| २३ | उस्मानाबाद | ३८९ | ७८९ | ४,८३१ | १,४८८ | ७,४९७ | ३६० | ८०१ | ४,८३१ | १,४६७ | ७,४५९ |
| २४ | लातूर | ४०१ | ८३७ | ४,६३२ | १,६६५ | ७,५३५ | २७० | ९०१ | ४,६७१ | १,६४० | ७,४८२ |
| | **मराठवाडा** | **३,१२६** | **४,७१९** | **४४,४४१** | **१३,२११** | **६५,४९७** | **३,००६** | **४,९२६** | **४४,६१९** | **१३,१३४** | **६५,६८५** |
| २५ | बुलढाणा | ३४७ | ८२६ | २,६३५ | १,५८५ | ५,३९३ | ५६१ | ८२६ | २,६३५ | १,५८५ | ५,६०७ |
| २६ | अकोला | २८४ | ५०३ | १,५३३ | ९६८ | ३,२८८ | ३८८ | ५०३ | १,५३३ | ९३८ | ३,३९२ |
| २७ | वाशिम | २८२ | ४५० | १,११९ | १,११९ | २,९७० | २८६ | ४५० | १,११९ | १,११९ | २,९७४ |
| २८ | अमरावती | ५५५ | ९६५ | १,७९३ | ४,९०९ | ८,२२२ | ६७७ | ९६० | १,७९२ | ४,९०९ | ८,३३८ |
| २९ | यवतमाळ | ६४३ | ९२० | ४,३२७ | २,५२३ | ८,४१३ | ४८७ | ९९७ | ४,२४१ | २,५१७ | ८,२४२ |
| | **अमरावती** | **२,१११** | **३,६६४** | **११,४०७** | **११,१०४** | **२८,२८६** | **२,३९९** | **३,७३६** | **११,३२०** | **११,०९८** | **२८,५५३** |
| ३० | वर्धा | २८२ | ४२१ | १,२३१ | २,२९१ | ४,२२५ | २३४ | ४६९ | १,०९२ | २,२९८ | ४,०९३ |
| ३१ | नागपूर | ७७५ | ६५२ | ३,०९९ | ४,१२२ | ८,६४७ | ७८४ | ६३१ | ३,११८ | ४,२३८ | ८,७७१ |
| ३२ | भंडारा | ९८ | ३४७ | ३,८२१ | ९६२ | ५,२२८ | १३७ | ३६० | ३,६७३ | १,०४० | ५,२१० |
| ३३ | गोंदिया | ११३ | ४३१ | २,३२६ | २,६८३ | ५,५५२ | १०३ | ४३३ | २,३०१ | २,८०३ | ५,६४० |
| ३४ | चंद्रपुर | ३६२ | १,४८४ | २,३४५ | ३,६०० | ७,७९२ | ४१५ | ५०८ | ३,३०९ | ३,५९३ | ७,८२५ |
| ३५ | गडचिरोली | ४०३ | ६३१ | २,०४८ | २,८५३ | ५,९३५ | २५२ | ६९४ | २,२५७ | २,९१४ | ६,११७ |
| | **नागपूर** | **२,०३३** | **३,९६७** | **१४,८६९** | **१६,५१०** | **३७,३७८** | **१,९२५** | **३,०९५** | **१५,७५०** | **१६,८८६** | **३७,६५६** |
| | **महाराष्ट्र** | **१५,६२८** | **२५,३७९** | **१,७६,३८६** | **८०,८७५** | **२,९९,३६८** | **१७५८४** | **२४,४४३** | **१,७७,५२४** | **८१,२३८** | **३,००,७८९** |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ९.४

## महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने

(१ जानेवारी रोजी)

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१५ | २०१६ | २०१७** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | १,८१,५१,३८६ | १,९८,८१,४९९ | २,१४,७६,७३३ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स् | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | ३५,४६,६५३ | ३८,५०,५३० | ४१,५१,९४६ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | २,०३,१८० | २,२४,३०८ | २,८१,४९६ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | ७,१९,३४१ | ७,२६,१२० | ७,४४,२३० |
| ५ | स्टेज कॅरेजेस् | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ३७,६३० | ३८,३१८ | ३८,४८२ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | -- | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ३९,६६२ | ४३,९८५ | ५२,०५८ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | | | |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | १२,९६,११६ | १३,८८,२३१ | १४,६९,५०६ |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | ३६,९६९ | २८,५६३ | २९,३९३ |
| | (३) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | -- | -- | -- | उ.ना. | उ.ना. | ५,०९४ | ५,९७९ | ६,२६० |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | १३,६२५ | १४,३१५ | १५,०१७ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | २७,०४६ | २१,५४१ | २४,९१० |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | ११,१६३ | ११,६२९ | १२,२०० |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ३,७०,४५२ | ३,८४,४८२ | ३,९६,१६१ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ५,५७,६२२ | ६,०३,६३२ | ६,३९,२३५ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | ४३,६१० | ४६,९९७ | ५६,७५० |
| | **एकूण** | **३,११,७६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०६४** | **१,६९,८९,६५९** | **२,५०,५९,५४९** | **२,७२,७०,१२९** | **२,९३,९४,३७७** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | २१,३७४ | २२,९१६ | २४,४११ |
| | दर किमी रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | ९५ | ९१ | ९८ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | ११.६ | १२ | १२.५ |

*आधार* - परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन    * अस्थायी    उ.ना. उपलब्ध नाही.

# १०
# सामाजिक क्षेत्र



# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ आर्थिक विकासात सामाजिक क्षेत्र महत्वाची भूमिका बजावत आहे व ते सामाजिक विकास कार्यक्रमाच्या विविध पैलूंशी निगडीत आहे. नागरिकांना पिण्याचे पाणी, आरोग्य, शिक्षण, रोजगार, लोकसहभाग, दारिद्रय निर्मूलन, वंचितांना सामाजिक संरक्षण यासारख्या किमान पायाभूत सेवा पुरविण्यासाठी शासन ठोस प्रयत्न करीत आहे. 'स्मार्ट शहरे अभियान' हा केंद्र शासनाचा नागरी नुतनीकरण व आधुनिकीकरण कार्यक्रम असून या अभियानांतर्गत संपूर्ण देशातील १०० शहरांना (सुधारित लक्ष्य १०९ शहरे करण्यात आले आहे. ) नागरी सेवा-सुविधांनी युक्त व कायम राहिल असे विकसित करण्यात येत आहे. यामध्ये राज्यातील बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, सोलापूर, नागपूर, पुणे व औरंगाबाद या दहा शहरांची निवड करण्यात आली आहे.

## शिक्षण

१०.२ 'सर्वांसाठी समन्यायी व सर्व समावेशक दर्जेदार शिक्षण' हे उद्दीष्ट २०३० पर्यंत साध्य करणे हे शाश्वत विकासाचे एक ध्येय आहे. त्याचप्रमाणे सर्वांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण व परवडण्याजोगे व्यावसायिक प्रशिक्षण देणे हे सुद्धा ध्येय आहे. जनगणना २०११ नुसार राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के आहे जो राष्ट्रीय स्तरावरील साक्षरता दरापेक्षा (७३ टक्के) बराच जास्त आहे. साक्षरता दरातील स्त्री-पुरुष अंतर कालपरत्वये कमी झाल्याचे दिसून येते.

**आलेख १०.१ : राज्यातील साक्षरता दर**




## शालेय शिक्षण

१०.३ प्राथमिक शिक्षणातील प्राथमिक स्तर (१ ली ते ५ वी ) व उच्च प्राथमिक स्तर (६ वी ते ८ वी ) हा शैक्षणिक मनोऱ्याचा पाया आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी विद्यार्थ्यांना शालेय सुविधा सोईस्कर अंतरावर उपलब्ध असणे गरजेचे आहे. सन २०१५-१६ मध्ये राज्य शासनाचा प्राथमिक शिक्षणावरील खर्च ₹ १८,८६२ कोटी आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च ₹ १५,७१९ कोटी इतका होता. शैक्षणिक संस्था व त्यातील पटसंख्या तक्ता १०.१ मध्ये तर विभागनिहाय आकडेवारी परिशिष्ट १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ शैक्षणिक संस्था आणि त्यातील पटसंख्या**

(पटसंख्या आणि शिक्षकांची संख्या हजारात)

| वर्ष | प्राथमिक (१ ली ते ८ वी) | | | | | माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळांची संख्या | पटसंख्या | | शिक्षकांची संख्या | विद्यार्थी शिक्षक प्रमाण | शाळांची संख्या | पटसंख्या | | शिक्षकांची संख्या | विद्यार्थी शिक्षक प्रमाण |
| | | एकूण | पैकी मुली | | | | एकूण | पैकी मुली | | |
| २०१५-१६ | ९८,२१९ | १६,०४४ | ७,५१९ | ५१५ | ३१.१ | २५,०२९ | ६,४२४ | २,९२४ | २२० | २९.२ |
| २०१६-१७* | १,०४,९७० | १५,९८६ | ७,४९० | ५३० | ३०.० | २५,७३७ | ६,६१५ | ३,०१३ | २१३ | ३१.१ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद * अस्थायी

## सर्व शिक्षा अभियान

१०.४ 'सर्व शिक्षा अभियान' हा केंद्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम असून राज्यांच्या सहाय्याने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण साध्य करण्यासाठी हा कार्यक्रम कालबध्द पध्दतीने राबविण्यात येत आहे. ज्या लोकवस्त्यांच्या ठिकाणी शालेय सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी नवीन शाळा सुरू करणे आणि असलेल्या शाळांत अतिरिक्त वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल, इत्यादी पायाभूत सुविधा पुरवून बळकटीकरण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सर्व शिक्षा अभियानावर २०१५-१६ मध्ये ₹ ८४२.५४ कोटी तर २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १,३७०.४५ कोटी खर्च झाला. प्राथमिक शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.२ मध्ये देण्यात आले आहेत.

## तक्ता १०.२ प्राथमिक शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| शिक्षणविषयक जिल्हा माहिती प्रणाली (DISE)अंतर्गत नोंदविलेल्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | ९६,१७८ | ९७,०८४ | ९८,२१९ |
| ग्रामीण भागातील शाळांची टक्केवारी | ७९.८ | ७९.८ | ७९.७ |
| दर १० चौ.किमी मागील शाळांची/ तुकड्यांची घनता (अ) प्राथमिक | २.७ | २.७ | २.८ |
| (ब) उच्च प्राथमिक | १.४ | १.४ | १.५ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (६ ते ११ वर्ष) प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | ८ | ८ | ८ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (११ ते १४ वर्ष) उच्च प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | ७ | ७ | ७ |
| खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | ११.१ | ११.७ | १२.४ |
| शाळेतील पटसंख्या (लाखात) | १६१.६ | १६१.७ | १६०.४ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | ४६.८ | ४६.८ | ४६.९ |
| एकूण पटसंख्या प्रमाण (अ) प्राथमिक | ९९.८ | ९९.० | १०४.० |
| (ब) उच्च प्राथमिक | ९६.७ | ९८.८ | १०२.६ |
| सरासरी विद्यार्थी-वर्ग प्रमाण (सर्व शाळा) | ३२ | ३१ | ३१ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | ५.० | ५.१ | ५.२ |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | ३२.३ | ३१.९ | ३१.२ |
| **सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी** | | | |
| पिण्याचे पाणी | ९९.३ | ९९.६ | ९९.७ |
| संरक्षक भिंत | ७७.२ | ८२.७ | ८२.३ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | ९७.७ | ९९.३ | ९९.४ |
| संगणक | ५०.६ | ५४.३ | ५६.९ |
| नि:शक्तांसाठी उतरता रस्ता @ | ७६.८ | ८५.५ | ८६.१ |
| खेळाचे मैदान | ८३.३ | ८८.० | ८७.२ |
| ग्रंथालय | ९४.१ | ९६.२ | ९६.० |
| संगणकांच्या सहाय्याने शिक्षण (उच्च प्राथमिक शाळा/ तुकड्या) | १३.९ | १४.३ | उ.ना. |
| विद्युत जोडणी | ८६.० | ९३.८ | ९३.९ |
| गळतीचे प्रमाण (अ) प्राथमिक | १.०३ | ०.६४ | १.२६ |
| (ब) उच्च प्राथमिक | १.८० | १.०३ | १.४५ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक (अ) प्राथमिक | ०.८९ | ०.८९ | ०.८८ |
| (ब) उच्च प्राथमिक | ०.८७ | ०.८७ | ०.८८ |
| शिक्षण विकास निर्देशांक (संयुक्त) | ०.७ | ०.७ | उ.ना. |

@ उतार आवश्यक व उपलब्ध असलेले उ.ना. उपलब्ध नाही

आधार : १) एलीमेंटरी एज्युकेशन इन इंडिया प्रोग्रेस टुवर्डस युईई फ्लॅश स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट , भारत सरकार २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

**आलेख १०.२ : एकूण पटसंख्येचे प्रमाण (२०१५-१६)**




**आलेख १०.३ : विद्यार्थी शिक्षक प्रमाण (२०१५-१६)**



## शाळाबाह्य मुले

१०.५ शाळाबाह्य मुलांची संख्या जाणून घेण्यासाठी २०१५-१६ मध्ये शासनामार्फत पाहणी घेण्यात आली. सदर पाहणीच्या निष्कर्षात ७४,९७१ शाळाबाह्य मुले आढळून आली. त्यापैकी ५०,६८२ मुलांना प्रवेशित करण्यात आले असून उर्वरित मुलांच्या शाळेतील प्रवेशासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## दिव्यांग समावेशक शिक्षण

१०.६ विशेष गरज असलेल्या मुलांना सर्वसाधारण परिस्थितीत सर्वसाधारण मुलांसोबत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळून त्यांची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी राज्यात 'दिव्यांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये विशेष गरज असलेली मुले शोधून व त्यांची वैद्यकीय तपासणी करून आवश्यकतेनुसार ब्रेल लिपीतील पुस्तके, चष्मे, श्रवणयंत्रे व उपकरणे, वाच्या प्रशिक्षक इत्यादी शैक्षणिक सहाय्यभूत सोईसुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे याचा समावेश आहे. सन २०१४-१५ मध्ये २.९५ लाख मुलांना लाभ दिला असून ₹ ६१.४० कोटी खर्च झाला तर सन २०१५-१६ मध्ये २.८१ लाख मुलांना लाभ दिला असून ₹ ५५.२३ कोटी खर्च झाला.

## राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

१०.७ 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' ही योजना सन २००९ साली माध्यमिक शिक्षणातील प्रवेश वाढविण्यासाठी व गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये या योजनेअंतर्गत ₹ ३३.९ कोटी खर्च झाला तर २०१६-१७ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ११.७ कोटी खर्च झाला. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.३ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.३ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| शिक्षणविषयक जिल्हा माहिती प्रणाली (U-DISE)अंतर्गत नोंदविलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | २३,७५३ | २४,४९७ | २५,०२९ |
| ग्रामीण भागातील शाळांचे प्रमाण | ६३.९ | ६३.७ | ६३.७ |
| दर १० चौ. किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता (अ) माध्यमिक | ०.७ | ०.७ | ०.८ |
| (ब) उच्च माध्यमिक | ०.३ | ०.३ | ०.३ |
| खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | २६.७ | २८.१ | २७.९ |
| शाळेतील पटसंख्या (लाखात) | ५९.१ | ६१.८ | ६४.२ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | ४५.९ | ४५.७ | ४५.५ |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण (अ) माध्यमिक | ८५.६ | ८९.१ | ९०.० |
| (ब) उच्च माध्यमिक | ५८.८ | ६२.१ | ६७.८ |
| सरासरी विद्यार्थी-वर्ग प्रमाण (सर्व शाळा) | ५६ | ५४ | ५४ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | २.१३ | २.१९ | २.२० |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | २८ | २८ | २९ |
| **सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी** | | | |
| पिण्याचे पाणी | ९९.९ | ९९.९ | ९९.९ |
| संरक्षक भिंत | ८३.६ | ८९.२ | ८९.२ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | ९९.१ | ९९.६ | ९९.८ |
| नि:शक्तांसाठी उतरता रस्ता @ | ७६.० | ८३.९ | ८६.६ |
| खेळाचे मैदान | ९४.५ | ९६.० | ९६.१ |
| ग्रंथालय | ९५.२ | ९७.६ | ९७.४ |
| विद्युत जोडणी | ९५.५ | ९६.९ | ९७.१ |
| संगणक | ८७.४ | ९२.० | ९३.३ |
| संगणक व इंटरनेट | ४८.८ | ५६.४ | ६०.२ |
| गळतीचे प्रमाण (अ) माध्यमिक | ११.३ | ११.२ | १२.४ |
| (ब) उच्च माध्यमिक | ३.३ | १.८ | १.८ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक (अ) माध्यमिक | ०.९५ | ०.९६ | ०.९५ |
| (ब) उच्च माध्यमिक | ०.९७ | ०.९७ | ०.९७ |

@ आवश्यक व उपलब्ध असलेले

*आधार :* १) सेकंडरी एज्युकेशन इन इंडिया प्रोग्रेस टुवर्डस युईई फ्लॅश स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट , भारत सरकार
२) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण परिषद

आलेख १०.४ : एकूण पटसंख्येचे प्रमाण (२०१५-१६)




आलेख १०.५ : विद्यार्थी शिक्षक प्रमाण (२०१५-१६)




## शिक्षणासाठी प्रोत्साहनपर योजना

१०.८ मुलांना शिक्षणात सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी व पालकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर सवलती देत आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहनपर निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४ शिक्षणासाठी प्रोत्साहनपर निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | १८.७० | १४.५० | ९.४० | ७.५२ | ४.९१@ | ६.१३$ |
| १ ली ते १० वी च्या शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | ३०.५४ | ४.४३ | २३.५२ | ३.४५ | उ.ना. | ४.२५@ |
| ११ वी व १२ वीत शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण | १.८८ | १.३५ | १.८९ | १.३५ | उ.ना. | १.८१@ |
| अवर्षण प्रवण क्षेत्रातील १० वी व १२ वी तील विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफी/ प्रतिपूर्ती | ५.६३ | १७.७९ | १.१४ | ३१.८८ | उ.ना. | ०.५०@ |
| आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन | ०.०३ | ०. १० | ०.०२ | ०.१० | उ.ना. | ०.२०@ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन $ मंजूर अनुदान @ अपेक्षित उ.ना. उपलब्ध नाही

## मुलींचे शिक्षण

१०.९ मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून पाच किमी अंतरावर राहणाऱ्या गरजू मुलींना महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत सायकलींचे वाटप करण्यात येते. निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५ मुलींच्या शिक्षणासाठीच्या निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹कोटी) |
| उपस्थिती भत्ता योजना | ४.३९ | ८.५५ | ४.११ | ९.०५ | उ.ना. | ९.५९$ |
| अहिल्याबाई होळकर योजना | १६.०९ | ५७.६० | १६.५० | ६१.३७ | १६.८३@ | ६२.६०@ |
| ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | २.८७ | २.०२ | २.७६ | २.०१ | उ.ना. | २.५१@ |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | १९.२३ | ०.०४ | २२.०९ | ०.०४ | ७.३९+ |

$ मंजूर अनुदान @ अंदाजित + डिसेंबर पर्यंत उ.ना. उपलब्ध नाही

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## शालेय पोषण आहार

१०.१० इयत्ता १ ली ते ८ वी तील विद्यार्थ्यांची पटनोंदणी, उपस्थिती वाढविणे व टिकविणे याबरोबरच त्यांना पोषक आहार पुरविणे याकरिता भारत सरकारने 'शालेय पोषण आहार योजना' सुरू केली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना तयार भोजन पुरविण्यात येते. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ११४.५ लाख विद्यार्थ्यांना लाभ मिळाला असून ₹ ५०० कोटी खर्च झाला. शालेय पोषण आहार योजनेची प्रगती तक्ता १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६ शालेय पोषण आहार योजनेची प्रगती**

| इयत्ता | उष्मांक पोषण मूल्य | प्रथिने पोषण मूल्य (ग्रॅ.) | २०१३-१४ | | २०१४-१५ | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ५ वी | ४५० | १२ | ६९ | ७३५ | ६५ | ९२० | ६४ | ९१३ |
| ६ वी ते ८ वी | ७०० | २० | ४० | ४१६ | ३९ | ४५१ | ४१ | ६७५ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र छात्र सेना

१०.११ विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, बंधुत्व, खेळाडूवृत्ती, राष्ट्रीय ऐक्य, समाजसेवा, इत्यादि गुण रुजविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना वैकल्पिक आहे. सन २०१४-१५ मध्ये सुमारे १९.०२ लाख विद्यार्थ्यांनी या योजनेमध्ये सहभाग घेतला असून ₹ चार कोटी खर्च झाला तर सन २०१५-१६ मध्ये १०.६८ लाख विद्यार्थ्यांनी या योजनेमध्ये सहभाग घेतला व ₹ ३.५ कोटी खर्च झाला.

## शिक्षणाची वार्षिक स्थिती दर्शक अहवाल-२०१६ (असर)

१०.१२ 'प्रथम' या संस्थेमार्फत असर - २०१६ ही पाहणी राज्यातील ३३ जिल्ह्यात ९७३ गावांतील कुटुंबांकरीता घेण्यात आली. यामध्ये १९,४३० कुटुंबांतील ३ ते १६ वर्षे वयोगटातील २६,३९३ मुलांकडून माहिती घेण्यात आली. या पाहणीचा उद्देश ग्रामीण भागातील मुलांची शैक्षणिक स्थिती आणि सोपा मजकूर वाचन व गणितातील मुलभूत शिक्षण पातळीचे मुल्यांकन करणे हा आहे. या पाहणीचे राज्यासाठी महत्वाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

**पटनोंदणी**

- वयोगट ६ ते १४ वर्ष यामधील २०१४ च्या ९८.५ टक्के इतक्या पटनोंदणीत वाढ होऊन २०१६ मध्ये ती ९९.१ टक्के झाली.
- वयोगट १५ ते १६ वर्ष यामधील २०१४ च्या ९०.८ टक्के इतक्या पटनोंदणीत वाढ होऊन ती २०१६ मध्ये ९४.१ टक्के झाली.
- वयोगट ११ ते १४ वर्ष मधील २०१४ च्या २.९ टक्के शाळाबाह्य मुलींच्या संख्येत घट होऊन ती २०१६ मध्ये १.९ टक्के झाली तसेच वयोगट १५ ते १६ करिता ही टक्केवारी २०१४ च्या ९.३ टक्के वरून घट होऊन २०१६ मध्ये ६.१ टक्के झाली.
- वयोगट ६ ते १४ मधील खाजगी शाळेत जाणाऱ्या मुलांच्या टक्केवारीत २०१४ मधील ३६.९ टक्क्यांवरून २०१६ मध्ये ३८.३ टक्के एवढी वाढ झाली.

**वाचन क्षमता**

- इयत्ता पहिली स्तराचा मजकूर (चार सोपी जोडवाक्य ज्यामध्ये सहा पेक्षा जास्त शब्द नाहीत) वाचू शकणाऱ्या इयत्ता तिसरीतील मुलांच्या २०१४ च्या ५४.१ टक्के इतक्या टक्केवारीत वाढ होऊन ती २०१६ मध्ये ६१.६ टक्के इतकी झाली.
- इयत्ता दुसरी स्तराचा मजकूर ( ७ ते १० वाक्यांची छोटी गोष्ट ) वाचू शकणाऱ्या इयत्ता पाचवीतील २०१४ मधील ५३.५ टक्के इतक्या टक्केवारीत वाढ होऊन ती २०१६ मध्ये ६२.५ टक्के इतकी झाली.
- इयत्ता दुसरी स्तराचा मजकूर वाचू शकणाऱ्या इयत्ता आठवीतील मुलांची टक्केवारी अद्याप ७५.८ टक्के असून २०१४ मध्ये ती ७६.५ टक्के होती.

**अंकगणित**

- दोन अंकी वजाबाकी (हातचा घेवून) करू शकणाऱ्या २०१४ मधील १८.७ टक्के इतक्या इयत्ता तिसरीतील मुलांच्या टक्केवारीत वाढ होऊन ती २०१६ मध्ये २३.९ टक्के एवढी झाली.
- सोप्या भागाकाराच्या अंकगणिताच्या उदाहरणांद्वारे मुलांची गणितातील क्षमता मोजली जाते (तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भागणे). इयत्ता पाचवीतील भागाकार करू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी २०१४ मध्ये १८.९ टक्के होती त्यात वाढ होऊन ती २०१६ मध्ये २०.३ टक्के झाली.
- इयत्ता आठवीमधील भागाकार करू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी २०१६ मध्ये ३१.५ टक्के होती व ती २०१४ मध्ये ३२.९ टक्के होती .

## सैनिकी शाळा

१०.१३ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तराच्या ४२ सैनिकी शाळा असून त्यापैकी चार शाळा फक्त मुलींसाठी, ३४ शाळा फक्त मुलांसाठी आणि चार सह शिक्षणासाठी आहेत. सन २०१६-१७ मध्ये या शाळांमधील एकूण पटसंख्या १४,६५३ आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.१४ खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी व क्रीडापटूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने पुणे येथे 'शिव छत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली आहे. या क्रीडापीठाकडून ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडा कौशल्य चाचण्या घेतल्या जातात आणि १७ विविध खेळांसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना सुमारे ८ ते १० वर्षे आवश्यक प्रशिक्षण दिले जाते. या क्रीडापीठा अंतर्गत ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. आतापर्यंत क्रीडाप्रबोधिनीतील २५ विद्यार्थ्यांना राज्य शासनाचा 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' प्राप्त झाला आहे तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये ५९ क्रीडापटूंनी/ खेळाडूंनी देशाचे प्रतिनिधीत्व केले आहे. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी सरासरी ₹ ९,००० खर्च करते. सन २०१६-१७ मध्ये ६०७ प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली आहे. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या पदकांचा तक्ता १०.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७ क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेली पदके**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राज्य स्तरावरील पदके | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०१३-१४ | ६६५ | २ | २ | ४ | ८ | ४४ | ४९ | ३३ | १२६ | १४३ | १२८ | ८५ | ३५६ |
| २०१४-१५ | ५६३ | २ | २ | ३ | ७ | ६६ | ६३ | ४६ | १७५ | १४८ | ११६ | ११६ | ३८० |
| २०१५-१६ | ५९३ | २ | ७ | ९ | १८ | ४९ | ३४ | ५४ | १३७ | २०० | १७३ | १४५ | ५१८ |

आधार : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम

१०.१५ शालेय मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सन २०१५-१६ मध्ये राज्य शासनाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' सुरू केला. एकही मूल शैक्षणिकदृष्ट्या अपेक्षेपेक्षा कमी असणार नाही यासाठी मुलांमधील मूलभूत क्षमता ओळखून प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित शैक्षणिक क्षमता संपादित केली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरिता या कार्यक्रमांतर्गत विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमधील मूलभूत क्षमता व शैक्षणिक पातळी ओळखण्यासाठी 'राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण' घेण्यात येते. याकरिता इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या वर्षातून तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्यात येतात. ज्यामध्ये एक पायाभूत चाचणी व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामधील संकलित मूल्यमापनाच्या दोन चाचण्या घेण्यात येतात. या चाचण्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचेमार्फत घेण्यात येतात. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी शासनाकडून शिक्षकांना आवश्यकतेनुसार व मागणीनुसार प्रशिक्षण देण्यात येत आहे. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमा' ची प्रगती तक्ता १०.८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.८ प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| विवरण | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|
| प्रगत शाळा | ८,७९१ | २४,६८७ |
| डिजिटल शाळा | ११,२२८ | २७,६८६ |
| कार्य आधारीत शिक्षण देणाऱ्या शाळा | १२,४०९ | १३,४४८ |
| आयएसओ प्रमाणित शाळा | १,३६८ | २,६४६ |
| रचनावादाचा अवलंब करत असलेल्या शाळा | ४६,६०८ | ६३,५९५ |
| आवश्यकतेनुसार व मागणीनुसार शिक्षकांना देण्यात येणारे प्रशिक्षण | १,८२,४२८ | ३,३७,३४८ |
| भाषा विषयात विद्यार्थ्यांचे सरासरी साध्य (टक्के) | ६७.० | ७७.० |
| गणित विषयात विद्यार्थ्यांचे सरासरी साध्य (टक्के) | ६८.० | ७१.० |

*आधार :* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद + जानेवारी पर्यंत

## प्रौढ साक्षरता

१०.१६ जनगणना-२०११ नुसार राज्यात १.६३ कोटी प्रौढ (१५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्ती) निरक्षर आहेत. ज्या जिल्ह्यांमध्ये स्त्री साक्षरता दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे किंवा ५० टक्के पेक्षा कमी आहे अशा जिल्ह्यांमध्ये प्रौढ साक्षरता वाढविण्यासाठी 'साक्षर भारत योजना' राबविण्यात येते. राज्यात ही योजना १० जिल्ह्यांतील ९३ तालुक्यातील ७,३१८ ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात येत असून एकूण १४.४ लाख निरक्षरांचे उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत प्रौढ निरक्षर व्यक्तीस व्यावहारीक साक्षरतेचे ज्ञान देण्यात येते ज्यामध्ये अक्षर व अंक ओळख तसेच मूलभूत साक्षरता ज्यामध्ये नवसाक्षर व्यक्तीस इयत्ता ३ री, ५ वी किंवा ८ वी च्या स्तरावरील मूलभूत साक्षरता चाचणी देता येते व प्रत्येक उत्तीर्ण व्यक्तीस त्या स्तरानुरूप औपचारिक शिक्षण प्रमाणपत्र दिले जाते. तसेच

या योजनेअंतर्गत व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण दिले जाते. एकूण ७,३१८ ग्रामपंचायतींमधील प्रौढ शिक्षण केंद्रात १४,६३० प्रेरक व १३८ समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मार्च २०१६ पर्यंत ११.१४ लाख नवसाक्षरांना औपचारिक शिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले आहे. प्रौढ साक्षरतेसाठी सामाजिक सहभागाद्वारे काही नाविन्यपूर्ण योजना जसे की, 'शिकवू आपल्या घरी शेजारी', 'साक्षर भारत महोत्सव' राबविण्यात आल्या.

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१७ सर्वांगिण आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारे तांत्रिक व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यास उच्च शिक्षण सहाय्य करते. उच्च शिक्षणात कृषि, पशुवैद्यक, वैद्यकीय, औषध निर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, इत्यादिंचा समावेश सर्वसाधारण उच्च शिक्षणासह होतो. मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच, उच्च शिक्षणातील संधींचादेखील विस्तार करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राज्यात एकूण २१ राज्य विद्यापीठे असून त्यापैकी चार कृषि विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १४ अन्य सर्वसाधारण विद्यापीठे (ज्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, अनौपचारिक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन, विकास व प्रसार करण्यासाठी कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, नागपूर) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राज्यात २० अभिमत विद्यापीठे, एक केंद्रीय विद्यापीठ व चार खाजगी विद्यापीठे (पैकी एक २०१५-१६ मध्ये स्थापित) आहेत. विद्याशाखानिहाय एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व सन २०१६-१७ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या परिशिष्ट १०.२ ते १०.५ मध्ये दिली आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणीवर आधारित उच्च शिक्षणाची राज्याशी संबंधित सांख्यिकी तक्ता १०.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९ राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| विद्यापीठांची संख्या | | ४५ | ४५ | ४५ | ४५ |
| महाविद्यालयांची संख्या | | ४,३६९ | ४,४९८ | ४,६४६ | ४,५६९ |
| स्वायत्त संस्थांची संख्या | | २,५५२ | २,६१५ | २,७०० | २,५०१ |
| उच्च शिक्षणातील पटसंख्या $ (लाखात) | एकूण | ३०.८० | ३५.१९ | ३७.३६ | ३९.८७ |
| | स्त्रियांची टक्केवारी | ४२.२ | ४२.९ | ४३.३ | ४३.६ |
| विद्यापीठातील व इतर संस्थांतील पटसंख्या | एकूण | ६.२० | ७.३५ | ७.१५ | ८.८० |
| | स्त्रियांची टक्केवारी | ३६.५ | ३९.७ | ३७.५ | ४०.८ |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण | सर्व प्रवर्ग | २२.९ | २६.३ | २७.९ | २९.९ |
| (१८ – २३ वर्ष) | अजा | १८.९ | २२.१ | २५.६ | २९.६ |
| | अज | ८.९ | १०.७ | १२.६ | १४.७ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक | सर्व प्रवर्ग | ०.८३ | ०.८५ | ०.८६ | ०.८६ |
| (१८ – २३ वर्ष) | अजा | ०.८२ | ०.८० | ०.८५ | ०.८५ |
| | अज | ०.५८ | ०.५६ | ०.६० | ०.६३ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | एकूण | १.४४ | १.५२ | १.६४ | १.६६ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | सर्व संस्था | २१ | २३ | २३ | २४ |

*आधार* : अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल

$ अंदाजित

**आलेख १०.६ : उच्च शिक्षणातील एकूण पटसंख्येचे प्रमाण (२०१४-१५)**




**आलेख १०.७ : उच्च शिक्षणातील स्त्री-पुरुष असमानता निर्देशांक (२०१४-१५)**



## राष्ट्रीय नमुना पाहणी ७१ व्या फेरीतील 'सामाजिक उपभोग : शिक्षण' या विषयावरील महत्वाचे निष्कर्ष (जानेवारी ते जून २०१४)

१०.१८ माहे जानेवारी ते जून २०१४ या कालावधीत राष्ट्रीय नमुना पाहणी नुसार केंद्रिय नमुना माहितीवर आधारित राज्यातील शैक्षणिक आकडेवारीचे काही महत्वाचे निर्देशक पुढीलप्रमाणे आहेत.

- प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांची सुविधा निवासस्थानापासून २ कि.मी. पेक्षा कमी अंतरावर असणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी अनुक्रमे ९८.८ टक्के, ८६.९ टक्के व ७४ टक्के होती.
- सन २०१४ मध्ये ग्रामीण भागासाठी साक्षरता दर ७९ टक्के, नागरी भागासाठी ९० टक्के तर राज्यासाठी ८४ टक्के होता.
- पुरुष साक्षरता दर ग्रामीण भागासाठी ८७ टक्के, नागरी भागासाठी ९४ टक्के व राज्यासाठी ९० टक्के होता.
- स्त्री साक्षरता दर ग्रामीण भागासाठी ७० टक्के, नागरी भागासाठी ८६ टक्के व राज्यासाठी ७७ टक्के होता.
- राज्यात सर्व शैक्षणिक स्तरावरील खाजगी शिकवणीस जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण २५ टक्के होते.
- सुमारे ८६ टक्के कुटुंबांनी मुख्यत्वेकरून मूलभूत शैक्षणिक क्षमता वाढीकरिता खाजगी शिकवणी घेतल्याचे सांगितले.
- वय ५ ते २९ वर्षे या वयोगटातील ग्रामीण भागातील ४३ टक्के पुरूष व ३३ टक्के स्त्रिया आणि नागरी भागातील ४५ टक्के पुरूष व ३० टक्के स्त्रियांचे शिक्षण अर्धवट सोडण्याचे कारण घरगुती कर्तव्ये व आर्थिक उपक्रमात व्यस्त असणे असल्याचे दिसून येते.
- शिक्षणावरील खर्च - शैक्षणिक संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्याचा खर्च हा अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याने भरलेले शुल्क (शिकवणी शुल्क, परीक्षा शुल्क इ.) वह्या पुस्तके व इतर सामग्री, गणवेश, वाहतूक खर्च व खाजगी शिकवणी इत्यादीवर होणारा खर्च हा कुटुंबाचा शिक्षणावर होणारा खाजगी खर्च आहे. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात निवडक राज्यात सर्वसाधारण शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रती विद्यार्थी सरासरी शैक्षणिक खर्च तक्ता १०.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१० निवडक राज्यांसाठी शैक्षणिक वर्षासाठी (२०१३-१४) सर्वसाधारण शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची बाबनिहाय प्रति विद्यार्थी सरासरी खर्चाची आकडेवारी**

(₹)

| राज्य | खर्चाची बाब | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अभ्यासक्रम शुल्क | पुस्तके, इतर सामग्री व गणवेश | वाहतूक | खाजगी शिकवणी | इतर खर्च | एकूण वार्षिक खर्च |
| आंध्र प्रदेश | ४,४९९ | १,५७० | ७७६ | १७९ | ३३४ | ७,३५८ |
| गुजरात | २,९५२ | १,८१६ | ९२८ | १,२३४ | ५१३ | ७,४४२ |
| कर्नाटक | ४,४१७ | १,६६७ | ७५४ | ४७१ | ५५५ | ७,८६३ |
| केरळ | ३,८८१ | २,२४१ | १,५८६ | १,०८१ | ५३८ | ९,३२६ |
| मध्य प्रदेश | २,२६६ | १,२०५ | ६१५ | ६४० | १६८ | ४,८९४ |
| **महाराष्ट्र** | **३,९५५** | **१,७१५** | **१,२३३** | **१,८९८** | **४९०** | **९,२९२** |
| पंजाब | ६,८६९ | २,५६८ | १,७४८ | ९६२ | ४५३ | १२,६०० |
| राजस्थान | ३,७९२ | १,५८३ | ८०४ | ४२६ | १९८ | ६,८०४ |
| तामिळनाडू | ५,६६१ | १,८५४ | १,२३३ | ४२५ | ६०१ | ९,७७३ |
| उत्तर प्रदेश | २,४१६ | १,३६८ | ५०१ | ६१५ | १७५ | ५,०७४ |
| पश्चिम बंगाल | १,५०४ | १,३६९ | ५२८ | ३,०८२ | २०९ | ६,६९२ |
| **भारत** | **३,१३३** | **१,५१८** | **७४९** | **१,०४०** | **३४९** | **६,७८८** |

*आधार :* राष्ट्रीय नमुना पाहणी अहवाल, भारत सरकार

# सार्वजनिक आरोग्य

१०.१९ आरोग्य सेवांमधील सुधारणांमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सार्वजनिक, खाजगी तसेच स्वयंसेवी क्षेत्रे राज्यात प्राथमिक ते आधुनिक वैद्यकीय सेवांसह आरोग्य विषयक पायाभूत सुविधा पुरवितात. राज्यातील जनतेला विश्वसनीय, जबाबदार, समाधानकारक, गुणात्मक, प्रतिबंधात्मक आणि गुणकारी आरोग्यसेवा पुरविणे हा सार्वजनिक आरोग्य सेवेचा उद्देश असून माता व बाल आरोग्यात सुधारणा करण्यावर विशेष भर आहे. याव्यतिरिक्त, विशेषत: आदिवासी व ग्रामीण जनतेसाठी स्थानिक तसेच सांस्कृतिक विविधता विचारात घेऊन सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात.

१०.२० राज्यात सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी त्रिस्तरीय पायाभूत सुविधा शासनाने निर्माण केल्या आहेत. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुहिक आरोग्य केंद्रे यांचा प्राथमिक स्तरामध्ये समावेश होतो. व्दितीय स्तरावर ग्रामीण व निमशहरी भागातील उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त, प्रमुख शहरांमध्ये स्थित सुसज्ज वैद्यकीय महाविद्यालये व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांचा तृतीय स्तरावर समावेश होतो. परिमंडळनिहाय सार्वजनिक, स्थानिक संस्था व विश्वस्थ संस्था रुग्णालयांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा तपशील तक्ता १०.११ मध्ये तर राज्यात उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्वस्थ संस्था रुग्णालये) याबाबतची तपशीलवार मालिका परिशिष्ट १०.६ मध्ये दिली आहे. आरोग्यविषयक निवडक निर्देशकांची मालिका परिशिष्ट १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.११ परिमंडळनिहाय सार्वजनिक, स्थानिक संस्था व विश्वस्थ संस्था रुग्णालयांकडून पुरविल्या जाणाऱ्या पायाभूत आरोग्य सुविधा (३१ डिसेंबर २०१५ पर्यंत)**

(संख्या)

| परिमंडळ | रुग्णालये (महानगरपालिका व विश्वस्थ संस्था रुग्णालयांसह) | | दवाखाने (महानगरपालिका व जिल्हा परिषद दवाखान्यांसह) | | प्राथमिक आरोग्य केंद्रे | | उपकेंद्रे | | सार्वजनिक आरोग्य पथके | | एकूण संस्था | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | खाटा | संख्या | खाटा | संख्या | खाटा | संख्या | खाटा | संख्या | खाटा | संख्या | खाटा |
| मुंबई | २०० | ३५,६४७ | ४७२ | ३६ | १९७ | १,१९४ | १,१५८ | ४६ | २६ | १०४ | २,०५३ | ३७,०२७ |
| नाशिक | ३१४ | ९,९२० | ११० | १४१ | ३७५ | २,६०६ | २,०९६ | ० | २० | ८० | २,९१५ | १२,७४७ |
| पुणे | २०६ | ११,७८० | ११० | ० | १७३ | १,०३८ | ९७० | ० | ९ | ३६ | १,४६८ | १२,८५४ |
| कोल्हापूर | १२४ | ७,८१० | १५६ | ६४० | २४१ | १,७०२ | १,३८१ | ५३३ | १४ | ६८ | १,९१६ | १०,७५३ |
| औरंगाबाद | १३१ | ८,००१ | १११ | ९१२ | १४५ | ९३६ | ८३८ | २१३ | ११ | ४४ | १,२३६ | १०,१०६ |
| लातूर | ८७ | ६,४७५ | ७५० | २,२८१ | २०३ | १,३५७ | १,११५ | ३७० | २६ | १०४ | २,१८१ | १०,५८७ |
| अकोला | १५८ | १०,११५ | ८४० | ५१२ | २२६ | १,५६४ | १,३७९ | ० | २६ | १०४ | २,६२९ | १२,२९५ |
| नागपूर | १८२ | १२,७४९ | ५३८ | १६२ | २५१ | १,५८४ | १,६४३ | ० | ६१ | २४४ | २,६७५ | १४,७३९ |
| **एकूण** | **१,४०२** | **१,०२,४९७** | **३,०८७** | **४,६८४** | **१,८११** | **११,९८१** | **१०,५८०** | **१,१६२** | **१९३** | **७८४** | **१७,०७३** | **१,२१,१०८** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

टीप : वरील आकडेवारी अस्थायी आहे.

१०.२०.१ आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत चालविली जाणारी राज्यातील आरोग्य सुविधांमध्ये ३४२ विश्वस्थ संस्था रुग्णालये, ४४ आघात उपचार केंद्र, चार सामान्य रुग्णालये, दोन सुपर स्पेशिॲलिटी रुग्णालये, एक महिला रुग्णालय, चार क्षयरोग उपचार रुग्णालये, चार कुष्ठरोग उपचार रुग्णालये अंतर्भूत आहेत. याव्यतिरिक्त, राज्यात सोळा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न एकूण सुमारे १४,००० खाटांची क्षमता असलेली २५ रुग्णालये आणि २,३८० खाटांची क्षमता असलेली कर्मचारी राज्य विमा योजनेची १४ रुग्णालये आरोग्यसेवा पुरवितात. निवडक राज्यांमधील उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुहिक आरोग्य केंद्रे यांची संख्या तक्ता १०.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१२ निवडक राज्यांमधील कार्यरत उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुहिक आरोग्य केंद्रे यांची संख्या**

(संख्या)

| राज्य | उपकेंद्रे | प्राथमिक आरोग्य केंद्रे | सामुहिक आरोग्य केंद्रे |
|---|---|---|---|
| उत्तरप्रदेश | २०,५२१ | ३,४९७ | ७७३ |
| राजस्थान | १४,४०८ | २,०८० | ५७१ |
| **महाराष्ट्र** | **१०,५८०** | **१,८११** | **३६०** |
| कर्नाटक | ९,३३२ | २,३५३ | २०६ |
| मध्यप्रदेश | ९,१९२ | १,१७१ | ३३४ |
| गुजरात | ८,८०१ | १,३१४ | ३२२ |
| तमिळनाडू | ८,७१२ | १,३६८ | ३८५ |
| **भारत** | **१,५५,०६९** | **२५,३५४** | **५,५१०** |

*आधार* : राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, भारत सरकार



आलेख १०.१ : निवडक आरोग्यविषयक निर्देशक

१०.२०.२ राज्यातील ॲलोपॅथी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांच्या आकडेवारीवर आधारित डॉक्टरांचे लोकसंख्येशी गुणोत्तर अंदाजे १:१४१८ आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी (आयुष) अशा अनेक वैद्यकीय व रुग्णसेवा संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

**राष्ट्रीय कुटुंब आरोग्य पाहणी**

१०.२१ राष्ट्रीय कुटुंब आरोग्य पाहणी (राकुआपा - ४) मधील निवडक राज्यांसाठी महत्त्वाचे निर्देशक तक्ता १०.१३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.१३ निवडक राज्यांसाठी राकुआपा - ४ मधील महत्त्वाचे निर्देशक**

(टक्के)

| निर्देशक | महाराष्ट्र | कर्नाटक | मध्य प्रदेश | गुजरात | तामिळनाडू | आंध्र प्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|
| बालकांचे नोंदणीकृत जन्म (पाच वर्षाखालील) | ९५.१ | ९४.९ | ८१.९ | ९५.८ | ९८.३ | ८२.७ |
| स्त्री-पुरुष प्रमाण@ | ९५२ | ९७९ | ९४८ | ९५० | १,०३३ | १,०२० |
| पाच वर्षाखालील मृत्यू दर $ | २९ | ३२ | ६५ | ४३ | २७ | ४१ |
| आरोग्य संस्थांतील प्रसूती | ९०.३ | ९४.३ | ८०.८ | ८८.७ | ९९.० | ९१.६ |
| एचआयव्ही/एड्स बाबतचे व्यापक ज्ञान | | | | | | |
| स्त्री | ३०.० | ९.५ | १८.१ | १८.४ | १६.० | २९.० |
| पुरुष | ४४.४ | २६.३ | २९.३ | ३१.४ | १०.९ | ५५.५ |

*आधार*: आंतरराष्ट्रीय जनसंख्या विज्ञान संस्था, मुंबई   @ १,००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण   $ प्रति १,००० जिवित जन्म

## राष्ट्रीय नमुना पाहणीचे निष्कर्ष

१०.२२ जानेवारी ते जून, २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय नमुना पाहणी ७१ वी फेरीच्या (सामाजिक उपभोग: आरोग्य) केंद्रीय नमुना माहितीवर आधारित राज्याबाबतचे महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

- रुग्णालयांत दाखल झालेल्या रुग्णांपैकी सुमारे ८० टक्के रुग्णांनी खाजगी रुग्णालयांत उपचार घेतल्याचे प्रतिवेदित केले.
- सुमारे ९८ टक्के ग्रामीण व ९७ टक्के नागरी गर्भवती महिलांच्या प्रसूतिपूर्व काही आरोग्य निगा घेण्यात आल्या.
- ग्रामीण भागातील ४९ टक्के प्रसूति सार्वजनिक रुग्णालयांत, ४८ टक्के खाजगी रुग्णालयांत झाल्या तर नागरी भागात ही टक्केवारी अनुक्रमे ३६ टक्के व ६० टक्के होती.
- ग्रामीण भागात प्रत्येक जन्मामागे सार्वजनिक रुग्णालयात सरासरी खर्च ₹ १,१४७ व खाजगी रुग्णालयात ₹ १५,५३७ होत होता तर शहरी भागात तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ २,४८० व ₹ २२,७५२ होती.
- ग्रामीण भागात रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांकरिता प्रति रुग्ण सरासरी वैद्यकीय खर्च ₹ २०,४७५ व वैद्यकीय खर्चाव्यतिरिक्त इतर खर्च ₹ २,०११ होता तर नागरी भागासाठी ही आकडेवारी अनुक्रमे ₹ २९,४९३ व ₹ १,५३४ होती.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

१०.२३ राष्ट्रीय आरोग्य अभियान हे जनतेला किफायतशीर, विश्वासार्ह आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करण्यासाठी सन २०१३ मध्ये सुरु करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

१०.२३.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- अर्भक मृत्यू व माता मृत्यू कमी करणे.
- सार्वजनिक सेवांमध्ये अन्न व पोषण, आरोग्यनिगा व स्वच्छता, सार्वजनिक आरोग्यसेवा यांची सहज उपलब्धता करणे तसेच महिला व बाल आरोग्य आणि सार्वत्रिक लसीकरणावर भर देणे.
- स्थानिक पातळीवर होणाऱ्या साथींच्यारोगांसह सांसर्गिक आणि असांसर्गिक रोगांचे प्रतिबंध व नियंत्रण करणे.
- एकत्रित व व्यापक प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करणे.
- लोकसंख्या स्थिर करणे आणि स्त्री-पुरुष व लोकसंख्या विषयक समतोल राखणे.
- स्थानिक आरोग्यविषयक उपचार पद्धती पुर्नजिवित करणे आणि आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी (आयुष) या पद्धतींना मुख्य प्रवाहात आणणे.
- आरोग्यदायी जीवनशैलीचे संवर्धन करणे.

सन २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाने राज्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत ₹ १,७१३.४८ कोटीचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर केला असून ₹ १,०५६.११ कोटी खर्च झाला तर सन २०१६-१७ मध्ये ₹ १,७४५.०७ कोटी मंजूर केले असून डिसेंबरपर्यंत ₹ ५९९.६० कोटी खर्च झाला. 'आशा' कार्यक्रमांतर्गत डिसेंबर २०१६ पर्यंत ५८,७९३ आशा नियुक्त करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची भौतिक प्रगती तक्ता १०.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१४ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत भौतिक प्रगती**

(संख्या)

| घटक | बाब | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|
| आयुष | बाह्यरुग्ण | ६२,७३,१९० | ७५,९७,६६० | ४१,३१,२३४ |
| | आंतररुग्ण | १,४२,३३४ | १,१५,२९३ | ७९,८६२ |
| फिरते वैद्यकीय पथक | बाह्यरुग्ण | ११,०४,२१२ | ११,८३,५९८ | ९,३३,१०९ |
| | प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात आरोग्य तपासणी) | १,१५,३४५ | १,३५,६७६ | १,१०,२८६ |
| | प्रयोगशाळा तपासणी | ५,१७,८३८ | ६,३१,९९४ | ४,९५,६५४ |
| | भेटी दिलेली गावे | २०,५५० | २०,४६० | १५,५९० |
| संदर्भ सेवा सुविधा (वाहतूक) | गर्भवती महिला | | | |
| | रुग्णालयीन प्रसुती | ६,१४,२११ | ५,८९,४३० | ४,२२,४७८ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ४,५८,०२८ | ४,४२,२८३ | ३,१४,४१७ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १,२८,६२५ | १,४१,२३२ | १,०४,२९४ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ५,४४,०९६ | ५,६४,१०४ | ३,९१,०९९ |
| | आजारी बालके | | | |
| | आजारी बालके | ५९,८२५ | ७३,७६८ | ५८,४९९ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | २४,३१५ | ३७,७६० | २९,२२७ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १३,५८८ | १७,३६६ | १३,९३८ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ३८,०५६ | ६०,०५२ | ४१,१६७ |
| टेलिमेडीसीन | संदर्भित केलेले व तज्ञ सल्ला मिळालेले रुग्ण | २६,५७२ | ३१,९८० | २१,७११ |
| सीकल सेल आजार नियंत्रण कार्यक्रम | एकूण तपासणी | ३०,६३,५०५ | ३७,१५,०७० | ५,४८,७५८ |
| | रूग्ण | २,१९३ | १,९१६ | ६५७ |
| | वाहक | २८,९८१ | २५,६९५ | ६,९९९ |
| सार्वजनिक खाजगी भागिदारी | | | | |
| अ) आरोग्य सल्ला व संपर्क केंद्र | एकूण कॉल्स | ७,२५,७५२ | ८,३०,३१६ | ५,१८,४०२ |
| ब) इपिलेप्सी (अपस्मार) | आयोजित शिबिरे | ११ | ९ | ७ |
| | रुग्ण संख्या | ५,१०२ | ३,२८८ | १,४९८ |
| | शिबिरे (ई.ई.जी. ची सुविधा असलेली ) | ५१० | ४२५ | ३१२ |
| | ऑक्युपेशन थेरपी/फिजीओथेरपी / स्पिच थेरपी घेतलेले | १,३०० | ९६८ | ६६७ |
| क) वैद्यकीय व दंत शिबीरे | आयोजित शिबिरे | ५० | ४९ | ३६ |
| | उपचार केलेले रूग्ण | ८१,५६२ | ८२,४६४ | २५,०१५ |
| | शस्त्रक्रियांची संख्या | ५,३४१ | ४,७६२ | १,५५६ |
| ड) उपशमन निगा (पॅलिॲटिव्ह केअर) | रुग्ण संख्या | ६५५ | ९९८ | ६८९ |
| इ) माहेरघर | लाभार्थी माता | २,१५९ | १,८७९ | १,०७९ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन   ई.ई.जी. - इलेक्ट्रो एन्सेफेलो ग्राम   + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

१०.२३.२ नागरी भागातील आरोग्य विषयक गरजा पूर्ण करणे विशेषत: गरिबांना आवश्यक प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करणे हा राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचा हेतू आहे. या अभियानांतर्गत ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या सर्व शहरे / नगरे यातील झोपडपट्टी व इतर दुर्लक्षित घटकांचा समावेश आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी सन २०१५-१६ साठी ₹ २८७.८८ कोटी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर केला आहे आणि ₹ ६४.८५ कोटी खर्च झाले आहेत. केंद्र शासनाने राज्यात सन २०१६-१७ साठी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा ₹ ३१०.८२ कोटी (मुंबई शहरासाठी ₹ ७३.७६ कोटी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ₹ २३७.०६ कोटी) मंजूर केले असून डिसेंबरपर्यंत ₹ ५३.७३ कोटी खर्च झाले आहेत.

## महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा

१०.२३.३ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेमार्फत रुग्णांना नजिकच्या रुग्णालयांमध्ये पुढील उपचारार्थ दाखल करण्यासाठी पुर्वरुग्णालयीन आरोग्यसेवेसह जीवन समर्थक प्रणालीयुक्त रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येतात. अतिसुसज्ज जीवन समर्थक प्रणालीयुक्त २३३ रुग्णवाहिका आणि मूलभूत जीवन समर्थक प्रणालीयुक्त ७०४ रुग्णवाहिका आहेत. ही आपत्कालीन सेवा १०८ या मोफत दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध होऊ शकते. आपत्कालीन सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या तक्ता १०.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१५ आपत्कालिन सेवा पुरविलेले रुग्ण**

(संख्या)

| प्रकार | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|
| प्रसुती | ९९२ | ४,६११ | ४,१६० |
| गर्भवती | ७७,०४७ | १,५९,९४९ | १,५६,०४४ |
| वैद्यकीय | १,००,२७० | १,६७,३७६ | २,२१,७३९ |
| अपघाती (वाहनांमुळे) | ३९,५८९ | ६०,९३७ | ५४,४४२ |
| प्राणघातक हल्ला | ४,२०७ | ७,५३१ | ७,६४४ |
| भाजणे | ३,२१४ | ४,२५७ | ३,२६१ |
| हृदयविकाराचा झटका | २,४८० | २,८२३ | १,८२९ |
| पडणे | ८,२११ | १६,३६० | १६,७५५ |
| विषद्रव्यप्राशन/ विषबाधा | ९,९४० | २०,८२६ | २०,३२३ |
| मोठी दुर्घटना | १,७८९ | ४,२२० | २,८६१ |
| आघात | १,१३८ | २,४५६ | १,२६४ |
| इतर | ११,९६५ | १६,१६० | ५१,५९१ |
| **एकूण** | **२,६०,८४२** | **४,६७,५०६** | **५,४१,९१३** |

*आधार :* आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - II

१०.२३.४ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - II हा बाल आरोग्याचा दर्जा उंचावून व लोकसंख्या स्थिर ठेवून त्याद्वारे माता मृत्यूदर, अर्भक मृत्यूदर व एकूण जननदर कमी होण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत आहे. राज्याचा मातामृत्यू दर सन २०१०-१२ मध्ये ८७ वरुन सन २०११-१३ मध्ये ६८ पर्यंत कमी झाला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत झालेला खर्च तक्ता १०.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१६ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम — II अंतर्गत झालेला खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ६५५.८६ | ४७१.३७ | ७१.९ |
| २०१५-१६ | ६२१.०० | ४५३.२० | ७३.० |
| २०१६-१७ | ७९६.६८ | २९६.१९+ | ३७.२ |

*आधार :* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## नवसंजीवनी योजना

१०.२३.५ आदिवासी भागातील माता व अर्भक मृत्यू कमी व्हावेत या उद्देशाने १६ जिल्ह्यांतील ८,४१९ गावांमध्ये १७३ फिरत्या वैद्यकीय पथकांव्दारे नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे.

१०.२३.५.१ मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत प्रसुतीपूर्व आरोग्य तपासणीकरिता वैद्यकीय केंद्राला भेट देण्यासाठी आदिवासी महिलेला ₹ ४०० रोख व चांगले आरोग्य राखण्यासाठी ₹ ४०० ची औषधे पुरविण्यात येतात. या योजनेची प्रगती तक्ता १०.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१७ मातृत्व अनुदान योजनेची प्रगती**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | लाभार्थी माता |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ५.६३ | ३.०६ | ६१,३५२ |
| २०१५-१६ | ५.१२ | ३.०२ | ७७,७९७ |
| २०१६-१७+ | २.४९ | ०.४३ | २०,३०४ |

*आधार :* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## जननी सुरक्षा योजना

१०.२३.६ जननी सुरक्षा योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून जिचा उद्देश राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील आरोग्य संस्थांमध्ये प्रसुतीला प्रोत्साहन देवून दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील माता व बालमृत्यू प्रमाण कमी करणे हा आहे. या योजनेअंतर्गत आरोग्य संस्थांमध्ये प्रसुती झाल्यानंतर सात दिवसांच्या आत शहरी भागात प्रति लाभार्थी ₹ ६०० व ग्रामीण भागात प्रति लाभार्थी ₹ ७०० दिले जातात, तर कुशल दाईच्या मदतीने घरी प्रसूत होणाऱ्या फक्त दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील लाभार्थ्यास ₹ ५०० दिले जातात. सिझेरियनद्वारे प्रसूती झालेल्या लाभार्थ्यास झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीपोटी ₹ १,५०० दिले जातात. जननी सुरक्षा योजनेची प्रगती तक्ता १०.१८ मध्ये दिली आहे.

## सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१०.२३.७ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाचा उद्देश क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, काविळ-बी, गोवर इत्यादी लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येण्याजोग्या आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी उच्च दर्जाच्या लसीकरण सेवा पुरविणे हा आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१८ जननी सुरक्षा योजनेची प्रगती**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | लाभार्थ्यांची संख्या (लाख) |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ५२.६४ | ४६.५३ | ३.४८ |
| २०१५-१६ | ५२.३१ | ४६.९६ | ३.३९ |
| २०१६-१७+ | ५०.८७ | २५.३१ | २.०७ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता १०.१९ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या लाखात)

| लस | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १९.७३ | १९.३४ | २०.८७ | २०.२१ | १९.७१ | १५.२९ |
| डीपीटी (घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात)-III | १९.७३ | १९.२१ | २०.८७ | १६.६८ | ला.ना. | ला.ना. |
| पोलिओ III | १९.७३ | १९.१५ | २०.८७ | १८.८७ | १९.७१ | १३.४३ |
| काविळ बी III | १९.७३ | १९.१३ | २०.८७ | १६.५७ | ला.ना. | ला.ना. |
| काविळ बी 0 | १९.७३ | ७.१७ | २०.८७ | ९.८८ | ७.७६ | ७.८२ |
| गोवर | १९.७३ | १८.८२ | २०.८७ | १९.०४ | १९.७१ | १४.२७ |
| डीपीटी (बुस्टर) | १९.३२ | १८.१६ | २०.४६ | १८.४८ | १९.३७ | १२.९३ |
| पोलिओ (बुस्टर) | १९.३२ | १८.०५ | २०.४६ | १८.४७ | १९.३७ | १२.९८ |
| डीटी (५ वर्ष) | १९.३२ | १६.६४ | २०.४६ | १६.६९ | १९.३७ | १२.९७ |
| धनुर्वात (१० वर्ष) | २१.१५ | १८.६१ | २०.६७ | १८.०४ | २५.३३ | १३.९४ |
| धनुर्वात (१६ वर्ष) | २१.८६ | १९.०३ | २२.०३ | १८.६९ | २२.९२ | १४.३१ |
| धनुर्वात (गरोदर माता) | २१.७१ | १७.१० | २२.९६ | १७.३७ | २१.६८ | १२.४८ |
| पेंटावॅलेन्ट ३ | ला.ना. | ला.ना. | ३.४८ | २.७७ | १९.७१ | १३.५२ |
| **खर्च (₹ कोटी)** | **३१.८२** | | **४१.६८** | | **२३.९२** | |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन ला.ना. लागू नाही + डिसेंबरपर्यंत

## पल्स पोलिओ कार्यक्रम

१०.२३.८ पाच वर्षाखालील मुलांना पूर्वी कितीही वेळा पोलिओ डोस दिला असला तरी देशभरात राष्ट्रीय लसीकरणाच्या दिवशी तोंडाव्दारे पोलिओ मात्रा देण्यात येते. राज्याने पोलिओ विषाणूचा प्रसार नियंत्रणात ठेवण्यासाठी उत्तम प्रगती केली असून २०१०-११ नंतर पोलिओचा एकही रुग्ण आढळला नाही. पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२० पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | लसीकरण केलेल्या मुलांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०१४-१५ | १२३.२६ | १०.९२ |
| २०१५-१६ | १२०.७८ | ५.३७ |
| २०१६-१७+ | ८१.१९ | १.९० |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

१०.२३.९ राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम बालकांच्या आरोग्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी पध्दतशीर आरोग्य तपासणी व आवश्यकतेनुसार वेळीच वैद्यकीय उपचार करण्यासाठी राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२१ राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| वर्ष | शाळा/ अंगणवाडी | विद्यार्थी (लाखात) | | | मोठ्या शस्त्रक्रिया | हृदय शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तपासलेले | उपचार केलेले | संदर्भित केलेले | | |
| २०१४-१५ | ८४,०६६ | १२२.३६ | १५.०९ | ०.७९ | ८,१३३ | १,४१९ |
| | १,०२,०९६# | ६३.३४ | ६.४८ | ०.८५ | | |
| | १,०१,८३५## | ६३.३४ | ५.९८ | ०.६४ | | |
| २०१५-१६ | ८४,४१९ | १२३.८४ | १३.७७ | ०.९० | १४,६७१ | १,९८७ |
| | १,०४,४७९# | ६४.४८ | ६.१८ | ०.४० | | |
| | १,०२,६२३## | ६५.९९ | ५.८५ | ०.४४ | | |
| २०१६-१७+ | ८४,९२४ | ९५.८३ | ८.८७ | ०.७० | ६,३७६ | ९८० |
| | १,०३,१५८# | ६४.५८ | ४.९२ | ०.३७ | | |
| | १,०३,१७४## | २४.५१ | २.०५ | ०.१९ | | |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन # अंगणवाडी सत्र I ## अंगणवाडी सत्र II + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

१०.२३.१० हिवताप, हत्तीरोग, डेंग्युताप, मेंदूज्वर, चिकुनगुनीया, चंडीपूरा, इत्यादी किटकजन्य रोगांचा प्रतिबंध, रोगनिदान, उपचार व नियंत्रणासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२२ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| रोग | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | ५५,५९८ | ६६ | ५३,७४७ | ५७ | १९,०५८ | २४ |
| हत्तीरोग | ३,३०३ | ० | २,३३६ | ० | १,७२० | ० |
| डेंग्यू | ८,५२४ | १३९ | ५,२९४ | ३२ | ६,४०६ | ३३ |
| मेंदूज्वर | १ | ० | ७ | ० | १२ | १ |
| चिकुनगुनिया | २२४ | ० | ३०९ | ० | २,८२१ | ० |
| एईएस/चंडीपुरा | ५ | २ | १ | १ | ४ | ४ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन एईस : ॲक्यूट एन्सेफॅलिटीस सिंड्रोम + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत इतर कार्यक्रम

१०.२३.११ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात इतर अनेक आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात. यापैकी काही कार्यक्रमांची प्रगती खालीलप्रमाणे:

➢ सुधारित राष्ट्रीय क्षय रोग नियंत्रण कार्यक्रम: क्षयरोग हा संसर्गजन्य रोग असून या कार्यक्रमाचे व्हिजन ‘क्षयरोग मुक्त भारत’ असे आहे. लागण झालेल्या क्षयरोग रुग्णांची डायरेक्टली ऑब्झवर्ड ट्रिटमेंट शॉर्ट कोर्स (डॉट्स) द्वारे तपासणी करुन ते पूर्ण बरे होईपर्यंत प्रभावीपणे उपचार देण्यात येतात. यामध्ये संपूर्ण कालावधीसाठी औषधांचा खात्रीशीर पुरवठा व औषधोपचाराला रुग्णांचा प्रतिसाद नियमितपणे नोंदविण्याची यंत्रणा आहे. दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या २०१५ मध्ये २१४ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८२ टक्के होते, तर सन २०१६ मध्ये प्रति लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या २०३ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८२ टक्के होते.

➢ राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम: सन २०१५-१६ मधील मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे ७.५० लाख लक्ष्यापैकी ९४ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले तर २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत तेवढ्याच लक्ष्याचे ६५ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले.

➢ राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम: सन २०१५-१६ मध्ये नवीन व ग्रस्त कुष्ठरुग्णांची संख्या अनुक्रमे १५,६९५ व १०,१०३ होती, तर सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरअखेर तत्सम आकडेवारी अनुक्रमे ११,९२१ व ११,७०८ होती.

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

१०.२३.१२ लोकसंख्या स्थिर करणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे पैलू असून हे अंतर राखण्यासाठी तांबी (आययुडी), पारंपारिक संतति प्रतिबंधक साधने, इत्यादींच्या प्रसारावर जास्त भर दिला जातो. कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२३ कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाची माहिती**

('०००)

| वर्ष | नसबंदी | | | | तांबी | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| २०१४-१५ | ५६५ | १३.९ | ४५८.६ | ४७२.५ (८३.६) | ४५० | ३९१.५ (८७.०) | २९.१७ |
| २०१५-१६ | ५६५ | १४.८ | ४४६.८ | ४६१.६ (८१.७) | ४६० | ३९८.० (८६.५) | २७.८९ |
| २०१६-१७+ | ५६५ | १०.४ | ३१३.१ | ३२३.५ (५७.२) | ४९० | ३१८.२ (६४.९) | १४.६३ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन   टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात.   + डिसेंबरपर्यंत

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना

१०.२४ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दारिद्र्य रेषेखालील पिवळे शिधापत्रिका धारक, दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिका धारक, अन्नपूर्णा व अंत्योदय शिधापत्रिका धारक आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा) पांढरे शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबासह रुग्णांना निवडक आजारांवरील उपचारांकरिता रोख रक्कम विरहीत (कॅशलेस) वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी नॅशनल इन्शुरन्स कंपनीच्या सहयोगाने राबविण्यात येते. या योजनेंतर्गत निवडक ४८९ रुग्णालयांद्वारे (७८ शासकीय व ४११ खाजगी) रोख रक्कम विरहित (कॅशलेस) वैद्यकीय सुविधा पुरविली जाते. प्रति वर्ष प्रति कुटुंब विम्याचा हप्ता राज्य शासन अदा करते व प्रति वर्ष प्रति कुटुंब ₹ १.५ लाखाचे व मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ₹ २.५ लाखाचे विमा संरक्षण दिले जाते. यामध्ये ९७१ प्रकारच्या गंभीर व खर्चिक शस्त्रक्रिया/उपचारपध्दतींचा समावेश होतो. या योजनेची विभागनिहाय प्रगती तक्ता १०.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२४ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची प्रगती**

| विभाग | वर्ष | पूर्व तपासणी | | शस्त्रक्रिया / उपचारपद्धती | | निपटारा केलेली देयके | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या (हजारात) | रक्कम (₹ कोटीत) | संख्या (हजारात) | रक्कम (₹ कोटीत) | संख्या (हजारात) | रक्कम (₹ कोटीत) |
| कोकण | २०१५-१६ | ८६.५९ | २३३.०६ | ८६.५२ | २३३.३४ | ८४.७६ | २०८.१५ |
| | २०१६-१७+ | ६७.८७ | १८१.४९ | ६७.५२ | १८०.५० | ६५.८२ | १६३.४२ |
| नाशिक | २०१५-१६ | ७६.६९ | १९०.४७ | ७६.६६ | १९०.३५ | ७०.३६ | १६१.९८ |
| | २०१६-१७+ | ६६.०८ | १६६.६१ | ६५.९९ | १६६.५४ | ६५.१३ | १५४.४८ |
| पुणे | २०१५-१६ | ९०.१२ | २१२.१२ | ९०.०२ | २११.९५ | ८०.२३ | १७१.८६ |
| | २०१६-१७+ | ८३.८३ | २०१.५९ | ८३.६० | २००.७५ | ८३.५७ | १८३.०९ |
| औरंगाबाद | २०१५-१६ | ५६.९७ | १२५.६८ | ५६.८९ | १२५.५९ | ४७.७७ | ९५.६५ |
| | २०१६-१७+ | ५०.७१ | ११२.०१ | ५०.२९ | १११.५६ | ५२.०५ | १०४.९२ |
| अमरावती | २०१५-१६ | २२.७५ | ४१.०३ | २२.७४ | ४०.९३ | २०.२६ | ३१.७९ |
| | २०१६-१७+ | २१.०५ | ४३.०७ | २१.०४ | ४३.०१ | १९.९० | ३७.१८ |
| नागपूर | २०१५-१६ | ३१.८३ | ७६.५९ | ३१.७७ | ७६.५० | २८.३९ | ६२.५९ |
| | २०१६-१७+ | २७.५४ | ६२.५८ | २७.२२ | ६२.०५ | २६.८४ | ५६.३० |
| **एकूण** | **२०१५-१६** | **३६४.९५** | **८७८.९५** | **३६४.६०** | **८७८.६६** | **३३१.७७** | **७३२.०२** |
| | **२०१६-१७+** | **३१७.०८** | **७६७.३५** | **३१५.६६** | **७६४.४१** | **३१३.३१** | **६९९.३९** |

*आधार* : राजीव गांधी जीवनदायी आरोग्य सोसायटी, महाराष्ट्र शासन   +डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.२५ राज्यात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेची स्थापना करण्यात आली. जनजागृती अभियान आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व निरीक्षण यावर या कार्यक्रमाचा भर आहे. यामध्ये लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयातील रुग्णांची व प्रसुतीपूर्व तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलांच्या रक्ताच्या नमुना तपासणीद्वारे निरीक्षणे केली जातात. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम-टप्पा IV (२०१२ ते २०१७) चा मुख्य उद्देश नवीन संक्रमण ५० टक्क्यांपर्यंत कमी करुन सर्व एचआयव्ही / एड्सग्रस्तांना सर्वसमावेशक आरोग्यनिगा, आधार व सर्व बाधित व्यक्तींना उपचार देणे हा आहे. एचआयव्ही / एड्स विषयक प्रकरणांचा तपशील तक्ता १०.२५ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.२५ एचआयव्ही / एड्स विषयक प्रकरणे**

('०००)

| बाब | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती | ४,१२८ | ४,६५० | ४,८९१ |
| तीन चाचणी पद्धतीवरुन एचआयव्ही बाधित | ३९ | ३६ | ३२ |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के) @ | १.० | ०.७ | ०.६ |
| एड्स रुग्ण | २४.९३ | १९.५२ | १८.८६ |
| एड्सने मृत्यू | ३.६८ | ३.७३ | ४.६१ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था @ तपासणी केलेल्या जोखीम गटातील व्यक्तींशी

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.२६ सुरक्षित रक्ताचा व त्याच्या घटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सीकल सेल ग्रस्त बालके तसेच थॅलेसेमिया व हेमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्त संकलनाची माहिती तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२६ रक्त संकलनाची माहिती**

(लाख युनिट)

| वर्ष | रक्तपेढ्या संख्या | एकूण संकलन | पैकी, ऐच्छिकपणे केलेले |
|---|---|---|---|
| २०१४ | ३१३ | १५.६२ | १४.९२ |
| २०१५ | ३१७ | १५.६६ | १५.१६ |
| २०१६ | ३२१ | १६.१७ | १५.७० |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.२७ या कार्यक्रमांतर्गत कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, काविळ, विषमज्वर, इत्यादी जलजन्य आजारांच्या साथींचा उद्रेक तसेच अधूनमधून उद्‌भवणाऱ्या आजारांचे संनियंत्रण केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करणे याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. साथींचा उद्रेक व अधूनमधून उद्‌भवणाऱ्या आजारांमुळे झालेली लागण व मृत्यूंची संख्या तक्ता १०.२७ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.२७ साथउद्रेक व अधूनमधून उद्‌भवणाऱ्या आजारांमुळे झालेली लागण व मृत्यूंची संख्या**

| आजार | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू |
| कॉलरा | १०८ | १ | १९५ | २ | ९६३ | ४ |
| गॅस्ट्रो | ५४,८९७ | ६ | १,३०,०३७ | ४ | २,३२,९०३ | १४ |
| अतिसार | ९,१८,९९९ | ३ | ११,६९,३७७ | २ | ९,३२,०२१ | ७ |
| काविळ | ५,७११ | ४ | ७,२०८ | ६ | ६,६५५ | ५ |
| विषमज्वर | ३६,१६० | ० | ७२,५१६ | ० | १,२३,५७४ | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | २३२ | २० | २४६ | २२ | ३६७ | १३ |
| **एकूण** | **१०,१६,१०७** | **३४** | **१३,७९,५७९** | **३६** | **१२,९६,४८३** | **४३** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## मानवी अवयव प्रत्यारोपण

१०.२८ मानवी उपचारांकरिता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री रोखण्याकरिता तत्संबंधी मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे यांचे नियमन/नियंत्रण करण्याकरिता केंद्र शासनाने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ लागू केला आहे. राज्यात एक अवयव प्रत्यारोपणाची १२८, एकापेक्षा जास्त अवयवांच्या प्रत्यारोपणाची २६ आणि नेत्रदान, नेत्रपेढी व बुब्बुळ प्रत्यारोपणासाठी २६९ केंद्रांची नोंदणी झाली आहे. प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.२८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.२८ प्रत्यारोपण झालेल्यांची संख्या**

| प्रत्यारोपण | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|
| जीवित मुत्रपिंड | ६९२ | ५०९ |
| जीवित यकृत | ११८ | ८७ |
| मृतवत अवयव प्रत्यारोपण | | |
| अ) मुत्रपिंड | ९७ | १६९ |
| ब) यकृत | ४१ | १०८ |
| क) हृदय | ५ | ३० |
| ड) फुफ्फुस | ० | १ |
| बुब्बुळ प्रत्यारोपण | ३,२३० | २,२४९ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

# महिला व बाल विकास

१०.२९ महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर महिला सक्षमीकरण साध्य होईल. महाराष्ट्र हे देशातील महिला धोरण आखणारे पहिले राज्य असून हे धोरण १९९४ मध्ये जाहीर करण्यात आल्यानंतर ते २००१ मध्ये सुधारीत करण्यात आले व सन २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण राज्याने जाहीर केले. या महिला धोरणांमध्ये प्रामुख्याने महिलांवरील अत्याचाराबाबत जागृती, महिलाविषयक कायदे, महिलांच्या आर्थिक स्थिती मध्ये सुधारणा, स्वयंसहाय्यता बचत गटांचा विकास आणि महिलांचे हक्क यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले.

१०.३० राज्यात विविध महिला विकास योजना राबविण्यात येत असून त्यापैकी निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ निवडक महिला विकास योजनांची प्रगती**

(₹ कोटी)

| योजना | २०१४-१५ | | | २०१५-१६ | | | २०१६-१७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | लाभार्थी (संख्या) | नियतव्यय | खर्च | लाभार्थी (संख्या) | नियतव्यय | खर्च + | लाभार्थी + (संख्या) |
| शासकीय महिला वसतिगृहे / संरक्षण गृहे/ स्वयंसेवी आधार गृहे | ५.६५ | ५.४७ | ३७५ | ११.२० | ११.६९ | ४०० | १२.९३ | ९.४९ | ४०० |
| समुपदेशन केंद्रे | ३.१६ | ३.१६ | १३६ | ३.६० | ३.६० | १३६ | १.५७ | १.५४ | १३६ |
| शुभमंगल सामुहिक विवाह योजना | १.५७ | १.५७ | १,५०० | ०.४३ | ०.४३ | ४२६ | - | - | - |
| मनोधैर्य योजना | ३०.०२ | २९.९० | ४७५ | ३६.८५ | ३६.८७ | ५१० | ४३.२३ | ४३.२३ | ५,४२६ |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

१०.३१ राज्यात महिलांसाठी विविध केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत असून त्यापैकी निवडक योजनांची प्रगती खालीलप्रमाणे आहे.

- **नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे :** नोकरदार महिलांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी उत्पन्नाची मर्यादा महानगरांसाठी वार्षिक ₹ ३०,००० व इतर शहरांसाठी वार्षिक ₹ २५,००० आहे. राज्यात अशी १२९ वसतिगृहे असून त्यात १०,१६८ महिला लाभ घेत आहेत.
- **प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमासाठी आधार :** या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे महिलांच्या छोट्या गटांना चालना देणे, स्वयंरोजगार व कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे आणि रोजगार तथा उत्पन्न निर्मितीचे प्रकल्प सुरू करण्यासाठी अनुषंगिक सहाय्य करणे ही आहेत. या कार्यक्रमांतर्गत १६ प्रकल्प कार्यरत असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता १,०५० आहे.
- **स्वाधार :** या योजनेंतर्गत संकटग्रस्त महिलांच्या पुनर्वसनासाठी संरक्षण, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या एकूण २४ प्रकल्पांमध्ये १,२२० लाभार्थी आहेत.
- **उज्वला :** महिलांच्या लैंगिक शोषणाच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी आणि पीडितांची सुटका, पुनर्वसन व पुनःएकीकरण करण्यासाठी ५२ संस्था कार्यरत असून, त्यापैकी १६ निवासी संस्था आहेत.

## निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग

१०.३२ केंद्र शासनाने महिलांना स्थानिक संस्थांमध्ये एक-तृतीयांश आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, राज्य शासनाने हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. राज्यातील स्थानिक संस्थांमधील महिलांसाठीच्या राखीव जागा तक्ता १०.३० मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.३० राज्यातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा**

(३१ डिसेंबर २०१६ रोजी)

| स्थानिक संस्था | संख्या | एकूण जागा | महिलांसाठी राखीव |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | २७ | २,७३० | १,३७१ |
| नगरपरिषद | २३४ | ५,२९० | २,७२१ |
| नगरपंचायत | १२४ | २,१०८ | १,११६ |
| जिल्हा परिषद | ३४ | २,००६ | १,०१३ |
| पंचायत समिती | ३५१ | ४,०१२ | २,००६ |
| ग्रामपंचायत | २८,३३२ | २,२७,२४१ | १,१३,६२१ |
| **एकूण** | **२९,१०२** | **२,४३,३८७** | **१,२१,८४८** |

*आधार :* राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.३३ महिलांविषयक विविध विकास योजना राबविण्याकरिता, राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्याची नोडल संस्था म्हणून घोषित केले आहे. स्व-सहाय्यता गट, वित्तीय संस्था आणि शासनाचे संबंधित विभाग यांमधील समन्वय संस्था म्हणून माविम काम करते. माविमला विविध योजनांखाली सन २०१६-१७ मध्ये ₹ २०.७२ कोटी निधी प्राप्त झाला असून डिसेंबरपर्यंत ₹ १८.९४ कोटी खर्च झाला आहे. माविमकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती तक्ता १०.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३१ महिला आर्थिक विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना**

(₹ कोटी)

| योजना | २०१५-१६ | | | २०१६-१७ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | लाभार्थी (संख्या) | नियतव्यय | खर्च + | लाभार्थी (संख्या) + |
| तेजस्विनी | १६.१३ | १६.१३ | ४०,९७४ | १०.०० | ८.०० | ४१,६४२ |
| महिला सक्षमीकरण (कर्जावरील व्याजासाठी चार टक्के अनुदान) | ०.०३ | ०.०३ | १५,५७९ | ०.१२ | ० | ० |
| महिला सक्षमीकरण (अजा उपयोजना) | ०.५२ | ०.५२ | ५,००७ | ०.८० | ०.६४ | १०,३९३ |
| महिला सक्षमीकरण (माविमला अर्थसहाय्य) | १८.६९ | १८.६९ | ला.ना. | १५.१० | १०.३० | ला.ना. |

*आधार :* माविम, महाराष्ट्र शासन ला.ना. लागू नाही + डिसेंबरपर्यंत

१०.३३.१ महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्व-सहायता गट हे चांगले माध्यम आहे. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत स्व-सहायता गटांची एकूण बचत सुमारे ₹ ८३.८८ कोटी होती तर एकूण अंतर्गत वितरीत कर्ज ₹ १८७.४१ कोटी होते. स्व-सहाय्यता गटांना विविध वित्तीय संस्थांकडून ₹ २५५.५९ कोटी कर्ज सन २०१६-१७ डिसेंबर अखेर मिळाले. राज्यातील महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती तक्ता १०.३२ मध्ये दिली आहे.

**आलेख १०.९ : बचत व स्व-सहाय्यता गटांना अंतर्गत वितरीत कर्ज (२०१६-१७ डिसेंबर पर्यंत)**



**तक्ता १०.३२ राज्यातील महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती**

(संख्या)

| विभाग | क्षेत्र | गावे/शहरे | २०१४-१५ स्व-सहाय्यता गट | २०१४-१५ सदस्य | २०१५-१६ स्व-सहाय्यता गट | २०१५-१६ सदस्य | २०१६-१७+ स्व-सहाय्यता गट | २०१६-१७+ सदस्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | ग्रामीण | ९६८ | ६,४७० | ७६,७०६ | ६,८२७ | ८१,०४६ | ९,१९७ | १,०४,९६१ |
| | नागरी | २ | ८६१ | १०,६४७ | ९४० | १२,९४० | १,२७७ | १२,५४२ |
| | एकूण | ९७० | ७,३३१ | ८७,३५३ | ७,७६७ | ९३,९८६ | १०,४७४ | १,१७,५०३ |
| पुणे | ग्रामीण | १,०३९ | ९,४०९ | १,२७,७८९ | १०,३३५ | १,३८,९६५ | १०,४९२ | १,३१,३५६ |
| | नागरी | २ | ४५२ | ५,७६१ | ४३० | ५,९०५ | ९०२ | १०,२६९ |
| | एकूण | १,०४१ | ९,८६१ | १,३३,५५० | १०,७६५ | १,४४,८७० | ११,३९४ | १,४१,६२५ |
| नाशिक | ग्रामीण | १,६०० | ९,८१४ | १,४९,०५८ | १०,२८५ | १,५४,२४३ | ८,४७१ | १,०४,६५८ |
| | नागरी | १ | २३७ | २,७१२ | २४९ | ३,४१२ | ९०८ | ७,७७८ |
| | एकूण | १,६०१ | १०,०५१ | १,५१,७७० | १०,५३४ | १,५७,६५५ | ९,३७९ | १,१२,४३६ |
| औरंगाबाद | ग्रामीण | २,५१० | ११,६५५ | १,८९,८१२ | १२,३५५ | १,९८,१२२ | १२,९८० | १,४६,६०० |
| | नागरी | ३ | ७३२ | ९,५१३ | ७३७ | १०,१२३ | १,५५२ | १४,२६८ |
| | एकूण | २,५१३ | १२,३८७ | १,९९,३२५ | १३,०९२ | २,०८,२४५ | १४,५३२ | १,६०,८६८ |
| अमरावती | ग्रामीण | १,९४२ | १०,४८० | १,३३,१२४ | ११,१९६ | १,४०,८१५ | १२,४९५ | १,३०,७६० |
| | नागरी | १ | २०० | २,४१९ | २१३ | २,७५८ | ६५४ | ४,८९६ |
| | एकूण | १,९४३ | १०,६८० | १,३५,५४३ | ११,४०९ | १,४३,५७३ | १३,१४९ | १,३५,६५६ |
| नागपूर | ग्रामीण | २,४३६ | १४,२१६ | २,०९,०५८ | १५,०७० | २,१९,१८७ | १४,५८० | १,७९,२९७ |
| | नागरी | १ | २०१ | २,५४९ | २०१ | २,७१४ | ९१० | ७,१५५ |
| | एकूण | २,४३७ | १४,४१७ | २,११,६०७ | १५,२७१ | २,२१,९०१ | १५,४९० | १,८६,४५२ |
| प्रादेशिक स्वयं-सेवी संस्था | - | - | १२,९५२ | १,६०,३९१ | १२,९५२ | १,६०,३९१ | १२,८०६ | १,४९,१९९ |
| **एकूण** | **ग्रामीण** | **१०,४९५** | **७४,९९६** | **१०,४५,९३८** | **७९,०२०** | **१०,९२,७६९** | **८१,०२१** | **९,४६,८३१** |
| | **नागरी** | **१०** | **२,६८३** | **३३,६०१** | **२,७७०** | **३७,८५२** | **६,२०३** | **५६,९०८** |
| | **एकूण** | **१०,५०५** | **७७,६७९** | **१०,७९,५३९** | **८१,७९०** | **११,३०,६२१** | **८७,२२४** | **१०,०३,७३९** |

*आधार* : माविम, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## महिलांवरील अत्याचार

१०.३४ महिलांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शारीरिक किंवा मानसिकरित्या केल्या जाणा-या क्रूर कृत्यांना 'महिलांवरील अत्याचार' असे संबोधिले जाते. महिलांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे तक्ता १०.३३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३३ महिलांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे**

(संख्या)

| अत्याचाराचा प्रकार | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|
| बलात्कार | ३,४३८ | ४,१४४ | ४,२०९ |
| अपहरण आणि पळवून नेणे | २,४५७ | ५,०९६ | ४,७७६ |
| हुंडाबळी | २७९ | २६८ | २२७ |
| पती व पतीच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार | ७,६९६ | ७,६४० | ६,२०३ |
| विनयभंग | १०,००१ | ११,७१३ | ११,३८८ |
| लैंगिक अत्याचार | १,५७५ | १,११९ | ७९३ |
| अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा | २०२ | ३८१ | ३१७ |
| इतर | १,०४५ | ७६५ | ४,६३५ |
| **एकूण** | **२६,६९३** | **३१,१२६** | **३२,५४८** |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन

## बाल विकास

१०.३५ बाल विकासासाठी राज्य शासनामार्फत राज्यात विविध योजना राबविण्यात येत असून त्या पुढीलप्रमाणे आहेत:

- **निरीक्षण गृहे :** राज्यात ११ जिल्ह्यांत शासनाकडून एकूण १२ शासकीय निरीक्षण गृहे चालविली जात असून त्यांची प्रवेश क्षमता ६०० आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांमार्फत ४८ निरीक्षण गृहे (१९ मुलींसाठी व २९ मुलांसाठी) चालविली जात असून, त्यांची प्रवेश क्षमता ४,२७५ आहे. अनाथ, परित्याग केलेली मुले, हरवलेल्या व काम करणाऱ्या मुलांना बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ यांच्या शिफारसीने निरीक्षण गृहात प्रवेश दिला जातो. राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी दरमहा ₹ ९०० सहाय्यक अनुदान दिले जाते.

- **बालगृहे :** वय वर्ष १८ पर्यंतच्या मुलांना या गृहात प्रवेश दिला जातो. राज्यात शासनाकडून २८ बालगृहे चालविली जात असून त्यांची प्रवेश क्षमता २,९९० आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांमार्फत ९९४ अनुदानित बालगृहे कार्यरत असून त्यांची प्रवेश क्षमता ८२,८५९ आहे. तसेच विना अनुदानित ६३ बालगृहे चालविली जात असून, त्यांची प्रवेश क्षमता ३,८४० आहे. राज्य शासनामार्फत दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,२१५ व एडस् ग्रस्त मुलासाठी दरमहा ₹ १,३०५ याप्रमाणे या बालगृहांना सहाय्यक अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये ५०,५७८ लाभार्थ्यांवर ₹ ६,९९६.५२ लाख खर्च झाला. तर सन २०१६-१७ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ₹ ३३२.३४ लाख खर्च झाला.

- **अनुरक्षण गृहे :** या योजनेंतर्गत बालगृहामधील १८ वर्षे वयाच्या किशोरवयीन मुलांचे अनुरक्षणगृहात पुनर्वसन केले जाते. प्रवेशितांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा त्यांना रोजगार मिळेपर्यंत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकिय सुविधा, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, इ. सुविधा पुरविण्यात येतात. सद्यस्थितीत राज्यात सहा शासकीय व तीन स्वयंसेवी संस्थांची अनुरक्षण गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता अनुक्रमे ६०० व ११० आहे. राज्य शासनाकडून दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,२१५ सहाय्यक अनुदान या अनुरक्षण गृहांना देण्यात येते.

- **बाल संगोपन योजना :** गरजू बेघर मुला-मुलींना पर्यायी कुटुंब उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राज्यात राबविण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात १३७ स्वयंसेवी संस्थांमार्फत १३,००४ बालकांचे संगोपन केले जाते. या योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये ₹ १०९ कोटी खर्च झाला.

- **सुकन्या :** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांमध्ये १ जानेवारी, २०१४ व त्यानंतर जन्मलेल्या मुलीच्या नावावर या योजनेंतर्गत शासनाकडून ₹ २१,२०० भारतीय आयुर्विमा महामंडळामध्ये जमा करण्यात येतात. मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ₹ एक लाख प्राप्त होतील. याशिवाय तिच्या इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणासाठी दरमहा ₹ १०० शिष्यवृत्ती देण्यात येते. ही योजना सन २०१६-१७ मध्ये माझी कन्या भाग्यश्री योजना या योजनेत समाविष्ट केली आहे.

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.३६ ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील शालेयपूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी, एकात्मिक सेवा पुरविणे ही एकात्मिक बाल विकास सेवा या योजनेची उद्दिष्टे आहेत. हा कार्यक्रम ९७,४७५ अंगणवाड्या, १३,०११ मिनी अंगणवाड्या आणि ५५३ बालविकास प्रकल्पांमार्फत राबविला जातो.

## पोषण कार्यक्रम

१०.३६.१ बालके, गर्भवती महिला व स्तनदा माता यांच्या पोषण विषयक किमान गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार हा कार्यक्रम एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येतो. पूरक पोषण कार्यक्रमांतर्गत समाजातील वंचित घटकांतील सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांना पोषण आहार देणे, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य सुधारणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. दुर्गम व संवेदनशील भागातील कुपोषण नियंत्रित करुन अर्भक मृत्यूदर कमी करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार, सन २०१०-११ पासून बालकांचे योग्य वजनाची, कमी वजनाची व अति कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करण्यात येते. बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी तक्ता १०.३४ मध्ये दिली आहे. पूरक पोषण आहार कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३४ बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | योग्य वजनाची बालके | कमी वजनाची बालके | अति कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | ग्रामीण | ९२.५ | ६.४ | १.१ |
| | आदिवासी | ८०.६ | १५.६ | ३.८ |
| | नागरी | ८३.४ | १५.४ | १.२ |
| | **एकूण** | **८९.२** | **९.६** | **१.५** |
| २०१५-१६ | ग्रामीण | ९१.६ | ७.० | १.३ |
| | आदिवासी | ८१.४ | १५.४ | ३.५ |
| | नागरी | ८३.३ | १५.९ | १.२ |
| | **एकूण** | **८९.६** | **९.१** | **१.३** |
| २०१६-१७+ | ग्रामीण | ९२.३ | ६.६ | १.१ |
| | आदिवासी | ८१.३ | १५.३ | ३.५ |
| | नागरी | ८३.१ | १५.९ | १.० |
| | **एकूण** | **८९.१** | **९.५** | **१.४** |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

**तक्ता १०.३५ पूरक पोषण आहार कार्यक्रमाची प्रगती**

| क्षेत्र | वर्ष | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| ग्रामीण (आदिवासी भागासह) | २०१४-१५ | ५९.९४ | १,०९२ |
| | २०१५-१६ | ५७.१५ | ९२३ |
| | २०१६-१७+ | ५२.२६ | ४६५ |
| नागरी | २०१४-१५ | ११.९८ | २१८ |
| | २०१५-१६ | ११.५९ | २८० |
| | २०१६-१७+ | ११.३७ | ९६ |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.३६.२ एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत राज्यात राबविल्या जाणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजना खालीलप्रमाणे आहेत.

- **राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला)** : ही योजना सन २०११ पासून ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये २०७ प्रकल्पांमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेखाली सन २०१५-१६ मध्ये १०.२० लाख व सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ७.८६ लाख लाभार्थी होते.
- **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना** : गर्भवती महिला व स्तनदा माता यांचे आरोग्य व पोषणाचा दर्जा सुधारावा या उद्देशाने ही योजना भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यांमध्ये सन २०११ पासून प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. लाभधारक महिलांस गरोदरपण व बाळंतपणाच्या कालावधीत दोन हप्त्यांमध्ये ₹ ६,००० रोख रक्कम दिली जाते. या योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये ०.६२ लाख व सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ०.५९ लाख लाभार्थी होते.

## बालकांवरील अत्याचार

१०.३७ बालकांवरील अत्याचाराचे जे गुन्हे घडतात किंवा ज्या गुन्ह्यात बालके पीडित असतात असे गुन्हे 'बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे' म्हणून संबोधिले जातात. बालकांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे तक्ता १०.३६ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३६ बालकांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|
| खून (एकूण) | २०७ | २१४ | १३२ |
| १) गर्भातील जीव | १२ | ७ | ४४ |
| २) इतर | १९५ | २०७ | ८८ |
| बालकांवरील बलात्कार | १,७१४ | २,२३१ | २,०८६ |
| अपहरण व पळवून नेणे | २,६१६ | ६,९६० | ८,०१६ |
| परित्याग | २२५ | १३ | २६ |
| इतर | ३,३५३ | ४,५२३ | ३,३३१ |
| **एकूण** | **८,११५** | **१३,९४१** | **१३,५९१** |

आधार : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन

# रोजगार व दारिद्र्य
## रोजगार

१०.३८ शासनाने रोजगार निर्मितीवर विशेष भर देऊन योजना व कार्यक्रमांची आखणी केली आहे. कुशल व उत्पादक श्रमशक्तीचा सर्वसमावेशक आर्थिक व स्थिर विकास साधण्यामध्ये महत्वाचा सहभाग आहे.

१०.३९ रोजगाराबाबतची स्थिती दर्शविणाऱ्या आकडेवारीचे मुख्य स्रोत जनगणना, आर्थिक गणना, राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय केंद्र शासन तसेच श्रम केंद्र, केंद्र शासन यांनी स्वतंत्रपणे घेतलेल्या ‘रोजगार व बेरोजगारविषयक’ पाहण्या हा आहे. कारखान्यांमधील (कारखाने अधिनियम-१९४८ खालील नोंदणीकृत) रोजगार विषयक माहिती वैधानिक विवरणपत्राव्दारे देखील उपलब्ध होते. याव्यतिरिक्त सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमधील रोजगार विषयक माहिती रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम अंतर्गत गोळा केली जाते.

### रोजगार विषयक माहिती - जनगणना २०११

१०.४० जनगणनेद्वारे लोकसंख्या विषयक आकडेवारी सोबतच रोजगार व त्याची रचना याबाबत माहिती उपलब्ध होते. जनगणना २०११ नुसार, राज्यात एकूण ४.९४ कोटी कामगार असून, त्यापैकी १.६८ कोटी महिला होत्या. राज्याकरिता कार्य सहभाग दर ४४ टक्के तर देशाकरिता ३९.८ टक्के आहे. कार्य सहभाग दर तक्ता १०.३७ मध्ये व निवडक राज्यांकरिता कार्य सहभाग दर तक्ता १०.३८ मध्ये दिले आहेत. जनगणना २०११ नुसार, कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण परिशिष्ट १०.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.३७ कार्य सहभाग दर - जनगणना २०११**

(टक्के)

| | क्षेत्र | मुख्य कामगार | | | सीमांतिक कामगार | | | एकूण कामगार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| महाराष्ट्र | ग्रामीण | ५१.३ | ३४.४ | ४३.१ | ५.४ | ८.१ | ६.७ | ५६.७ | ४२.५ | ४९.८ |
| | नागरी | ५१.७ | १४.३ | ३४.० | ३.५ | २.५ | ३.० | ५५.२ | १६.८ | ३७.० |
| | **एकूण** | **५१.५** | **२५.४** | **३८.९** | **४.५** | **५.६** | **५.०** | **५६.०** | **३१.१** | **४४.०** |
| भारत | ग्रामीण | ४१.६ | १६.७ | २९.५ | ११.४ | १३.३ | १२.३ | ५३.० | ३०.० | ४१.८ |
| | नागरी | ४८.७ | ११.९ | ३१.० | ५.१ | ३.५ | ४.३ | ५३.८ | १५.४ | ३५.३ |
| | **एकूण** | **४३.८** | **१५.२** | **२९.९** | **९.५** | **१०.३** | **९.९** | **५३.३** | **२५.५** | **३९.८** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय.

**तक्ता १०.३८ निवडक राज्यांकरिता कार्य सहभाग दर - जनगणना २०११**

(टक्के)

| राज्य | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| आंध्र प्रदेश | ५८.४ | ४४.७ | ५१.६ | ५४.१ | १९.१ | ३६.८ | ५७.० | ३६.२ | ४६.६ |
| तामीळनाडू | ६०.० | ४१.२ | ५०.७ | ५८.५ | २१.८ | ४०.२ | ५९.३ | ३१.८ | ४५.६ |
| कर्नाटक | ५९.८ | ३८.८ | ४९.४ | ५७.८ | २०.८ | ३९.७ | ५९.० | ३१.९ | ४५.६ |
| मध्य प्रदेश | ५४.३ | ३९.३ | ४७.० | ५१.७ | १५.१ | ३४.२ | ५३.६ | ३२.६ | ४३.५ |
| **महाराष्ट्र** | **५६.७** | **४२.५** | **४९.८** | **५५.२** | **१६.८** | **३७.०** | **५६.०** | **३१.१** | **४४.०** |
| राजस्थान | ५१.७ | ४२.७ | ४७.४ | ५०.८ | १२.० | ३२.३ | ५१.५ | ३५.१ | ४३.६ |
| गुजरात | ५७.२ | ३२.० | ४४.९ | ५७.२ | ११.४ | ३५.७ | ५७.२ | २३.४ | ४१.० |
| पश्चिम बंगाल | ५७.२ | १९.४ | ३८.७ | ५६.८ | १५.४ | ३६.७ | ५७.१ | १८.१ | ३८.१ |
| बिहार | ४६.७ | २०.२ | ३४.० | ४४.९ | १०.४ | २८.६ | ४६.५ | १९.१ | ३३.४ |
| उत्तर प्रदेश | ४७.४ | १८.३ | ३३.५ | ४९.९ | ११.३ | ३१.२ | ४७.७ | १६.८ | ३२.९ |
| **भारत** | **५३.०** | **३०.०** | **४१.८** | **५३.८** | **१५.४** | **३५.३** | **५३.३** | **२५.५** | **३९.८** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

## रोजगार विषयक माहिती - ६ वी आर्थिक गणना

१०.४१ सहावी आर्थिक गणना सन २०१३-१४ मध्ये घेण्यात आली. सदर गणनेत पीक उत्पादन व लागवड, लोक प्रशासन, संरक्षण, अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा, घरगुती कामगाराचे मालक म्हणून कुटुंबाचे कार्य, विदेशी संघटना व संस्थाचे कार्य तसेच अनधिकृत कार्ये वगळता सर्व आस्थापनांचा समावेश करण्यात आला होता. विभागनिहाय रोजगाराची माहिती तक्ता १०.३९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३९ विभागनिहाय रोजगार - ६ वी आर्थिक गणना**

(लाख)

| विभाग | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| कोकण | ३.६ | ०.९ | ४.५ | ३४.७ | ७.५ | ४२.२ | ३८.२ | ८.५ | ४६.७ |
| नाशिक | ६.५ | २.१ | ८.६ | ६.८ | १.३ | ८.२ | १३.३ | ३.५ | १६.८ |
| पुणे | १९.४ | ९.२ | २८.६ | १३.४ | ४.२ | १७.४ | ३२.८ | १३.२ | ४६.० |
| औरंगाबाद | ७.२ | १.६ | ८.८ | ५.२ | ०.९ | ६.१ | १२.३ | २.५ | १४.८ |
| अमरावती | ३.४ | ०.८ | ४.२ | ३.५ | ०.६ | ४.० | ६.९ | १.४ | ८.२ |
| नागपूर | ४.६ | १.३ | ६.० | ५.२ | १.४ | ६.६ | ९.८ | २.८ | १२.६ |
| **राज्य** | **४४.६** | **१६.०** | **६०.६** | **६८.८** | **१५.७** | **८४.५** | **११३.४** | **३१.७** | **१४५.१** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## रोजगार विषयक माहिती - राष्ट्रीय नमुना पाहणी (रानपा)

१०.४२ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय रोजगार व बेरोजगारविषयक व्यापक पंचवार्षिक पाहण्या घेते. रानपा ६८ व्या फेरीनुसार नित्य कार्यरत एकूण व्यक्तींची टक्केवारी ५३.६ होती. प्रमुख उद्योग गटनिहाय नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी तक्ता १०.४० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४० प्रमुख उद्योग गटनिहाय नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी**

| प्रमुख उद्योग गट | जुलै २००४-जून २००५ (६१ वी फेरी) | | | जुलै २०११-जून २०१२ (६८ वी फेरी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य |
| कृषि | ७८.३ | ५.० | ५४.० | ७४.० | ३.९ | ४७.२ |
| खाणकाम आणि दगड खाणकाम | ०.२ | ०.४ | ०.३ | ०.३ | ०.२ | ०.२ |
| वस्तूनिर्माण | ५.७ | २२.० | ११.१ | ५.९ | २१.९ | १२.० |
| वीज, वायू व पाणी पुरवठा | ०.१ | ०.३ | ०.२ | ०.१ | ०.४ | ०.२ |
| बांधकाम | २.७ | ८.५ | ४.६ | ४.८ | १०.८ | ७.१ |
| व्यापार | ५.५ | २५.२ | १२.१ | ५.१ | १७.० | ९.७ |
| वाहतूक | २.१ | १०.३ | ४.८ | २.५ | ९.७ | ५.३ |
| सेवा | ५.४ | २८.३ | १२.९ | ७.३ | ३६.१ | १८.३ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.४२.१ दैनिक कार्यस्थितीनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील कार्यशक्तीची टक्केवारी तक्ता १०.४१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४१ दैनिक कार्यस्थितीनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील कार्यशक्तीची टक्केवारी**

| कार्यशक्तीचा प्रकार | जुलै २००४-जून २००५ (६१ वी फेरी) | | | जुलै २०११-जून २०१२ (६८ वी फेरी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य |
| स्वयंरोजगार / घरगुती व्यवसायात मदतनीस | ५१.८ | ३७.५ | ४६.८ | ५०.१ | ३२.२ | ४३.० |
| नियमित रोजंदारी / वेतनी कर्मचारी | ८.८ | ५२.३ | २४.० | ११.४ | ५५.३ | २८.७ |
| नैमित्तिक मजूर | ३९.४ | १०.२ | २९.२ | ३८.५ | १२.५ | २८.३ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.४२.२ दैनिक कार्यस्थितीनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील श्रमशक्तीची टक्केवारी तक्ता १०.४२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४२ दैनिक कार्यस्थितीनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील श्रमशक्तीची टक्केवारी**

| श्रमशक्तीचा प्रकार | जुलै २००४-जून २००५ (६१ वी फेरी) | | | जुलै २०११-जून २०१२ (६८ वी फेरी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य |
| स्वयंरोजगार / घरगुती व्यवसायात मदतनीस | ४९.१ | ३५.४ | ४४.३ | ४९.० | ३१.० | ४१.९ |
| नियमित रोजंदारी / वेतनी कर्मचारी | ८.३ | ४९.४ | २२.७ | ११.२ | ५३.५ | २७.९ |
| नैमित्तिक मजूर | ३७.४ | ९.७ | २७.७ | ३७.६ | १२.१ | २७.५ |
| बेरोजगार | ५.२ | ५.५ | ५.३ | २.२ | ३.४ | २.७ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## रोजगार व बेरोजगार माहिती - वार्षिक पाहणी

१०.४३ सन २०१५-१६ मध्ये श्रम केंद्र, केंद्र शासन यांनी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमानाने श्रमशक्ती सहभाग संदर्भात राज्यस्तरीय/ जिल्हास्तरीय अंदाज तयार करण्यासाठी ५वी रोजगार व बेरोजगार वार्षिक पाहणी घेतली.

१०.४३.१ राज्यामध्ये नित्य मुख्य कार्यस्थितीनुसार, १५ वर्ष व त्यावरील व्यक्तींसाठी श्रमशक्ती सहभाग दर ५२.७ टक्के, काम करणाऱ्यांचे लोकसंख्येशी प्रमाण ५१.६ टक्के व बेरोजगारीचा दर २.१ टक्के होता. नित्य मुख्य कार्यस्थितीनुसार १५ वर्ष व त्यावरील व्यक्तींसाठी श्रमशक्ती प्रमाण तक्ता १०.४३ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.४३ नित्य मुख्य कार्यस्थितीनुसार १५ वर्ष व त्यावरील व्यक्तींसाठी श्रमशक्ती प्रमाण**

(टक्के)

| क्षेत्र | | नित्य मुख्य कार्यस्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | श्रमशक्ती सहभाग दर | काम करणाऱ्यांचे लोकसंख्येशी प्रमाण | बेरोजगार दर |
| ग्रामीण | पुरूष | ७६.३ | ७४.६ | २.२ |
| | स्त्री | ४६.३ | ४५.५ | १.६ |
| | तृतीयपंथी | ५५.४ | ५५.४ | - |
| | एकूण | ६१.६ | ६०.३ | २.० |
| नागरी | पुरूष | ६४.४ | ६३.३ | १.७ |
| | स्त्री | १२.८ | १२.१ | ५.५ |
| | तृतीयपंथी | ३७.६ | ३६.० | ४.४ |
| | एकूण | ३९.७ | ३८.८ | २.३ |
| **राज्य** | **पुरूष** | **७१.४** | **६९.९** | **२.०** |
| | **स्त्री** | **३३.०** | **३२.२** | **२.२** |
| | **तृतीयपंथी** | **४६.७** | **४५.९** | **१.७** |
| | **एकूण** | **५२.७** | **५१.६** | **२.१** |

*आधार*: श्रम केंद्र, केंद्र शासन

## राज्य सेवेमधील रोजगार

१०.४४ ३१ मार्च २०१५ रोजी राज्य शासनाच्या सेवेमध्ये एकूण ७.३७ लाख इतकी मंजूर पदे होती व त्यापैकी एकूण रिक्त पदे १.६५ लाख (२२.५ टक्के) होती. राज्य सेवेमधील कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे तक्ता १०.४४ मध्ये दिली आहेत.

## कारखान्यातील रोजगार

१०.४५ सन २०१४ च्या अस्थायी निष्कर्षानुसार, कारखाना अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणीकृत एकूण ३६,८०३ कार्यरत कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार सुमारे २०.२५ लाख होता. सन २०१३ मधील तत्सम आकडेवारीच्या तुलनेत कारखान्यांच्या संख्येत ४.० टक्के घट, तर रोजगारात ०.२ टक्के वाढ झाली आहे. सन २०१४ मध्ये कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण २२ टक्के होते. कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी तक्ता १०.४५ मध्ये दिली आहे. राज्यातील विविध उद्योगातील सरासरी दैनिक रोजगार आणि कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार परिशिष्ट १०.९ व १०.१० मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४४ राज्य सेवेमधील कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे**

(३१ मार्च २०१५ रोजी ) (लाख)

| गट | पदे (*) | | |
|---|---|---|---|
| | मंजूर | भरलेली | रिक्त |
| अ | ०.३९ | ०.२३ | ०.१५ |
| ब | ०.६७ | ०.५१ | ०.१६ |
| क | ४.८२ | ३.८७ | ०.९५ |
| ड | १.५० | १.१० | ०.३९ |
| **एकूण** | **७.३७** | **५.७२** | **१.६५** |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत. * अस्थायी

*आधार*: अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता १०.४५ कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी**

| उद्योग प्रकार | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५* |
| ग्राहक वस्तू | २८.५ | २७.८ | २७.९ | २८.३ |
| मध्यम तयारमाल | ३६.६ | ३५.६ | ३६.२ | ३६.५ |
| भांडवली वस्तू | २७.७ | २८.२ | २७.० | २६.५ |
| इतर | ७.२ | ८.४ | ८.९ | ८.७ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार*: औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम

१०.४६ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सार्वजनिक व खाजगी आस्थापना आणि त्यातील रोजगार यांच्याबाबतची माहिती उपलब्ध करणे तसेच रोजगाराच्या स्थितीतील बदलाची नोंद करणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत त्रैमासिक आकडेवारी गोळा करण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील सर्व आस्थापना (आकार विचारात न घेता) व खाजगी क्षेत्रातील १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर-कृषि आस्थापनांचा समावेश होतो. तर बृन्हमुंबईसाठी २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर-कृषि खाजगी आस्थापनांचा समावेश आहे. मार्च २०१६ अखेर, रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार राज्यातील एकूण रोजगार ६०.७४ लाख होता, त्यापैकी २२.४९ लाख (३७.० टक्के) रोजगार सार्वजनिक क्षेत्रात होता. एकूण रोजगारात महिलांचे प्रमाण १८.४ टक्के होते.

**आलेख १०.१० : रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमांतर्गत रोजगार**




## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे

१०.४७ कामाच्या शोधात असणाऱ्या व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगारासाठी समुपदेशन, मार्गदर्शन व मदत करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात अशी एकूण ५० केंद्रे कार्यरत असून, त्यापैकी ३५ जिल्हा स्तरावर, सहा विद्यापीठात, आठ आदिवासींकरिता, तर एक विशेष केंद्र दिव्यांग व्यक्तींसाठी आहे.

१०.४७.१ या केंद्रांच्या चालू नोंदवहीत, ३१ डिसेंबर २०१६ रोजी नोंद असलेल्या व्यक्तींची संख्या ३३.५६ लाख होती. सन २०१६ मध्ये या केंद्रांत नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ४.६० लाख होती. सन २०१६ मध्ये, ५.७६ लाख रिक्त पदे अधिसूचित करण्यात आली, तर १.४४ लाख व्यक्तींना रोजगार पुरविण्यात आला. अधिसूचित रिक्तपदे, भरलेली पदे आणि चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींचा शैक्षणिक पात्रतेनुसार तपशील अनुक्रमे परिशिष्ट १०.११ व १०.१२ मध्ये दिला आहे.

## रोजगार प्रोत्साहनाकरिता कार्यक्रम

१०.४८ राज्य शासनामार्फत खालील रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येतात.

- **रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :** शिक्षित बेरोजगार व्यक्तींना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण अथवा इतर प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे
- **शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम :** शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देऊन उद्योगास प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे
- **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :** शिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रेरीत व प्रशिक्षित करणे

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या तक्ता १०.४६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४६ रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या**

| कार्यक्रम | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|
| रोजगार प्रोत्साहन@ | १९,८३३ | २०,८१९ | १८,६४३ |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण$ | ४३,३९६ | ५४,०५० | ५४,६७३ |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण# | ४०,४८६ | ३८,०९० | ११,३४३ |

+ डिसेंबरपर्यंत

*आधार* : @ कोशल्यविकास, रोजगार व उद्योकजकता संचालनालय, महाराष्ट्र शासन
$ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन
# उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.४८.१ कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी व त्याद्वारे उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने सन २००९-१० पासून सर्व जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यास सुरुवात केली आहे. आयोजित रोजगार मेळावे व त्याद्वारे पुरविण्यात आलेला रोजगार तक्ता १०.४७ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४७ आयोजित रोजगार मेळावे व पुरविण्यात आलेला रोजगार**

(संख्या)

| वर्ष | रोजगार मेळावे | उपस्थित उद्योजक | रोजगार मेळाव्यात उपस्थित असलेले बेरोजगार युवक | त्यापैकी, रोजगार पुरविलेले |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | १५६ | ८५३ | ५०,९५० | १५,६२५ |
| २०१५-१६ | २४४ | १,२२६ | ८६,१९४ | २४,७४२ |
| २०१६-१७+ | १७२ | १,१७२ | १,१६,९७७ | २९,२९६ |

*आधार* : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

१०.४८.२ राज्यात कौशल्य विकाससंबंधीत सर्व कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी ही नोडल संस्था आहे. सन २०२२ पर्यंत रोजगार दरात वृद्धि व्हावी यासाठी राज्यातील ४.५ कोटी लोकांमध्ये वेगवेगळया प्रकारचे कौशल्य विकसित करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीव्दारे विहीत प्रक्रियेनुसार सुचीबद्ध करण्यात आलेल्या कौशल्य प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता विकास अभियान आणि राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनां राबविण्यात येत आहेत.

## प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान

१०.४८.३ सन २०१५-१६ मध्ये या कार्यक्रमांतर्गत १८,४१५ लाभधारक होते व त्यावर ₹ ७८.७९ लाख खर्च झाला. तर सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ७३,५९२ लाभधारक होते व त्यावर ₹ १,१५३.४८ लाख खर्च झाला.

## रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

१०.४९ दारिद्र्य निर्मूलन हे विकासाच्या धोरणाचे महत्वाचे ध्येय आहे. सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी, विविध दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती कार्यक्रम, केंद्र तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. यापैकी काही कार्यक्रमांबाबतची माहिती खाली दिली आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

१०.४९.१ महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (सन २००६ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे) राज्यातील ३४ जिल्हयातील ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे. राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा प्रगती तक्ता १०.४८ मध्ये तर, कामाच्या वर्गीकरणानुसार कामाची संख्या व त्यावर झालेला खर्च परिशिष्ट १०.१३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४८ राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती**

| तपशील | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|
| रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख) | ११.६० | १२.७५ | १२.४६ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | १,६०८.३५ | १,८४७.११ | १,७७१.८८ |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | १,४८,८९४ | १,०५,१४३ | १,२४,७९६ |
| मनुष्य दिवस निर्मिती (कोटी) | ६.१४ | ७.६३ | ५.४७ |
| प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ५३ | ६० | ४४ |
| रोजगारातील हिश्शाची टक्केवारी | | | |
| (i) अनुसूचित जाती | १०.१ | ९.२ | ९.० |
| (ii) अनुसूचित जमाती | १८.७ | १९.३ | १७.५ |
| (iii) महिला | ४३.५ | ४४.५ | ४५.० |
| एक दिवसाच्या रोजगार निर्मितीची किंमत (₹) | २६२ | २४२ | ३२४ |

*आधार* : नियोजन विभाग (रोहयो ), महाराष्ट्र शासन + ९ जानेवारी रोजी

## राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

१०.४९.२ राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान सन २०११ पासून सुरु केले आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी गरिबांकरिता सक्षम संस्था उभारणे, जेणे करून गरिबांसाठी स्वयंरोजगाराच्या आणि कौशल्याधारीत जीवनोन्नतीच्या वर्धित संधी उपलब्ध होऊन परिणामी त्यांच्या उत्पन्नात सातत्य रहावे, असा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ४१,१२६ स्वयंसहायता गटांना ₹ ५८१.६९ कोटींचा पतपुरवठा करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती तक्ता १०.४९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४९ राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती**

| तपशील | २०१५-१६ | २०१६-१७+ |
|---|---|---|
| सहाय्यित स्वयंसहाय्यता गट (संख्या) | ३७,७३८ | ४१,१२६ |
| स्वयंसहाय्यता गटातील एकूण सदस्य (संख्या) | ४,७७,४९९ | ४,२३,४६७ |
| एकूण अनुदान (₹ कोटी) | २०१.०५ | १६२.५५ |
| एकूण कर्ज (₹ कोटी) | ६२७.१५ | ५८१.६९ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | १६१.९१ | १०३.१८ |

*आधार* : ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन. + डिसेंबरपर्यंत

## दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

१०.४९.३ राज्यात राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाची अंमलबजावणी ऑगस्ट २०१४ पासून करण्यात येत आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासन ६० टक्के व राज्य शासन ४० टक्के निधी या तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये राज्यामधील ५३ नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये केंद्र शासनाने ₹ १२८ कोटी इतका निधी या अभियानाकरिता उपलब्ध करून दिला असून, राज्य शासनाने ₹ ४१.५७ कोटी वितरीत केले आहेत. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत कौशल्य प्रशिक्षण व रोजगार या कार्यक्रमांतर्गत ६०,६८३ लाभ धारकांच्या लक्ष्याच्या तुलनेत ४३,५९३ लाभधारक होते व त्यावर ₹ १३.११ कोटी खर्च झाला. स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत ९,१०० लाभधारकांच्या लक्ष्याच्या तुलनेत ३,१०० लाभधारक होते व त्यावर ₹ ०.३५ कोटी खर्च झाला.

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.४९.४ पंतप्रधान रोजगार निर्मिती हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे :

- शहरी भागात होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी पारंपरिक कारागीर / बेरोजगार युवकांसाठी स्वयंरोजगार उद्योगांची उभारणी करुन रोजगाराच्या संधी निर्माण करणे
- कारागिरांच्या मजुरी मिळविण्याच्या क्षमतेत वाढ करुन रोजगाराच्या संधीत वाढ करणे

सन २०१५-१६ मध्ये २,३४३ प्रकल्पांना ₹ ४८.७३ कोटी तारण वितरीत करण्यात आले व त्याद्वारे १९,०५३ इतका रोजगार निर्माण झाला, तर सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत, ७७६ प्रकल्पांना ₹ १८.१४ कोटी तारण वितरित करण्यात आले व त्याद्वारे ५,४७९ रोजगार निर्माण झाला.

## बीज भांडवल योजना

१०.५० उद्योग, सेवा व व्यापार यासारखे स्वयंरोजगार सुरु करण्याच्या दृष्टीने तारण भागविण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कमी व्याज दराचे कर्ज पुरवून बेरोजगार व्यक्तींना प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासनाद्वारे ही योजना राबविण्यात येते. स्थानिक बेरोजगार व्यक्ती किंवा १८ ते ५० वर्षे वयोगटातील सातवी उत्तीर्ण व्यक्ती या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सन २०१५-१६ मध्ये एकूण २,१०२ प्रकल्पांना ₹ १७.०५ कोटी, तर २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत, एकूण ९८६ प्रकल्पांना ₹ ८.३६ कोटी बीज भांडवल वितरीत करण्यात आले.

## औद्योगिक संबंध

१०.५१ मागील वर्षातील २१५ कामबंद झालेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) व त्यामुळे प्रभावित झालेल्या १,१९,५९८ कामगारांच्या तुलनेत २०१६ मध्ये काम बंद झालेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) १४४ होती व त्याचा परिणाम ७२,५०८ कामगारांवर झाला. सन २०१६ या वर्षातील संप व टाळे बंदीमुळे वाया गेलेल्या मनुष्य दिवसांची संख्या २१.२९ लाख होती, तर सन २०१५ मध्ये ती ३०.१० लाख होती. राज्यातील औद्योगिक विवादाबाबतचा तपशील परिशिष्ट १०.१४ मध्ये दिला आहे.

## दारिद्र्य

१०.५२ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय, भारत सरकार यांच्याकडून दर पाच वर्षांनी व्यापक स्तरावर घेतल्या जाणाऱ्या 'कुटुंबाच्या उपभोग्य बाबीवरील खर्च' या विषयावरील पाहणीच्या आधारे तत्कालीन योजना आयोगाकडून दारिद्र्याचे प्रमाण यांचे अंदाज तयार करण्यात येत होते. राष्ट्रीय नमुना पाहणी ६८ व्या फेरीच्या 'कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च' या पाहणीतील माहितीच्या आधारे तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार, सन २०११-१२ साठी दारिद्र्याचे अंदाज तयार केले.

१०.५२.१ सन २०११-१२ साठी अखिल-भारतीय स्तरावरील दारिद्र्यरेषा ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा ₹ ८१६ आणि नागरी भागासाठी दरडोई दरमहा ₹ १,००० अशी निश्चित करण्यात आली. तर राज्यातील ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा ₹ ९६७ आणि नागरी भागासाठी दरडोई दरमहा ₹ १,१२६ अशी निश्चित करण्यात आली. राज्यातील ग्रामीण भागामधील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण २४.२० टक्के तर नागरी भागामधील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ९.१ टक्के आहे.

१०.५२.२ निवडक राज्यांतील सन २०११-१२ साठी राज्यनिहाय दारिद्र्यरेषा आणि शिरगणती गुणोत्तर तक्ता १०.५० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५० निवडक राज्यातील सन २०११-१२ साठी दारिद्र्यरेषा आणि शिरगणती गुणोत्तर#**

| राज्य | दारिद्र्यरेषा ( ₹ ) | | शिरगणती गुणोत्तर |
|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | |
| आंध्र प्रदेश | ८६० | १,००९ | ९.२ |
| बिहार | ७७८ | ९२३ | ३३.७ |
| गुजरात | ९३२ | १,१५२ | १६.६ |
| कर्नाटक | ९०२ | १,०८९ | २०.९ |
| केरळ | १,०१८ | ९८७ | ७.१ |
| मध्य प्रदेश | ७७१ | ८९७ | ३१.७ |
| **महाराष्ट्र** | **९६७** | **१,१२६** | **१७.४** |
| पंजाब | १,०५४ | १,१५५ | ८.३ |
| राजस्थान | ९०५ | १,००२ | १४.७ |
| तामीळनाडू | ८८० | ९३७ | ११.३ |
| उत्तर प्रदेश | ७६८ | ९४१ | २९.४ |
| पश्चिम बंगाल | ७८३ | ९८१ | २०.० |
| **अखिल-भारत** | **८१६** | **१,०००** | **२१.९** |

आधार : नियोजन आयोग, भारत सरकार

# तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार

# गृहनिर्माण

१०.५३ मानवी जीवनात निवासाच्या गरजेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गृहनिर्माणाद्वारे केवळ भांडवल निर्मिती, रोजगार निर्मिती आणि उत्पन्नाच्या संधीच उपलब्ध होत नसून त्या आर्थिक विकासासाठी सहायभूत ठरतात. गृह विषयक समस्या सोडविण्याच्या दृष्टिने राज्य शासनाने समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी विविध योजना आखल्या आहेत.

# नागरी गृहनिर्माण

१०.५४ राज्य शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) तसेच शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांची स्थापना केली आहे. याशिवाय नागरी भागातील झोपडपट्ट्यांचा पुर्नविकास व झोपडपट्टीवासीयांकरिता घरबांधणी यासाठी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना

१०.५५ 'सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने नागरी भागाकरिता 'प्रधानमंत्री आवास योजना' ही सर्वकष योजना सन २०१५-१६ मध्ये सुरू केली असून यामध्ये प्रत्येक कुटुंबास पाणी, स्वच्छतागृह, अखंड वीजपुरवठा व पोहोच रस्ते असणारे पक्के घर उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. सदर योजना राज्यातील ५१ शहरात राबविण्यात येत असून या योजनेचे झोपडपट्टी पुर्नविकास, कर्ज संलग्न अनुदान, भागीदारीमध्ये परवडण्याजोगी घरे, लाभार्थ्याच्या पुढाकाराने स्वतंत्र घरबांधणी / वाढ हे चार घटक आहेत. या योजनेत राज्यातील १४२ शहरांचा समावेश करण्यात आला आहे व एकूण २२ शहरातील ४९ प्रकल्पांचा विचार करण्यात आला असून याअंतर्गत समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १.१९ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत ४६ प्रकल्पांना केंद्र शासन व संनियंत्रण समिती कडून मान्यता प्राप्त झाली आहे. केंद्र शासनाने १३ प्रकल्पांसाठी (म्हाडा कोकण मंडळाचे ११ प्रकल्प, अकोला मनपाचा एक प्रकल्प, अमरावती मनपाचा एक प्रकल्प) पहिला हफ्ता म्हणून ₹ ३७१.५८ कोटी (४० टक्के) इतका निधी वितरीत केला आहे. या योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांची संख्या तक्ता १०.५१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५१ प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांची संख्या**

| प्रकल्प | घरकुल संख्या (आर्थिक दृष्ट्या दुर्बल गट)* |
|---|---|
| कोकण (११ प्रकल्प) | ५४,५३१ |
| नाशिक (२ प्रकल्प ) | ६६४ |
| पुणे (१० प्रकल्प ) | ४,०७८ |
| औरंगाबाद (६ प्रकल्प ) | ३,७५६ |
| अमरावती (५ प्रकल्प ) | २,०३७ |
| नागपूर (५ प्रकल्प ) | ४,७३८ |
| नागरी स्थानिक संस्था (सोलापूर-१, अकोला-१, अमरावती -२ प्रकल्प ) | १०,६१५ |
| रे नगर, सोलापूर (१ प्रकल्प ) | ३०,००० |
| नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर (२ प्रकल्प ) | १,२६८ |
| **एकूण ४६ प्रकल्प** | **१,११,६८७** |

*आधार* : म्हाडा * अस्थायी

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

१०.५६ सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकार करण्यासाठी मुंबई तसेच राज्याच्या काही भागात परवडण्याजोगी घरे उपलब्ध करुन देण्याकरिता सन १९७७ मध्ये म्हाडाची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून डिसेंबर २०१६ पर्यंत म्हाडाने एकूण ४,६०,८४७ घरकुलांचे बांधकाम व पुर्नविकास केला आहे. म्हाडाकडून बांधण्यात आलेली घरकुले व मालकीचे भूखंड तक्ता १०.५२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५२ म्हाडाकडून बांधण्यात आलेली घरकुले व मालकीचे भूखंड**

(संख्या)

| वर्ष | घरकुलांची संख्या | | | | | | | भूखंडांची संख्या | खर्च @ (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक दृष्ट्या दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | एकूण $ | | |
| | | | | | सदनिका | संक्रमण शिबिरे | | | |
| २०१२-१३ | १२४ | १,२९८ | ३१८ | १९७ | ३७८ | ० | २,३१५ | २२४ | ४६५.४५ |
| २०१३-१४ | १,५४२ | ४,६२७ | ६८७ | ४६९ | ९९ | ३५६ | ७,४२४ | ४३३ | ८५०.४२ |
| २०१४-१५ | ९१५ | १,१३६ | १,२९० | १९६ | ७१ | ८५५ | ३,६०८ | ० | ४२४.३८ |
| २०१५-१६ | ८६५ | ५,२४० | २,९८९ | १४ | ७८२ | ४३९ | ९,८९० | ० | १,६४०.१७ |
| २०१६-१७+ | १५२ | ४३० | ५८० | ६८ | ६० | ० | १,२९० | ० | १,०२१.७६ |

*आधार* : म्हाडा + डिसेंबर पर्यंत @ भूखंडांसह $ संक्रमण शिबिरे वगळून

१०.५७ सन २०१५-१६ मध्ये म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत बांधलेली घरकुले तक्ता १०.५३ मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.५३ म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत सन २०१५-१६ मध्ये बांधलेली घरकुले**

(संख्या)

| म्हाडा मंडळ | घरकुल संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक दृष्ट्या दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | एकूण $ |
| | | | | | सदनिका | संक्रमण शिबिरे | |
| मुंबई | १४९ | २६२ | १७२ | ० | २१ | ० | ६०४ |
| कोकण | २८० | ३,५८१ | १,८६५ | ० | ५७ | ० | ५,७८३ |
| नाशिक | १९६ | १७० | ३०० | ० | ४४ | ० | ७१० |
| पुणे | ० | ७९७ | ६२० | ० | १९ | ० | १,४३६ |
| औरंगाबाद | ० | ० | १२ | ० | ० | ० | १२ |
| अमरावती | ० | १८७ | ० | ० | ० | ० | १८७ |
| नागपूर | ० | २४३ | २० | १४ | ५३ | ० | ३३० |
| मुंइदुवपुकें | २४० | ० | ० | ० | ० | ० | २४० |
| **एकूण** | **८६५** | **५,२४०** | **२,९८९** | **१४** | **१९४** | **०** | **९,३०२** |

*आधार : म्हाडा $ संक्रमण शिबिरे वगळून मुंइदुवपुकें मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्वसन केंद्र*

## शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित

१०.५८ सिडको हे सुनियोजित पद्धतीने गृहनिर्माण विकास कार्यक्रम राबवित आहे. स्थापनेपासून (१९७०) डिसेंबर २०१६ पर्यंत सिडकोने एकूण १,८२,९४२ सदनिका नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक आणि नांदेड येथे बांधल्या आहेत. सिडकोने बांधलेल्या सदनिकांची संख्या तक्ता १०.५४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५४ सिडकोने बांधलेल्या सदनिका (स्थापनेपासून डिसेंबर २०१६ पर्यंत)**

(संख्या)

| शहर | सदनिका | | | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक दृष्ट्या दुर्बल गट/ अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | एकूण सदनिका | |
| नवी मुंबई | ६४,४७३ | ३५,२४५ | २८,७३६ | १,२८,४५४ | २,४४७ |
| औरंगाबाद | १९,५०१ | २,१२७ | ४३२ | २२,०६० | ५६ |
| नाशिक | २१,३४३ | २,६१९ | ५८२ | २४,५४४ | ४२ |
| नांदेड | ७,७५८ | १२६ | ० | ७,८८४ | ९ |
| **एकूण** | **१,१३,०७५** | **४०,११७** | **२९,७५०** | **१,८२,९४२** | **२,५५४** |

*आधार* : सिडको

## जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

१०.५९ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान (जनेराशपुअ ३ डिसेंबर २००५ पासून अंमलात) हा केंद्र शासनाचा महत्त्वाचा (फ्लॅगशीप) शहर आधुनिकीकरणासंदर्भातील कार्यक्रम आहे. या अभियानांतर्गत 'शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा' व 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' या दोन योजना राज्यात म्हाडामार्फत राबविण्यात येत आहेत.

१०.५९.१ नागरी भागातील झोपडपट्टीतील रहिवाशांसाठी पायाभूत सुविधांसह निवासी वसाहतींचा विकास करणे हे 'शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा' या अभियानाचे उद्दिष्ट आहे. ही योजना मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, नांदेड, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर आणि कुळगांव-बदलापूर या १० महानगरपालिका क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत आहे.

१०.५९.२ 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' या योजनेंतर्गत शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या महानगरपालिका वगळून, ८७ शहरांमध्ये ११९ प्रकल्प राबविण्यात येत आहेत. निवडक राज्यांची जनेराशपुअ अंतर्गत प्रगती तक्ता १०.५५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५५ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत 'शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा' आणि 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' यांची प्रगती**

(अंमलबजावणीच्या सुरुवातीपासून फेब्रुवारी २०१६ पर्यंत)

| राज्य | कार्यक्रम | मंजूर प्रकल्प | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | घरकुल संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लक्ष्य | बांधलेल्या | प्रगतीपथावर |
| **महाराष्ट्र** | **शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा** | **५३** | **४,१६९.६०** | **९७,१४७** | **७९,६४२** | **१४,८८२** |
| | **एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम** | **११९** | **१,९०३.५४** | **७७,८८५** | **५३,९२२** | **१९,०९३** |
| तामीळनाडू | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | ५१ | २,२८५.१६ | ८९,७२० | ७८,२८८ | ११,४३२ |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | ९४ | ५६६.११ | ३७,७१५ | ३६,९७२ | ७४३ |
| गुजरात | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | २७ | २,०३३.०८ | १,११,१०४ | १,०७,७८६ | ३,२८६ |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | ३९ | ३२४.७६ | २०,३५० | १६,८०० | ३,५५० |
| उत्तरप्रदेश | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | ६७ | १,६३७.६६ | ४५,५९९ | ४०,९३४ | ४,६६५ |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | १५९ | ९८७.६७ | ३७,८१८ | ३०,७३० | ७,०८८ |
| आंध्रप्रदेश | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | २२ | १,६३७.५५ | ५१,१३२ | ४३,१११ | ४,१५२ |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | ४५ | ६९२.२९ | २८,२५० | २३,५५० | १,६९४ |
| कर्नाटक | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | १८ | ८३७.८ | २७,९२५ | २६,९४३ | ९८२ |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | ३४ | ४१०.३० | १७,२३७ | १७,२३७ | उ.ना. |
| मध्यप्रदेश | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | २१ | ४७३.४४ | २४,७२८ | २३,३२८ | १,४०० |
| | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | ५० | २३५.३४ | १३,६३५ | १२,००२ | १,३४१ |

*आधार:* गृहनिर्माण आणि शहरी गरिबी निर्मूलन मंत्रालय, भारत सरकार उ.ना. उपलब्ध नाही

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना

१०.६० झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांना निवारा पुरविण्यात येत आहे. योजनेच्या सुरुवातीपासून (१९९५) ऑक्टोबर २०१६ पर्यंत १,६९५ प्रकल्प पूर्ण झाले असून १,६७,३९१ झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांचे मुंबईत पुनर्वसन केले आहे.

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

१०.६१ झोपडपट्टी पुनर्वसनाची कामे जलदगतीने होण्याच्या उद्देशाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितची स्थापना करण्यात आली. योजनेच्या सुरुवातीपासून (१९९८) ऑक्टोबर २०१६ पर्यंत एकूण १०,६७२ सदनिका असलेल्या १११ इमारती बांधण्यात आल्या (ज्यापैकी १०,३४५ सदनिकांचे वाटप करण्यात आले) व त्यावर ₹ ४६९ कोटी खर्च झाला.

# ग्रामीण गृहनिर्माण

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

१०.६२ या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील बेघर, भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी रक्कम ₹ १.२० लाख अनुदान देण्यात येते. तर नक्षलग्रस्त व डोंगराळ दुर्गम भागातील लाभार्थ्यांना ₹ १.३० लाख अनुदान देण्यात येते. सन २०१६-१७ या वर्षासाठी १.७१ लाख घरकुलांचे उद्दिष्ट निर्धारीत केले असून केंद्र शासनाने ₹ १,२८९.९२ कोटी रकमेचा नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे आणि राज्य शासनाने राज्य हिस्सा म्हणून ₹ ८५९.९४ कोटीची तरतूद केली आहे. सन २०१५-१६ पासून सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे देय निधी लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येत आहे. या योजनेची प्रगती तक्ता १०.५६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५६ प्रधानमंत्री आवास योजनेची (ग्रामीण) प्रगती**

| वर्ष | भौतिक प्रगती घरकुल संख्या | | आर्थिक प्रगती (₹ कोटी) | |
|---|---|---|---|---|
| | उद्दिष्ट | बांधलेल्या | नियतव्यय | खर्च |
| २०१२-१३ | १,६६,१०६ | १,४५,७६४ | १,२२२.४१ | १,१०७.५४ |
| २०१३-१४ | १,३७,३१४ | १,२८,१३५ | १,५०६.२० | १,३४०.९७ |
| २०१४-१५ | १,७१,७२२ | १,००,८७० | १,५७०.५१ | १,३६८.०८ |
| २०१५-१६ | १,५७,२६० | २९,२२९ | ७२९.४४ | ४३९.१० |
| २०१६-१७ | १,७१,०५० | उ.ना. | ८५९.९४ | उ.ना. |

*आधार*: ग्राम विकास विभाग , महाराष्ट्र शासन उ.ना. उपलब्ध नाही

## सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-२

१०.६३ सदर योजना ही दारिद्र्य रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील लोकांकरिता राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत प्रति घरकुल ₹ एक लाख किंमत निर्धारित करण्यात आली असून त्याकरिता जिल्ह्यातील अग्रणी बँकेकडून ₹ ०.९० लाख कर्ज पुरविले जाते व उर्वरित ₹ ०.१० लाख लाभार्थ्याने जमा करावयाचे आहेत. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून दिले जाते. सदर योजनेअंतर्गत, डिसेंबर २०१६ पर्यंत ₹ ४५.९८ कोटी व्याजाची रक्कम म्हाडामार्फत बँकांना वितरित करण्यात आली आहे.

## शबरी आदिवासी घरकुल योजना

१०.६४ शबरी आदिवासी घरकुल योजना ही राज्य पुरस्कृत योजना असून ग्रामीण तसेच शहरी भागातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लोकांकरिता राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत, ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थ्यांना ₹ १.३२ लाख प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान देण्यात येते. नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रातील लाभार्थ्यांना ₹ १.४२ लाख प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान देण्यात येते आणि शहरी क्षेत्रातील वार्षिक उत्पन्न ₹ तीन लाखापर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी ₹ २.५० लाख इतके अनुदान देण्यात येते. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अभिसरणाद्वारे ₹ ०.१७ लाख व ₹ ०.१८ लाख अनुदान अनुक्रमे ग्रामीण भागातील आणि नक्षलग्रस्त व डोंगराळ भागातील लाभार्थ्यांना देण्यात येते.

## रमाई आवास योजना

१०.६५ रमाई आवास योजना ही राज्य पुरस्कृत योजना असून ग्रामीण तसेच शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लोकांकरिता राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत, ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थ्यांना ₹ १.३२ लाख प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान देण्यात येते. नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रातील लाभार्थ्यांना ₹ १.४२ लाख प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान देण्यात येते आणि शहरी क्षेत्रातील वार्षिक उत्पन्न ₹ तीन लाखापर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी ₹ २.५० लाख इतके अनुदान देण्यात येते. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अभिसरणाद्वारे ₹ ०.१७ लाख व ₹ ०.१८ लाख अनुदान अनुक्रमे ग्रामीण भागातील आणि नक्षलग्रस्त व डोंगराळ भागातील लाभार्थ्यांना देण्यात येते. सन २०१६-१७ या वर्षासाठी ०.५० लाख घरकुलांचे उद्दिष्ट निर्धारीत केले आहे आणि डिसेंबर २०१६ अखेर एकूण ९,६७४ घरकुलांच्या बांधकामासाठी मंजुरी देण्यात आली आहे.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

१०.६६ राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना प्राथम्याने निवारा पुरविणे शासनाने निश्चित केले आहे. सद्यस्थितीत राज्यात दोन लाखांच्या वर पात्र कुटुंबे घरबांधणीकरिता स्वत:ची जागा नसल्यामुळे आवास योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. अशा कुटुंबांकरिता राज्य शासनाने सन २०१५-१६ पासून 'पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना' सुरू केली असून, ही योजना प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेच्या पात्र कुटुंबांकरिता लागू आहे. या योजनेअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या (ग्रामीण) लाभार्थ्यांना ₹ ०.१० लाख केंद्र शासनामार्फत व ₹ ०.४० लाख राज्य शासनामार्फत पुरविण्यात येणार आहेत. रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेच्या लाभार्थ्यांना ₹ ०.५० लाख राज्य शासनामार्फत पुरविण्यात येणार आहेत.

# पाणी पुरवठा आणि स्वच्छता

१०.६७ निरामय मानवी जीवनाकरिता पाणी व स्वच्छतेच्या सुविधांची उपलब्धता याबाबी पूर्वापेक्षित आहेत. पिण्याचा पाणीपुरवठा व स्वच्छतेसाठी विविध योजना राज्यात राबविल्या जात आहेत.

## पाणी पुरवठा

### पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

१०.६८ पाणी टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविला जातो. सन २०११-१२ पासून सलग २०१३-१४ पर्यंत राज्याला दुष्काळाचा सामना करावा लागला होता. वर्ष २०१५-१६ मध्ये असमान आणि अपुरा पाऊस झाल्यामुळे जुलै २०१६ पर्यंत टंचाईग्रस्त परिस्थिती उद्भवली होती. त्यामुळे शासनाने २७ जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आणि पाणी टंचाई निवारण कार्यक्रम देखील जुलै २०१६ पर्यंत वाढविण्यात आला. राज्यात २०१५-१६ या वर्षात ₹ ४५९.०९ कोटी खर्च झाला व सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ५१४.५६ कोटी खर्च झाला. त्यापैकी ₹ २१७.०१ कोटी खर्च जुलै २०१६ पर्यंत झाला. या कार्यक्रमांतर्गत विभाग निहाय झालेल्या खर्चाची माहिती तक्ता १०.५७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५७ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत विभाग निहाय खर्च**

(₹ कोटी)

| विभाग | खर्च | |
|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७+ |
| कोकण | ९.२५ | ९.३७ |
| नाशिक | ९१.५२ | ४४.९६ |
| पुणे | २५.४७ | २०.४० |
| औरंगाबाद | २७७.६५ | ३२६.७३ |
| अमरावती | ३६.१४ | ६५.४७ |
| नागपूर | १९.०६ | ४७.६३ |
| **एकूण** | **४५९.०९** | **५१४.५६** |

आधार : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.६८.१ राज्यातील टंचाईग्रस्त २२,९१० गांवे व १२,०९८ वाड्यांकरिता तात्पुरत्या नळ पाणी योजना, कुपनलिका व इतर पाण्याचे स्त्रोत पुनरुज्जीवित करणे, टँकरने पाणी पुरवठा करणे, इत्यादी सारख्या विविध उपाययोजना करण्यात आल्या. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर २०१५ ते जुलै २०१६ पर्यंत लाभ झालेल्या गावे व वाड्यांची विभागनिहाय संख्या तक्ता १०.५८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५८ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर २०१५ ते जुलै २०१६ पर्यंत लाभ झालेल्या गावे व वाड्यांची विभागनिहाय संख्या**

| उपाययोजना / कामे | लाभ झालेल्या गावे आणि वाड्यांची संख्या | | | | | | | खर्च (₹ लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग | | | | | | | |
| | कोकण | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | एकूण | |
| टँकरने पाणीपुरवठा | १,०८७ | २,५६६ | ३,३६९ | ५,१३३ | ४१९ | ३७ | १२,६१४ | ३१,५१७ |
| नवीन विंधन विहिरी | ७४४ | १,३१८ | ५८५ | १,७७४ | ६७३ | ६३६ | ५,७३० | ३,५०८ |
| विंधन विहिरींचे अधिग्रहण | ० | ० | ३०८ | ४,८४६ | १९२ | ० | ५,३४६ | ४,१३१ |
| विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती | ८ | ७ | १,३७७ | ९९३ | ४१५ | २३० | ३,०३० | २८६ |
| खाजगी विहिरींचे अधिग्रहण | ० | ५२५ | २७१ | २,५१५ | १,६०९ | २७९ | ५,१९९ | ३,०८३ |
| नळ पाणीपुरवठा विशेष दुरूस्ती | ११९ | ४८ | १७८ | ७३२ | ६९१ | ३५७ | २,१२५ | ६,१९४ |
| विहिरी खोल करणे / गाळ काढणे | ८१ | ० | २१२ | ७० | १३ | ७३ | ४४९ | १५९ |
| तात्पुरती पुरक नळ जोडणी | १० | ११२ | ९ | १९० | १८१ | ११ | ५१३ | २,१०४ |
| बुडक्या विहिरींचे बांधकाम | ० | ० | ० | २ | ० | ० | २ | २५ |
| **एकूण** | **२,०५२** | **४,५७६** | **६,३०९** | **१६,२५५** | **४,१९३** | **१,६२३** | **३५,००८** | **५१,००७** |

आधार : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

१०.६८.२ खालील विशेष उपाययोजना देखील करण्यात आल्या :

१०.६८.३ **रेल्वे वॅगनव्दारे पाणी पुरवठा :** लातूर शहरात २०१६ मध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने १२ एप्रिल २०१६ ते ९ ऑगस्ट २०१६ या कालावधीत एकूण ५,१९० वॅगन्सद्वारे २,५९५ लाख लिटर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा रेल्वेद्वारे करण्यात आला. त्यासाठी ₹ ५.२३ कोटी खर्च झाला.

१०.६८.४ **दुष्काळग्रस्त भागामध्ये चारा छावण्या सुरू करणे :** राज्याच्या विविध भागात अत्यल्प पाऊस झाला त्याचा परिणाम जनावरांसाठी चाऱ्याची उणीव निर्माण झाली. राज्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद, नाशिक, अहमदनगर आणि सांगली या जिल्ह्यात चारा उपलब्ध करून देण्यासाठी ४३१ चारा छावण्या सुरू केल्या व यासाठी २०१५-१६ मध्ये ₹ ७३ कोटी खर्च करण्यात आला, तर २०१६-१७ मध्ये ₹ २५५.६० कोटी वितरीत करण्यात आले.

## राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.६९ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा केंद्रशासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम असून सदर कार्यक्रम राज्यामध्ये एप्रिल २००९ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागात कायमस्वरुपी पिण्यायोग्य व पुरेसे पाणी पुरविणे हा आहे. सन २०१५-१६ मध्ये या योजनेंतर्गत १,६११ गावे / वाडयांच्या लक्ष्यापैकी १,५६६ गावे / वाडयांची कामे पूर्ण झाली असून ₹ १,०६८ कोटी खर्च झाला आहे. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबरपर्यंत या योजनेंतर्गत १,८९१ गावे/वाड्यांच्या लक्ष्यापैकी ५०६ गावे/वाड्यांची कामे पूर्ण झाली असून ₹ ४१४ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.५९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५९ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | हाताळलेली गावे/ वाड्यांची संख्या | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | |
| २०१२-१३ | ५,९४० | ४,६३८ | १,१६८ |
| २०१३-१४ | ५,०६६ | ४,०६५ | १,२२५ |
| २०१४-१५ | ४,२०० | ३,७४८ | १,५६६ |
| २०१५-१६ | १,६११ | १,५६६ | १,०६८ |
| २०१६-१७ + | १,८९१ | ५०६ | ४१४ |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## पिण्याच्या पाण्याची शाश्वतता

१०.६९.१ पिण्याच्या पाण्याची शाश्वतता हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा घटक असून पारंपरिक व अपारंपरिक उपाय योजनांद्वारे पाण्याचे संधारण करण्याच्या उद्देशाने ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण म्हणजेच, छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक, पावसाचे पाणी साठविण्यासाठी डोंगराळ भागात तलाव बांधणी आणि या सारख्या इतर उपाययोजनांद्वारे पिण्याचे पाणी सातत्याने उपलब्ध होण्यासाठी ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. यापूर्वी अशा प्रकारच्या उपाययोजना शिवकालीन पाणी साठवण योजनेतंर्गत राबविण्यात आल्या होत्या. योजनेच्या सुरुवातीपासून (२००२) ते नोव्हेंबर २०१६ पर्यंत १७,३४५ वस्त्यांची निवड करुन ५०,८०६ उपाययोजना निश्चित करण्यात आल्या असून १३,२०६ वस्त्यांमधील ३९,१८६ (६६ टक्के) उपाययोजना पूर्ण झाल्या व त्यावर एकूण ₹ ५०४.०७ कोटी खर्च झाला.

१०.६९.२ पावसाच्या पाण्याची साठवण ही जलसंधारणाची लोकप्रिय उपाययोजना आहे. सन २०१६-१७ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ग्रामीण भागात छतावरील पावसाच्या पाण्याच्या साठवणीसाठी ११,६०७ बांधकामे करण्यात आली असून त्यापैकी १,०३४ कोकण, १,१७६ नाशिक, १,२७९ पुणे, ४,०१३ औरंगाबाद, २,११४ अमरावती आणि १,९९१ नागपूर या विभागात झाली आहेत.

## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.७० राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हाताळण्यासाठी व ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता राज्यात सन (२०१६-१७ ते २०१९-२०) या चार वर्षाच्या कालावधीकरिता 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम' शासनामार्फत राबविण्यात येणार असून यासाठी ₹ २,५३१ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रम प्रामुख्याने, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या नवीन योजना, बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन आणि प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती या तीन प्रकारात वर्गीकृत करण्यात आलेला आहे.

## अमृत अभियान

१०.७१ केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान ही योजना राज्यात सन २०१५ पासून राबविण्यात येत आहे. शहरातील बेहिशोबी पाणी वापराचे प्रमाण कमी करणे व पाणी पुरवठ्याची व्याप्ती वाढविणे यासाठी हे अभियान सुरू केले आहे. या अभियानाचा उद्देश शहरातील नागरीकांना प्रतिव्यक्ती प्रतिदिन १३५ लिटर पाणी पुरविणे हा आहे. या अभियानांतर्गत राज्यातील एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ४३ शहरे व विशेष बाब म्हणून शिर्डी अशा एकूण ४४ शहरांचा समावेश आहे. सन २०१५-१६ मध्ये राज्यात ₹ १,६८२ कोटी किंमतीच्या २१ पाणी पुरवठा प्रकल्पांना व सन २०१६-१७ मध्ये ₹ ७८७ कोटी किंमतीच्या पाच शहरांतील पाणीपुरवठा प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे. राज्याने सौर उर्जा प्रकल्पांचा समावेश करण्याची नाविन्यपूर्ण बाब पाणी पुरवठा योजनेंतर्गत समाविष्ट केली आहे.

### महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान

१०.७२ राज्यातील ड वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राज्यामध्ये सन २०१० पासून राबविण्यात येत असून ३० शहरांच्या पाणी पुरवठा प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे व सदर प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

## स्वच्छता

१०.७३ स्वच्छतेच्या अभावाचा थेट संबंध पाण्यातून निर्माण होणाऱ्या आजाराशी असून त्याचा आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. उघडयावरील खुले शौच बंद करुन त्याद्वारे आरोग्य व स्वच्छतेस उत्तेजन देण्यासाठी केंद्र शासनामार्फत संपूर्ण स्वच्छता अभियांनांतर्गत शौचालय व इतर तद्संबंधी घटकांचा बांधकाम कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

### स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

१०.७४ निर्मल भारत अभियान याचे नामकरण दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान असे करण्यात आले असून २०१४ ते २०१९ या पाच वर्ष कालावधीकरिता हे अभियान राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात स्वच्छता मोहीम राबविणे, उघडयावर मलविसर्जन करण्यास प्रतिबंध करणे, कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालय बांधणे व त्याचा वापर करणे ही या अभियानाची उद्दीष्टे आहेत. या अभियानाव्दारे प्रत्येक घरासाठी शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे आणि २ ऑक्टोंबर २०१९ पर्यंत संपुर्ण भारत खुली हागणदारी मुक्त करणे यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. निर्मल भारत अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील एकूण २७,९०२ ग्रामपंचायतीमध्ये २ ऑक्टोंबर २०१२ ते ३१ जानेवारी २०१३ या कालावधीत पायाभूत सर्वेक्षण (BLS) घेण्यात आले. सर्व्हेक्षणानुसार एकूण १.१५ कोटी कुटुंबापैकी ६३.६७ लाख (५५ टक्के) कुटुंबांकडे शौचालय सुविधा उपलब्ध नव्हती. २०१६-१७ मध्ये फेब्रुवारी पर्यन्त १२.७९ लाख वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली आणि जानेवारी पर्यन्त ₹ ६५६ कोटी खर्च झाला. प्रकार निहाय आणि विभागनिहाय शौचालय बांधकामाबाबतची आकडेवारी अनुक्रमे तक्ता १०.६० व १०.६१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६० प्रकार निहाय शौचालय बांधकामाबाबतची आकडेवारी**

(संख्या लाखात)

| प्रकार | २०१५-१६ | | | २०१६-१७+ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | टक्केवारी | लक्ष्य | साध्य | टक्केवारी |
| दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ११.८८ | ६.५९ | ५५.५ | १२.५० | ९.१९ | ७३.५ |
| दारिद्रय रेषेवरील कुंटुंबासाठी स्वतंत्र शौचालये | ५.५५ | २.२९ | ४१.३ | ५.५५ | ३.६० | ६४.९ |
| **एकूण** | **१७.४३** | **८.८८** | **५१.१** | **१८.०५** | **१२.७९** | **७०.९** |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + फेब्रुवारी पर्यंत

**तक्ता १०.६१ विभागनिहाय शौचालय बांधकामाबाबतची आकडेवारी**

(संख्या लाखात)

| विभाग | पायाभूत सर्वेक्षण २०१२ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण कुटुंबे | शौचालय नसलेली कुटुंबे | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| कोकण | १३.४३ | ४.९७ | १.५८ | १.०९ | १.३८ | १.११ |
| नाशिक | २२.३२ | १४.५२ | ३.४५ | १.७६ | ३.२० | १.९९ |
| पुणे | २४.५४ | ८.२४ | २.१० | १.५० | ३.२९ | ३.३४ |
| औरंगाबाद | २४.७६ | १८.७२ | ५.२९ | २.०४ | ४.५३ | २.२२ |
| अमरावती | १५.८३ | १०.६१ | ३.०४ | १.३५ | २.५५ | १.७३ |
| नागपूर | १४.३३ | ६.६१ | १.९४ | १.१६ | ३.०९ | २.४० |
| **एकूण** | **११५.२१** | **६३.६७** | **१७.४०** | **८.९०** | **१८.०४** | **१२.७९** |

*आधार* : पाणीपुरवठा व स्वच्छताविभाग, महाराष्ट्र शासन + फेब्रुवारी पर्यंत

आलेख १०.११ : निवडक राज्यातील खुल्या हागणदारी मुक्त ग्रामपंचायती (जानेवारी २०१७ पर्यंत)




आलेख १०.१२ : विभागातील खुल्या हागणदारी मुक्त झालेल्या ग्रामपंचायतींची एकूण ग्रामपंचायतींशी टक्केवारी (जानेवारी २०१७ पर्यंत)




## स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१६

१०.७४.१ पेयजल व स्वच्छता मंत्रालयामार्फत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण- २०१६ घेण्यात आले होते, यामध्ये वेगवेगळ्या पातळीवर स्वच्छतेचे मुल्यमापन करून ७५ जिल्ह्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी ५३ जिल्हे सर्वसाधारण प्रकारातील व २२ जिल्हे ईशान्य भारतातील आणि विशेष प्रकारातील आहेत. पाहणीअंती सर्वसाधारण जिल्ह्यांमधून सिंधुदुर्ग (महाराष्ट्र) स्वच्छ जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आणि मंडी (हिमाचल प्रदेश) पहाडी भागात स्वच्छ जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. याशिवाय राज्यातील सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी आणि ठाणे या जिल्ह्यांचा पहिल्या १० क्रमांकामध्ये समावेश आहे.

## स्वच्छ भारत अभियान (नागरी)

१०.७४.२ जनगणना सन २०११ नुसार नागरी भागातील एकूण ८,३२,६७२ कुटूंबांच्या आवारात शौचालय सुविधा नाहीत. सन २०१६-१७ मध्ये डिसेंबर पर्यंत २.६४ लाख वैयक्तिक शौचालये बांधण्यात आलेली असून १.२६ लाख शौचालयांचे बांधकाम सुरू आहे. याअंतर्गत ऑक्टोबर २०१६ पर्यंत ₹ ६३४ कोटी खर्च करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

१०.७५ नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी पुरेशी व गुणवत्तापुर्ण सेवा किफायतशीर शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा उद्देश आहे. अभियानाच्या सुरूवातीपासून (२००८-०९) ते डिसेंबर २०१६ पर्यंत पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या ₹ १,२३१.२९ कोटी किंमतीच्या २५८ कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असुन ₹ ८३०.७७ कोटी निधी वितरीत केला आहे. सन २०१५-१६ मध्ये ₹ १०६.७१ कोटी आणि २०१६-१७ मध्ये नोव्हेंबर अखेर ₹ ३०.०६ कोटी खर्च झाला आहे.

## एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजना

१०.७६ एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजना राज्यात १९९६-९७ पासून राबविण्यात येत असून मागणी आधारीत या कार्यक्रमात झोपडपट्टी व अनाधिकृत वसाहतीसह जेथे शौचकुपे नाहीत किंवा कोरडी शौचालये आहेत अशा सर्व कुटूंबांना शौचकुप सुविधा देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत नागरी भागातील आर्थिक दृष्ट्या मागास गटातील (ज्याचे सर्व स्त्रोतांपासून मासीक उत्पन्न ₹ ३,३०० पेक्षा कमी आहे.) अशा व्यक्ती शौचालय बांधकामाकरीता अनुदान मिळण्यास पात्र आहेत. शौचकुप बांधकामाकरीता केंद्रशासन, राज्य शासन आणि लाभार्थी यांच्या हिश्श्याची विभागणी अनुक्रमे ७५:१५:१० अशा प्रमाणात आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाने १६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २१ प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे व त्या अंतर्गत ३९,६६३ वैयक्तिक शौचालय बांधण्यात येणार असून त्यापैकी २७,१८४ शौचालये बांधण्यात आली आहेत व २,१८९ शौचालयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

# पर्यावरण संवर्धन

१०.७७ आर्थिक कार्यांमुळे होणारा जीव-सृष्टीचा ऱ्हास आणि पर्यावरण प्रदूषण नियंत्रित करणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. वेगाने होणारे औद्योगिकीकरण, स्थलांतर, शहरीकरण इ. मुळे सातत्याने नैसर्गिक संसाधनांमध्ये घट होत आहे तसेच पर्यावरणाची गुणवत्ता खालावत आहे. पर्यावरण संवर्धन आणि त्याबाबतची जागृती निर्माण करण्याकरिता राज्याने वृक्ष लागवडीसाठी विशेष पुढाकार घेतला आहे.

१०.७८ राज्यात पर्यावरणासंबंधीचे विविध कायदे व नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची (मप्रनिमं) स्थापना करण्यात आली. प्रदूषण कमी करण्यासाठी व नियंत्रित ठेवण्यासाठी संबंधित आकडेवारी व शास्त्रीय माहिती तयार करणे, धोरण निश्चितीसाठी तांत्रिक बाबींची माहिती पुरविणे, मनुष्यबळ प्रशिक्षित करणे आणि विविध स्तरावर जागृती करणे अशा महत्वाच्या भूमिका हे मंडळ पार पाडते.

## वायू प्रदूषण

१०.७९ मानवी जीवन आणि आसपासच्या जीव-सृष्टीवर वायू प्रदूषणाचा प्रतिकूल परिणाम होतो. वायू प्रदूषणाला कारणीभूत होणारे पदार्थ घन, द्रव अथवा वायू स्वरूपात असू शकतात. वायू प्रदूषण प्रतिबंधीत, नियंत्रित व कमी करण्यासाठी वायू (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विविध शैक्षणिक संस्थांच्या मदतीने राज्यात वायू गुणवत्ता संनियंत्रण प्रणाली १७ जिल्ह्यांमध्ये विखुरलेल्या विविध ७७ स्थानकांवर राबवित आहे. वायू प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी अल्प प्रमाणात गंधक असलेले डिझेल, शिसेरहीत पेट्रोल, सीएनजी/एलपीजी या पर्यायी इंधनाचा वापर करणे, पीयुसी अनिवार्य करणे, १५ वर्षे झालेल्या वाहनांवर बंदी घालणे आणि आठ वर्षे झालेली वाहने सीएनजी/एलपीजी मध्ये रूपांतरित करणे अशा काही महत्वाच्या उपाय योजना करण्यात येत आहेत. राज्यात ३१ मार्च २०१६ रोजी सीएनजी/एलपीजी मध्ये रूपांतरित करता येण्याजोग्या एकूण ७५.१४ लाख वाहनांपैकी १.२८ लाख (१.७ टक्के) वाहनांना एलपीजी संच आणि ५.५८ लाख (७.४ टक्के) वाहनांना सीएनजी संच बसविण्यात आले तर मागील वर्षी ही संख्या अनुक्रमे १.२५ लाख व ४.०३ लाख इतकी होती. सन २०१६ (ऑक्टोबर पर्यंत) मध्ये प्रमुख संनियंत्रण स्थानकांनी नोंदविलेल्या परिसर वायू गुणवत्तेची माहिती तक्ता १०.६२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६२ सन २०१६ मध्ये प्रमुख संनियंत्रण स्थानकात नोंदविली गेलेली परिसर वायू गुणवत्ता**

| सनियंत्रण स्थानक | वायू प्रदूषित करणाऱ्या पदार्थांची तीव्रता ($\mu g/m^3$) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सल्फर डायऑक्साईड ($SO_2$) | | | नायट्रोजन ऑक्साईड्स ($NO_x$) | | | श्वसन प्रवण दूषित कण | | |
| | मर्यादा ८०# | | | मर्यादा ८०# | | | मर्यादा १००# | | |
| | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी |
| मुंबई - शीव | ३ | ३४ | १० | ९ | २१८ | ७१ | ३१ | ३७४ | १५० |
| | (१) | (४१) | (१३) | (११) | (१८९) | (८७) | (२३) | (३७९) | (१३१) |
| पुणे - स्वारगेट | १० | ४४ | २३ | २६ | ३२३ | ७५ | १७ | १९० | ७९ |
| | (६) | (५५) | (२२) | (१३) | (१६७) | (६७) | (१८) | (२८६) | (१०१) |
| नाशिक - मनपा इमारत | ५ | ३० | १६ | ९ | ४१ | २६ | २२ | २१८ | ९१ |
| | (३) | (२९) | (१६) | (९) | (४८) | (२३) | (२२) | (३५९) | (८२) |
| औरंगाबाद - कडा कार्यालय | ६ | २८ | १५ | २३ | ६० | ४१ | १७ | १६९ | ७३ |
| | (९) | (१८) | (१२) | (३४) | (५७) | (४१) | (२१) | (१६१) | (६८) |
| अमरावती - शास. अभि. महाविद्यालय | ६ | १४ | ११ | ९ | १५ | १२ | ४१ | ९३ | ७१ |
| | (५) | (१४) | (११) | (६) | (१५) | (१३) | (३८) | (९७) | (७४) |
| नागपूर - मप्रनिमं चे प्रादेशिक कार्यालय | ६ | १५ | ९ | १५ | ५६ | २६ | ३४ | ८६ | ४८ |
| | (६) | (४२) | (९) | (१६) | (६२) | (२९) | (३६) | (१४४) | (५५) |

टिप : कंसातील आकडे सन २०१५ करिता परिसर वायू गुणवत्ता दर्शवितात. $\mu g/m^3$ मायक्रोग्रॅम प्रति घन मीटर # वायू गुणवत्तेचे प्रमाण

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## जल प्रदूषण

१०.८० जल प्रदूषण म्हणजे जलाशयातील (उदा. तलाव, नदी, समुद्र, झरे आणि भूजल) पाण्याचे होणारे दूषितीकरण होय. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दूषित घटकांतील घातक संयुगांवर पुरेसे संस्करण न करता त्यांचे जलाशयात होणाऱ्या विसर्गामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ हा जल प्रदूषण प्रतिबंधीत व नियंत्रित करून जल गुणवत्ता राखणे आणि पूर्ववत करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

जागतिक पर्यावरण संनियंत्रण प्रणाली व राष्ट्रीय जलस्रोत नियंत्रण प्रकल्प राबवित आहे. राज्यातील १५६ नद्या, ३४ खाड्या/समुद्र, १० नाले / कारखान्यांचे सांडपाणी आणि ५० विहिरीं येथील स्थानकांचा समावेश या संनियंत्रणात आहे. सदर २५० संनियंत्रण स्थानकात २०० भूपृष्ठीय आणि ५० भूजल स्थानके आहेत. भूपृष्ठावरील पाण्याचे मासिकरित्या आणि भूजलाचे सहामाही गुणवत्ता संनियंत्रण केले जाते. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यातील गोदावरी, कृष्णा, पंचगंगा आणि भीमा या नद्यांच्या ३९ स्थानांवरील सन २०१५-१६ मधील जल गुणवत्ता तक्ता १०.६३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६३ नद्यांच्या ३९ स्थानांवरील सन २०१५-१६ मधील जल गुणवत्ता**

| प्रमाणक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| pH मूल्य ६.० ते ८.५# | | जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी ५ मि ग्रॅ / लि# | | विरघळलेला प्राणवायू ४.० मि ग्रॅ / लि# | | फिकल कॉलिफॉर्म ५,००० पेक्षा जास्त नाही# | |
| कक्षा | स्थाने | कक्षा | स्थाने | कक्षा | स्थाने | कक्षा | स्थाने |
| ५.५ - ६.५ | ० | २.५ - ५.५ | २५ | ३ - ५ | १ | ० - १०० | ३८ |
| ६.५ - ७.५ | ८ | ५.५ - ८.५ | १२ | ५ - ७ | ३७ | १०० - २०० | ० |
| ७.५ - ८.५ | ३१ | ८.५ - ११.५ | ० | ७ - ९ | १ | २०० - ३०० | ० |
| ८.५ - ९.५ | ० | ११.५ आणि त्यापेक्षा अधिक | २ | ९ आणि त्यापेक्षा अधिक | ० | ३०० आणि त्यापेक्षा अधिक | १ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ pH मूल्य वगळता उर्वरित सर्व परिमाणे मिली ग्रॅम प्रति लिटर # जल गुणवत्तेचे प्रमाण

१०.८१ सन २०१५-१६ मध्ये २६ महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रति दिन अंदाजित ६,२६४.७५ दशलक्ष लिटर्स सांडपाण्याची निर्मिती झाली. त्यापैकी अंदाजे ३,८९७ (६२.२ टक्के) दशलक्ष लिटर्स सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. सन २०१५-१६ मधील राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील सांडपाण्याची निर्मिती व प्रक्रियेबाबतची माहिती तक्ता १०.६४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६४ सन २०१५-१६ मधील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील सांडपाणी निर्मिती व प्रक्रियेची माहिती**

(दशलक्ष लिटर प्रतिदिन)

| स्थानिक संस्था | संख्या | सांडपाणी निर्मिती | सांडपाणी प्रक्रिया | सांडपाणी प्रक्रिया (टक्के वारी) |
|---|---|---|---|---|
| महानगर पालिका | २६ | ६,२६४.८ | ३,८९७.० | ६२.२ |
| ‘अ’ वर्ग नगर पालिका | १२ | १८८.७ | ४२.० | २२.३ |
| ‘ब’ वर्ग नगर पालिका | ६१ | ३६७.६ | २४.५ | ६.७ |
| ‘क’ वर्ग नगर पालिका | १४६ | ४२१.४ | २०.९ | ५.० |
| कटक मंडळे | } १३ | ३९.० | ७.१ | १८.२ |
| नगर पंचायत | | १५.५ | २.८ | १८.१ |
| **एकूण** | **२५८** | **७,२९७.०** | **३,९९४.३** | **५४.७** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.८२ महापालिका घन कचरा प्रक्रियेमध्ये यांत्रिकी व जैविक प्रक्रियेचा समावेश केला आहे. राज्यातील सन २०१५-१६ मधील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घनकचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती तक्ता १०.६५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६५ सन २०१५-१६ मधिल नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घन कचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती**

(प्रति दिन मे.टन)

| स्थानिक संस्था | संख्या | घन कचरा निर्मिती | घन कचरा प्रक्रिया | प्रक्रिया टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| महानगर पालिका | २६ | १९,६९०.० | ५,५१६.५ | २८.० |
| ‘अ’ वर्ग नगर पालिका | १२ | ५७९.० | ११९.० | २०.६ |
| ‘ब’ वर्ग नगर पालिका | ६१ | १,०७७.२ | }२१९.६ | }१०.३ |
| ‘क’ वर्ग नगर पालिका | १४६ | १,०६५.० | | |
| नगर पंचायत/कटक मंडळे | १३ | १५२.५ | ७१.५ | ४६.९ |
| **एकूण** | **२५८** | **२२,५६३.७** | **५,९२६.६** | **२६.३** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ध्वनी प्रदूषण

१०.८३ ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० नुसार क्षेत्रनिहाय ध्वनी स्तर मर्यादा प्रमाणके तक्ता १०.६६ मध्ये दिल्या आहेत.

१०.८४ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ध्वनी प्रदूषणाचा प्रभाव तपासण्याकरिता प्रमुख शहरांमध्ये सलग दोन दिवस (एक कामकाजाचा व एक सुट्टीचा दिवस) ४८ तासांच्या कालावधीकरिता परिसर ध्वनी स्तर संनियंत्रण कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. दोन्ही दिवशी त्याच ठिकाणी समान कालावधीकरिता ध्वनी स्तर मोजला जातो. निवडक शहरांमधील निवासी क्षेत्रातील दिवस-रात्रीचे ध्वनी स्तराचे प्रमाण तक्ता १०.६७ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.६६ क्षेत्रनिहाय ध्वनी स्तर मर्यादा प्रमाणके**

(डेसिबल)

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्राचा प्रकार | मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| अ | औद्योगिक | ७५ | ७० |
| ब | वाणिज्यिक | ६५ | ५५ |
| क | निवासी | ५५ | ४५ |
| ड | शांतता प्रभाग | ५० | ४० |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**तक्ता १०.६७ निवडक शहरांमधील निवासी क्षेत्रातील दिवस-रात्रीचे ध्वनी स्तराचे प्रमाण**

(डेसिबल)

| ठिकाण | सुट्टीचा दिवस | | कामकाजाचा दिवस | |
|---|---|---|---|---|
| | १८-१२-२०१६ | | १९-१२-२०१६ | |
| | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री |
| मुंबई (शिवाजी पार्क – दादर) | ८०.२ | ७६.९ | ८८.२ | ७९.३ |
| मुंबई (वाशी नाका – चेंबूर) | ८३.५ | ७७.३ | ८९.२ | ८९.४ |
| ठाणे (गोखले रोड) | ८३.९ | ९२.९ | ८२.३ | ७१.७ |
| ठाणे (वागळे इस्टेट) | ८३.९ | ९२.९ | ८२.३ | ७१.७ |
| पुणे (स्वारगेट) | ८०.२ | ६४.३ | ८१.९ | ८१.९ |
| पुणे (हडपसर) | ७७.३ | ६२.५ | ८२.८ | ८२.८ |
| नाशिक (द्वारका सर्कल) | ७९.६ | ७०.१ | ७९.४ | ६९.५ |
| नाशिक (उद्योग भवन, सातपुर) | ७१.९ | ६८.४ | ७३.५ | ६७.८ |
| औरंगाबाद (निराला बजार) | ७३.७ | ६३.५ | ७९.६ | ६४.८ |
| नांदेड- वाघोला (विष्णुपुरी) | ७६.३ | ५८.२ | ७७.४ | ६८.३ |
| नागपूर (सीताबर्डी पोलीस स्टेशन) | ७६.७ | ६९.५ | ७८.१ | ७४.६ |
| चंद्रपूर (जटपुरा गेट) | ७५.२ | ७१.० | ८९.० | ७७.४ |
| अमरावती (राजकमल चौक) | ८४.२ | ६६.५ | ८०.९ | ६८.४ |
| अकोला (जिल्हाधिकारी कार्यालय) | ७५.५ | ५८.७ | ७७.० | ५८.३ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## औद्योगिक प्रदूषण

१०.८५ मार्च २०१६ अखेर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील एकूण ८३,४०० उद्योगांपैकी १३ टक्के वायू प्रदूषण प्रवण, २३ टक्के जलप्रदूषण प्रवण तर आठ टक्के घातक टाकाऊ पदार्थ निर्माण करणारे होते.

१०.८६ सन २०१५-१६ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ च्या कलम ३३अ अंतर्गत १,५४८ उद्योगांना आणि वायू (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या कलम ३१अ अंतर्गत ३३५ उद्योगांना

निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या कारखान्यांवर ८७९ प्रकरणे न्यायालयात दाखल केली असून, त्यापैकी नोव्हेंबर २०१६ अखेर दोषी, खारीज व प्रलंबीत प्रकरणांची संख्या अनुक्रमे २९४, २८२ व ३०३ आहे.

१०.८७ सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र या योजने अंतर्गत लघु उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या घातक घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावण्यासाठी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे २४ औद्योगिक वसाहतीतील ७,९२७ कारखान्यांसाठी कार्यान्वित करण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये प्रति दिन सरासरी २००.२ दशलक्ष लिटर्स सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१५-१६ मधील उद्योगांचे प्रदूषण क्षमतेनुसार केलेले वर्गीकरण तक्ता १०.६८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.६८ प्रदूषण क्षमतेवर आधारीत सन २०१५-१६ मधील उद्योगांचे वर्गीकरण**

(संख्या)

| नियंत्रण मंडळाचे विभाग | उद्योग | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाल | | | नारंगी | | | हिरवा | | |
| | मोठा | मध्यम | लहान | मोठा | मध्यम | लहान | मोठा | मध्यम | लहान |
| मुंबई | ११३ | ३० | २७४ | ४६२ | ८० | ४९१ | ६ | १७ | १,९४२ |
| ठाणे | १०३ | ४५ | १,१६८ | ९ | १४ | ५११ | ३३ | २८ | ३,१४५ |
| कल्याण | १०२ | ५८ | १,५४४ | ३८ | २६ | ५३१ | १३ | ८ | १,८९७ |
| नवी मुंबई | १५८ | ८४ | ९३८ | १३१ | १०९ | ९३७ | ३७ | ४० | १,३०९ |
| रायगड | २१३ | ८३ | ३०३ | १५ | ४१ | २२४ | १४ | १८ | ५७१ |
| पुणे | ६९३ | ३४९ | २,३२५ | ४३४ | ३१७ | १,८३७ | २०० | २०१ | ५,०११ |
| कोल्हापूर | २११ | ५९ | १,६८२ | ३० | ४३ | १,५९५ | ६ | ११ | ९,९४७ |
| नाशिक | २७५ | २३० | २,५४७ | ४४ | ७९ | २,००६ | २२ | ४३ | १०,३८१ |
| औरंगाबाद | २३७ | २०९ | १,८६२ | २८ | ४५ | १,८०० | ८ | ४३ | ६,९२४ |
| अमरावती | २७ | ६ | ८५६ | ८ | ६ | १,४९९ | १ | १ | १,९५४ |
| नागपूर | १८५ | १७९ | १,८९४ | २५ | २७ | २,८२९ | ५ | १२ | २,७९६ |
| चंद्रपुर | १०१ | १५ | ४०० | ० | १ | ६५५ | १ | ० | २७० |
| **एकूण** | **२,४१८** | **१,३४७** | **१५,७९३** | **१,२२४** | **७८८** | **१,४९१५** | **३४६** | **४२२** | **४६,१४७** |

लाल- ६० किंवा अधिक प्रदूषण क्षमता असलेल्या उद्योगांची संख्या नारंगी – ४१ ते ५९ च्या दरम्यान प्रदूषण क्षमता असलेल्या उद्योगांची संख्या
हिरवा - २१ ते ४० च्या दरम्यान प्रदूषण क्षमता असलेल्या उद्योगांची संख्या

*आधार :* महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## घातक कचरा

१०.८८ राज्यात घातक कचरा निर्माण करणारे ६,४९६ कारखाने आहेत. राज्यात ठाणे येथील तळोजा व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे ठाणे खाडी किनारपट्टीवरील औद्योगिक क्षेत्र, पुणे येथील रांजणगाव आणि नागपूर येथील बुटीबोरी या चार प्रमुख ठिकाणी घातक टाकाऊ कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सामाईक सुविधा असणाऱ्या चार प्रमुख केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. सामाईक सुविधा केंद्राव्दारे प्रक्रिया केलेल्या घातक कचऱ्याबाबतची माहिती तक्ता १०.६९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६९ सामाईक सुविधा केंद्राव्दारे प्रक्रिया केलेल्या घातक कचऱ्याबाबतची माहिती**

(लाख मे टन)

| वर्ष | प्रक्रियेचा प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | थेट जमिनीत पुरणे | प्रक्रिया केल्यानंतर जमिनीत पुरणे | भस्मीकरण करण्याजोगे | |
| २०१२-१३ | २.२६ | ०.७६ | ०.४५ | ३.४७ |
| २०१३-१४ | ०.८१ | ०.९९ | ०.४६ | २.२६ |
| २०१४-१५ | २.०८ | ०.८७ | ०.४९ | ३.४४ |
| २०१५-१६ | ६.३ | १४.१ | ५.६ | २६.०० |

*आधार :* महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.८९ घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा मागोवा घेण्यासाठी वाहनांवर ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) स्थापित करणे राज्यात अनिवार्य करण्यात आले आहे. डिसेंबर २०१६ अखेर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्राधिकृत केलेल्या ११७ घातक कचरा वाहतूकदारांनी जीपीएस स्थापित केले आहे.

## इ-कचरा

१०.९० इ-कचऱ्याचे व्यवस्थापन ही जागतिक चिंतेची बाब आहे. सन २०१५-१६ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने इ-कचऱ्याची पुनर्प्रक्रिया करता यावी यासाठी ४२ इ-कचरा संकलन केंद्रांना आणि इ-कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०११ नुसार पर्यावरणास अनुकुल पुनर्प्रक्रिया / विघटन तंत्रज्ञान असलेल्या ३८ उद्योगांना मान्यता दिली असून त्यांची एकूण क्षमता प्रतिवर्ष ५५,४१० मे. टन इतकी आहे.

## जैव-वैद्यकीय कचरा

१०.९१ जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम-२०१६ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्य सेवा आस्थापनांना जैव-वैद्यकीय कचरा विल्हेवाट करण्याचे प्राधिकार प्रदान करण्यास सुरुवात केली आहे. राज्यात एकूण ६२,३३४ आरोग्य सेवा आस्थापना आहेत. या आस्थापनांमध्ये निर्माण होणारा जैव-वैद्यकीय कचऱ्यावर राज्यात एकूण ३६ सामुहिक जैव-वैद्यकीय कचरा प्रकिया व विल्हेवाट केंद्रांद्वारे प्रक्रिया केली जाते त्यापैकी ३४ केंद्रे भस्मीकरण व उर्वरीत केंद्रे जमिनीत खोलवर पुरणे या पद्धतीची आहेत. सन २०१५-१६ मध्ये सरासरी सुमारे प्रति दिन ६२,२०४ किलो जैव-वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यात आली.

## पर्यावरणविषयक मान्यता

१०.९२ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (१९९८), राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरण (२००८) व राज्य स्तर तज्ञ मूल्यांकन समिती अनुक्रमे तटीय नियमन क्षेत्र व पर्यावरणविषयक मान्यता प्रदान करण्यासाठी गठीत केल्या आहेत. राज्यामध्ये पर्यावरणविषयक मान्यतेच्या कामांना गती येण्यासाठी तीन राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती स्थापित करण्यात आल्या आहेत.

१०.९३ सन २०१६ मध्ये ३४० इमारत व बांधकाम, ४६ खाण, सिंचन आणि ४६ उद्योग क्षेत्रातील प्रस्तावांना पर्यावरण विषयक मान्यता देण्यात आली. सन २०१५ मध्ये २१७ इमारत व बांधकाम, ३६ खाणकाम, तीन सिंचन आणि ४३ उद्योग क्षेत्रातील प्रस्तावांना पर्यावरणविषयक मान्यता देण्यात आली आहे.

१०.९४ सन २०१६ मध्ये महाराष्ट्र तटीय व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्र (सीआरझेड) अधिसूचना, २०११ नुसार १७६ प्रकल्पांना शिफारसी देण्यात आल्या आहेत.

## सरोवर संवर्धन योजना

१०.९५ सरोवरांची अवनती रोखणे हा या योजनेचा उद्देश आहे. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाचा त्यात ७० टक्के तर राज्य शासनाचा ३० टक्के हिस्सा आहे. या योजने अंतर्गत सन २००७ पासून ४० तलावांचे संवर्धन करण्यात येत आहे. या तलावांच्या संवर्धनासाठी ₹ १११.५ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ₹ ४५.३७ कोटी वितरीत करण्यात आली आहे आणि डिसेंबर २०१६ पर्यंत ₹ ३९.५८ कोटी खर्च झाला.

# सामाजिक न्याय

१०.९६ समाजाकडून सर्व घटकांना, विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक, दिव्यांग व जेष्ठ नागरीक इत्यादींना न्याय्य वागणूक आणि सामाजिक लाभांमध्ये वाटा प्रदान करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. सामाजिक न्याय हे एक तत्त्व असून, त्याद्वारे स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या पायावर आधारीत समाजाची रचना करण्यात येत असते. भारतीय राज्यघटनेत राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली असून, त्यानुसार दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या समान पातळीवर आणण्यासाठी विविध विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्य शासन अनुसूचित जातींकरिता ‘अनुसूचित जाती उपयोजना’ व अनुसूचित जमातींकरिता ‘आदिवासी उपयोजना’ अशा दोन स्वतंत्र उपयोजना तयार करते. सर्वसाधारण योजनांतर्गत उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या निधी व लाभांव्यतिरिक्त, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना याद्वारे संबंधित समुदायास त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. जनगणना-२०११ नुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येतील अनुसूचित जातीचे प्रमाण ११.८ टक्के, अनुसूचित जमाती ९.३ टक्के व अल्पसंख्याक १९.९ टक्के आहे.

# अनुसूचित जाती उपयोजना

१०.९७ बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-१७) अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ २८,०५० कोटी नियतव्यय निश्चित केला असून, तो राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या १०.२ टक्के आहे. सन २०१६-१७ करिता अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ ६,७२५.६५ कोटी नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून, त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ ४,३२५.६५ कोटी (६४.३ टक्के) तर उर्वरीत जिल्हास्तरीय योजनांकरिता ₹ २४०० कोटी (३५.७ टक्के) आहे. या योजनेतंर्गत “ सामाजिक व सामुहिक सेवा ” क्षेत्रावरील खर्चाचा वाटा महत्तम (८६.५ टक्के ) आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये एकूण २०५ योजना (११९ राज्यस्तरीय व ८६ जिल्हास्तरीय) राबविण्यात आल्या असून, सन २०१६-१७ मध्ये एकूण २२२ योजनांची (१२७ राज्यस्तरीय व ९५ जिल्हास्तरीय) अंमलबजावणी करण्यात येत आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय व खर्च तक्ता १०.७० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७० अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च+ |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **४,०४४.००** | **१,७२०.००** | **४,०९०.००** | **१,५५७.७६** | **४,३२५.६५** | **१,०४६.८४** |
| कृषि व संलग्न कार्ये | ६४.२८ | २७.१३ | ६१.३० | ५४.८६ | १२८.४० | ११.१२ |
| ग्राम विकास | १३.६८ | ० | २०.०० | १४.५६ | ६९.५६ | २५.३३ |
| उद्योग व खनिजे | २१.२६ | १०.०७ | ३०.०३ | ३०.०० | ५०.०२ | ६.६५ |
| सामान्य आर्थिक सेवा | ६०.०० | ३३.५३ | ० | ० | २३.३७ | ४.६३ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ३,८७५.०४ | १,६४८.०१ | ३,९७८.६६ | १,४५८.३२ | ४,०५४.२९ | ९९९.११ |
| सामान्य सेवा | १०.०० | १.७३ | ० | ० | ० | ० |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,०००.००** | **१,८६२.८२** | **२,४००.००** | **२,२९८.५६** | **२,४००.००** | **१,५१९.१८** |
| कृषि व संलग्न कार्ये | २७०.६९ | २६९.१९ | २९३.९८ | ७९.७५ | ३०५.२० | १८४.५८ |
| ग्राम विकास | ० | ० | ० | ० | ७३.२८ | ७३.२८ |
| ऊर्जा | ७४.९७ | ० | ७६.६८ | २१२.३२ | ९२.५६ | ० |
| उद्योग व खनिजे | ११.५६ | ११.०० | ११.९९ | ११.४३ | १२.२२ | ४.१३ |
| वाहतूक | ३२.२५ | २५.९९ | ५५.५९ | ४७.६४ | ५४.९५ | ३५.७३ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १,६१०.५२ | १,५५६.६४ | १,९६१.७३ | १,९४७.३९ | १,८६१.७९ | १,२२१.४६ |
| **एकूण (अ + ब)** | **६,०४४.२६** | **३,५८३.२९** | **६,४९०.००** | **३,८५६.३२** | **६,७२५.६५** | **२,५६६.०२** |

आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जूळणार नाहीत. + डिसेंबरपर्यंत

*आधार* : सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

## संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.९८ चर्मकार समाजाच्या विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ स्थापन करण्यात आले असून, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळाच्या (राअजाविविम) विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळास राज्याची अधिकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. चर्मोद्योगात कार्यरत असणाऱ्यांसाठी कच्च्या मालाचे प्रापण व पुरवठा व्यवस्था करणे, तसेच त्यांच्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यक व्यवस्था करणे, स्वदेशी व विदेशातील बाजारांमध्ये तयार मालाच्या विक्रीसाठी मध्यस्थ म्हणून काम करणे, उत्पादन व पणन याबाबतच्या प्रशिक्षण सुविधा पुरविणे इ. मुख्य कार्ये महामंडळामार्फत केली जातात. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ७३.२१ कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३०६.२१ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७१ संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | १६२ | १५.१० | १६९ | १६.०० | १२६ | १२.३० |
| मुदत कर्ज | ४७० | ३८.५० | ३२५ | २६.५० | ४५ | ४.०० |
| पन्नास टक्के अनुदान | ३५३ | ३५.२५ | ३०४ | ३०.४० | १५८ | १५.७८ |
| सूक्ष्म वित्तपुरवठा | ३०१ | ३०.१० | २७९ | २७.९० | ११६२ | ११६.२० |
| महिला समृद्धी | ५७१ | ५७.१० | ३७१ | ३७.१० | २२१ | २२.१० |
| महिला किसान | ३८ | ३.२० | ११ | ०.७० | १९ | १.१० |
| प्रशिक्षण कार्यक्रम | ७२६ | १०.१३ | ७७८ | ३१.७९ | ७१३ | ४७.६२ |

*आधार* : संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ. + डिसेंबरपर्यंत

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

१०.९९ राज्य शासनाने मातंग समाजातील १२ उपजातींच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ३०० कोटी आहे, तर भरणा केलेले भागभांडवल ₹ ३९४.६० कोटी असून, त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि उर्वरीत हिस्सा केंद्र शासनाचा आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे राअजाविविमची राज्यातील अधिकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७२ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल | ६२६ | ८२२.७६ | २७८ | ४६०.५४ | २७८ | ७८३.०५ |
| अनुदान | १,४०१ | १४०.१० | ३,२०२ | ३२०.२० | ६२८ | ६२.८० |
| राअजाविविमच्या योजना | ९५६ | ९२४.२६ | ६ | १६.४० | ६४ | २५१.२० |
| सूक्ष्म वित्तपुरवठा | ८ | १.७० | ० | ० | ० | ० |
| महिला समृद्धी | ३,४२१ | १,३६७.०० | ० | ० | ० | ० |
| शैक्षणिक कर्ज | ३ | ४.६६ | १ | १६.४० | १ | ६.५० |

*आधार* : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित

१०.१०० अनुसूचित जाती आणि नवबौध्दांच्या आर्थिक विकासासाठी राज्य शासनाने महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना केली. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी आहे, तर भरणा केलेले भागभांडवल ₹ ६३२.६४ कोटी असून, त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि उर्वरीत हिस्सा केंद्र शासनाचा आहे. हे महामंडळ राअजाविविम आणि राष्ट्रीय

सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (रासकविविम) यांची राज्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७३ महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल | २,२२५ | १,०८०.२१ | २,३२५ | १,२७५.६९ | १,०९० | ६५२.७६ |
| पन्नास टक्के अनुदान | ४,४३८ | ७०२.०३ | ६,७९८ | ७२०.४५ | २,६७३ | २८०.४६ |
| राअजाविविमची मुदत कर्जे | २ | ३.७४ | ० | ० | ० | ०## |
| राअजाविविमची शैक्षणिक कर्जे | १४ | ११.५६ | ० | ३.११# | ० | ०## |
| रासकविविमची मुदत कर्जे | ४६७ | १,९७७.७५ | ८१ | ३४५.७६ | ० | ०## |
| रासकविविमची शैक्षणिक कर्जे | १ | १४.०७ | १ | ३.२४ | ० | ०## |

\# मागील वर्षाची अंशत: देणी ## राअजाविविम व रासकविविम यांचेकडून अनुदान अप्राप्त + डिसेंबरपर्यंत

*आधार* : महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित

## आदिवासी उपयोजना

१०.१०१ राज्यातील आदिवासी लोकसंख्या ही धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पालघर व ठाणे या पश्चिमेकडील डोंगरी जिल्ह्यांमध्ये (सह्याद्री प्रदेश) आणि चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, अमरावती व यवतमाळ या पूर्वेकडील जंगलव्याप्त जिल्ह्यांमध्ये (गोंडवाना प्रदेश) मुख्यत: केंद्रित झाली आहे. भारत सरकारच्या निर्देशानुसार राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या केंद्रिकरणावर आधारित २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ४३ सुधारित क्षेत्र विकास खंड (माडा) व २४ लघु सुधारित क्षेत्र विकास खंड (मिनीमाडा) तयार करण्यात आले आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत प्रामुख्याने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा क्षेत्र व मिनीमाडा क्षेत्रांमध्ये तसेच आदिवासी क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेर वास्तव्य करणाऱ्या आदिवासी समाजाला विविध पायाभूत व सामाजिक - आर्थिक सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

१०.१०२ आदिवासी उपयोजनेसाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ₹ २४,४७५ कोटी नियतव्यय निश्चित केलेला असून तो राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या ८.९ टक्के आहे. सन २०१६-१७ साठी ₹ ५,३५७.७२ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला, त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ २,४१०.८२ कोटी (४५ टक्के) तर जिल्हास्तरीय योजनांकरिता ₹ २,९४६.९० कोटी (५५टक्के) आहे. सन २०१५-१६ मध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ३११ योजना राबविण्यात आल्या असून, त्यातील १०५ योजना राज्यस्तरीय व २०५ जिल्हास्तरीय व एक योजना दोन्ही स्तरावरील आहेत. सन २०१६-१७ मध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ३२० योजना (८४ राज्यस्तरीय, १८९ जिल्हास्तरीय व ४७ केंद्र पुरस्कृत योजना ) राबविण्यात येत आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत सन २०१६-१७ (डिसेंबरपर्यंत) च्या खर्चात सामाजिक व सामुहिक सेवांचा महत्तम वाटा (६१ टक्के) असून, त्याखालोखाल ग्राम विकास (२४ टक्के) आणि कृषि व संलग्न कार्ये (६ टक्के) यांचा वाटा आहे. आदिवासी उपयोजनेअंतर्गत विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय व खर्च तक्ता १०.७४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७४ आदिवासी उपयोजनेअंतर्गत विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च+ |
| कृषि व संलग्न कार्ये | २९९.६९ | ३२१.६५ | ३१६.७५ | ३११.०६ | २५१.२६ | १०३.२३ |
| ग्राम विकास | २११.६१ | १८९.२५ | ४५७.५४ | ४३६.२४ | ६३९.१४ | ४०१.६८ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | २६८.०९ | १३८.१९ | २१०.१२ | १५०.५५ | १८७.१० | ३३.१९ |
| ऊर्जा | ९५.५३ | १११.६३ | १३०.३२ | १२४.६२ | १०२.४७ | ४६.६९ |
| उद्योग व खनिजे | १.०७ | ०.९४ | १.४५ | १.२० | १.५० | ०.३५ |
| वाहतूक | ५०६.४६ | ६६०.३१ | ५४५.१४ | ५३५.०२ | ५३१.२७ | ७१.४३ |
| सामान्य आर्थिक सेवा | १७.७३ | ९.९३ | १७.२२ | १३.९७ | २.१५ | ० |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ३,४१४.७४ | २,६००.७८ | ३,४०९.६८ | २,९५४.६९ | ३,५०७.४७ | १,०३६.०५ |
| इतर कार्यक्रम | ० | ० | ८१.७८ | ३५.२० | १३५.३६ | ८.८३ |
| **एकूण** | **४,८१४.९२** | **४,०३२.६८** | **५,१७०.००** | **४,५६२.५५** | **५,३५७.७२** | **१,७०१.४५** |

*आधार:* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

१०.१०२.१ **भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम अमृत आहार योजना** - आदिवासी क्षेत्रात कुपोषित, अशक्त व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांचे प्रमाण जास्त आहे. राज्य शासनाने गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांसाठी ही योजना सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सन २०१६-१७ (डिसेंबरपर्यंत) मध्ये एकूण १.२७ लाख लाभधारकांना लाभ देण्यात आला असून त्याकरिता ₹ १०१.६८ कोटी खर्च झाला आहे.

१०.१०२.२ **अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रवेश देण्याबाबत** - या योजनेंतर्गत एकूण १७,४४२ व १९,५९४ आदिवासी विद्यार्थ्यांना ११४ व १३२ इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत अनुक्रमे सन २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षात प्रवेश देण्यात आला आहे. त्यावर सन २०१५-१६ मध्ये ₹ १२९.५४ कोटी व २०१६-१७ (डिसेंबरपर्यंत) मध्ये ₹ १६६.७१ कोटी खर्च झाला आहे. आदिवासी विभागवार विद्यार्थी तक्ता १०.७५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७५ आदिवासी विभागवार विद्यार्थी**

| विभागाचे नांव | विद्यार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७ |
| नाशिक | ५,७८२ | ५,८३० |
| ठाणे | ३,१६७ | ४,८५३ |
| अमरावती | ३,९११ | ५,२२० |
| नागपूर | ४,५८२ | ३,६९१ |
| **एकूण** | **१७,४४२** | **१९,५९४** |

*आधार* : आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

१०.१०२.३ **अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता क्रीडा प्रबोधिनी व क्रीडा विषयक सवलती** - क्रीडा प्रबोधिनी नाशिक येथे सुरू करण्यात आली असून, याअंतर्गत शासकिय, शासन अनुदानित आश्रमशाळा व एकलव्य इंग्रजी शाळेतील ६६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्याकरिता सन २०१६-१७ (डिसेंबरपर्यंत) ₹ १३.१९ लाख खर्च झाला आहे.

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१०३ आदिवासी समाजाच्या आर्थिक कल्याणासाठी राज्य शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी आहे, तर भरणा केलेले भागभांडवल ₹ ७७.११ कोटी असून, त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि उर्वरीत हिस्सा केंद्र शासनाचा आहे. हे महामंडळ राष्ट्रीय आदिवासी वित्त व विकास महामंडळाची राज्यातील अधिकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७६ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमूख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| मुदत कर्ज | २८९ | ५२७.३५ | २४७ | ३०७.१५ | १८ | ६४.३६ |
| महिला सबलीकरण | २८४ | १४२.०० | २४३ | १४५.५४ | ५ | २.५० |

*आधार* : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ + डिसेंबरपर्यंत

## विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागासवर्गीयांचे कल्याण

१०.१०४ विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या समाजातील लोकांच्या कल्याणासाठी शासनाने स्वतंत्र संचालनालय स्थापन केले आहे. या समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सन २०१५-१६ मध्ये ₹ ३४५.५४ कोटी नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला व ₹ १९३ कोटी खर्च झाला आहे. सन २०१६-१७ मध्ये ₹ ३४५.५४ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून डिसेंबर पर्यंत ₹ १५१.७९ कोटी खर्च झाला.

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित

१०.१०५ विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची राज्यातील अधिकृत यंत्रणा आहे. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ १८९.२३ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७७ वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | ९४५ | २३६.२५ | ८८२ | २२०.५० |
| बीज भांडवल | ७२९ | ७८०.७५ | ५३० | ६६१.५० |
| मुदत कर्ज | ० | ० | ५,०५० | १,०००.०० |

वरील योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये (डिसेंबरपर्यंत) लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला नाही.

*आधार* : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

१०.१०६ राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ८५.४६ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाची (रामाविविम) राज्यातील अधिकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७८ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | ४२७ | २०५.०२ | ३८२ | १९०.८२ | १७३ | ९०.४२ |
| थेट कर्ज | ० | ० | ६३२ | १५७.०५ | ६०४ | १५१.०० |
| मुदत कर्ज | ४०४ | ६००.५९ | २१५ | २१५.२८ | २ | १.७१ |
| मार्जिन मनी | १९ | ३५.७७ | १४ | २७.१० | ५ | १०.५१ |
| महिला समृद्धी | १० | २.२५ | २० | ४.७५ | ० | ०# |
| स्वर्णिमा | ३५ | २०.७५ | १३ | ९.२६ | ० | ०# |
| शैक्षणिक कर्ज | ३९५ | १३४.४७ | ३९७ | १३६.५४ | २८९ | १००.७७ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ # रामाविविम कडून निधी प्राप्त झालेला नाही. + डिसेंबरपर्यंत

## दिव्यांग व्यक्तींचे कल्याण

१०.१०७ दिव्यांग व्यक्तींच्या क्षमता ओळखणे, कौशल्य विकास, समान संधी देणे, अधिकारांचे रक्षण करून सक्षमीकरण करणे, त्याचबरोबर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. शासन सेवेत गट क व ड मधील पदावर नियुक्ती तसेच सेवांतर्गत बढतीमध्ये दिव्यांग व्यक्तींना तीन टक्के आरक्षण दिले जाते. सरकारी सेवेत नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये ₹ ११.२६ कोटी नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला व ₹ ९.१९ कोटी खर्च झाला. सन २०१६-१७ करीता ₹ १४.१४ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून डिसेंबर पर्यंत ₹ ४.७१ कोटी खर्च झाला.

## महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१०८ दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ४७.५१ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७९ महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | २५१ | ५०.२० | १,५२६ | ३०५.२० | १२ | २.४० |
| मुदत कर्ज | ८५६ | १,३१९.३२ | ७८७ | १,६५६.१९ | ७४० | १,५८०.६५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित. + डिसेंबरपर्यंत

### अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

१०.१०९ राज्यातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ५० कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). महामंडळाव्दारे २०१५-१६ या वर्षात एकूण ७५ लाभधारकांना ₹ १०४.३९ लाख वितरीत करण्यात आले तर, २०१६-१७ डिसेंबरपर्यंत ८९ लाभधारकांना ₹ ११६.४९ लाख वितरीत करण्यात आले आहेत.

## अल्पसंख्यांक विकास

१०.११० राज्यामध्ये अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी स्वतंत्र अल्पसंख्यांक विकास विभाग आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ₹ १,६८५ कोटी नियतव्यय निश्चित केला आहे. सन २०१५-१६ मध्ये ₹ ४३०.४५ कोटी नियतव्यय उपलब्ध करून दिला असून ₹ ३३५.६५ कोटी खर्च झाले. सन २०१६-१७ मध्ये ₹ ४०५.०५ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून डिसेंबर पर्यंत ₹ १४४.४६ कोटी खर्च झाला आहे.

### मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

१०.१११ राज्य शासनामार्फत अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३७५.६९ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाची राज्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.८० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८० मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | ११,०३६ | ४,४१४.४० | २,८३७ | १,१३४.४० | ४२ | १८.९७ |
| शैक्षणिक कर्ज | २,८६१ | २,०४५.०० | २,१४१ | १,६१५.६४ | २,१९० | १,८२१.१२ |
| इतर कर्ज (स्वंयसहाय्यता बचत गट) | २६५ | ५०६.०० | १५४ | २९३.२० | ० | ० |
| मुदत कर्ज | ० | ० | ३६८ | ३४७.९९ | ३७ | ३५.१५ |

*आधार* : मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ + डिसेंबरपर्यंत

## सामाजिक सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण योजना

१०.११२ राज्य शासन सामाजिक सुरक्षेच्या विविध योजना राबविते. महत्त्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च तक्ता १०.८१ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८१ महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | वितरित रक्कम |
| संजय गांधी निराधार अनुदान | ७.८२ | ५९१.३७ | ८.६० | ६३८.०७ | ९.०५ | ५२५.४५ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन | १८.२५ | ९८३.११ | १९.२९ | १०९१.११ | १९.८२ | ८५५.०० |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन | १२.०३ | २८३.१४ | ११.९३ | २९०.९२ | ११.७० | २०७.७८ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन | ०.४४ | ९.२६ | ०.४८ | ११.२६ | ०.५१ | ९.५६ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन | ०.०७ | १.७२ | ०.०७ | १.५६ | ०.०७ | १.२३ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ | ०.१५ | २९.८८ | ०.१८ | ३६.१८ | ०.०९ | २०.८० |
| आम आदमी विमा | ५३.०० | ३९.०९ | ५२.३४ | २५.३५ | ५२.३४ | ०# |

*आधार :* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन # डिसेंबर २०१६ पर्यंत खर्च झालेला नाही. + डिसेंबरपर्यंत

## वस्ती/ क्षेत्र विकास कार्यक्रम

१०.११३ सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग आणि आदिवासी विकास विभाग, वस्ती/ क्षेत्र विकासाच्या विविध योजना राबविते. वस्ती/ क्षेत्र विकासाच्या काही प्रमुख योजनांचा नियतव्यय व झालेला खर्च तक्ता १०.८२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८२ वस्ती/ क्षेत्र विकासाच्या काही प्रमुख योजनांचा नियतव्यय व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च+ |
| दलित वस्ती सुधार ++ | ६२१.५८ | ६२१.५८ | ७५३.४६ | ७५३.४६ | ७५६.४५ | ६२६.१६ |
| तांडा/वस्ती सुधार ++ | २१.०० | १५.५३ | २१.०० | १४.६९ | २५.०० | १२.५४ |
| नागरी दलित वस्ती सुधार @ | ३५८.१३ | ३५८.१३ | ४६७.७६ | ४४३.९९ | ४७२.६६ | ३४१.४१ |
| नागरी आदिवासी वस्ती सुधार @ | ६.०० | ३.५० | ६.०० | ४.२० | ७.०० | ० |
| ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम # | २६१.४९ | २४७.५० | २५५.६५ | २१९.६५ | २१२.३० | ५.०३ |
| अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम $ | १५.०० | ४.८७ | ६२.५० | ३२.१२ | २५.०० | ५.२५ |
| अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम $ | ४०.०० | १६.५६ | ६२.५० | ४९.८८ | ३५.५५ | १०.७२ |

+ डिसेंबरपर्यंत

*आधार :* ++ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, @ नगर विकास विभाग, # आदिवासी विकास विभाग , $ अल्पसंख्यांक विकास विभाग

# मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये

१०.११४ संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने मानव विकासाची व्याख्या 'लोकांच्या निवडींच्या कक्षा रुंदावण्याची प्रक्रिया', अशी केली असून या मध्ये 'आरोग्यदायी व दीर्घायुष्य, सुशिक्षित होणे, दर्जेदार राहणीमान', तसेच 'राजकीय स्वातंत्र्य, इतर मानवी हक्कांची हमी व आत्म सन्मानाचे विविध घटक' निवडण्याची अनुमती आहे. मानव विकास निर्देशांक (माविनि) हा आरोग्यदायी व दीर्घायुष्य, ज्ञानार्जनाची संधी व दर्जेदार राहणीमान या तीन मानवी विकासाचे दीर्घकालीन प्रगतीचे मोजमाप करून मूल्यांकन करण्याचा संयुक्त निर्देशांक आहे.

१०.११५ संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांनी प्रकाशित केलेल्या मानव विकास अहवाल-२०१५ नुसार, मानव विकास निर्देशांक ०.९४४ सह नॉर्वे यादीत प्रथम क्रमांकावर तर भारत मानव विकास निर्देशांक ०.६०९ सह १३० व्या क्रमांकावर आहे. आशियायी देशांमध्ये सिंगापूर (०.९१२) चा पहिला क्रमांक आहे तर भारताचा (०.६०९) ३८ वा क्रमांक आहे. सार्क देशांमध्ये श्रीलंका (०.७५७) पहिल्या क्रमांकावर त्यापाठोपाठ मालदीव (०.७०६) व भारत (०.६०९) आहे.

१०.११६ तत्कालीन नियोजन आयोग, भारत सरकार यांनी प्रकाशित केलेल्या भारत मानव विकास अहवाल-२०११ नुसार केरळ मानव विकास निर्देशांक ०.७९० सह देशात प्रथम क्रमांकावर आहे तर महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक ०.५७२ सह सहाव्या क्रमांकावर आहे.

१०.११७ राज्याने प्रकाशित केलेल्या महाराष्ट्र मानव विकास अहवाल-२०१२ नुसार मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर एकत्रित) मानव विकास निर्देशांक ०.८४१ सह पहिल्या क्रमांकावर, त्यापाठोपाठ पुणे (०.८१४) तर नंदुरबार (०.६०४) शेवटच्या क्रमांकावर आहे. मानव विकास निर्देशांकानुसार राज्यातील नऊ जिल्ह्यांचे अल्प माविनि म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. जिल्हानिहाय माविनि २०११ परिशिष्ट १०.१५ मध्ये दिले आहे.

## महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

१०.११८ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांमधील ग्रामीण भागात व 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शिक्षण, आरोग्य व उत्पन्न यांचा स्तर उंचविण्याच्या योजना राबविण्यात येतात. तालुक्यांच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थिती आणि स्थानिक गारजां नुसार जिल्हा/तालुका विवक्षित योजना तयार करण्यात येतात. तालुक्यासाठी मिळणाऱ्या एकूण निधीच्या २० टक्के निधी या करिता राखून ठेवण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ साठी ₹ ३०२ कोटीची अर्थसंकलपीय तरतुद करण्यात आली असून डिसेंबरपर्यंत ₹ १६९.६८ कोटी खर्च झाला आहे.

१०.११९ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमातंर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची भौतिक व आर्थिक प्रगती तक्ता १०.८३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८३ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची भौतिक व आर्थिक प्रगती**

(संख्या)

| योजना | लाभार्थ्यांचा प्रकार | भौतिक प्रगती | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७+ |
| **अ) शिक्षण** | | | | |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अभ्यासिका (२,८८८ अभ्यासिका ) | विद्यार्थी | १,६७,६१५ | १,४१,५४१ | १,१५,९०० |
| ग्रामीण भागातील मुलींना मोफत बस सेवा (८६९ बस) | मुली | ७६,३९६ | ९६,९४६ | ९७,८७१ |
| बालभवन विज्ञान केंद्र स्थापन करणे (१२४ केंद्रे) | भेट दिलेले विद्यार्थी | ५,५१,१३८ | २,१०,९३२ | १,३०,९४६ |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे (३९ शाळा) | मुली | १,८०३ | १,८७९ | १,९४० |
| इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून ५ किमी अंतरापर्यंत राहाणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप | मुली | २२,५७९ | २८,५१४ | १,०१७ |
| अंगणवाड्यांचे बांधकाम | | | ६१०$ | |
| **ब) आरोग्य** | | | | |
| गर्भवती महिला, स्तनदा माता व 0 ते 6 महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य शिबिरे | गर्भवती महिला, स्तनदा माता व बालके | ६,३१,६५८ | ३,७८,०५६ | ४,६९,१०५ |
| किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक प्रशिक्षण | किशोरवयीन मुली | २,८५,५४१ | १,६९,९५४ | १,२२,८१९ |
| अजा, अज, दारिद्र्य रेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजूरी देणे | गर्भवती महिला | १,०७,८५४ | ९६,६२५ | ५८,३०२ |
| आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम | | | १७$ | |
| **क) उत्पन्न निर्मिती** | | | | |
| माती परिक्षण फिरती प्रयोगशाळा | मातीचे तपासलेले नमुने | ३९,१६१ | ३१,३३१ | ३०,७२८ |
| गौण वनोपजे गोळा करणे/मत्स्य व्यवसायासाठी ग्रामसभेला बीज भांडवल देणे | ग्रामसभेचे प्रस्ताव | ९४ | ३२८ | २२६ |
| | | **आर्थिक प्रगती** (₹ कोटी) | | |
| तरतूद | | २०५.०० | २०२.०० | ३०२.०० |
| खर्च | | १३८.६७ | १३५.४२ | १६९.६८ |

*आधार* : आयुक्तालय, महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम $ योजनेच्या अंमलबजावणी पासून बांधकाम पूर्ण + डिसेंबर पर्यंत

## तालुका मानव विकास निर्देशांक

१०.१२० कुटुंबाचा दरडोई मासिक उपभोक्ता खर्च, शालेय सरासरी वर्ष, अपेक्षित शालेय वर्ष व जन्माच्या वेळचे आयुर्मान या आधारे राज्यातील सर्व तालुक्यांसाठी मानव विकास निर्देशांक परिगणित करण्यास राज्याने पुढाकार घेतला आहे.

## शाश्वत विकासाची ध्येये

१०.१२१ संयुक्त राष्ट्रसंघाच्या दिनांक ८ सप्टेंबर २००० च्या सहस्त्रकीय परिषदेत, जागतिक स्तरावरील नेत्यांनी जगातील दारिद्र्य निर्मूलन व मानवता वृद्धींगत करण्यासाठी एकत्रितपणे सहस्त्रकातील विकास उद्दिष्टे निश्चित केली होती. सदर उद्दिष्टे २०१५ पर्यंत साध्य करण्याचे ध्येय ठेवण्यात आले होते. तद्नंतर आता जगाचा शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन, सर्वसमावेशक सामाजिक आणि आर्थिक उन्नती यांचा समान विकास करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

१०.१२२ संयुक्त राष्ट्रसंघाच्या रिओ दे जेनेरिओ येथे जून २०१२ मध्ये झालेल्या रिओ +२० परिषदेमध्ये नविन शाश्वत विकासाची ध्येये निश्चित करण्यात आली आहेत. ही जागतिक ध्येये व उद्दिष्टे संपूर्ण जगाला लागू आहेत. सदर उद्दिष्टांमध्ये दारिद्र्य, रोजगार, शिक्षण व साक्षरता, आरोग्य, स्त्रीपुरुष समानता, महिला सक्षमीकरण, बालविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, आधुनिक उर्जा आणि साजेसे काम यांचा समावेश आहे.

१०.१२३ सदर उदिष्टे खालीलप्रमाणे :

१. सर्व स्वरूपातील दारिद्याचे निर्मुलन करणे

२. भूक संपवणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषण साध्य करणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे

३. सर्व वयोगटातील लोकांचे कल्याण व निरोगी जीवनाची हमी

४. सर्वसमावेशक आणि समन्यायी दर्जेदार शिक्षणाची हमी आणि सर्वांना निरंतर शिकण्याच्या संधीस प्रोत्साहन

५. स्त्री पुरुष समानता आणि सर्व स्त्रिया व मुलींचे सक्षमीकरण

६. सर्वांसाठी पुरेसे पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे शाश्वत व्यवस्थापन

७. सर्वांसाठी परवडणारी, विश्वसनीय, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा यांच्या उपलब्धतेची हमी

८. सर्वांसाठी शाश्वत सर्वसमावेशक, आर्थिक उन्नतीसाठी व भरीव उत्पादक रोजगार व साजेश्या कामास प्रोत्साहन

९. पायाभूत सुविधा, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरणास चालना व नावीन्यपूर्ण निर्मितीस प्रोत्साहन

१०. आंतर देशीय व देशांतर्गत विषमता कमी करणे

११. शहरे आणि मानवी वस्ती यांना सर्वसमावेशक, सुरक्षित आणि शाश्वत करणे

१२. उत्पादन आणि उपभोगाच्या पद्धती शाश्वत रूपात आणणे

१३. हवामानातील बदल आणि त्याचे परिणाम रोखण्यासाठी त्वरित कारवाई करणे

१४. महासागरे, समुद्र व त्यातील संसाधनांचा संवर्धन व शाश्वत विकासासाठी वापर

१५. भूतलावरील परिसंस्थेचे संरक्षण व पुनर्संचय करून त्याचा शाश्वत वापर, वनांचे शाश्वत व्यवस्थापन जमिनीची धूप व वाळवंटीकरण तसेच जैव विविधतेचे ऱ्हास थोपविणे

१६. शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजव्यवस्थांना प्रोत्साहन देणे. त्यांची शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल निश्चित करणे, सर्वांची न्यायापर्यंत पोहोच स्थापित करण्यासाठी विविध पातळ्यांवर परिणामकारक, उत्तरदायी आणि सर्वसमावेशक संस्था उभ्या करणे

१७. चिरस्थायी विकासासाठी वैश्विक भागीदारी निर्माण व्हावी यासाठी अंमलबजावणीची साधने विकसित करणे

* * * * *

## परिशिष्ट १०.१

## विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या

| बाब | वर्ष | विभाग | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोकण | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | प्राथमिक (१ ली ते ८ वी ) | | | | |
| शाळांची संख्या | २०१४-१५ | १८,३२७ | २०,१६५ | १६,८३३ | १९,१६५ | १०,६२० | ११,९७४ | ९७,०८४ |
| | २०१५-१६ | १८,८१५ | २०,२९५ | १६,९१९ | १९,५२७ | १०,६७४ | ११,९८९ | ९८,२१९ |
| | २०१६-१७* | २०,४५९ | २१,९६८ | १७,७७५ | २०,८१० | ११,३१३ | १२,६४५ | १,०४,९७० |
| एकूण पटसंख्या (हजारात) | २०१४-१५ | ३,८४५.० | ३,१९५.३ | २,८४४.३ | ३,१४०.४ | १,६०१.४ | १,५४६.० | १६,१७२.४ |
| | २०१५-१६ | ३,८६९.६ | ३,१८१.२ | २,८४२.० | ३,०७८.६ | १,५६४.३ | १,५०८.४ | १६,०४४.० |
| | २०१६-१७* | ३,८४०.८ | ३,१९७.४ | २,८४८.१ | ३,०५७.० | १,५४८.१ | १,४९४.४ | १५,९८५.७ |
| मुलींची पटसंख्या (हजारात) | २०१४-१५ | १,८१८.२ | १,४७६.८ | १,३१०.८ | १,४७१.१ | ७५७.५ | ७४२.० | ७,५७६.४ |
| | २०१५-१६ | १,८३२.१ | १,४७१.९ | १,३११.९ | १,४३८.६ | ७४०.२ | ७२७.७ | ७,५२२.३ |
| | २०१६-१७* | १,८१७.१ | १,४८१.० | १,३१६.५ | १,४२४.२ | ७३२.२ | ७१९.० | ७,४९०.० |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | २०१४-१५ | १०७.६ | १०५.१ | ८१.७ | ९८.७ | ५३.५ | ५९.५ | ५०६.१ |
| | २०१५-१६ | १११.३ | १०६.३ | ८२.२ | १०१.५ | ५४.४ | ५९.७ | ५१५.३ |
| | २०१६-१७* | ११६.० | १०९.७ | ८४.४ | १०४.८ | ५५.६ | ६०.० | ५३०.५ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २०१४-१५ | ३५.७ | ३०.४ | ३४.८ | ३१.८ | २९.९ | २६.० | ३१.९ |
| | २०१५-१६ | ३४.८ | २९.९ | ३४.६ | ३०.३ | २८.८ | २५.३ | ३१.१ |
| | २०१६-१७* | ३३.० | २९.० | ३३.६ | २९.० | २७.७ | २४.८ | ३०.० |
| | | | | माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी ) | | | | |
| शाळांची संख्या | २०१४-१५ | ४,८९६ | ५,०४२ | ३,८९८ | ४,७९१ | २,८३० | ३,०४० | २४,४९७ |
| | २०१५-१६ | ५,०५२ | ५,१५९ | ३,९८० | ४,८६८ | २,८६९ | ३,१०१ | २५,०२९ |
| | २०१६-१७* | ५,१८८ | ५,३३६ | ४,०७० | ५,०४४ | २,९४१ | ३,१५८ | २५,७३७ |
| एकूण पटसंख्या (हजारात) | २०१४-१५ | १,४७७.२ | १,२८६.७ | १,००९.१ | १,०४८.३ | ६४१.६ | ७१७.८ | ६,१८०.५ |
| | २०१५-१६ | १,५३१.८ | १,३२७.३ | १,०४१.७ | १,१२०.७ | ६७०.१ | ७३२.२ | ६,४२३.७ |
| | २०१६-१७* | १,५६६.९ | १,३५८.४ | १,०६९.१ | १,१९२.४ | ६८८.० | ७३९.८ | ६,६१४.७ |
| मुलींची पटसंख्या (हजारात) | २०१४-१५ | ६९६.६ | ५७८.८ | ४४४.४ | ४५३.३ | ३०२.२ | ३५१.६ | २,८२७.० |
| | २०१५-१६ | ७२२.६ | ५९३.१ | ४५८.२ | ४८०.९ | ३११.९ | ३५७.४ | २,९२४.० |
| | २०१६-१७* | ७३६.८ | ६०८.६ | ४७१.७ | ५१८.३ | ३१८.९ | ३५८.६ | ३,०१३.० |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | २०१४-१५ | ५१.० | ४७.८ | ३२.९ | ३८.१ | २१.८ | २७.७ | २१९.२ |
| | २०१५-१६ | ५०.५ | ४८.१ | ३३.६ | ३८.७ | २१.८ | २७.३ | २२०.० |
| | २०१६-१७* | ४७.४ | ४६.७ | ३३.२ | ३८.१ | २१.२ | २६.३ | २१२.८ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २०१४-१५ | २९.० | २६.९ | ३०.७ | २७.५ | २९.५ | २५.९ | २८.२ |
| | २०१५-१६ | ३०.३ | २७.६ | ३१.० | २९.० | ३०.८ | २६.८ | २९.२ |
| | २०१६-१७* | ३३.० | २९.१ | ३२.२ | ३१.३ | ३२.५ | २८.१ | ३१.१ |

*आधार:* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

* अस्थायी

## परिशिष्ट १०.२

### सन २०१६-१७ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **अॅलोपॅथी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २३ | ३,२०० | ३,१८८ | -- | -- | -- | १६ | १,९७० | १,९४५ | ३९ | ५,१७० | ५,१३३ |
| पदव्युत्तर | २० | १,६६९ | १,३८९ | ०१ | ७२ | ५२ | १५ | ३८१ | ३०४ | ३६ | २,१२२ | १,७४५ |
| **आयुर्वेदीक** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०४ | ३५० | ३४६ | १६ | ८४० | ८४० | ४४ | २,७४० | २,७४० | ६४ | ३,९३० | ३,९२६ |
| पदव्युत्तर | ०४ | १९३ | १९१ | १० | १५१ | १४२ | २२ | ९१८ | ६५१ | ३६ | १,२६२ | ९८४ |
| **होमिओपॅथी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | -- | -- | -- | ४० | ३,०४५ | ३,०४१ | ४० | ३,०४५ | ३,०४१ |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | १७ | ३४८ | २५२ | १७ | ३४८ | २५२ |
| **युनानी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | ०३ | १८० | १८० | ०३ | १६० | १६० | ०६ | ३४० | ३४० |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | २१ | २१ | ०२ | २१ | २१ |
| **दंतचिकित्सा** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०४ | २६० | २५८ | -- | -- | -- | २५ | २,३०० | २,२४० | २९ | २,५६० | २,४९८ |
| पदव्युत्तर | ०५ | ७४ | ६७ | -- | -- | -- | २१ | ४०२ | ३५५ | २६ | ४७६ | ४२२ |
| **फिजीओथेरपी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०४ | ९० | ९० | -- | -- | -- | २२ | ८६० | ८५९ | २६ | ९५० | ९४९ |
| पदव्युत्तर | ०४ | ४६ | ४२ | -- | -- | -- | १५ | १२३ | १२१ | १९ | १६९ | १६३ |
| **ऑक्युपेशनल थेरपी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०३ | ६० | ६० | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ | ६० | ६० |
| पदव्युत्तर | ०४ | ३१ | २४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०४ | ३१ | २४ |
| **ऑडीओलॉजी व स्पीच लँग्वेज पॅथोलॉजी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०३ | ८३ | ७७ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ | ८३ | ७७ |
| पदव्युत्तर | ०२ | ३० | २५ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ३० | २५ |
| **प्रोस्थेटीक्स व ऑरथोटीक्स** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०१ | ३० | २७ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ३० | २७ |
| पदव्युत्तर | ०१ | ०४ | ०४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०४ | ०४ |
| **नर्सिंग** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ०८ | ३४० | ३२९ | -- | -- | -- | ११४ | ४,२३५ | ३,७८२ | १२२ | ४,५७५ | ४,१११ |
| पदव्युत्तर | ०२ | ३७ | ३५ | -- | -- | -- | १४ | २११ | १६२ | १६ | २४८ | १९७ |
| **बी.पी.एम.टी.** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १८ | १,२८५ | ७०८ | -- | -- | -- | ०३ | २०७ | ९ | २१ | १,४९२ | ७१७ |

*आधार:* महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

# परिशिष्ट १०.३

## सन २०१६-१७ मधील तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **अभियांत्रिकी** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ४२ | १८,१६० | १५,३२६ | १७ | ४,६०० | ३,३०२ | ४१४ | १,३७,०४४ | ५१,७७७ | ४७३ | १,५९,८०४ | ७०,४०५ |
| पदवी | ८ | ३,०४० | २,९४१ | ११ | ३,३५७ | ३,१३४ | ३४६ | १,३७,४५६ | ७३,३६० | ३६५ | १,४३,८५३ | ७९,४३५ |
| पदव्युत्तर | ६ | ८६१ | ७७३ | १२ | १,४१० | १,१५४ | २०८ | १५,८८६ | ४,८७१ | २२६ | १८,१५७ | ६,७९८ |
| **वास्तुशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | ३ | २०७ | २०७ | ७२ | ४,६८० | ४,२१८ | ७५ | ४,८८७ | ४,४२५ |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | १६ | ४२० | १८६ | १६ | ४२० | १८६ |
| **व्यवस्थापन शास्त्र** | | | | | | | | | | | | |
| एमएमएस / एमबीए | २ | १८० | १३० | १३ | १,१४० | ७९६ | ३३० | ३५,०२८ | २४,७९८ | ३४५ | ३६,३४८ | २५,७२४ |
| पीजीडीएम | १ | ६० | ६० | -- | -- | -- | ७० | १०,१५८ | ५,२६४ | ७१ | १०,२१८ | ५,३२४ |
| **हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदविका | २ | १२६ | १०९ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | १२६ | १०९ |
| पदवी | -- | -- | -- | १ | ४२ | २८ | ८ | ४५२ | ३९५ | ९ | ४९४ | ४२३ |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ४८ | ५ | २ | ४८ | ५ |
| **औषध निर्माणशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ४ | २१० | १९२ | २० | १,२४० | १,०९४ | २१३ | १३,५३३ | ८,९५८ | २३७ | १४,९८३ | १०,२४४ |
| पदवी | ४ | २२० | २१९ | ७ | ३३० | ३१८ | १५८ | ११,०६८ | १०,८०३ | १६९ | ११,६१८ | ११,३४० |
| पदव्युत्तर | ३ | ८२ | ७३ | ६ | ३३० | २५९ | १०८ | ३,००५ | १,९२७ | ११७ | ३,४१७ | २,२५९ |
| फार्मा. डी. | २ | ६० | ५९ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ६० | ५९ |
| **मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन** | २ | ९० | ९० | ९ | ५१० | २८४ | १०४ | ९,०५० | ३,८०६ | ११५ | ९,६५० | ४,१८० |
| **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** | ४१७ | ९०,५७५ | ८५,१९२ | -- | -- | -- | ४२९ | ३६,०२३ | ३२,०५४ | ८४६ | १,२६,५९८ | १,१७,२४६ |

*आधार*: १) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई

# परिशिष्ट १०.४

## सन २०१६-१७ मधील कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **कला*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | | १,०१३ | ९७० | | ३,४४,६१० | २,५९,७७० | | ५३,६५९ | ३७,०१७ | | ३,९९,२८२ | २,९७,७५७ |
| पदव्युत्तर | | ६४५ | ४८७ | | १०,५०४ | ४,५८३ | | १,५४९ | ७०५ | | १२,६९८ | ५,७७५ |
| **विज्ञान*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | | ३,२१४ | २,९३५ | | १,९८,६६१ | १६४,८७५ | | ५०,७६८ | ३२,१३५ | | २,५२,६४३ | १,९९,९४५ |
| पदव्युत्तर | | ८०३ | ७६९ | | ५,०८१ | ३,९८१ | | १,६९४ | १,०७४ | | ७,५७८ | ५,८२४ |
| **वाणिज्य*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १५ | १,१२२ | १,०३१ | १,११२ | २,७५,७९६ | २२५,९३३ | १,१२२ | ८७,९१४ | ६४,६६२ | २,२४९ | ३,६४,८३२ | २,९१,६२६ |
| पदव्युत्तर | | २४० | २२८ | | ५,५४६ | ४,३१९ | | १,२९२ | ४९७ | | ७,०७८ | ५,०४४ |
| **नॉन-एआयसीटीई अभ्यासक्रम*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | | १३८ | १३३ | | १७,४१६ | १२,२५० | | १९,१२५ | १२,२३८ | | ३६,६७९ | २४,६२१ |
| पदव्युत्तर | | -- | -- | | २२० | ५८ | | ९७४ | १२९ | | १,१९४ | १८७ |
| **विधी*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | २,४२० | १,१४० | ४५ | १६,३५७ | ९,०७७ | ६१ | ७,७८६ | ४,०८३ | १०७ | २६,५६३ | १४,३०० |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | | ८८० | ६६६ | | २,६२७ | ९७४ | | ३,५०७ | १,६४० |
| **शिक्षणशास्त्र*** | | | | | | | | | | | | |
| **बी.एड** | १२ | ४०० | १७१ | ४९ | ३,२६३ | १,८९९ | ५७८ | २१,५१६ | ७,८७२ | ६३९ | २५,१७९ | ९,९४२ |
| **एम.एड** | | ५० | ० | | १३ | १३ | | ६२८ | १९९ | | ६९१ | २१२ |
| **ललितकला** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ३ | ११५ | १११ | ३१ | १,९३० | १,६२९ | १७२ | १५,९९० | १०,१०६ | २०६ | १८,०३५ | ११,८४६ |
| पदवी | ४ | ३०० | २९४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | ३०० | २९४ |
| पदव्युत्तर | ४ | १३० | ५३ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | १३० | ५३ |

*आधार* : १) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

२) कला संचालनालय, मुंबई

* अस्थायी

## परिशिष्ट १०.५

## सन २०१६-१७ मध्ये कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **कृषि** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १७ | १,७६८ | १,७५८ | २ | २४४ | २४१ | ७३ | ७,४७० | ७,४२५ | ९२ | ९,४८२ | ९,४२४ |
| पदव्युत्तर | ११ | ८८५ | ८८५ | -- | -- | -- | -- | -- | -- | ११ | ८८५ | ८८५ |
| आचार्य पदवी | ४ | १६२ | १५१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | १६२ | १५१ |
| **फलोत्पादन** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ५ | २०० | १९८ | -- | -- | -- | १० | ५६० | ५६० | १५ | ७६० | ७५८ |
| पदव्युत्तर | १० | ११८ | ११८ | -- | -- | -- | -- | -- | -- | १० | ११८ | ११८ |
| **वन संवर्धन** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २ | ६४ | ६४ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ६४ | ६४ |
| पदव्युत्तर | २ | २१ | २१ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २१ | २१ |
| **मत्स्य विज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ३ | १२२ | १०४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ | १२२ | १०४ |
| पदव्युत्तर | १ | २८ | २८ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २८ | २८ |
| आचार्य पदवी | १ | ११ | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ११ | २ |
| **अन्न तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | ६४ | ६४ | -- | -- | -- | २६ | १,६०० | १,५९२ | २७ | १,६६४ | १,६५६ |
| पदव्युत्तर | १ | १५ | १५ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १५ | १५ |
| आचार्य पदवी | १ | ५ | ५ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ५ | ५ |
| **जैव तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २ | ८० | ७८ | -- | -- | -- | १६ | १,००० | ९८४ | १८ | १,०८० | १,०६२ |
| पदव्युत्तर | १ | ८ | ८ | -- | -- | -- | ३ | २४ | २४ | ४ | ३२ | ३२ |
| आचार्य पदवी | १ | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ | १ |
| **कृषि अभियांत्रिकी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | २४७ | २४५ | -- | -- | -- | १५ | ८८० | ८६९ | १९ | १,१२७ | १,११४ |
| पदव्युत्तर | ४ | ७० | ६९ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | ७० | ६९ |
| आचार्य पदवी | ४ | ३० | ११ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | ३० | ११ |
| **गृह विज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | ४० | ४० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ४० | ४० |
| पदव्युत्तर | १ | १२ | ९ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १२ | ९ |
| आचार्य पदवी | १ | २ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ० |
| **कृषि व्यवसाय व्यवस्थापन** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | -- | -- | -- | १३ | ६४० | ६३१ | १३ | ६४० | ६३१ |
| पदव्युत्तर | १ | ३५ | ३५ | -- | -- | -- | २ | ६० | ६० | ३ | ९५ | ९५ |
| **पशुसंवर्धन शास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३० | ३० | १ | ३० | ३० |
| **काढणी पश्चात तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदव्युत्तर | १ | ३० | १४ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३० | १४ |
| **पशुविज्ञान शास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ५ | ४०५ | ४०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ५ | ४०५ | ४०२ |
| पदव्युत्तर | ६ | २८६ | १८४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ६ | २८६ | १८४ |
| आचार्य पदवी | ६ | १०८ | १९ | -- | -- | -- | -- | -- | -- | ६ | १०८ | १९ |
| **दुग्ध तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २ | ८२ | ६५ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ८२ | ६५ |
| पदव्युत्तर | १ | ८ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ८ | ० |

*आधार* - १) महाराष्ट्र कृषी व संशोधन परिषद, पुणे. २) महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर.

## परिशिष्ट १०.६

## राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा
## (सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्‍वस्थ संस्था रुग्णालये)

| अ. क्र. | वर्ष | रुग्णालये (संख्या) | दवाखाने (संख्या ) | प्राथमिक आरोग्य केंद्रे (संख्या) | प्राथमिक आरोग्य पथके (संख्या) | क्षयरोग रुग्णालये आणि रुग्ण चिकित्सालये (संख्या) | संस्थांतील@@ खाटा (संख्या) | दर लाख @ लोकसंख्येमागे खाटा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९७१ | २९९ | १,३७२ | ३८८ | १ | ७२ | ४३,८२३ | ८८ |
| २ | १९८१ | ५३० | १,७७६ | ४५४ | ४०० | ९० | ७१,३८५ | ११४ |
| ३ | १९९१ | ७६८ | १,८९६ | १,६७२ | ८१ | १,९७७ | १,०९,२६७ | १४४ |
| ४ | २००१ | ९८१ | १,६२९ | १,७६८ | १६९ | २,५२० | १,०१,६७० | १०५ |
| ५ | २०११ | १,३६८ | ३,०१२ | १,८१६ | १९१ | २,५२० | १,१८,११६ | १०३ |
| ६ | २०१२ | १,३९३ | ३,०८७ | १,८१६ | १९३ | २,५२० | १,१९,३५५ | १०६ |
| ७ | २०१३ | १,३९५ | ३,०८७ | १,८११ | १९३ | ३,०६२## | १,२०,५७६ | १०७ |
| ८ | २०१४ | १,४०२ | ३,०८७ | १,८११ | १९३ | ३,०६२## | १,२१,०६६ | १०८ |
| ९ | २०१५* | १,४०२ | ३,०८७ | १,८११ | १९३ | ३,०६६## | १,२१,१०८ | १०८ |

*आधार* - (१) राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

(२) आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

(३) राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय, महाराष्ट्र शासन

@@ फक्त सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्‍वस्थ संस्था रुग्णालयातील खाटांचा समावेश आहे.खाजगी रुग्णालयातील खाटांचा समावेश केलेला नाही.

@ संबंधित वर्षाच्या मध्याकरिता अंदाजित लोकसंख्येवर आधारित आहे.

## क्षयरोग रुग्णालये, केंद्रे, उपचार पथके, इ. सार्वजनिक आरोग्य संस्थांचा यात समावेश आहे.

## परिशिष्ट १०.७

## राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर

| | जन्मदर | | | मृत्युदर | | | अर्भकमृत्युदर | | | एकूण जननदर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९७१ | ३३.७ | २९.० | ३२.२ | १३.५ | ९.७ | १२.३ | १११ | ८८ | १०५ | ४.९ | ३.९ | ४.६ |
| | (३८.९) | (३०.१) | (३६.९) | (१६.४) | (९.७) | (१४.९) | (१३८) | (८२) | (१२९) | (५.४) | (४.१) | (५.२) |
| १९८१ | ३०.४ | २४.५ | २८.५ | १०.६ | ७.४ | ९.६ | ९० | ४९ | ७९ | ४.० | ३.० | ३.७ |
| | (३५.६) | (२७.०) | (३३.९) | (१३.७) | (७.८) | (१२.५) | (११९) | (६२) | (११०) | (४.८) | (३.३) | (४.५) |
| १९९१* | २८.० | २२.९ | २६.२ | ९.३ | ६.२ | ८.२ | ६९ | ३८ | ६० | ३.४ | २.५ | ३.० |
| | (३०.९) | (२४.३) | (२९.५) | (१०.६) | (७.१) | (९.८) | (८७) | (५३) | (८०) | (३.९) | (२.७) | (३.६) |
| २००१ | २१.१ | २०.२ | २०.७ | ८.५ | ५.९ | ७.५ | ५५ | २८ | ४५ | २.६ | २.२ | २.४ |
| | (२७.१) | (२०.३) | (२५.४) | (९.१) | (६.३) | (८.४) | (७२) | (४२) | (६६) | (३.४) | (२.३) | (३.१) |
| २००७ | १८.७ | १७.३ | १८.१ | ७.३ | ५.७ | ६.६ | ४१ | २४ | ३४ | २.२ | १.८ | २.० |
| | (२४.७) | (१८.६) | (२३.१) | (८.०) | (६.०) | (७.४) | (६१) | (३७) | (५५) | (३.०) | (२.०) | (२.७) |
| २००८ | १८.४ | १७.२ | १७.९ | ७.४ | ५.६ | ६.६ | ४० | २३ | ३३ | २.१ | १.७ | २.० |
| | (२४.४) | (१८.५) | (२२.८) | (८.०) | (५.९) | (७.४) | (५८) | (३६) | (५३) | (२.९) | (२.०) | (२.६) |
| २००९ | १८.१ | १६.९ | १७.६ | ७.६ | ५.५ | ६.७ | ३७ | २२ | ३१ | २.१ | १.७ | १.९ |
| | (२४.१) | (१८.३) | (२२.५) | (७.८) | (५.८) | (७.३) | (५५) | (३४) | (५०) | (२.९) | (२.०) | (२.६) |
| २०१० | १७.६ | १६.४ | १७.१ | ७.५ | ५.३ | ६.५ | ३४ | २० | २८ | २.० | १.७ | १.९ |
| | (२३.७) | (१८.०) | (२२.१) | (७.७) | (५.८) | (७.२) | (५१) | (३१) | (४७) | (२.८) | (१.९) | (२.५) |
| २०११ | १७.३ | १५.८ | १६.७ | ७.३ | ५.१ | ६.३ | ३० | १७ | २५ | १.९ | १.६ | १.८ |
| | (२३.३) | (१७.६) | (२१.८) | (७.६) | (५.७) | (७.१) | (४८) | (२९) | (४४) | (२.७) | (१.९) | (२.४) |
| २०१२ | १७.४ | १५.५ | १६.६ | ७.३ | ५.० | ६.३ | ३० | १७ | २५ | २.० | १.६ | १.८ |
| | (२३.१) | (१७.४) | (२१.६) | (७.६) | (५.६) | (७.०) | (४६) | (२८) | (४२) | (२.६) | (१.८) | (२.४) |
| २०१३ | १७.२ | १५.४ | १६.५ | ७.१ | ५.० | ६.२ | २९ | १६ | २४ | १.९ | १.६ | १.८ |
| | (२२.९) | (१७.३) | (२१.४) | (७.५) | (५.६) | (७.०) | (४४) | (२७) | (४०) | (२.५) | (१.८) | (२.३) |
| २०१४ | १६.८ | १६.० | १६.५ | ६.८ | ४.८ | ६.० | २७ | १४ | २२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| | (२२.७) | (१७.४) | (२१.०) | (७.३) | (५.५) | (६.७) | (४३) | (२६) | (३९) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २०१५ | १६.६ | १५.९ | १६.३ | ६.६ | ४.७ | ५.८ | २६ | १४ | २१ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| | (२२.४) | (१७.३) | (२०.८) | (७.१) | (५.४) | (६.५) | (४१) | (२५) | (३७) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

*आधार* - नमुना नोंदणी पाहणी पत्रिका, महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली

*टीप* - (१) कंसातील आकडे भारताकरिता आहेत (२) * जम्मू व काश्मिर वगळून

(३) जन्मदर व मृत्युदर दर हजार लोकसंख्येमागे (४) अर्भकमृत्युदर दर हजार जीवित जन्मामागे आहेत

(५) उ.ना. - उपलब्ध नाही

# परिशिष्ट १०.८

## काम करणाऱ्या लोकांची जनगणना २०११ नुसार आर्थिक वर्गवारी

(हजार)

| काम करणाऱ्यांची वर्गवारी | मुख्यत: / सीमांतिक / एकूण | महाराष्ट्र | | | भारत# | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (अ) काम करणारे | | | | | | | |
| १. शेतकरी | मुख्यत: | ७,१८१ | ४,२९७ | ११,४७८ | ७३,०१८ | २२,८२३ | ९५,८४१ |
| | सीमांतिक | ४११ | ६८० | १,०९१ | ९,६८९ | १३,१६३ | २२,८५१ |
| | एकूण | ७,५९२ | ४,९७७ | १२,५६९ | ८२,७०७ | ३५,९८६ | १,१८,६९२ |
| २. शेतमजूर | मुख्यत: | ५,८४७ | ५,२२२ | ११,०६९ | ५५,२५५ | ३०,९१२ | ८६,१६७ |
| | सीमांतिक | ९२८ | १,४८९ | २,४१७ | २७,४८५ | ३०,६७८ | ५८,१६३ |
| | एकूण | ६,७७५ | ६,७११ | १३,४८६ | ८२,७४० | ६१,५९० | १,४४,३३० |
| ३. घरगुती उद्योगातील | मुख्यत: | ६०७ | ३८५ | ९९१ | ७,५४० | ४,७९१ | १२,३३१ |
| | सीमांतिक | ८४ | १५० | २३४ | २,२३६ | ३,७६९ | ६,००५ |
| | एकूण | ६९१ | ५३५ | १,२२५ | ९,७७६ | ८,५६० | १८,३३६ |
| ४. इतर | मुख्यत: | १६,३५५ | ३,८७० | २०,२२५ | १,३७,३३६ | ३०,७७१ | १,६८,१०७ |
| | सीमांतिक | १,२०४ | ७१८ | १,९२२ | १९,३०७ | १२,९७१ | ३२,२७८ |
| | एकूण | १७,५५९ | ४,५८८ | २२,१४७ | १,५६,६४३ | ४३,७४२ | २,००,३८५ |
| एकूण (अ) | मुख्यत: | २९,९८९ | १३,७७४ | ४३,७६३ | २,७३,१४९ | ८९,२९७ | ३,६२,४४६ |
| | सीमांतिक | २,६२८ | ३,०३७ | ५,६६५ | ५८,७१७ | ६०,५८० | १,१९,२९७ |
| | एकूण | ३२,६१७ | १६,८११ | ४९,४२८ | ३,३१,८६६ | १,४९,८७७ | ४,८१,७४३ |
| (ब) काम न करणारे | एकूण | २५,६२६ | ३७,३२० | ६२,९४६ | २,९१,२५६ | ४,३७,५७० | ७,२८,८२६ |
| **एकूण (अ + ब)** | | **५८,२४३** | **५४,१३१** | **१,१२,३७४** | **६,२३,१२२** | **५,८७,४४७** | **१२,१०,५६९** |

*आधार* - महानिबंधक व गणना आयुक्त, केंद्र शासन

\# मणिपूर राज्याच्या सेनापती जिल्ह्यातील माओ-मारम, पाओमाटा आणि पुरुल हे उपविभाग वगळून

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

# परिशिष्ट १०.९

## महाराष्ट्रातील विविध उद्योगांतील सरासरी दैनिक रोजगार

(शंभर)

| अ.क्र. | उद्योग गट | सरासरी दैनिक रोजगार | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५* |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **(अ)** | **ग्राहक वस्तू उद्योग** | **५,०२०** | **५,१६८** | **४,५३५** | **४,५३३** | **५,१६४** | **५,९३९** | **५,६१५** | **५,६५१** | **५,७७२** |
| १. | खाद्य उत्पादने, पेये व तंबाखूची उत्पादने | ९२१ | ९६५ | १,३३० | १,६६२ | १,९९१ | २,३४८ | २,१८६ | २,३४४ | २,४१० |
| २. | वस्त्रोद्योग (परिधान करण्याची वस्त्रे धरुन) | ३,५१६ | ३,५५४ | २,५२७ | २,१६७ | २,१८२ | २,५०९ | २,४२६ | २,२८४ | २,२९९ |
| ३. | लाकूड व लाकडाची उत्पादने | ७५ | ७५ | १५२ | १५४ | २१७ | २१६ | २१६ | २१२ | २२३ |
| ४. | कागद, कागदाची उत्पादने, मुद्रण व प्रकाशन, इत्यादि | ४९४ | ५४९ | ४९१ | ५२५ | ७३६ | ८१६ | ७४१ | ७६० | ७८५ |
| ५. | कातडी कमावणे व चामड्याची उत्पादने | १४ | २५ | ३५ | २५ | ३८ | ५० | ४७ | ५१ | ५५ |
| **(ब)** | **मध्यम तयार माल उद्योग** | **२,४३५** | **३,१९३** | **३,४२१** | **३,४६२** | **६,६४८** | **७,३१३** | **७,२०१** | **७,३२५** | **७,४५३** |
| ६. | रसायने व रासायनिक उत्पादने | ७६० | १,०५९ | १,२१५ | १,२९९ | १,८०२ | २,०१४ | १,९९४ | १,९९९ | १,९६३ |
| ७. | पेट्रोलियम, रबर, प्लास्टिक यांची उत्पादने | ३४९ | ४२१ | ४८२ | ५३५ | १,०८७ | १,१४४ | १,११९ | १,२२२ | १,२०७ |
| ८. | अधातू खनिज उत्पादने | ४०२ | ४०३ | ४२३ | ३१७ | ४६५ | ५३८ | ५३२ | ५६१ | ४८३ |
| ९. | मूलभूत धातू, धातूची उत्पादने | ९२४ | १,३१० | १,३०१ | १,३११ | ३,२९४ | ३,६१७ | ३,५५६ | ३,५४४ | ३,८०० |
| **(क)** | **भांडवली वस्तू उद्योग** | **२,११०** | **२,८९८** | **२,७१२** | **३,१४०** | **५,०३३** | **५,८२७** | **५,६९६** | **५,४६८** | **५,४१८** |
| १०. | यंत्रे व यंत्रसामग्री (परिवहन यंत्रसामग्री वगळून) | १,३२२ | १,७८६ | १,६१४ | १,७२० | २,४०७ | २,६६७ | २,६०३ | २,५३३ | २,५३० |
| ११. | परिवहन यंत्रसामग्री | ६०८ | ९०३ | ८६७ | १,०२५ | १,७८५ | २,१३९ | २,११२ | १,९८३ | १,९७४ |
| १२. | इतर वस्तुनिर्माण उद्योग | १८० | २०९ | २३१ | ३९५ | ८४१ | १,०२१ | ९८१ | ९५३ | ९१४ |
| **(ड)** | **इतर** | ४१२ | **६६३** | **१,०१६** | **८७०** | **१,३०१** | **१,४८५** | **१,७११** | १,८०१ | १,७८२ |
| | **एकूण** | **९,९७७** | **११,९२२** | **११,६८४** | **१२,००५** | **१८,१४६** | **२०,५६४** | **२०,२२२** | **२०,२४५** | **२०,४२४** |

*आधार* - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत

(२) १९७४ पासून विडी कारखान्यांची नोंद वेगळ्या अधिनियमात समाविष्ट करण्यात आली

# परिशिष्ट १०.१०

## महाराष्ट्रातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार

रोजगार (हजार)

| वर्ष | बाब ** | कलम २ एम (i) | | | कलम २ एम (ii) व कलम ८५ | | | सर्व कारखाने | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५० पेक्षा कमी कामगार असलेले | ५० किंवा अधिक कामगार असलेले | एकूण कारखाने | ५० पेक्षा कमी कामगार असलेले | ५० किंवा अधिक कामगार असलेले | एकूण कारखाने | ५० पेक्षा कमी कामगार असलेले | ५० किंवा अधिक कामगार असलेले | एकूण सर्व कारखाने |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९७१ | कारखाने | ६,३४१ | २,७०१ | ९,०४२ | ८५६ | ३४३ | १,१९९ | ७,१९७ | ३,०४४ | १०,२४१ |
| | रोजगार | १२३ | ८२४ | ९४७ | १५ | ३६ | ५१ | १३८ | ८६० | ९९८ |
| १९८१ | कारखाने | १०,२३८ | ३,१३२ | १३,३७० | ३,१५४ | ७० | ३,२२४ | १३,३९२ | ३,२०२ | १६,५९४ |
| | रोजगार | १८३ | ९८३ | १,१६६ | २० | ६ | २६ | २०३ | ९८९ | १,१९२ |
| १९९१ | कारखाने | १३,१३९ | ३,१९९ | १६,३३८ | ७,७४३ | ३८ | ७,७८१ | २०,८८२ | ३,२३७ | २४,११९ |
| | रोजगार | २१५ | ९१० | १,१२४ | ४० | ४ | ४४ | २५४ | ९१४ | १,१६९ |
| २००१ | कारखाने | १५,९७७ | ३,९२९ | १९,९०६ | ८,३९३ | २५ | ८,४१८ | २४,३७० | ३,९५४ | २८,३२४ |
| | रोजगार | २६६ | ८९१ | १,१५७ | ४२ | २ | ४४ | ३०८ | ८९३ | १,२०१ |
| २००९ | कारखाने | १८,६६८ | ६,११२ | २४,७८० | ९,२६३ | १७ | ९,२८० | २७,९३१ | ६,१२९ | ३४,०६० |
| | रोजगार | ३४५ | १,१०३ | १,४४८ | ५० | २ | ५२ | ३९५ | १,१०५ | १,५०० |
| २०१० | कारखाने | १९,१७३ | ६,५१७ | २५,६९० | ९,१८३ | १५ | ९,१९८ | २८,३५६ | ६,५३२ | ३४,८८८ |
| | रोजगार | ३६३ | १,२३१ | १,५९४ | ५२ | १ | ५३ | ४१५ | १,२३३ | १,६४७ |
| २०११ | कारखाने | १९,४१० | ७,३७३ | २६,७८३ | ९,०६७ | २६ | ९,०९३ | २८,४७७ | ७,३९९ | ३५,८७६ |
| | रोजगार | ३६७ | १,३९४ | १,७६१ | ५१ | ३ | ५४ | ४१८ | १,३९७ | १,८१५ |
| २०१२ | कारखाने | १९,८१८ | ८,६६४ | २८,४८२ | ८,८१६ | ४१ | ८,८५७ | २८,६३४ | ८,७०५ | ३७,३३९ |
| | रोजगार | ३९९ | १,५९९ | १,९९८ | ५४ | ४ | ५८ | ४५३ | १,६०३ | २,०५६ |
| २०१३ | कारखाने | २१,२२४ | ८,३४५ | २९,५६९ | ८,७२८ | २९ | ८,७५७ | २९,९५२ | ८,३७४ | ३८,३२६ |
| | रोजगार | ४०६ | १,५९५ | १,९७१ | ४८ | ३ | ५१ | ४५४ | १,५६८ | २,०२२ |
| २०१४ | कारखाने | १८,१२६ | ८,०१५ | २६,१४१ | १०,६३४ | २८ | १०,६६२ | २८,७६० | ८,०४३ | ३६,८०३ |
| | रोजगार | ४०२ | १,५६३ | १,९६५ | ५७ | ३ | ५९ | ४५९ | १,५६६ | २,०२५ |
| २०१५* | कारखाने | २०,४३५ | ७,८८२ | २८,३१७ | ७,८५६ | ८८ | ७,९४४ | २८,२९१ | ७,९७० | ३६,२६१ |
| | रोजगार | ४१९ | १,५६८ | १,९८७ | ४५ | १० | ५५ | ४६४ | १,५७९ | २,०४२ |

*आधार* - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन — * अस्थायी

टीप - (१) अंदाजित रोजगारात प्रपत्र न पाठविणाऱ्या कारखान्यांतील दैनिक सरासरी रोजगारांचा समावेश आहे

(२) आकडेवारी १९४८ च्या कारखाना अधिनियमांखाली येणाऱ्या कारखान्यासंबंधी आहे

(३) रोजगाराचे आकडे संक्षिप्तात लिहिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत

** कारखाने - कार्यरत कारखान्यांची संख्या — रोजगार - रोजगाराची दैनिक सरासरी

१९७४ पासून विडी कारखान्यांची नोंद यातून काढून वेगळ्या अधिनियमाखाली समाविष्ट करण्यात आली आहे

## परिशिष्ट १०.११

## राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे

(हजार)

| वर्ष | संदर्भ वर्षात नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या | अधिसूचित केलेल्या रिक्त पदांची संख्या | संदर्भ वर्षात भरलेल्या पदांची संख्या | वर्ष अखेरीस चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १९९१ | ५९१.८ | ६४.८ | ३०.३ | ३,१५९.८ |
| १९९२ | ५९६.६ | ५५.९ | २९.१ | ३,३२०.५ |
| १९९३ | ५९९.७ | ५५.४ | २४.१ | ३,३४९.६ |
| १९९४ | ६३५.८ | ५२.१ | २४.७ | ३,४३९.२ |
| १९९५ | ७२०.१ | ४९.७ | १८.७ | ३,६३४.३ |
| १९९६ | ६८८.७ | ५३.७ | २२.६ | ३,७८७.२ |
| १९९७ | ६९२.८ | ४७.४ | २२.९ | ३,९३३.१ |
| १९९८ | ७२९.३ | ३७.९ | १६.८ | ४,१०९.६ |
| १९९९ | ८६१.१ | ५०.९ | १६.२ | ४,१८३.८ |
| २००० | ७५०.८ | ४३.९ | १८.१ | ४,३४८.८ |
| २००१ | ६२३.२ | ३२.३ | १२.५ | ४,४१९.७ |
| २००२ | ६२२.७ | ३०.९ | ९.५ | ४,२०३.३ |
| २००३ | ८१९.१ | ५९.६ | १६.४ | ४,०४४.१ |
| २००४ | ८८०.३ | ४३.४ | १५.१ | ४,१०५.७ |
| २००५ | ६४५.२ | ४४.२ | १३.९ | ४,०००.३ |
| २००६ | ६०८.१ | ६८.३ | १४.८ | ३,६०८.५ |
| २००७ | ६१६.७ | ९७.५ | ९.२ | ३,२१३.८ |
| २००८ | ७२१.५ | ९९.२ | ११.८ | ३,००७.२ |
| २००९ | ६९८.३ | १७६.६ | १७.२ | २,८७५.९ |
| २०१० | ८९२.९ | ३७८.८ | ३५३.९ | २,६८२.४ |
| २०११ | ७४७.५ | ३४६.२ | १९१.० | २,५९६.२ |
| २०१२ | ६१२.३ | २५९.२ | १३४.२ | २,४०४.० |
| २०१३ | ६३०.३ | ११८.९ | ११४.६ | ३,०३४.८ |
| २०१४ | ५३६.४ | ८४१.१ | ८४.७ | ३,५७१.५ |
| २०१५ | ४६१.९ | ५७१.४ | ७०.४ | ३,४०१.५ |
| २०१६ | ४६०.० | ५७६.८ | १४४.० | ३,३५६.७ |

*आधार* - कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट १०.१२

## रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर २०१६ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | एकूण | व्यक्ती पैकी, स्त्रिया | स्त्रियांची टक्केवारी | एकूण बेरजेशी व्यक्तींची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | माध्यमिक शालांत परीक्षेपेक्षा कमी (निरक्षर धरुन ) | २,७२,९३६ | ६२,७७७ | २३ | ७.६४ |
| २. | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण | १०,६४,२९१ | २,२८,८२३ | २१.५० | २९.७८ |
| ३. | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण | १०,४७,८८९ | २,६१,९७२ | २५ | २९.३३ |
| ४. | औ.प्र.सं. प्रशिक्षित व शिकाऊ उमेदवार | २,१९,८७१ | २१,९८७ | १० | ६.१५ |
| ५. | पदविकाधारक | | | | |
| | ५.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ६७,९५३ | १६,३०९ | २४ | १.९० |
| | ५.२ वैद्यकीय, डी.एम.एल.टी. व औषधनिर्माण | १७,८६६ | ६,६१० | ३७ | ०.५० |
| | ५.३ इतर | १,३६,०३५ | ६२,५७६ | ४६ | ३.८१ |
| | **एकूण (५.१ ते ५.३)** | **२,२१,८५४** | **८५,४९५** | **३८.५३** | **६.२१** |
| ६. | पदवीधर | | | | |
| | ६.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ६२,२७६ | १६,८१५ | २७ | १.७४ |
| | ६.२ वैद्यकीय | २,७३० | १,२५९ | ४६.१० | ०.०८ |
| | ६.३ इतर | ५,७७,६६९ | १,९६,४०७ | ३४ | १६.१७ |
| | **एकूण (६.१ ते ६.३)** | **६,४२,६७५** | **२,१४,४८१** | **३३** | **१७.९९** |
| ७. | पदव्युत्तर पदवीधर | | | | |
| | ७.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ३,३६० | ९१३ | ३२ | ०.०९ |
| | ७.२ वैद्यकीय | ३२१ | १३७ | ३८.५ | ०.०१ |
| | ७.३ इतर | १,००,०५८ | ४५,४९९ | ४४ | २.८० |
| | **एकूण (७.१ ते ७.३)** | **१,०३,७३९** | **४६,५४९** | **४४** | **२.९०** |
| | **एकूण बेरीज** | **३५,७३,२५५** | **९,२२,०८४** | **२५.४५** | **१००.०** |

*आधार* - कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, महाराष्ट्र शासन

टीप - वरील तपशिलात एकापेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता नोंदविलेल्या उमेदवारांची त्यांच्या प्रत्येक नोंदीनुसार स्वतंत्र गणना करण्यात आली आहे

# परिशिष्ट १०.१३

## महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या विविध कामांच्या प्रकारानुसार संख्या व त्यावरील खर्च

(₹ लाख)

| अ. क्र. | कामाचा प्रकार | २०१२-१३ | | २०१३-१४ | | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | ग्रामीण जोड रस्ते | ४,८७६ | १९,१२०.७१ | २,८६७ | ९,४८६.७४ | ३,६८० | १५,८३२.८१ | ५,३४६ | १६,३५९.५५ | ५,९७० | ८,३३१.२४ |
| २ | पूरनियंत्रण व पूर संरक्षण | १०५ | २८८.९३ | २१३ | ८४९.७९ | १७९ | १,२६३.६३ | २७६ | २,५४२.२४ | ५१४ | १,९७६.३४ |
| ३ | जलसंधारण व जलसंवर्धन | २७,४१३ | २२,२१७.४५ | १०,६४६ | ७,९८०.६० | १४,८४४ | १२,८८७.३ | १८,८२४ | २२,२२४.०८ | १८,६७५ | ९,५७३.७३ |
| ४ | दुष्काळ प्रतिबंधक काम | १६,२३० | १४,२९१.४६ | १४,७५१ | ५,९१४.६५ | १०,५९८ | ४,५८०.६७ | १५,१७५ | ८,१५२.६ | २०,९११ | ८६२.३१ |
| ५ | सूक्ष्म जलसिंचन | ८१६ | ३४७.७३ | ५३८ | २८२.६३ | ५३० | ३६६.०५ | ४२८ | ६९९.८१ | ३०७ | १४७.८२ |
| ६ | अनुसूचित जाती / जमाती व भूधारकांना सिंचन सुविधा | १२,४८२ | १४,७८८.०५ | ११,७६५ | ८,८९७.५० | १८,९७० | १५,३४६.४६ | ३३,८०८ | २७,८९२.८५ | ३२,९३४ | १४,१६२.२६ |
| ७ | पारंपारिक जलस्त्रोतांचे नुतनीकरण | ६,०२७ | ३,३७५.१९ | २,३४१ | १,७८५.१४ | १,८१७ | १,५१४.१९ | २,४३४ | ४,१७५.७१ | २,९२४ | २,२३५.३६ |
| ८ | भूविकास | ४,१६० | २,३६०.३२ | २,९०० | १,७९८.५० | १,५१४ | २,०१३.०९ | ३,८९३ | ४,४३६.३३ | ६,५४८ | २,४७०.३५ |
| ९ | राजीव गांधी सेवा केंद्र | ३८ | २९१.११ | ७२ | २०१.३७ | ७४ | ३१९.२७ | ११७ | १२७.१७ | १४६ | १५६.८० |
| १० | इतर कामे | ४,९३७ | ६००.२७ | ३३,५१४ | २,३८५.६४ | ९६,६८८ | ५,८७६.४० | २४,८४२ | १,७६४.२३ | ३५,८६७ | २,४७६.४५ |
| | **एकूण** | **७७,०८४** | **७७,६८१.२२** | **७८,८०७** | **३,९५६.९६** | **१,४८,८९४** | **५९,९९९.८७** | **१,०५,१४३** | **८८,३७४.५७** | **१,२४,७९६** | **४२,३९२.६६** |

*आधार* - नियोजन विभाग,(रोहयो) महाराष्ट्र शासन

+ ९ जानेवारी २०१७ रोजी

## परिशिष्ट १०.१४

## महाराष्ट्रातील औद्योगिक विवाद **

(भाग घेतलेले कामगार शंभरात व वाया गेलेले श्रमदिन लाखात)

| बाब | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **१. कापड गिरण्या --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ६६ | १० | १२ | ७ | ५ | १५ | ८ | ४ | १८ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ५६४ | ६१ | ८६ | २६ | १९ | ५२ | २४ | ८९ | ७० |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ४७.३६ | २.३७ | ४.५३ | १.७३ | २.४३ | १.३८ | ०.६ | २.३२ | १.८० |
| **२. अभियांत्रिकी कारखाने -** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ११९ | ५९ | २८ | ८ | ८ | ४२ | ३५ | ५१ | ६० |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ४१२ | ११० | ६५ | ७१ | ४७ | ४६९ | ४३७ | ४३८ | १४८ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | १६.२१ | १४.४६ | २५.७९ | १२.९० | १२.५७ | १२.१७ | ११.३६ | १०.७५ | ३.८१ |
| **३. संकीर्ण --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ४५१ | १४८ | १९ | १८ | १४ | १३३ | १४९ | १६० | ६६ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | १,०३१ | ४२३ | ८५ | ३८ | ३५ | ४४० | ४९८ | ६६९ | ५०८ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ३१.४९ | २९.६६ | १५.९० | ७.८० | ८.४५ | ११.२४ | १३.०० | १७.०३ | १५.६७ |
| **४. एकूण --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ६३६ | २१७ | ५९ | ३३ | २७ | १९३ | १९२ | २१५ | १४४ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | २,००७ | ५९४ | २३७ | १३५ | १०० | ९६२ | ९५९ | १,१९६ | ७,२५० |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ९५.०५ | ४६.४९ | ५२.३१ | २२.४३ | २३.४५ | २४.७८ | २४.९९ | ३०.१० | २१.२९ |

*आधार* - कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन

टीप - (१) बाब क्रमांक ४ (ब) व ४ (क) समोरील आकडे संक्षिप्तात दिल्याने प्रत्यक्ष बेरजेशी जुळतीलच असे नाही

(२) ** राज्य औद्योगिक संबंध यंत्रणेखालील

(३) माहीती जानेवारी ते डिसेंबर पर्यंत

## परिशिष्ट १०.१५

## जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११

| जिल्हा | मानव विकास निर्देशांक (माविनि) २०११ | माविनि स्थिती |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| नंदूरबार | ०.६०४ | अल्प |
| गडचिरोली | ०.६०८ | |
| वाशिम | ०.६४६ | |
| हिंगोली | ०.६४८ | |
| उस्मानाबाद | ०.६४९ | |
| नांदेड | ०.६५७ | |
| जालना | ०.६६३ | |
| लातूर | ०.६६३ | |
| धुळे | ०.६७१ | |
| बीड | ०.६७८ | मध्यम |
| परभणी | ०.६८३ | |
| बुलढाणा | ०.६८४ | |
| यवतमाळ | ०.७०० | |
| गोंदिया | ०.७०१ | |
| अमरावती | ०.७०१ | |
| भंडारा | ०.७१८ | |
| चंद्रपूर | ०.७१८ | |
| अहमदनगर | ०.७२० | उच्च |
| अकोला | ०.७२२ | |
| वर्धा | ०.७२३ | |
| जळगाव | ०.७२३ | |
| औरंगाबाद | ०.७२७ | |
| सोलापूर | ०.७२८ | |
| रत्नागिरी | ०.७३२ | |
| सातारा | ०.७४२ | |
| सांगली | ०.७४२ | अति उच्च |
| नाशिक | ०.७४६ | |
| सिंधुदुर्ग | ०.७५३ | |
| रायगड | ०.७५९ | |
| कोल्हापूर | ०.७७० | |
| नागपूर | ०.७८६ | |
| ठाणे | ०.८०० | |
| पुणे | ०.८१४ | |
| मुंबई | ०.८४१ | |
| **महाराष्ट्र** | **०.७५२** | |

*आधार* - महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२

# ११
# विशेष अभ्यास



# ११. विशेष अभ्यास

## अंगणवाड्यांच्या स्थितीविषयक शीघ्र सर्वेक्षण

### पार्श्वभूमी

११.१ माता व बालके यांचे कुपोषण कमी करण्याकरिता ‘एकात्मिक बाल विकास सेवा’ हा शासनाचा महत्वपूर्ण कार्यक्रम मागील तीन दशकांपेक्षा जास्त कालावधीपासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात अंगणवाडी केंद्रांच्या जाळ्यांचा समावेश असून त्याद्वारे एकत्रितपणे ६ वर्षाखालील मुलांना, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना पूरक पोषण आहार पुरविणे, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा इत्यादी सेवा, ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना अनौपचारिक पूर्व शालेय शिक्षण तसेच १५ ते ४५ वर्ष वयोगटातील महिलांसाठी आरोग्य व सकस आहाराविषयक ज्ञान पुरविले जाते. याद्वारे देशातील मागास व अतिदुर्गम भागातील वंचित समाजापर्यंत सेवा पुरविल्या जातात. जास्तीत जास्त लोकांचा सहभाग वाढेल याची खात्री करण्याच्या दृष्टीने लाभार्थ्यांच्या घरोघरी जाऊन याद्वारे सेवा पुरविण्यात येतात. हा कार्यक्रम अंगणवाडी सेविकांच्या स्वतंत्र संवर्गामार्फत राबविला जातो. त्यांची निवड स्थानिकरित्या करण्यात येते व त्यांना आरोग्य, पोषण व बालकांची काळजी याबाबत चार महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येते. अंगणवाडीकेंद्राची प्रमुख अंगणवाडी सेविका असून तिच्या सहाय्यासाठी मदतनीस असते. मुख्य सेविका अंगणवाडी सेविकांचे पर्यवेक्षण करते.

११.२ राज्यामध्ये एकूण ५५३ एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प मंजूर असून त्यापैकी ३६४ ग्रामीण, ८५ आदिवासी व १०४ नागरी प्रकल्प आहेत. या प्रकल्पांतर्गत ६५,९१२ ग्रामीण, १६,०३१ आदिवासी व १५,५३२ नागरी अशा एकूण ९७,४७५ अंगणवाड्यांचा समावेश आहे. तसेच ग्रामीण भागात १५० ते ४०० लोकसंख्येकरिता व आदिवासी भागात १५० ते ३०० लोकसंख्येकरिता मिनी-अंगणवाड्या सुध्दा मंजुर केल्या आहेत व अशा १२,३०४ मिनी-अंगणवाड्या असून त्यापैकी १०,०३७ ग्रामीण व २,२६७ आदिवासी क्षेत्रातील आहेत. राज्यामध्ये सप्टेंबर २०१६ अखेर एकूण ९७,३२७ अंगणवाड्यांकरिता ९५,८७३ अंगणवाडी सेविका व ९२,३७३ मदतनीस तसेच ११,७५५ मिनी-अंगणवाड्यांकरिता १०,९११ अंगणवाडी सेविका कार्यरत होत्या व सर्वसाधारणपणे या अंगणवाड्यांमार्फत ३ ते ६ वर्ष वयोगटातील २६ लाखांपेक्षा जास्त मुले व १० लाखांपेक्षा जास्त गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना लाभ देण्यात येत आहे. दरमहा अंगणवाडी सेविकांना ₹ ५,०००, मदतनीसांना ₹ २,५०० आणि मिनी अंगणवाडी सेविकांना ₹ ३,५०० मानधन देण्यात येते.

### सर्वेक्षण पद्धती

११.३ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत ‘अंगणवाड्यांच्या स्थितीविषयक शीघ्र सर्वेक्षण’ घेण्यात आले. सदर सर्वेक्षणांतर्गत एकूण १,२०४ अंगणवाड्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये ५४० ग्रामीण, ३९४ आदिवासी आणि २७० नागरी भागातील अंगणवाड्या निवडण्यात आल्या होत्या. यामध्ये ३९४ मिनी-अंगणवाड्या समाविष्ट असून त्यापैकी २७० ग्रामीण व १२४ आदिवासी अंगणवाड्या होत्या. प्रथम सर्व अंगणवाड्यांचे ग्रामीण, आदिवासी व नागरी असे स्तर विचारात घेऊन त्यानंतर क्रमबद्ध नमुना निवड पद्धतीचा वापर करून संबंधित स्तरातील अंगणवाड्यांमधून विभागनिहाय अंगणवाड्या निवडण्यात आल्या.

११.४ निवड करण्यात आलेल्या प्रत्येक अंगणवाडीला डिसेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधीत भेट देण्यात आली. पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, शैक्षणिक सेवा आणि लाभार्थी तसेच अंगणवाडी सेविका यांचेबाबत माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षणातील निष्कर्ष हे निवडलेल्या अंगणवाड्यांची निरीक्षणे व अंगणवाडी सेविकांनी दिलेली मौखिक माहिती यावर आधारित आहेत. अंगणवाडी सेविकांनी त्यांच्या कामाबाबतच्या समस्या व मानधनाबाबतच्या केलेल्या सूचना या त्यांच्या मतांवर आधारित आहेत.

११.५ सांख्यिकीय पद्धतीनुसार नमुना निवड केली असली तरीही या पद्धतीतील मूळ मर्यादा व त्रुटी या निष्कर्षांमध्ये आढळू शकतात.

### सर्वेक्षणाचे निष्कर्ष

११.६ या नमुना सर्वेक्षणातील काही महत्वाचे निष्कर्ष खाली दिले आहेत.

### पायाभूत सुविधा

- राज्यातील सुमारे ५१ टक्के अंगणवाड्या राज्य शासन/ ग्रामपंचायत यांच्या मालकीच्या जागेत कार्यरत होत्या तर सुमारे २७ टक्के अंगणवाड्या या भाडेतत्वावरील जागेत होत्या.
- बहुतांशी अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम पक्क्या (७७ टक्के) व अर्ध पक्क्या (१३ टक्के) स्वरूपाचे होते. सुमारे सहा टक्के अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम कच्च्या स्वरूपाचे होते व पाच टक्के अंगणवाड्या मोकळया जागेवर चालविल्या जात होत्या.

- इमारतीच्या मालकीच्या प्रकारानुसार व बांधकामाच्या प्रकारानुसार अंगणवाड्यांची टक्केवारी तक्ता ११.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ११.१ इमारतीच्या मालकीच्या प्रकारानुसार व बांधकामाच्या प्रकारानुसार अंगणवाड्यांची टक्केवारी**

(टक्के)

| बाब | ग्रामीण | आदिवासी | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| **इमारतीच्या मालकीचा प्रकार** | | | | |
| राज्य शासन/ ग्रामपंचायत | ५९.६ | ७०.१ | ६.३ | ५१.१ |
| भाडेतत्वावर | १२.६ | ३.८ | ९१.१ | २७.३ |
| सामुदायिक | ५.४ | ५.१ | १.१ | ४.३ |
| प्राथमिक शाळा | १०.४ | २.५ | ०.० | ५.५ |
| इतर | १२.० | १८.५ | १.५ | ११.८ |
| **बांधकामाचा प्रकार** | | | | |
| पक्का | ८०.२ | ७६.१ | ६९.३ | ७६.४ |
| अर्ध पक्का | १०.२ | ८.१ | २५.२ | १२.९ |
| कच्चा | ३.१ | ९.२ | ५.५ | ५.६ |
| मोकळी जागा | ६.५ | ६.६ | ०.० | ५.१ |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## अंगणवाड्यांमधील सुविधा

- सुमारे ९७ टक्के अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होती.
- सुमारे ४२ टक्के अंगणवाड्यांमध्ये नळ, २५ टक्के अंगणवाड्यांमध्ये हातपंप व १७ टक्के अंगणवाड्यांमध्ये विहीर हा पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत होता.
- सुमारे ५४ टक्के अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालयांची सुविधा उपलब्ध होती.
- सुमारे ४८ टक्के अंगणवाड्यांमध्ये साठवणुकीसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध होती.
- सुमारे ३५ टक्के अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर उपलब्ध होते.
- सुमारे ६९ टक्के अंगणवाड्यांमधील अंतर्गत जागा पुरेशी होती.
- सुमारे ६१ टक्के अंगणवाड्यांना पुरेसा बाहेरील मोकळा परिसर उपलब्ध होता.
- सुमारे ५४ टक्के अंगणवाड्यांमध्ये बैठ्या खेळांचे सामान उपलब्ध होते.
- महत्वाच्या सुविधा उपलब्ध असणाऱ्या अंगणवाड्यांची टक्केवारी तक्ता ११.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ११.२ महत्वाच्या सुविधा उपलब्ध असणाऱ्या अंगणवाड्यांची टक्केवारी**

(टक्के)

| उपलब्ध सुविधा | ग्रामीण | आदिवासी | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| पिण्याचे पाणी | ९८.० | ९४.७ | ९७.० | ९६.७ |
| वापरण्यायोग्य शौचालय | ५६.७ | ४९.० | ५४.१ | ५३.६ |
| स्वतंत्र साठवणूकीची जागा | ४८.५ | ५५.१ | ३८.१ | ४८.३ |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | ४२.६ | ४३.७ | ५.२ | ३४.६ |
| पुरेशी अंतर्गत जागा | ७५.६ | ७६.६ | ४४.४ | ६८.९ |
| खेळासाठी पुरेसा बाहेरील मोकळा परिसर | ७१.५ | ७१.८ | २३.३ | ६०.८ |
| बैठ्या खेळांचे सामान | ५०.४ | ५८.४ | ५७.० | ५४.५ |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

- अंगणवाडीमध्ये सरासरी २० ते २२ मुलांना पूर्व शालेय शिक्षण मिळत होते व नियमानुसार प्रतीदिन अंगणवाडीच्या ४ तास ३० मिनिटे इतक्या कार्यवेळेच्या तुलनेत ती सरासरी ४ तास ५० मिनिटे चालू असल्याचे आढळून आले.

- प्रत्येक अंगणवाडीमध्ये १२ नोंदवह्या ठेवल्या जात असून सुमारे ९५ टक्के अंगणवाडयांमध्ये त्या नियमितपणे अद्ययावत केल्या जात होत्या.

## आरोग्य सेवा

- नोंदणी केलेल्या ० ते ३ वर्ष वयोगटातील सुमारे ९२ टक्के मुले अंगणवाड्यांतील सुविधांचा लाभ घेत होती.
- नोंदणी केलेल्या सुमारे ३३ टक्के किशोरवयीन मुली अंगणवाड्यांतील सुविधांचा लाभ घेत होत्या.
- नोंदणी केलेल्या सुमारे ८९ टक्के गर्भवती स्त्रिया अंगणवाड्यांतील सुविधांचा लाभ घेत होत्या.
- सुमारे ९५ टक्के अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहार नियमितपणे उपलब्ध करून देण्यात येत होता.
- सुमारे ४९ टक्के ग्रामीण आणि ६४ टक्के आदिवासी अंगणवाड्यांमध्ये अंगणवाडी सेविका/ मदतनीसांमार्फत पोषण आहार तयार करण्यात येत होता, तर ४७ टक्के ग्रामीण, ३५ टक्के आदिवासी आणि ८७ टक्के नागरी अंगणवाड्यांमध्ये स्वसहायता गटांमार्फत पोषण आहार तयार करण्यात येत होता.
- सुमारे ९५ टक्के अंगणवाड्यांमध्ये उंची व वजन वाढ दर्शविणारा तक्ता आढळून आला.
- सुमारे ७० टक्के अंगणवाड्यांमध्ये सुस्थितीतील वजन काटा उपलब्ध होता.
- सुमारे ४४ टक्के अंगणवाड्यांमध्ये मानकानुसार औषधे उपलब्ध होती.
- वैद्यकीय अधिकारी, सहायक परिचारिका व आरोग्य सेविका यांच्या वैद्यकीय पथकाने मानकानुसार प्रत्येक अंगणवाडीस तीन महिन्यातून एकदा भेट देणे अभिप्रेत आहे. सुमारे ३१ टक्के अंगणवाड्यांना मागील तीन महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट दिली नसल्याचे आढळून आले.
- सुमारे ७४ टक्के अंगणवाड्यांमधील मुलांना वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता पाठविण्यात आले होते.
- सुमारे ९२ टक्के अंगणवाड्यांमध्ये प्रत्येक नोंदणी करण्यात आलेल्या मुलांच्या आरोग्याबाबत नोंदी नियमितपणे केल्या जात होत्या.
- सुमारे ९३ टक्के अंगणवाड्यांमधील सर्व मुलांचे लसीकरण पूर्ण झालेले होते.
- अंगणवाड्यांतील आरोग्यसेवा तक्ता ११.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ११.३ अंगणवाड्यांतील आरोग्य सेवा**

(टक्के)

| आरोग्य सेवा | ग्रामीण | आदिवासी | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| नोंदणी केलेल्या ० ते ३ वर्ष वयोगटातील मुलांपैकी लाभ घेणाऱ्या मुलांची टक्केवारी | ९४.३ | ९४.७ | ८६.४ | ९१.७ |
| नोंदणी केलेल्या किशोरवयीन मुलींपैकी लाभ घेणाऱ्या मुलींची टक्केवारी | ३६.९ | ३८.८ | २३.५ | ३२.७ |
| नोंदणी केलेल्या गर्भवती स्त्रियांपैकी लाभ घेणाऱ्या गर्भवती स्त्रियांची टक्केवारी | ९२.१ | ८९.६ | ८५.१ | ८९.१ |
| पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता | ९२.८ | ९८.५ | ९५.९ | ९५.३ |
| सुस्थितीतील वजन काटा उपलब्ध असणाऱ्या अंगणवाड्या | ७६.५ | ७३.९ | ५१.९ | ७०.१ |
| मानकानुसार औषधे उपलब्ध असणाऱ्या अंगणवाड्या | ४०.४ | ४८.२ | ४४.१ | ४३.८ |
| मागील तीन महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट न दिलेल्या अंगणवाड्या | ३४.८ | २२.८ | ३४.८ | ३०.९ |
| वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता मुलांना पाठविणाऱ्या अंगणवाड्या | ७२.८ | ७१.८ | ७९.६ | ७४.० |
| नोंदणी केलेल्या प्रत्येक मुलाच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवणाऱ्या अंगणवाड्या | ९१.९ | ९३.४ | ८८.९ | ९१.७ |
| सर्व मुलांचे लसीकरण पूर्ण झालेल्या अंगणवाड्या | ९३.३ | ९७.२ | ८८.१ | ९३.४ |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## शैक्षणिक सेवा

- नोंदणी केलेल्या ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांपैकी सुमारे ७२ टक्के मुले भेटीच्या दिवशी उपस्थित होती.
- सुमारे ७३ टक्के अंगणवाड्यांना राज्य शासनाकडून पूर्व शालेय शिक्षण संच पुरविण्यात आला होता. त्यापैकी ७० टक्के अंगणवाड्यांना सन २०१५-१६ या वर्षात प्राप्त झाला होता. पूर्व शालेय शिक्षण संच पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाल्याचे ४१ टक्के अंगणवाड्यांनी नोंदविले.
- अंगणवाड्यांतील शैक्षणिक सेवा तक्ता ११.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ११.४ अंगणवाड्यांतील शैक्षणिक सेवा**

(टक्के)

| तपशील | ग्रामीण | आदिवासी | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| नोंदणी केलेल्या ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांपैकी भेटीच्या दिवशी उपस्थित असणाऱ्या मुलांची टक्केवारी | ७०.८ | ८०.७ | ६६.६ | ७२.१ |
| राज्य शासनाकडून शैक्षणिक साहित्याचा संच प्राप्त झालेल्या अंगणवाड्या | ७०.७ | ७०.१ | ८१.१ | ७२.८ |
| शैक्षणिक साहित्याचा संच सन २०१५-१६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अंगणवाड्या | ६८.१ | ७०.७ | ७२.६ | ७०.० |
| शैक्षणिक साहित्याचा संच पुरेशा प्रमाणात प्राप्त झालेल्या अंगणवाड्या | ३७.० | ४४.९ | ४१.१ | ४०.५ |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सर्वसाधारण

- सुमारे ४४ टक्के अंगणवाड्यांमध्ये टेबल, खुर्च्या, पुस्तके, खडू, फळा इत्यादी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होते.
- मागील वर्षभरात सुमारे ६४ टक्के अंगणवाड्यांना वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या होत्या.
- सुमारे ७ टक्के अंगणवाड्यांना कार्पोरेट सामाजिक दायित्व (CSR) अंतर्गत मदत मिळाली होती तर ५ टक्के अंगणवाड्यांना स्वयंसेवी संस्थांकडून मदत मिळाली होती.

## अंगणवाडी सेविकांबाबत

- ग्रामीण भागातील ९१ टक्के पेक्षा जास्त व आदिवासी भागातील ८८ टक्के अंगणवाडी सेविका त्याच गावात राहणाऱ्या होत्या तर नागरी भागातील ९१ टक्के पेक्षा जास्त अंगणवाडी सेविका त्याच स्थानिक भागातील होत्या.
- अंगणवाडी सेविकेस सरासरी १२ वर्षांचा अनुभव होता.
- शैक्षणिक पात्रतेनुसार अंगणवाडी सेविकांची टक्केवारी तक्ता ११.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ११.५ अंगणवाडी सेविकांची शैक्षणिक पात्रतेनुसार टक्केवारी**

(टक्के)

| शैक्षणिक पात्रता | ग्रामीण | आदिवासी | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| दहावी पेक्षा कमी | २०.४ | ३८.१ | ३.० | २२.३ |
| दहावी व त्यापेक्षा अधिक | ७९.६ | ६१.९ | ९७.० | ७७.७ |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

- ग्रामीण व आदिवासी भागातील सुमारे ४४ टक्के आणि नागरी भागातील ६३ टक्के अंगणवाडी सेविकांना वेळेत मानधन मिळत नव्हते.
- जवळपास सर्व अंगणवाडी सेविकांनी मानधन वाढीबाबत व आहाराचा दर्जा सुधारावा याबाबत सुचना केली.
- समस्यांबाबत अंगणवाडी सेविकांनी नोंदविलेली टक्केवारी तक्ता ११.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ११.६ समस्यांबाबत अंगणवाडी सेविकांनी नोंदविलेली टक्केवारी**

(टक्के)

| समस्या | ग्रामीण | आदिवासी | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| कामाचा अतिरिक्त भार | ७३.० | ८८.६ | ७२.६ | ७८.० |
| सहायक परिचारिका यांच्याशी समन्वयाबाबत समस्या | ४.३ | ६.१ | ५.६ | ५.१ |
| इतर कार्यक्रमातील व कामातील सहभाग | ३९.१ | ४९.७ | ४०.४ | ४२.९ |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मिनी-अंगणवाड्यांविषयी

- सुमारे ४१ टक्के ग्रामीण आणि ३३ टक्के आदिवासी मिनी-अंगणवाड्या या राज्य शासन/ ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेत कार्यरत होत्या तर सुमारे २० टक्के ग्रामीण आणि नऊ टक्के आदिवासी मिनी-अंगणवाड्या भाडेतत्वावरील जागेत होत्या.
- सुमारे ८४ टक्के ग्रामीण व ६१ टक्के आदिवासी मिनी-अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम पक्क्या / अर्ध पक्क्या स्वरूपाचे होते. सुमारे पाच टक्के ग्रामीण व २३ टक्के आदिवासी मिनी-अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम कच्च्या स्वरूपाचे होते आणि ११ टक्के ग्रामीण व १५ टक्के आदिवासी मिनी-अंगणवाड्या मोकळ्या जागेवर चालविल्या जात होत्या.
- सुमारे ३० टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये नळ, ३० टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये हातपंप व २७ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये विहीर हा पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत होता.
- सुमारे ४६ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालयांची सुविधा उपलब्ध होती.
- सुमारे ३५ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये साठवणूकीसाठी स्वतंत्र जागा व २९ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर उपलब्ध होते.
- सुमारे ६६ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये अंतर्गत जागा पुरेशी होती व सुमारे ६८ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये पुरेसा मोकळा परिसर उपलब्ध होता तर सुमारे ३० टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये बैठ्या खेळांचे सामान उपलब्ध होते.
- मिनी-अंगणवाड्यांमध्ये नोंदणी केलेल्या सुमारे ९० टक्के गर्भवती स्त्रियांना आणि ९६ टक्के मुलांना पुरक पोषण आहार मिळाला होता आणि ९३ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये पुरक पोषण आहार नियमितपणे उपलब्ध करून देण्यात येत होता.
- सुमारे ६८ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये सुस्थितीतील वजन काटा उपलब्ध होता.
- सुमारे ९३ टक्के मिनी-अंगणवाड्यांमध्ये उंची व वजन वाढ दर्शविणारा तक्ता आढळून आला.

* * * * *

# व्याख्या सूची

## लोकसंख्या

**मुख्य कामगार :** संदर्भ कालावधीत ६ महिन्यांपेक्षा जास्त दिवस (१८० दिवस) काम केलेल्या कामगारांना मुख्य कामगार असे म्हणतात.

**सीमांतिक कामगार :** संदर्भ कालावधीत ६ महिन्यांपेक्षा कमी दिवस (१८० दिवस) काम केलेल्या कामगारांना सीमांतिक कामगार असे म्हणतात.

**कामाच्या शोधात/कामासाठी उपलब्ध व्यक्ती :** ज्या व्यक्तीकडे काम नाही, काम केलेले नाही तथापि रोजगार विनिमय केंद्र, मध्यस्थ, मित्र अथवा नातेवाईक यांच्यामार्फत किंवा संभाव्य नियोक्त्यांना अर्ज करुन सद्य:स्थितीतील उपलब्ध काम व त्याचा मेहनताना विचारात घेऊन कामाची मागणी करीत आहे, काम करण्याची इच्छा किंवा कामासाठी उपलब्धता दर्शविली आहे, अशी व्यक्ती.

**श्रमशक्ती :** काम करणाऱ्या (रोजगार असलेल्या) व कामाच्या शोधात किंवा कामासाठी उपलब्ध असणाऱ्या (बेरोजगार) व्यक्ती मिळून श्रमशक्ती तयार होते.

**कार्यशक्ती (रोजगार असलेले) :** आर्थिक कार्यात गुंतलेल्या (रोजगार असलेल्या) व्यक्ती मिळून कार्यशक्ती तयार होते.

**कार्य सहभाग दर :** एकूण काम करणाऱ्यांचे (मुख्य + सीमांतिक) एकूण लोकसंख्येशी टक्केवारी म्हणजे कार्य सहभाग दर होय.

$$\text{कार्य सहभाग दर :} \quad \frac{\text{एकूण काम करणारे (मुख्य + सीमांतिक)}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

(जनगणना २०११ मधील व्याख्येनुसार)

**श्रमशक्ती सहभाग दर :** दर हजार व्यक्तींपैकी श्रमशक्तीतील (ज्या मध्ये काम करणारे व बेरोजगार या दोन्हींचा समावेश होतो) व्यक्तींची संख्या म्हणजे श्रमशक्ती सहभाग दर होय.

$$\text{श्रमशक्ती सहभाग दर :} \quad \frac{\text{(काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या + बेरोजगार व्यक्तींची संख्या)}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १०००$$

**काम करणाऱ्यांचे लोकसंख्येशी प्रमाण :** दर हजार व्यक्तींपैकी काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या म्हणजे काम करणाऱ्यांचे लोकसंख्येशी प्रमाण होय.

$$\text{काम करणाऱ्यांचे लोकसंख्येशी प्रमाण:} \quad \frac{\text{काम करणा-या व्यक्तींची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १०००$$

(श्रम केंद्र, भारत सरकार यांनी वापरलेल्या संज्ञेनुसार)

**बेरोजगार दर :** श्रमशक्तीतील दर हजार व्यक्तींमधील बेरोजगार व्यक्तींची संख्या म्हणजे बेरोजगार दर होय.

$$\text{बेरोजगार दर :} \quad \frac{\text{बेरोजगार व्यक्तींची संख्या}}{\text{(काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या + बेरोजगार व्यक्तींची संख्या )}} \times १०००$$

**नित्य मुख्य कार्य स्थिती :** पाहणीच्या दिवसापूर्वी मागील ३६५ दिवसात एखादी व्यक्ती तुलनेने ज्या कार्यस्थितीवर जास्त वेळ कार्यरत असते त्यास नित्य मुख्य कार्य स्थिती असे संबोधले जाते.

## जन्म-मृत्यु सांख्यिकी

**जन्म दर :** दर हजार व्यक्तींमागे त्या वर्षातील जीवित जन्मांची संख्या

**मृत्यू दर :** दर हजार व्यक्तींमागे त्या वर्षातील मृत्यूंची संख्या

**अर्भक मृत्यू दर :** दर हजार जीवित जन्मांमागे अर्भकांच्या (एक वर्ष किंवा त्यापेक्षा लहान) मृत्यूंची संख्या

**नवजात मृत्यू दर :** चालू वर्षातील जीवित जन्मांमागे २८ दिवसांपेक्षा कमी वय असलेल्या नवजात शिशुंच्या मृत्यूंची संख्या

**माता मृत्यू :** कोणत्याही स्त्रीचा मृत्यू गरोदरपणात किंवा गरोदरपणाची समाप्ती झाल्यानंतर ४२ दिवसांच्या आत, गर्भधारणेची जागा किंवा गरोदरपणाच्या कालावधीचा विचार न करता गरोदरपणाशी संबंधित कारणाने किंवा ज्याची गरोदरपणामुळे किंवा त्याच्या व्यवस्थापनामुळे तीव्रता वाढेल अशा कारणाने झालेला मृत्यू परंतु अपघाती व प्रासंगिक कारणे यामधून वगळण्यात यावीत.

**माता मृत्यू प्रमाण :** संबंधित वर्षामध्ये गरोदरपणाची गुंतागुंत किंवा प्रसुती दरम्यान गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे प्रति १००,००० जीवित जन्मांमागे त्या वर्षातील स्त्रियांच्या मृत्युंची संख्या

$$\text{माता मृत्यू प्रमाण :} \quad \frac{\text{एका ठराविक कालावधीमध्ये झालेले एकूण माता मृत्यू}}{\text{त्याच कालावधीमध्ये झालेले एकूण जिवंत जन्म}} \times १००,०००$$

**एकूण जनन दर :** स्त्रीच्या संपुर्ण प्रजनन कालावधीमध्ये स्त्रीला होणारी सरासरी मुले

## शिक्षण

$$\textbf{एकूण प्रवेश प्रमाण :} \quad \frac{\text{विशिष्ट शैक्षणिक स्तरामधील विद्यार्थ्यांची पटसंख्या}}{\text{विशिष्ट शैक्षणिक स्तराकरिता अधिकृत वयोगटातील लोकसंख्या}} \times १००$$

$$\textbf{स्त्री-पुरूष असमानता निर्देशांक :} \quad \frac{\text{मुलींच्या एकूण प्रवेशाचे प्रमाण}}{\text{मुलांच्या एकूण प्रवेशाचे प्रमाण}}$$

**विशेष गरजा असलेली मुले :** विशेष गरजा असलेली मुले म्हणजे दृष्टीदोष, श्रवणदोष, हालचाल दोष, आकलनदोष, सेरेब्रल पाल्सी किंवा मतिमंदत्व यांसारख्या रोगाने पिडीत असलेली सर्व मुले होय.

**वार्षिक सरासरी गळतीचे प्रमाण :** वार्षिक सरासरी गळतीचे प्रमाण हे २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षांची इयत्तानिहाय पटसंख्या व इयत्तानिहाय २०१५-१६ या वर्षाची पुन:परीक्षार्थ्यांची संख्या विचारात घेऊन यु-डीआयएसईमध्ये परिगणित करण्यात आले आहे.

**शिक्षण विकास निर्देशांक परिगणित करण्याकरीता वापरलेले चल**

| *घटक* | *निर्देशक* |
|---|---|
| ***उपलब्धता*** | दर दहा चौकिमी मागील शाळांची घनता |
| | दर हजार मुलांच्या संख्येमागे शाळांची उपलब्धता |
| | प्राथमिक शाळांचे उच्च प्राथमिक शाळांशी/तुकड्यांशी प्रमाण |
| ***पायाभूत सुविधा*** | विद्यार्थी-वर्गखोल्या यांचे प्रमाण : प्राथमिक >३० आणि उच्च प्राथमिक > ३५ असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | वर्गखोल्या-शिक्षक यांचे प्रमाण : १ :१ असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | पिण्याच्या पाण्याची सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | मुलांसाठी स्वच्छतागृहे असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | मुलींसाठी स्वच्छतागृहे असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | नि:समर्थांसाठी उतार आवश्यक व उपलब्ध असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | स्वयंपाकघर असलेल्या शाळांची टक्केवारी (शासकीय/अनुदानित शाळा) |
| ***शिक्षक*** | शिक्षिका असलेल्या शाळांची टक्केवारी (दोन किंवा अधिक शिक्षक असलेल्या शाळांमध्ये) |
| | विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण : प्राथमिक > ३० आणि उच्च प्राथमिक > ३५ असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | एकच शिक्षक असलेल्या शाळांची टक्केवारी |
| | व्यावसायिक शैक्षणिक अर्हता नसलेले शिक्षक |
| ***फलनिष्पत्ती*** | सरासरी अध्यापन दिवसांची संख्या |
| | शिक्षकांचे सरासरी शिकवणी तास |
| | शासकीय शाळांतील मागील वर्षाच्या तुलनेत प्रवेशित विद्यार्थ्यांमधील शेकडा बदल |
| | स्थूल प्रवेश प्रमाण |
| | अनुसूचित जातींच्या मुलांचा सहभाग : अनुसूचित जाती लोकसंख्येची टक्केवारी (२०११ जनगणनेनुसार)- अनुसूचित जाती पटसंख्या टक्केवारी |
| | अनुसूचित जमातींच्या मुलांचा सहभाग : अनुसूचित जमाती लोकसंख्येची टक्केवारी (२०११ जनगणनेनुसार)- अनुसूचित जमाती पटसंख्या टक्केवारी |
| | मुस्लिम मुलांचा सहभाग : मुस्लिम लोकसंख्येची टक्केवारी (२०११ जनगणनेनुसार)- मुस्लिम पटसंख्या टक्केवारी |
| | मुलींच्या प्रवेशाचे मुलांच्या प्रवेशाशी प्रमाण |
| | गळतीचे प्रमाण |
| | प्राथमिक स्तरामधून उच्च प्राथमिक स्तरामध्ये संक्रमण दर |

## आर्थिक

**देशांतर्गत स्थूल उत्पन्न** : कोणत्याही भौगोलिक सीमांकित क्षेत्रातील विशिष्ट कालावधीमध्ये (साधारणपणे एक वर्ष) निर्माण झालेल्या सर्व वस्तू व सेवांचे (द्विरुक्ती टाळून) चलनाच्या स्वरुपात केलेले मोजमाप. सर्वसाधारणपणे भौगोलिक क्षेत्र म्हणजे देश. जर भौगोलिक क्षेत्र राज्य असेल तर त्यास स्थूल राज्य उत्पन्न आणि जर भौगोलिक क्षेत्र जिल्हा असेल तर त्यास स्थूल जिल्हा उत्पन्न असे संबोधले जाते.

**स्थूल मूल्यवृद्धी (मूळ किंमतींनुसार)** : कर्मचाऱ्यांची भरपाई + व्यवस्थापन अधिक्य / मिश्र उत्पन्न + स्थिर भांडवलाचा घसारा + उत्पादन कर वजा उत्पादन अर्थसहाय्य

**देशांतर्गत स्थूल उत्पन्न (बाजार किंमतींनुसार)** : प्रत्येक उद्योगापासून तयार करण्यात आलेल्या मूळ किंमतींनुसार स्थूल मूल्यवृद्धी + आयात शुल्कांसह उत्पादनावरील कर वजा उत्पादनावरील अनुदान

निव्वळ उत्पन्नाची जसे **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न, निव्वळ राज्य उत्पन्न व निव्वळ जिल्हा उत्पन्न** परिगणना करतांना संबंधित स्थूल उत्पन्नातून स्थिर भांडवलाचा घसारा वजा करण्यात येतो.

**स्थूल राष्ट्रीय उत्पन्न** : देशांतर्गत स्थूल उत्पन्नात विदेश व्यवहारातील देवाण-घेवणातील फरकाचा समावेश करुन स्थूल राष्ट्रीय उत्पन्न परिगणित करण्यात येते.

**निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न** : स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामधून स्थिर भांडवलाचा घसारा वजा करुन निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न परिगणित करण्यात येते. यास राष्ट्रीय उत्पन्न असेही संबोधले जाते.

दरडोई उत्पन्न (राष्ट्रीय दरडोई उत्पन्न, राज्य दरडोई उत्पन्न आणि जिल्हा दरडोई उत्पन्न) हे संबंधित भौगोलिक क्षेत्राच्या निव्वळ उत्पन्नाला मध्यावधी लोकसंख्येने भागून परिगणित करण्यात येते.

**आगाऊ अंदाज** म्हणजे उपलब्ध अनुरुप/प्रतिनिधिक निर्देशक वापरुन केलेले अंदाज.

**ग्राहक वस्तू :** स्वत:च्या व कुटुंबाच्या वापरासाठी ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तू.

**मध्यम तयार माल :** दुसऱ्या वस्तू तयार करण्याकरिता वापरात येणाऱ्या वस्तू.

**भांडवली वस्तू :** वस्तू तयार करण्यात येणारी यंत्रे, इत्यादि.

